ॐ नमो भगवते दत्तात्रयाय ।



त्रैमासिक

# श्रीवासुदेव निवास

( पंथराज सह )

श्रीवासुदेव निवास
(पंथराजसह) त्रैमासिक
वर्ष २१ वे,
आषाढ शुद्ध पौर्णिमा
आणि
आश्विन शुद्ध पौर्णिमा
शके १९२०,
९ जुलै ९८ आणि
५ ऑक्टोबर ९८ -
८३ व ८४ वा जोडअंक.




# श्रीवासुदेव पत्रबोध संग्रह

संकलन :
श्री. वासुदेव गोविंद चोरघडे,
नागपूर

प्रकाशक :
प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर,
पुणे

प्रस्तावना :
डॉ. गुणाकर वामन पिंपळापुरे,
नागपूर



श्री वासुदेव पत्रबोध संग्रहाचे प्रेरणास्थान

या पत्रबोध संग्रहाचा प्रारंभ इ.स. १९६० साली प. पू. श्री गुळवणी महाराज यांनी श्री. पिंपळापुरे यांना आपल्या संग्रहातील पत्रांच्या नकला पाठवून केला आहे.

॥ श्रीगणेशदत्तगुरुभ्यो नमः ॥



भक्त्या पारायणैरेव दत्तात्रेयो जगद्गुरुः ।
दत्त्वाच मस्तके हस्तं शक्तिपातं करोति हि ॥
द्विसाहस्त्री.

# श्रीवासुदेव निवास

## (पंथराज सह)

महायोग चिंतनाचे सुबोध त्रैमासिक

" यत्र शक्तिर्न पतति – तत्र सिद्धिर्न भवति "- सूत संहिता.

- संस्थापक : योगिराज श्रीसद्गुरु गुळवणी महाराज
- संचालक : ब्रह्मश्री ज्ञानयोगी श्रीदत्तमहाराज कवीश्वर

गुरो तुझी ही पदवारिधारा । धुवो सदा कायिक दोष सारा ॥
सदैव माझे मन वाणि शुद्ध । करो तुझे नाम पवित्र सिद्ध ॥

वर्ष २१ वे ) श्रीवासुदेव पत्रबोधसंग्रह ( अंक ८३-८४
आषाढ व अश्विन पौर्णिमा – जोडअंक

जोडअंकाची किंमत रु. ३५/-) आजीव सदस्य वर्गणी रु. ४०० ( वा. व. रु. ६०/-

श्रीवासुदेव निवास प्रकाशन, पुणे ४
पत्रव्यवहाराचा पत्ता : श्रीवासुदेव निवास, ४२/१७ एरंडवणे, कर्वे पथ, पुणे ४११ ००४.

# अंतरंग


- संपादकीय — अ. सि. पोटभरे .................... ३
- संकलकाचे निवेदन — वासुदेव गोविंद चोरघडे........... ५
- प्रस्तावना — डॉ. गुणाकर वामन पिंपळापुरे .... ८
- आशयशीर्षकासह पत्रान्तरंग .............................. २७
- **पत्रांचे विषयानुरुप विभाग**
  - १. प्रासंगिक सूचना .............................. २७
  - २. दत्तसंप्रदाय व्यापक .............................. ३२
  - ३. व्यवहार दक्षता .............................. ३२
  - ४. ग्रंथरचना संबंधी उल्लेख .............................. ३२
  - ५. औषधयोजना – व्याधीमुक्तीचे उपाय .............................. ३४
  - ६. ज्योतिष विषयक .............................. ३५
  - ७. योग-अभ्यास-साधना .............................. ३५
  - ८. स्वप्नार्थ बोधक .............................. ३६
  - ९. श्रीस्वामी शिष्यांच्या पत्रातील प्रेरक अंश .............................. ३७
- श्री स्वामींची पत्रे .............................. ३८
- श्री स्वामींच्या पत्रासंबंधी मनोगत — वासुदेव चोरघडे ............... १४४
- श्रीस्वामींचे चातुर्मास .............................. १४७
- श्रीस्वामींचे भारतभ्रमण - नकाशा .............................. १४८
- ग्रंथ निर्मितीची स्थळे .............................. १४९
- सर्व उपदेशाचे सार .............................. १५१
- श्रीस्वामींचे हस्ताक्षर .............................. १५२
- मानसपूजा — द. श्री. सबनीस .............. १५३



संपादक : **अच्युत सिद्धनाथ पोटभरे**, एम्. ए. बी. एड. सहकारनगर नं २, पुणे-४११ ००९

कार्यकारी संपादक : **श्रीमती सुशीला मोडक**, सदाशिव पेठ, पुणे.

प्रकाशक : **श्री. दत्तात्रेय धुंडिराज कवीश्वर,** प्रमुख विश्वस्त
श्री वासुदेवानंदसरस्वती स्वामीमहाराज व
श्री लोकनाथतीर्थ स्वामीमहाराज ट्रस्ट, ४१/१७ एरंडवन, पुणे ४.

मुद्रण स्थळ : **रत्नाकर गो. जोशी. के. जोशी ॲन्ड को.**
ब्लॉक मेकर्स ॲन्ड ऑफसेट प्रिन्टर्स, १७४५/२ सदाशिव पेठ, पुणे ३०



**(सर्व हक्क प्रकाशनाधीन)**


॥ श्री गुरूः शरणम् ॥

**जगद्‌गुरू श्रीभगवान् दत्तप्रभूंचे चरणी**

# समर्पण



तया सर्वात्मका ईश्वरा ।
स्वकर्म कुसुमांची वीरा ।
पूजा केली होय अपारा ।
तोषालागी ॥ ज्ञा. १८/९१९

भरोनि सद्‌भावाची अंजुळी ।
मियां ओविया फुले मोकळी
अर्पिली अंघ्रि युगुली ।
विश्वरूपाच्या ॥ ज्ञा. ११/७०८

Gowdatt Vyas श्री शंकराचार्य जयंती 06.05.2022

# श्रीवासुदेव पत्रबोधसंग्रह

**प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज यांनी**
**शिष्य-भक्तादिंना लिहिलेली सुमारे ३०० पत्रे**

उपासना – योगसाधना – औषधयोजना – ज्योतिष – व्यवहार
दक्षता – प्रासंगिक विषय – स्वप्नार्थबोध – आचारबोध –
ग्रंथरचनासंदर्भ – दत्तसंप्रदायाची व्यापकता आदि अनेक
विषयांना स्पर्श केलेल्या पत्रांचा निःसंदिग्ध मार्गदर्शक – प्रेरक
"श्रीवासुदेव पत्रबोधसंग्रह."


**• प्रकाशक •**

प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर
श्रीवासुदेव निवास, पुणे ४.

**• संकलक •** **• प्रस्तावना •**

श्रीवासुदेव गोविंद चोरघडे डॉ. श्री. गु. वा. पिंपळापुरे
नागपूर नागपूर



**सर्व हक्क प्रकाशनाधीन**



**• प्रकाशन दिन •**

**प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज पुण्यतिथी**

आषाढ शु १ - शके १९२०
गुरूवार दि. २५ जून १९९८

# संपादकीय

**ध्यानमूलं गुरोर्मूर्ति: पूजामूलं गुरोःपदम् ।**
**मंत्र मूलं गुरोर्वाक्यं मोक्षमूलं गुरोःकृपा ॥**

प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामी महाराज यांच्या पुण्यतिथीच्या पर्वकाळात - आषाढ शुद्ध प्रतिपदेस - श्रीवासुदेवपत्रबोधसंग्रह - हा विशेषांक ग्रंथरुपाने श्रीवासुदेव निवासाद्वारे प्रकाशित होत आहे हा साश्चर्य आनंदाचा धक्का सर्वांनाच सुखद वाटणारा आहे, ईश्वरी कार्य अनाकलनीय असते याचा प्रत्ययदेणारी ही घटना आहे. पूर्वनियोजित नसताना श्री स्वामीमहाराजांचा पत्रसंग्रह आपलेकडून प्रकाशित व्हावा ही श्रीस्वामींचीच नियोजनपूर्वक व्यवस्था आणि परम कारुणिक कूर्म कृपादृष्टी आहे, आमचे पूर्व नियोजन असते तर तसा उल्लेख मागील अंकात करता आला असता. मागील अंक प्रकाशित झाल्यानंतर या संदर्भाच्या घटनांना गती आली आणि प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर यांच्या अमोघ कृपाशीर्वादाने आज **' श्रीवासुदेव पत्रबोधसंग्रह ग्रंथ '** वाचकांच्या हाती देण्याचे सौभाग्य लाभत आहे.

त्याचे असे झाले की, नागपूरहून श्रीस्वामींचे अनन्यभक्त श्री वासुदेवराव चोरघडे यांनी त्यांच्या संग्रहातील श्रीस्वामींची पत्रे छापून, त्याला श्रीस्वामींच्या वाङ्मयाचे थोर अभ्यासक डॉ. गु. वा. पिंपळापुरे यांची विस्तृत प्रस्तावना मिळवून, हे सर्व तयार छापील बाड रजिस्टर पार्सलने आमचेकडे पाठवून दिले. सोबत सविस्तर पत्र पाठविले. '' पू. श्रीदत्तमहाराजांना हे दाखवावे. आपल्या श्रीवासुदेव निवासातर्फे प्रकाशित करण्यास अत्यंत योग्य असे वाङ्मय आहे. आम्ही सर्व पूर्व तयारी करून D. T. P. ची एक छापील पत्र पाठवित आहोत. पत्रे विषयवारीने विभागून - प्रत्येक पत्रातील आशयानुसार योग्य शीर्षक देऊन - संकलकाचे निवेदन व डॉ. पिंपळापुरे यांची प्रस्तावना जोडून पाठवित आहोत. श्रीस्वामीमहाराजांच्या पुण्यतिथीला प्रकाशित झाल्यास उत्तम. '' श्रीदत्तप्रभूंनी घेवड्याच्या शेंगांचा वेल उपटून दरिद्री विप्राला धनाचा हंडा देऊन संपन्न केले अशातला हा प्रकार झाला. श्री वासुदेवराव चोरघडे आणि डॉ. श्री. नानासाहेब पिंपळापुरे या उभयतांची मातृपितृदैवते श्रीस्वामीमहाराजांचे कृपानुग्रहीत असल्याने स्वामीभक्तीच यांच्या रुपाने प्रगट झाली आहे. या स्वामीभक्तांच्या हृदयात श्री स्वामीमहाराजांप्रमाणेच पू. श्री वामनरावजी गुळवणी महाराज, पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज आणि श्रीवासुदेव निवास यांचेबद्दल अपार श्रद्धा आहे. त्या श्रद्धेने त्यांनी आपल्या सेवेचा नजराणा श्रीवासुदेव निवासाला समर्पित केला आहे. याबद्दल आम्ही त्यांचेबद्दल आत्मीयतेने कृतज्ञ आहोत. त्यांच्या या सेवेचे फळ देणारे श्रीस्वामीमहाराज समर्थ आहेत.

इकडे पत्र संग्रह आल्यावर पू. श्रीदत्तमहाराज यांना दाखविला. माहिती दिली. तेव्हा अत्यंत प्रसन्नतेने आणि उत्स्फूर्तपणे म्हणाले, '' हा विशेषांकच काढावा. '' सर्व विश्वस्तांच्यासमोर हे सांगितले. सर्वांनाच समाधान झाले आणि **' सर्वेषां अविरोधेन '** हे अपूर्व कार्य घडून येत आहे. श्रीस्वामींची पुण्यतिथी आषाढ शु. प्रतिपदेस असते. श्रीगुरुपौर्णिमा आषाढ पौर्णिमेस आपला अंक निघतो तो या निमित्त पंधरा दिवस आधीच प्रकाशित करून ही पर्वणी साधित आहोत. श्रीवासुदेव निवास त्रैमासिक '' श्रीवासुदेव पत्रबोध संग्रह प्रकाशित करून सर्वांना नवचैतन्य देत आहे. श्री स्वामी कृपेने दरवर्षी श्रीस्वामीमहाराजांच्या वाङ्मयकृतीचा एखादा विशेषांक निघत गेल्यास श्री स्वामी महाराजांच्या वाङ्मयाचा प्रसार अधिक वाढता राहील. श्रीवासुदेवनिवासच्या ध्येयधोरणातील हे महत्त्वाचे कार्य कार्यान्वित होत राहावे असाहि विचार औचित्यपूर्ण ठरेल.

**' श्रीवासुदेव पत्रबोधसंग्रह '** हा नेहमीच्या अंकापेक्षा अधिक पृष्ठांचा ग्रंथरुपात-असल्याने आणि किंमतीच्या दृष्टीने दोन अंकांच्या किंमतीएवढा असल्याने जवळजवळ दोन अंकांचा हा एक ग्रंथ केला आहे. सभासदांना त्रैमासिकांच्या वर्गणीत हा ग्रंथ मिळेल. स्वतंत्र ग्रंथ म्हणून विक्रीस राहील. त्याची किंमत वाजवी राहील.

कोजागिरी पौर्णिमेचा अंक ४८ पृष्ठांचा असेल व त्यामध्ये प. पू. श्रीसद्‌गुरु गुळवणी महाराज यांच्या २५ व्या पुण्यतिथी संबंधीच्या सूचना - अन्य निवेदने आदि निवेदने राहतील. तरी पूर्व सूचना म्हणून येथेही त्यासंबंधी थोडे लिहितो.

**श्रीसद्‌गुरु योगिराज श्रीवामनरावजी गुळवणी महाराज यांची २५ वी पुण्यतिथी दि. ९ जाने १९९९ रोजी येत आहे.** तत्पूर्वी दि. ३-१-९९ पासून पुण्यतिथी महोत्सव सुरु होईल. यज्ञयाग - पारायणे - होमहवन आदि धार्मिक कार्यक्रम सकाळी श्रीवासुदेव निवासात होतील आणि भजन - प्रवचन - कीर्तनादि कार्यक्रम दुपारपासून सांयंकाळपर्यंत श्रीवामन निवासात होतील. हे कार्यक्रम निश्चित झाल्यावर अंकातून आणि स्वतंत्र निमंत्रण पत्रिकेतून प्रसिद्ध होतील.

या विशेष पुण्यतिथी पर्वासाठी काही विशेष सूचना-कल्पना वा कार्यक्रम भक्तमंडळींकडून लेखी - पत्रादि द्वारे ६ सप्टेंबर - भागवत् सप्ताह समाप्तीपर्यंत आल्यास त्याचा विचार ' पुण्यतिथी महोत्सव समिती ' तर्फे होऊन शक्यतेनुसार त्यांचा स्वीकार होईल. समितीला अशा सूचनांमुळे चालना मिळेल.

**' योगीराज विशेषांक '** यामध्ये केवळ श्रीसद्‌गुरु गुळवणी महाराज यांच्या विविध अलौकिक गुणदर्शनाचे लेख राहतील. लेख-काव्याची निवड समिती ठरवील. मान्यवर अधिकारी - व्यक्तींचे लेख मिळविण्याचा प्रयत्न राहील. त्यासाठी आम्हास सूचना केल्यास आम्ही त्यांचेशी संपर्क साधू.

श्रीवासुदेव निवासचे हे स्वरुप लक्षात घेऊन या साधन परंपरेतील सर्वही साधक भक्तांनी या त्रैमासिकाचे केवळ वर्गणीदारच नव्हे तर आजीव सदस्य व्हावे अशी प्रेरणा श्रीसद्‌गुरुंनी सर्व साधक भक्तादिंना द्यावी ही प्रार्थना.

**अ. सि. पोटभरे**

# श्रीवासुदेव पत्रबोध-संग्रह

## संकलकाचे निवेदन

**वासुदेव गोविंद चोरघडे,**
**नागपूर**

श्री. प. प. वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांची ग्रंथ-रचना प्रचंड आहे. त्यातीत बराच भाग प्रकाशित झाला आहे. त्यांच्या अप्रकाशित वाङ्मयातील महत्त्वाचा भाग म्हणजे त्यांनी साधकांना, उपासकांना वेळोवेळी लिहिलेली पत्रे. त्यांतून अनेक विषयांचे मार्गदर्शन झाले आहे. ज्ञान, कर्म उपासना, प्रापंचिक दुःखातून मुक्तीचे उपाय, ज्योतिषविषयक मार्गदर्शन, व्याधिग्रस्तांसाठी सुचविलेली औषधयोजना, योगसाधनेतील अडचणींच्या निराकरणाचे उपाय इत्यादी अनेक विषयांचे नेमके मार्गदर्शन या पत्रातून झाले आहे. स्वामींचे हे पत्ररूप चरित्रच आहे. त्यांच्या भारत-भ्रमणाच्या काळात आलेले विविध अनुभव. तत्कालीन समाजस्थिती याचा अक्षर आलेख या पत्रातून उतरला आहे. त्या व्यतिरिक्त अत्यंत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे या चार चार ओळींच्या पत्रांनी अनेक अधिकारी साधक निर्माण केले आहेत. या आधारावर जीवनातील विविध दुःखांना समर्थपणे पेलणारी साधक मंडळी निर्माण केली आहेत. ही पत्रे म्हणजे स्वामी महाराजांचा अक्षर प्रसाद म्हणून अनेकांनी जपली. ती आजही अनेकांना मार्गदर्शक ठरणारी आहेत. महाराजांच्या प्रत्यक्ष अनुग्रहाचा लाभ न झालेल्यांना सुद्धा प्रत्यही मार्गदर्शन करणारी, आधार वाटणारी ही पत्रे आहेत.

**सदा संतापाशी जावे । त्यांचे जवळी बैसावे ।**
**उपदेश ते न देती । तरी ऐकाव्या त्या गोष्टी**
**तेचि उपदेश होती । त्याही कष्ट नष्ट होती ।**
**वासुदेव म्हणे संत । संगे करिती पसंत**

ही पत्रे म्हणजे महाराजांचे सान्निध्य देणारा, उपदेश देणारा, अक्षर निधी आहे.

**सुमारे ३५-४० वर्षांपूर्वी यांतील बऱ्याचशा पत्रांचा संग्रह परम आदरणीय श्री गुळवणी महाराजांचे संग्रही हस्तलिखित स्वरूपात होता.** तो संग्रह पाहून श्री स्वामी महाराजांच्या इतर मंत्रसिद्ध ग्रंथाप्रमाणे हा पत्रसंग्रह हाच नित्य पठनीय ग्रंथच आहे हे जाणवल्याने श्रीस्वामी महाराजांचे भक्त श्री. गु. वा. पिंपळापुरे यांनी ऑगस्ट १९६० मध्ये श्री गुळवणी महाराजांना पत्र पाठवून या पत्रांची हस्तलिखित प्रत पाठविण्याची विनंती केली होती. त्यावर आलेले श्री. गुळवणी महाराजांचे पत्र पुढे दिले आहे.



श्री गुरुःशरणम् पत्र क्रमांक १

५.८.६० २०, नारायण पेठ, पुणे २.

सप्रेम नमस्कार वि. वि.

पत्र व तिकिटे मिळाली. माझी प्रकृती बरी नसल्याने इतकी पत्रे ( १०० फुलस्केप कागद ) उतरून पाठविणे मला शक्य नाही. दुसऱ्याकडून लिहून घेण्यास एक महिना तरी लागेल. तिकिटे ठेवून घेतली आहेत. क. हे. विनंती. एक महिन्यानंतर पत्र पाठवावे.

आपला
**वा. द. गुळवणी**

---

श्री गुरुःशरणम् पत्र क्रमांक २

१४.९.६० २०, नारायण पेठ, पुणे २.

आपले पत्र व १ रु. तिकिटे मिळाली. श्री कवीश्वर यांना आलेले पत्रही मिळाले. लौकरच पत्रांची प्रत करून पाठविण्याची व्यवस्था करतो. माझी प्रकृती बरी नसल्याने काम लौकर करू शकलो नाही. क. हे. वि.

आपला
**वा. द. गुळवणी**

---

( ही दोन्ही पत्रे श्री गुणाकर वामन पिंपळापुरे c/o वा. गो. चिंचाळकर, संती रोड इतवारी नागपूर - २ यांना पाठविलेली होती. त्यानंतर पत्रांची हस्तलिखित प्रत आली. ती आजही श्री. पिंपळापुरे यांच्या संग्रही आहे. त्यांच्या नित्यपाठात आहे. )

याशिवाय नागपूरचे गुरुभक्त श्री गु. त्रिं. जोशी यांनी महाराजांची पत्रे अन्य ठिकाणाहून मिळविली होती. श्री. जोशी यांचे वडील, महाराजांचे अनुगृहीत होते. १९०६ साली बडवाईला त्यांच्या वडिलांना अनुग्रह लाभला होता. श्री. स्वामी महाराजांची उपासना आपला पैतृक कुळाचार म्हणून श्री. जोशी आजही सांभाळत आहेत. असो. पत्रातील विषयानुसार त्यांचे वर्गीकरण प्रथमतः प्रकाशित होत आहे. पत्रांचे विषयवार व कालानुरूप वर्गीकरण करून पत्राला उद्बोधक शीर्षक दिले आहे. आशय लक्षात ठेवण्याच्या दृष्टीने त्याचा निश्चित लाभ होईल. याशिवाय **श्री स्वामी महाराजांच्या पत्रवाङ्मयाचा रसग्रहणात्मक परामर्श घेणारी डॉ. गु. वा. पिंपळापुरे यांची लाभलेली प्रस्तावना हे या संग्रहाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.**

या पत्रांव्यतिरिक्त महाराजांनी वेगवेगळ्या साधकांना दिलेल्या मंत्राचे श्री स्वामी महाराजांचे हस्ताक्षरातील कागद उपलब्ध झाले आहेत. हा अत्यंत मौलिक ठेवा

आहे. तोही यथावकाश प्रकाशित करीत आहोत.

श्री. गु. वा. पिंपळापुरे, श्री. गु. त्र्यं. जोशी यांच्या साहायाशिवाय हा संग्रह तयार झाला नसता. त्यांचा कृतज्ञतापूर्वक ऋणनिर्देश करतो. या कार्यात वे. शा. सं. श्रीकृष्णशास्त्री आर्वीकर - नागपूर येथील श्री वासुदेवानंद सरस्वती वाङ्मय अभ्यासक मंडळाचे प्रमुख आधारस्तंभ यांचेहि मोलाचे सहकार्य लाभले आहे. त्यांचाहि कृतज्ञतापूर्वक उल्लेख अनिवार्य आहे. तसेच श्रीवासुदेव निवास त्रैमासिकाचे संपादक श्री. अच्युतराव पोटभरे यांचे सहकार्य शब्दातीत लाभले आहे. त्यांच्या आत्मीयतेने हा ग्रंथ तातडीने प्रकाशित करण्याची त्यांची तळमळ व ग्रंथाचे सौष्ठवपूर्ण नियोजन या गोष्टी त्यांनी जबाबदारीने पूर्ण केल्या आहेत. श्रीवासुदेव निवासचे ट्रस्टीमंडळ या प्रकल्पाच्या पाठीशी उभे राहिले त्यांचाही कृतज्ञ आहे.

सर्वांत विशेष उल्लेख प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर यांच्या कूर्म कृपादृष्टीने लाभलेला मंगल आशीर्वाद अनिर्वचनीय आहे. **'' दैवं चैवात्र पंचमं ''** हेच ग्रंथ प्रकाशित होण्याचे रहस्य आहे. की जे प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज यांच्या आशीर्वादाने सिद्ध केले. आम्हाला त्यांच्या ऋणात राहण्यात कृतार्थता वाटते. **'' आता कसा हा उपकार फेडू ? का हा देह ओवाळूनि दूर सांडू ? ''** अशी आम्हा ' श्रीदत्तस्वरूप श्रीस्वामींच्या भक्तांची स्थिती आहे. आम्ही सर्व निमित्तमात्र आहोत. आपली कर्तृम-अकर्तृम् शक्ती हे घडवित असते. आपली ही परम कारुणिक कृपा आम्हा सर्वांवर अखंड राहो एवढीच श्रीचरणाजवळ प्रार्थना आहे.

प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज यांचा या संग्रहासाठी आवर्जून फोटो देणारे श्री दत्तानंद स्वामी, सध्या मंडलेश्वर ( म. प्र ) येथे आहेत. त्यांचेबद्दलची कृतज्ञता व्यक्त करतो.

श्रीवासुदेव पत्रबोध संग्रहाच्या कार्यात ज्ञात अज्ञात अनेक स्वामिभक्तांचे सहकार्य लाभले आहे. त्यांचेबद्दलही श्रीस्वामीचरणी कृपेची प्रार्थना आहे.

अल्पावधीत ग्रंथ मुद्रित करण्याचे कार्य कौशल्याने पूर्ण करणारे श्री. रत्नाकर गोविंद जोशी, ब्लॉक मेकर्स ॲण्ड ऑफसेट प्रिंटर्स, पुणे यांचेबद्दल कृतज्ञता व्यक्त करून हे संकलकाचे निवेदन पूर्ण करतो.

**श्रीस्वामीपद्मभृंग**
**वासुदेव गोविंद चोरघडे**

१६२ शिवकृपा,
अभ्यंकरनगर, नागपूर.



# प्रस्तावना

**डॉ. गु. वा. पिंपळापुरे**
**नागपूर**

प. प. श्री. वासुदेवानंद सरस्वती - ( टेंब्ये ) स्वामी महाराजांचे नाव आता सर्वदूर पोचले आहे. त्यांच्या वाङ्मयातील कार्याची म्हणावी तशी ओळख व प्रसिद्धी नसली तरी त्यांचे नाव माहिती नसणारा, निदान दत्तसंप्रदायात तरी तुरळकच आढळेल. **सुमारे पन्नास वर्षांपूर्वी परमपूजनीय श्री गुळवणी महाराज व परमपूजनीय श्री दत्तमहाराज यांनी श्रीस्वामींची ग्रंथसंपदा व चरित्र प्रकाशित करून फार मोलाचे कार्य करून ठेवले. त्याचा परिणाम म्हणून आज श्री स्वामींचे नाव विश्वतोमुखी झाले.** श्री स्वामींच्या वाङ्मयाचा जसजसा व्यासंग वाढत जाईल तसतशी त्यांची वाङ्मयीन कामगिरी सुद्धा लोकांपुढे प्रकर्षाने येत जाईल. त्याला पूरक असणारी एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे श्रीस्वामींच्या अल्पज्ञात पत्रांचे नव्या स्वरूपात संपादन - प्रकाशन. हे काम अत्यंत निष्ठेने करणारे संत वाङ्मयाचे गाढे अभ्यासक व आपल्या आई-वडिलांपासून श्रीस्वामींवरील निष्ठेचा वारसा लाभलेले परमसुहृद **श्री. वासुदेव गोविंद चोरघडे**. त्यांच्या या उपक्रमाबद्दल आपण सदैव त्यांचे ऋणी राहू.

श्री स्वामींनी संन्यासग्रहण केले त्यावेळी त्यांचे वय छत्तीस वर्षांचेहोते. थोडी सहृदयता सवे घेऊन आज त्या भूतकाळात डोकावता आले तर अंग किंचितसे तरी शहारल्याविना राहणार नाही. पत्नीस सोबत घेऊन व्यक्ती यात्रेला निघाली आहे. कुठे जायचे हे माहीत नाही. परत जायचे आहे की नाही हेही माहीत नाही. उत्तरखंडी जाणे आहे एवढाच संकेत मिळाला आहे. उत्तरखंडात म्हणजे नेमके कुठे हे विचारता येत नाही. कारण सेव्य-सेवकभावात ते बसत नाही. आज्ञासंकेत पाळत राहायचा एवढेच या सेवक-वृत्तीत बसते. उपजीविकेचे साधन प्रतिदिनी नवी नवी भिक्षा. विश्रांतीचे स्थान जिथे सायंकाळ होईल ते. यालाच सायंगृह जीवन म्हणतात. **'' द्यौः पिता - पृथिवी माता ''** असे उघडे जीवन पत्करून एक जोडपे उत्तरखंडी जायला निघते. तोच वाटेत गोदाकाठी गंगाखेड येथे पत्नी आजारी पडते. कुठे आजचे औषध व कुठे पाणी ? यथार्थचित सेवा-शुश्रूषा होते. त्याला प्रतिसाद मिळत नाही. पत्नी निरोप घेते. और्ध्वदेहिक होताच वासुदेव-गणेश टेंब्ये आता वासुदेवानन्द सरस्वती होतात. संसारात थांबायला आता एका क्षणाचीही उसंत नाही. **यदहरेव विरजेत् तदहरेव प्रव्रजेत्** - संसार ज्याक्षणी खऱ्या अर्थाने मनातून उतरेल त्याक्षणी तिथून चालते व्हावे. ही श्रुतीची - आईची आज्ञा. ती पाळायलाच हवी. इथून पुढे दुसऱ्या जीवन-पर्वास आरंभ होतो.

या नव-पर्वारंभापूर्वी पत्नीच्या निधनाची वार्ता संबंधितांना कळविली जाते. पत्राचा हा कित्ता.

वै. व. ३०.१८९३
६ जून १८९१

**" श्रींचे आज्ञेने उत्तरखंडी जाणे होत असता गोदातीरी वै. कृ. १४ शुक्रवारी दुपारी सौभाग्यवतीला देवाज्ञा झाली. क्रिया करून नंतर उत्तरखंडी जाणे होईल. आपण सदैव दत्तनामानुसंधान ठेवावे. .... चि. दत्तू व भलू ( धाकट्या बंधूंची नावे ) यास वरील मजकूर प्रविष्ट व्हावा व इह-पर-भयाने सत्कालक्षेप करावा. मातोश्री आईस मानसिक वंदन असावे. यावर आता भेट होणे प्रारब्धाधीन आहे. परंतु सदैव चरणकमल हृदयी ठेविले आहेत. तेथील सर्व दृष्ट स्पृष्ट कृतोपकार मंडळीचे स्मरण आहे. हा मजकूर ती. बाबाजीपंत गोडे यास (पूर्वाश्रमीचे सासरे - सौ. अन्नपूर्णाबाई टेंब्ये यांचे वडील) प्रविष्ट व्हावा. "**

मोठ्यांची अंतःकरणे कोणत्या तंतूंनी विणली असतील? काही सांगता येत नाही. येथून पुढे और्ध्वदेहिक संपता बरोबर श्रींनी संन्यास स्वीकारला आहे. पण त्याचा इथे जरासाहि संकेत नाही. हेही शक्य आहे, की तत्पूर्वी संन्यासग्रहणाचा संकेत मिळाला नसेल किंवा मिळाला असला तरी तो प्रकट करण्याची आज्ञा नसेल.

प्रस्तुत पत्र श्रींनी श्री नारोपंत उकीडवे, सावंतवाडी यांना लिहिले आहे. दत्तू व भलू या धाकट्या भावांच्या नावाने अथवा गोडे ( सासरे ) यांच्या नावाने पत्र नाही. सावंतवाडी हे मोठे गाव. तेथून हा निरोप त्यांना लवकर पोचेल असा कदाचित त्यांचा विचार असेल.

श्रींची मातोश्रीची भेट यापुढे कधीहि झाली नाही. माणगाव वरून उत्तरखंडी प्रवास सुरू झाला असता मातोश्रींनी कडवटपणानेच निरोप दिला अशी चरित्रात नोंद आहे. त्या घटनेचा पुसटसाही स्पर्श पत्राला नाही. उलट, मातृऋणाची जाणीव आहे. पण, प्रत्यक्ष भेट? ती कोण घेणार? मातृभूमीचे दर्शन यतीने घ्यावे अशी शास्त्राज्ञा आहे खरी, पण मातृभूमी म्हणजे स्व-स्वरूपावलोकन. त्यात माणगावची मातृभूमी कुठे बसेल व आईचे दर्शन तरी कसे होईल? (गुजराथमधून पाठविलेले पत्र)

तारुण्यात पत्नीचा विरह. '**इह तया सह हसितं, कुपितम्** .... (इथे तिच्याबरोबर हसायचे, रागवायचे) अशा उमाळ्यांचा कहर. पण त्या गावचे शिवार इथे दुरूनही दृष्टिपथात येत नाही. पत्नीवर महाराजांचे अतिशय प्रेम होते. तिच्या चांगुलपणाची, उत्तराश्रमात, तुरळक प्रसंगी का होईना, ग्वाही श्रीमहाराजांनी दिली आहे अशी आठवण श्रीमहाराजांचे भक्त, अमरावतीचे श्री. बाळाभाऊ जोशी सांगत. अशा प्रियगुण किंवा अनुगुण पत्नीच्या " **चिरनिवृत्तिप्रसंगी सुद्धा इतरांना सांत्वन - आपण सदैव दत्तनामानुसंधान ठेवावे.** " हे इतरांना सांत्वन -" असे तरी कसे म्हणता येईल? " आपण काय " इतर " असतो? आपण आपलेच असतो. हे दत्तनामानुसंधान इतरांच्या साठी म्हणता येत नाही. " तू तुम्ही " हे शब्द इतरवाचक आहेत. आपण शब्द तसा नाहीच तसा घ्यायचा देखील नसतो. हे " सदैव दत्तनामानुसंधान " श्रींचे स्वतःचेच होते. तो स्वकार आता



त्यांचा मर्यादित राहिला नव्हता म्हणून तो, त्यांच्याबरोबर सर्व संबंधितांना कवेत घेऊ इच्छीत होता.

इथून पुढे श्रीस्वामींच्या चोवीस वर्षाचा वाऱ्यासारखा धावता प्रवास सुरू झाला आहे. अशाही प्रसंगी त्यांना स्मरण आहे ते दृष्ट - स्पृष्ट - कृतोपकार - मंडळीचे. दत्तनामानुसंधानाच्या " एकाहारी " असलेले हे स्मरण आहे हे मात्र विसरले जाऊ नये. हे वाक्य केवळ औपचारिकपणाचे निदर्शक नव्हे. " **श्रीदत्तपुराण ही " श्री स्वामींची महत्त्वाची आकाररचना. तीत आत्मपूजा प्रकरणात " स-त्र " असा शब्द येतो. त्या शब्दाच्या स्पष्टीकरणातच " सज्जनांचे त्राण " करण्याचे मला सामर्थ्य दे असे श्रींनी श्रीदत्ताला विनविले आहे. " " परित्राणाय साधूनाम " या गीतावचनाचा तो पुनरुच्चार होता १) स-त्रं सन्मार्गवर्त्युद्धरणंक्षमं कुरु - श्रीदत्त आत्मपूजा.** अवतार प्रकरणातील हे गीतावचन आहे हे लक्षात आल्यावर " **परित्राणाय साधूनाम " व स-त्रं कुरु '** ही दोन्ही वचने एकार्थक होऊन जातात. श्रीस्वामींचे जीवन हे अवतारजीवन आहे हे लक्षात यायला मग वेळ लागत नाही .... कृतोपकार मंडळीचे स्मरण आहे यातील स्मरण शब्दाचा अर्थ देखील अनकलितपणे " रक्षण " असा होऊन जातो. ज्यांना काही मागायचे नाही " श्री दत्ताला सुद्धा, " **मागू तेची धन। हे तुझे दर्शन। वासुदेवा आन। धन नको** " अशी ज्यांची कडक समजावणी आहे त्यांच्यावर कोण आणि काय उपकार करणार होता? राहायला देवळाची ओसरी सुद्धा ज्यांना चाले मार्गात तेहतीस दिवस भिक्षा न झाली तरी ज्यांचे अडे ना, अशा निःसंगावर कोण कोणता उपकार करू शकणार होता? दर्शन स्पर्शन हाच काय तो उपकार? होय तोच उपकार आणि त्याच्या विनिमयात श्रीस्वामींकडून मिळणार ते **स्मरण म्हणजेच कृपारक्षण.**

श्रीस्वामींच्या पत्रातील अक्षरांची नाती अशी दूरवर पोचली आहेत. दिसायला सहज व सोपारी असली तरी दूरदूर ती वेल्हावत आहेत हे भान ठेवूनच त्या अक्षरांची सोबती आपल्याला करायची आहे. श्रींच्या उत्तर जीवनाच्या वेशीवरचेच हे पत्र असल्याने त्याकडे सर्व वाचकांनी मुद्दामच अधिक लक्ष द्यायला हवे त्यासाठी हे थोडे अधिक लिहिले.

"**श्रींच्या आज्ञेने**" हे या पत्रातील शब्द फार सूचक होते. माणगावचे श्रीमहाराजांचे जीवन त्याच परिसरापुरते सीमित राहू नये हे श्रींच्या मनात होते हे श्रीस्वामींच्या उत्तर-जीवनातील लेखा - जोखा पाहिल्यानंतर आता लक्षात येते. माणगाव हे श्रींच्या वास्तव्यात एका तीर्थक्षेत्राच्या स्वरूपात आकारत होते. भाविकांची पावले आपले आर्त - निवारणासाठी माणगावकडे आताशा वळू लागून तिकडे गर्दी करू लागली होती. पण तेवढ्याच रिंगणात ही अलौकिकता कोंडल्यासारखी झाली होती. श्रीदत्ताला, निश्चित तिने गुंतून पडून राहू नये असे वाटत होते. एका परीने पिटाळूनच त्यांनी तिला तिथून काढले व संपूर्ण - 'भारत' मोकळा करून दिला. भारताच्या जवळपास अर्ध-

गोलार्धाच्या भागातून श्रीस्वामींनी पाठविलेली ही पत्रे पाहिली म्हणजे त्यांच्या जीवनाला अखिल भारतीय आयाम कसा येत होता हे सहज लक्षात येते. या पत्रसंग्रहात हरिद्वार - रामेश्वर - द्वारका - काशी (अप्रत्यक्ष) अशा ठिकाणाहून पाठविलेली पत्रे आढळतील. **' परिक्रान्ताच देशा भगवति चतस्रोऽपि दिशः '' भगवति, कृष्णा - माई, मी चारही दिशा फिर-फिरलो आहे** - असे कृष्णालहरीत श्रीस्वामी म्हणतात ते खऱ्या अर्थाने खरेच होते. असा **'' धावेकरु ''** त्या काळी आणखी कोणी असेल तर माहीत नाही. भाविकांची दारे ठोठावीत फिरण्याची सर्वच संत - सत्पुरुषांना ओढ असते. असा जागर ही त्यांची सहज प्रवृत्ती असते. **तथापि सतत चोवीस वर्षे अशा तऱ्हेची पदयात्रा व तीही दोन छाट्या, चार लंगोट्या व दण्ड कमंडलु एवढ्या परिग्रहाने कोणी काढल्याचे अजून ऐकिवात नाही. हेच उपलब्ध झालेले साधारणपणे तीनशे पत्र लेख त्या अलौकिक पर्यटकाचे आहेत एवढे जरी आपल्या लक्षात आले तरी त्यातील अक्षरांशी आपले जिव्हाळ्याचे नाते जुळेल.** ही पत्रे, ज्यांनी आपल्या **'' जीवीचे हितगुज ''** म्हणून जपून ठेवली त्यांच्या विषयी आपल्या भावना, कृतज्ञतेचा नवा भाव जागा करतील.

**पत्र हे आगळेच माध्यम आहे. त्याची सर काही अंशी, महापुरुषांनी लिहिलेल्या वाङ्मयाला सुद्धा करता येत नाही. कारण पत्रात घरेलूपणाचा भाव असतो. ती थेट असतात. त्यात सलगी असते. ती आपल्याकडे आली म्हणजे आपलीच असतात. ती इतरांची नाहीत. माझीच आहेत अशी जी व्यावर्तकता त्यात असते ती आपल्याला एकांतात नेवून ठेवते. आपल्याला आत्मसंमुख करीत जाते. त्यात संवादाचा युष्मदस्मत् प्रत्यय - मी - तू असा बोलका प्रत्ययहि असतो.** वाङ्मयातून असा भाव वेचणे सोपे नाही. त्या दृष्टीने श्री स्वामींच्या वाङ्मयाइतकेच या पत्र-संग्रहाचे महत्त्व आहे. कारण इथे वेचायचेहि श्रम नाहीत : निवडून अगोदरच ठेवले आहे. ते केवळ घ्यायचे आहे. ग्रंथाभ्यासाला अधिकार लागतो. अधाशीपणा चालत नाही. इथे तसे काही नसले तरी चालते. अधिकार असला तर या स्फुट लेखनातूनहि ग्रंथातून मिळणारे महा-तात्पर्य मिळू शकेल. पण तेवढी वाट न पाहता देखील इथे भागण्याजोगे आहे. कारण साध्या साध्या कौटुंबिक प्रश्नावर देखील श्रीस्वामी त्या त्या व्यक्तीशी त्या काळात सहृदयतेने बोलत, असे इथे आढळते. त्यामुळे आपण देखील चट्दिशी त्या काळात जाऊ शकतो व त्या युष्मदस्मत्संबंधात आपणहि सहभागी होतो. साध्या साध्या सांसारिक समस्येपासून तर गहन किंवा गहनतम पारमार्थिक समस्येपर्यंत सर्वच विषयांत श्रीस्वामीजवळ आपले हृदय हलके करावे असे अनेकांना वाटत राही. श्रींनी त्या सर्वांचा परामर्श आस्थेने घेतला आहे.

'' मुलाचे जन्मलग्न सांगितलेल्या वेळावरुन वृश्चिक लग्न सिद्ध होते. जरी मारक ग्रह आहे तरी उच्चराशीस गुरु असोन तो पूर्ण दृष्टीने पाहतो. तेव्हा अरिष्ट दूर करील तथापि काही दिवसपर्यंत केवळ मृत्युंजय मंत्राचा जप प्रत्यही १०८ सुरू ठेवावा.

**ब्रह्मावर्त - १८९६**



'' आपुला हक्क असणे किंवा बशिला असणे इत्यादि सर्व प्राकृत विचार आहेत. जो देणारा तो निराळाच आहे. ''

कोणत्या तरी महाशक्तीच्या संकल्पाचे संदेश - वाहक आहेत तसेच हे ग्रंथ आहेत असे त्यांना म्हणायचे आहे. **कोणताहि वैयक्तिक संकल्प, सूर्य-चंद्रांचे उदय घडवून आणू शकत नाही. तसेच हेहि ग्रंथ होत असे त्यांना म्हणायचे आहे.**

द्विसाहस्री गुरुचरित्र टीकेविषयी ते लिहितात.-

**रोज दोन घटिका गुरुचरित्रावर टीका लिहिण्याची होत असते. पहिले चार अध्याय आताच पुरे झाले. संस्कृतात टीका करणेची लहर लागली आहे. तूर्त चारशे झाली. पुढे कशी लहर लागेल कोण जाणे! येथे प्रत मुळीच नाही. बरोबरची प्रत सारंगपुरास पूर्वीच पाठविली. तोंडानेच चालते. कदाचित पाठाक्षर - भेद होईल तर तो पुढे सुधारला जाईल.**

**प्रयाग १८९८**

ही प्रत स्वच्छ लिहून काढण्यास मुळीच अवकाश मिळाला नाही. कारण येथे भाष्याचे वगैरे पाठ देण्याचे शिवाय इतरही पाठ चालू आहेत. त्याच व्यवधानात ही लिहिली.

.......... ह्या टीकेचे जागोजाग भाष्यकारांचे संमत व उत्तरमीमांसा न्याय व क्वचित मीमांसान्याय दिला. व्याकरणाचाही भाग थोडा थोडाच दिला आहे. शिवाय कठीण श्रुती व सूत्रे यांचाही अर्थ दाखविला. परंतु बरीच सूत्रे व श्रुती प्रमाणभूत असून त्याचा अर्थ दाखवावा. परंतु तशी सवड न झाली. हा ग्रंथ मुमूक्षूला उपयुक्त. मात्र संस्कृत भाषेत झाला. तूर्त लोक संस्कृताचे भाषांतर करतात हे कळले. तथापि अंतर्यामी श्रीगुरु यांची अशीच इच्छा. अस्तु **एक भाषा एखाद सिद्ध देशी चालेल. पण संस्कृत सर्वत्र चालते. पुढे भाषांतर करणार तर खुशाल करो. ही टीका होणे एवढा ह्या व्यक्तीचा अधिकार नाही.**

---

*टीप :*

*१) हरिद्वार येथे अहिल्याबाईचे धर्मशाळेत (हरिद्वार १८९२), मारुतीचे मंदिरात तूर्त आसन आहे. (तिलकवाडा - १८९८), श्री मार्कंडेश्वर मंदिरात. (सिसोर - १८९८) सोमनाथाच्या मंतिरत (प्रथासपट्टण १८९८) हाटकेश्वराचे मंदिरात (सिद्धपूर - १८९८) मारुतीचे मंदिरत (चिखलदा १९००) अंताजीपंताचे घाटावर रामाचे मंदिरात (ब्रह्मातावर्त १९०३) येथे लहानसे राममंदिर आहे. येथेच आसन ठेविले. (नरसी १९०५) तंजावरापासून १ कोसावर कावेरीचा प्रवाह बरा आहे तिला वेणुनदी म्हणतात. येथे राहणेची उत्तमसोय ... (तंजावर १९०७) सर्व तऱ्हेची अडचण असून जागासुद्धा मिळणेची मुस्कील (मुक्त्याला - १९०८) मधुकेश्वराचे देवळात (वनवासी - कर्नाटक १९१०) २) द्वारकेसाठी जातेवेळी रस्त्यात ३३ क्विस भिक्षा न झाली व कोठे कोठे कोणी खजूर व खोबरे दिले. त्या सेवनाने काही दिवस रक्त पडून संग्रहणीवर आज तीन वर्षे पल्ला पोचला. (ब्रह्मावर्त १९०३)*

(रामो हरि) करणाऱ्या मुखाचे हे माहात्म्य नव्हे. तर हा श्रीस्वामींचा अनुग्रह व स्वहृदयस्थ स्वमहिमख्यापक श्रीदत्तगुरुप्रसाद जाणावा.

**द्वारका १८९८**

श्रीस्वामींच्या हातून घडलेला हा पहिला टीकाग्रंथ आहे व तोही पूर्वाश्रमात लिहून झालेल्या द्विसाहस्री गुरुचरित्रावर ; आणि त्यातहि ती मूळ प्रत पुढे नसता. श्रीमहाराजांकडून पुढे पुष्कळ ग्रंथरचना झाली तिचा हा श्रीगणेशा होता. वरील पत्रात **श्रीस्वामी ज्याला लहर म्हणत आहेत ती. दुसऱ्या पत्रात लिहिल्याप्रमाणे अंतर्यामी - श्रीगुरु यांची इच्छा होती.** लहर म्हणण्याचे कारण उघड होते. संस्कृतज्ञानाची स्वतःजवळ असलेली व्यावहारिक पुंजी किती आहे. याचे त्यांना पुरेपूर भान होते. तीत हा खेळ साधणारा नव्हता हेही उघड होते. **स्वाभाविक हे न जुळणारे गणित ज्याने जुळवून आणले त्यांना श्रेय देण्यावाचून पर्याय नव्हता. श्रीस्वामींच्या ग्रंथकर्तृत्वाची आधारशक्ति व्यक्तिगत संकल्प नसून श्रीदत्तगुरूंची लीलेच्छा असल्यामुळे आपल्या ग्रंथरचनेकडे श्रीस्वामी अतिशय सावधपणे पण कौतुकपणाने बघत. त्यांचा सावधपणा पुढील पत्रात दिसतो.**

समश्लोकी गुरुचरित्र ही श्री स्वामींची दुसरी मोठी रचना. त्याविषयी ते लिहितात.

**ब्रह्मावर्तास असतांना प्लेग गावात आल्यामुळे सर्व लोक बाहेर गेले होते. काही वृद्ध मागे राहिले होते. त्यावेळी तेथे समश्लोकी करण्याचे सांगणे झाले व तेथे एक लेखी जुने पुस्तक ५१ अध्यायांचे होते. त्यावरून करण्याचे सांगणे झाले. हे मोठे काम कधी कसे संपावे असे त्याच वेळी मनात येताच पुनः सांगणे झाले की, तूर्त पाठ वगैरे नसल्यामुळे रोज २००/२५० श्लोक होऊन महिना सव्वा महिन्यात संपेल असे म्हणून ६॥ हजार श्लोक संख्या दाखविली. नंतर त्या गुरुचरित्राची जास्त संख्या पाहून ६-१६-३६-३७-४१-४२ अध्यायांपैकी ओव्या काहीशा अर्थानुसंधानास अडचण न येणाऱ्या कमी करून समश्लोकी केल्यावर ही संख्या भरेल तसे करावे काय ? अशी प्रार्थना केल्यावर तसेच करण्याची आज्ञा झाली. तसा ग्रंथ झाला. आता कमीजास्त करता येणार नाही.**

**बिठूर १९०३**

सर्वच संत-पुरुषाच्या वाङ्मयातील कृतीमागे परमेश्वराची प्रत्यक्ष प्रेरणा असते व स्वतःच्या यंत्रारुढतेचे त्यांना ज्ञान असते. तसे उद्गारसुद्धा संत वाङ्मयात अनेक ठिकाणी आढळतात. परंतु ही प्रेरणा आशयाच्या अभिव्यक्ती पुरतीच मर्यादित असावी असा सामान्यांचा समज असतो. त्याला इथे या पत्राद्वारे नवे वळण मिळत आहे. केवळ **आशयच नव्हे तर आशयाचे वाहक असणारे शब्द आणि त्यांचे प्रमाण हे सुद्धा त्यांच्याच आज्ञेवरून ठरत असते ही एक नवी उपलब्धी या पत्रावरून हाती येते.** या पत्राचे महत्त्व आहे ते त्यामुळे.

अशा या अ-पौरुषेय कृतीचे श्रीस्वामींना जर कौतुक वाटत असेल तर अद्भुत म्हणता येत नाही. त्या दृष्टीने पुढील पत्र वाचनीय आहे.

**हा देह तिकडे येण्याचा इत्यादि इच्छा करण्याची गरज नाही. क्षणभंगुर नश्वर देहापेक्षा यशःकाय कायम राहणार नाही काय ?**

**जयन्ति ते सुकृतिनोरससिद्धाः कवीश्वराः।**
**नास्ति तेषां यशःकाये जरा-मरणजं भयम्॥**

जरी यशःकायाने शंका समाधान भाषणादिक कसे घडेल म्हणणे तर प्राकृत लोकाकरिता रसभरित **भक्तिज्ञानरसभरित दत्तमाहात्म्य प्रसिद्ध झाले आहे.** शिवाय, संस्कृत प्राकृत अनेक ग्रंथांची प्रसिद्धि झाली. तेणे शंका समाधान होईल.

**सारंगपूर १९०२**

ज्यांना श्रीस्वामींच्या ग्रंथ रचनेमागील गूढ अन्तःप्रक्रिया माहीत नसेल त्यांना वरील पत्रात अहंकाराचा वास जाणवेल. परंतु

**दयावत्या दत्तं द्रविड शिशुरास्वाद्य तव यत्।**
**कवीनां प्रौढानामजनि कमनीयः कवयिता।**

**सौन्दर्यलहरी**

हे श्री शंकराचार्यांचे उद्गार ज्यांना त्यातील अनुभूतीच्या तळासकट वाचता येतात त्यांना श्रीस्वामींचे वरील बोल सुद्धा अत्यंत भगवच्छरणतेचे द्योतक वाटतील. मूल ज्याप्रमाणे रागावले किंवा हसले तरी त्याचा निरागसपणा सुटत नाही, तशीच प्राप्त पुरुषांची मनःस्थिती असते. **अहंकार व विनय या दोन्ही टोकांना एकत्र घेणारा सम-भाव म्हणजेच भगवद्भाव त्यांच्या प्रत्येक उक्ति-कृतीत एकवटलेला असतो.** त्यामुळे त्यांनी वापरलेले शब्द आमच्या परिचयाचे असले तरी त्या शब्दांचा आम्हाला अवगत असलेला अपभ्रष्ट अर्थ मात्र त्यांच्या गावी नसतो ही पूर्ण खूणगाठ आम्ही बांधायला हवी.

श्रीस्वामींच्या जीवनातील महत्त्वाचा एक पैलू या पत्रव्यवहारामुळे वाचकांच्या नव्याने लक्षात येत आहे. अनुभवाला येणाऱ्या स्वप्नांचा अर्थ कसा करावा ही जीवनात एक मोठी समस्या कधी कधी होऊन बसते. स्वप्नसृष्टि एका बाजूने खोटी असली तरी ती दुसऱ्या बाजूने पारमार्थिक प्रगतीची मापक सुद्धा असते. परंतु स्वप्नात येणारे अनुभव, भास हे एक परीने अवगुंठित स्वरूपात असतात. ते अवगुंठन काढून त्यामागील आशय जाणून घेणे त्याविषयीच्या अधिकारी व्यक्तीवाचून इतरांना शक्य होत नाही. अलीकडच्या काळात फ्राईड नावाच्या पाश्चात्य मानस शास्त्रज्ञाने बराच विचार या विषयात करून ठेवला. काही काळ त्या विचारांचा पगडा जगभरच्या अभ्यासकावर होता असे म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाही. परमार्थाच्या दृष्टीने मात्र त्याचा काही उपयोग नाही. कारण तो अभ्यास रुग्णमनोवृत्तीचा होता. आपल्यास हवा आहे साधकांच्या स्वप्नदृष्टांताचा अर्थ. या विषयीची काही चर्चा शारीर-मीमांसेत श्रीशंकराचार्यांनी केली आहे. (३.२.१) पातंजल-योगदर्शनात **"स्वप्ननिद्राज्ञानालम्बनं**

बा'' असे एक सूत्रच आहे (समाधिपाद ३६) अलीकडच्या काळात मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबराव महाराज यांनी हिरण्ययोग या नावाखाली या विषयाचा मौलिक विचार करून ठेवला आहे. प्रस्तुत मुद्दा एवढाच की, स्वप्नातील अनुभव जरी आपल्यास मिथ्या म्हणून वाटत असला तरी त्याने सुचविलेला अर्थ मात्र मिथ्या नसतो. अशाच विषयात अधिकारी पुरुषांचे खरे साह्य भाग्यवंताच्या वाट्याला येते व त्याचा परमार्थ प्रवास सुकर होतो. या विषयात श्रींचे त्या काळात अनेकांना मार्गदर्शन लाभले आहे. पूर्वाश्रमापासूनच त्यांच्याकडे या दृष्टीने साधक बघत असत असे दिसते.

स्वप्नांचा अभिप्राय हा की तूर्त येणे होत नाही. सत्पुरुषाने गळ्यात माळ घातली म्हणजे आपुल्या गळ्यात लोक रमणीय संसारमाला ईश्वराने घातली ही आपणाला पसंत वाटत नाही तर जडभार घेण्यासाठी उपास्य देवता अक्कलकोट बाबांचे रूपाने आपले कंठी घेण्यास तयार आहेत. म्हणजे हे संसाराचे ओझे मला नाही अशा बुद्धीने वागावे हेच सुचविले. **नरसोबावाडी १९९०**

स्वप्नी लिहिलेले ते देवसंबंधी नव्हे; भास आहे.

स्वप्नाचा भावार्थ नोकरी मिळेल की काय ? अशी इच्छा स्वप्न उत्पन्न झाल्यावर त्याबद्दल हे असे स्वरूप दाखवून बोलणे केले .......... सिनोर १८९९

स्वप्नाचा अभिप्राय देववत् पूज्य (पिता) पाषाणमूर्तिवत् (जडीभूतपिशाचदशमान) स्वकर्माने झाला.

(स्वप्न) स्वसंबंधी गरीब स्वभावांचे मनुष्य. जम म्हणजे स्वप्न अरिष्ट येणे कमंडा-मलम म्हणजे त्याचा परिहारोपाय. **प्रभास १८९९**

स्वप्नाबद्दलचे तुम्हाला ज्ञापन केले तोच हेतू असावा. बिठोर १९०२. पहिल्या स्वप्नाचा अभिप्राय दंड घेऊन चालणे कठिण. २ चा अभिप्राय भजन चालवावे. ३ चा अभिप्राय दंड घेऊन चांगला धर्म पाळावा. ४ चे नाव प्रणव, पाठीचा वारा गुरुभक्ति, वाढ मिळणे म्हणजे अभ्यासानुकूलता, गावास पोचणे क्रममुक्ती हा अभिप्राय आहे. **ब्रह्मावर्त १९०४**

ज्याप्रमाणे स्वप्न झाले तसे भजन करावे. **नरसी १९०५**

* मुलीच्या टिपणावरून राजयोग दिसत नाही. मात्र दारिद्र्यस्थळी पडणार नाही. विशेष कोणी सांगावे .... तेव्हा लग्नपति मंगळ अष्टमस्थानी असोन स्वगृही जरी आहे तथापि असाच मंगळ पाहून वराची रोजना करावी हे योग्य. यापुढे विवाहाची हयगय करू नये. या वर्षी योग प्रायः यावा. **सिनोर १८९९**

* ईश्वराचे इच्छेने प्लेग (सांक्रमिक रोग) फैलावती .... ज्यांना वाटेल त्या आस्तिक लोकांनी भगवद्भजन करीत असावे. ग्रहमान विपरीत आहे. **प्रभास १८९९**



* जिला श्वेतकुष्ठ आहे तिला पांढरे गोकर्णीची जडी पाण्यात उगाळून कोडावर लावावी. रोज प्रदक्षिणा घालू लागाव्यात. **सारंगपूर जाने. १९०२**

* मुलीची प्रकृती क्षीण असल्यामुळे येथून व्हावा तसा उपाय होणे नाही. श्रीगुरुचे तीर्थ दोन वेळ द्यावे. **सारंगपूर १९०२**

* गोकर्णीची मुळी गोमूत्रातून द्यावी व कुळथ्याचे काढ्या बरोबर भात जेवावा. दोन वेळ असे १४ दिवस द्यावे. ७ दिवसांनंतर प्रकृतिमान कळवावी. यथाशक्ति ''मुञ्चामि त्वा'' या पाच ऋचेचा जप करावा. **ब्रह्मावर्त १९०३**

* अजून गोकर्णीची जडी काही दिवस घ्यावी. कदाचित् मूळव्याधि किंवा प्रमेहास नेट करील तर थोड्याच गोमूत्रात थोडीच घ्यावी. नागकेशर खडीसाखर ज्यामानाने सुरु केले तसेच घ्यावे. **ब्रह्मावर्त १९०३**

* गाईचे तुपातून रोज २.२ गुंजा सांज सकाळ हे भस्म घ्यावे. पथ्य विशेष नाही. स्नान थंड पाण्याने करू नये. **ब्रह्मावर्त १९०३**

* पुनः परीक्षेस बसतेवेळी श्रीगुरुदत्तात्रेयाचे स्मरण करावे. सर्वसिद्धि देणारा तोच भगवान् आहे. **राजमहेंद्री १९०८**

* खोकल्याच्या गोळ्या पाठविता येतील. **गरुडेश्वर १९१३**

* दत्तमहात्म्याचे २४ अध्याय पाठविले. येथे एक लिहीत आहे. त्याची प्रत झाल्यावर बाकीचे पाठविता येतील. ती प्रत साधारण लेखाची आहे. आता एक कुणाकडून स्वच्छ मोठ्या अक्षराची प्रत काढवावी. **मंडलेश्वर १९०१**

* बरोबर वेंकटराव नावाचा इसम आहे. त्याने लिहिण्यास आरंभ केला. १४ अध्याय लिहिले. आपुली इच्छा असेल तर झालेले अध्यायाची पहिली टिपणी पाठविता येईल. मात्र प्रथमचीच असल्यामुळे जपून लिहिली पाहिजे. **महापूर १९०१**

* प्राकृत श्रावणातच पुरे झाले. येथे एक गृहस्थ लिहीत आहे. त्याचे लिहिणे झाल्यावर तो आपल्याकडे पाठवील. २५ अध्याय त्याने लिहिले बाकी २६ उरले.

* **हे पाठविलेले पुस्तक साक्षाद्दर्शन समजावे. (अधोरेखा मुळात नाही.)**

गुरुचरित्रातील कर्नाटकी कवितेचा महाराष्ट्रभाषेत अर्थ करून पाठवावा. **ब्रह्मावर्त १९०२**

* पाठविलेल्या आर्या ज्या ज्या वेळी शोधण्याचा उपक्रम काढावा त्या त्या वेळी आडथळा यावा. एवं सर्व तपासून झाल्या नाहीत. तेव्हा ज्या करणाऱ्याच्या प्रेमाने घडल्या त्या प्रभूला मान्यच आहेत असे मानून तशाच पाठविल्या. **बिठूर १९०२**

* येथे थोडा सुद्धा वेळ मिळत नाही. जास्त शोधणे होत नाही. **स्वराज्य सिद्धि** नावाचे पुस्तक वाडीवर आले की नाही कळवा. **बिठूर १९०२**

* **पत्रद्वारा दर्शन होत आहे.** आणखी विशेष श्रम का करावा? **विश्वेश्वरी** पोचली. पुनः गुरुचरित्रसार पाठविलेले ते पोचले. **बिठूर १९०२**

* गुरुचरित्र काव्य मिळाले. एका ब्राह्मणाने येथे लिहिण्यास आरंभिले ते थोडेच दिवसांत आपलेकडे पाठवतील. **नरसी १९०५**

* सांगितल्याप्रमाणे भोजन पात्राची आरती पाठविली आहे. **मूळतापी १९०५**

* हल्ली श्रीदत्तचंपू हा ग्रंथ व कृष्णालहरी हे दोन ग्रंथ उदित झाले. **मूळतापी १९०५**

* येथील मंडळीने गुदस्ता रस्त्यात घडलेली तापी रेवा इत्यादिक स्तोत्रे व पदे मागविली आहेत. तरी गेल्या वर्षी वाडीवर ठेवलेली पदे वगैरे पाठवून द्यावी. **नाजमंडी १९०५**

* आपण सर्वांशी मिळून राहावे. पुनः सेवेवर घेतील. थोडा थोडा वाचण्याचा अभ्यास ठेवावा. (गावाचे व वर्षाचे नाव नाही.)

* गांडाचे सांगणेवरून कृष्णालहरी टीका आरंभिली. १९ श्लोकांची झाली. **तंजावर १९०७**

* सूत्रवृत्तीची भाषा सुगम आहे. आण्णा व तुम्ही सर्व शंकरस्वामी यांना सुद्धा सहज अर्थ कळणेसारखा आहे. तरी प्रत्यही होतील तितकीच सूत्रे चालवावी. कदाचित् श्रुत्यर्थ सर्व कळला न कळला तेवढा या विचाराने भाष्यविचार सुगम होईल. **तंजावर १९०७**

* गुरुचरित्र स्तोत्र टिपणी पाठविली. पोचल्यास कळवावे. ४४ अध्यायांची चूर्णिका झाली. **भवानी - कावेरी संगम १९०७**

* सदाशिव ब्रह्मेन्द्रकृत सूत्रवृत्ति वीस सूत्रांपर्यंत लिहिली. चमत्कारिक लेख असावा अशी इच्छा आहे. **नेलोर १९०७**

* आजच तैत्तिरीय संपले. वनवासी १९१०

**श्रीमद्‌भगवद्‌गीतेत आर्त भक्तानंतर जिज्ञासु - भक्ताचा क्रम येतो. ही सारी पत्रे म्हणजे जिज्ञासु - भक्तांना मोहरे लावावे यासाठी श्रीस्वामींनी स्वतः वळविलेला कित्ता होता.** स्वतः श्रीस्वामी जसे ग्रंथ - लेखन, ग्रंथ-संग्रह, ग्रंथ-समीक्षण यात निमग्न असत त्याप्रमाणे इतरांनी सुद्धा तसेच तत्पर असावे असे त्यांना सुचवावयाचे होते. वस्तुतः त्यांचे उत्तर जीवन प्रवासमय होते. ग्रंथाभ्यासासाठी आवश्यक असणारी स्थिरता त्यांच्या वाट्याला आली नव्हती.

मुलाला अजीर्णाचा उपद्रव असेल तर दाडिम फळाची साल व कुड्याची जडी ताकातून द्यावी. **बदली झाल्याने गैरसोई झाली असेल. परंतु प्रभुसत्ता जशी असेल तसे घडणारच. अंतरातील देवाची बदली न झाली म्हणजे पुरे.**

**पेटलाद १८९७**



आज अमरावती येथे येणे झाले. येथे गैरसोय असलेमुळे येथून प्रातःकाळी पुढे जाणार. पुस्तक ७० श्लोकांपर्यंत पाठविले आहे. येथे लक्ष्मणशास्त्री यांच्या मुलीचे नाकात व्रण होऊन त्यातून अर्ध्या अंगुळा एवढे किडे पडतात. मुलांचाहि नाकात तशीच तऱ्हा आहे. तरी कुणाला तरी सांगून वाकेरीचे भाते कृष्णशास्त्री बिलवकर किंवा दुसऱ्या कोणच्याहि जागी मिळेल तिथून पाठवून देण्यास सांगावे. अंतोबा नरहरि यांचे नावे १ रुपया मनी ऑर्डर करून पाठविला. तो घेऊन कोणातरी माहितगाराने चांगले वाकेरीचे भाते पाठवून द्यावे. पत्ता : गुंटूर. पो. अमरावती रंगावझाल लक्ष्मीनारायण शास्त्री यासी. **अमरावती १९०८**

वरील सारी पत्रे दिसायला किरकोळ वाटत असली तरी फार बोलकी आहेत. श्रीस्वामींच्या उत्तरायुष्यातील व्यस्तजीवनातहि दुःखितांचे आसू पुसण्यासाठी एक मोठा कप्पा किती सुरक्षित ठेवलेला होता ते या पत्रांवरून कळून येते. **सामान्य माणसांचेहि दुःख असामान्यच असते हे लक्षात ठेवायला हवे. संत पुरुष ते लक्षात घेतात.** म्हणूनहि ते असामान्य – सामान्याहून आपोआपच वेगळे ठरतात. दुःखिताची कहाणी आपल्यास कंटाळवाणी असते. कारण ते दुःख आपले नसते. संत पुरुषाच्या मनात हा भेदभाव नसतो. या दृष्टीने हे अमरावतीचे पत्र काळजीपूर्वक वाचायला हवे. श्रीस्वामी अमरावतीला आले आहेत. गाव आंध्रातील, अनोळखीचा व गैरसोयीचा. दुसऱ्या दिवशी तिथून प्रस्थान होणार आहे.अशा स्थितीत कोणीतरी व्यक्ति श्रीमहाराजांचे नाव ऐकून धावत येते व आपले कौटुंबिक दुःख सांगते. "**मातेच्या ठायी। अपत्या अनवसर नाही**" अशा एकाधिकाराने आपले दुःख सांगते व श्रीस्वामी देखील "**आर्तचेनि बोरसे**" दुःखावरील उपाय सांगतात व त्याची स्वतःच उपाययोजना करतात. वरील पत्र श्रींनी प. प. श्रीदीक्षितस्वामींना पाठविले आहे. '**परमहंस छात्रान्तर्गत**' असे बिरुद त्यांना श्रीस्वामींनी एका पत्रात लावले आहे. यावरून श्रींच्या शिष्यवर्गात त्यांचा केवढा उच्चाधिकार होता हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. अशाहि महनीय पुरुषास (परमहंसात्मक) "वाकेरीचे भाते" शोधण्यासाठी श्रीस्वामी सांगत आहेत. दुःखितांची आसवे पुसण्यासाठी श्रीस्वामी किती आटाआटी करीत असत. ते या पत्रावरून सहजच लक्षात येते. **जीवन धावते पण दुःखितांचे दुःख-निवारणात मात्र चालढकल नाही असा हा मनाचा हळुवारपणा.** परंतु उत्तरजीवनाचा हा एक लहान अंश होता. चोवीस वर्षांचा प्रदीर्घ काळ केवळ या एका उद्देशाने घालविणे शक्य नव्हते. अध्यापन व ग्रंथलेखन या कार्यात ते अधिक काळ घालवीत. असे या पत्र व्यवहारावरून दिसते. याव्यतिरिक्त आपल्याकडे आलेल्यांना मार्गदर्शन व पत्रलेखन या कामात त्यांचा काळ अधिक जाई. आरंभीची हिमालयातील काही वर्षे सोडली व नंतरची गर्दीची काही वर्षे सोडली तर मधला साधारणपणे दहा-पंधरा वर्षांचा कालखंड श्रींनी अध्यापनात व ग्रंथलेखनात घालविला आहे. पत्रलेखन मात्र शेवटपर्यंत चालूच होते. अध्यापन -

ग्रंथलेखन - मार्गदर्शन (पत्रद्वारा व साक्षात्) व पत्रलेखन या चार माध्यमांतून त्यांचा जनसंपर्क सुरू असे. **अध्यापन व ग्रंथलेखन व आनुषंगिक उद्योग यात श्रीगुरुमहाराज किती तत्पर असत हे पाहण्याजोगे आहे.**

* येथे ब्राह्मणाची घरे आठ आहेत. मात्र खेडेगाव असल्यामुळे भाष्य वगैरे पुस्तक मिळत नाही. कूर्मपुराणाची प्रत काढली. मूळ प्रत पाठविण्यात येईल.

**तिलकवाडा १८९८**

* स्वामींनी मागितलेले आह्निक देण्याचा योग येत नाही. कारण हल्ली दोन वर्षे प्लेगामुळे खेडेगावातच राहणे झाले. **अच्युताश्रमी, यतिधर्मसमुच्चय, विश्वेश्वरी** वगैरे ग्रंथ उपलब्ध न झाले तो योग येत नाही. रुद्राविषयी सदर ग्रंथ पाहणेस अजून मिळाले नाही. **तिलकवाडा १८९८**

* टीका व टीप देण्याकरिता गुरुचरित्र पाठविणार तर या मुक्कामी पाठवावे. आल्यापासून आठ दिवसात टीप देऊन पाठविले जाईल.

**सिनोर १८९८**

* कठभाष्याचा पाठ सुरू केला तो ४/८ दिवसांत संपेल.

* स्वामींच्या पुस्तकांपैकी पंचीकरण भाष्य मिळेल तर बुकपोस्ट करून पाठवावे. **प्रभासपट्टन १८९९**

* येथे बरेच पाठ चालू असल्यामुळे मुळीच अवकाश मिळत नाही.

**चिखलदरा १९००**

**चलाचल – निकेतश्च यतिर्यादृच्छिको भवेत्। माण्डूक्य - वैतथ्य ३६** (यतीने यदृच्छेने मिळालेल्या कौपीन - ग्रास भिक्षा इत्यादींवर विसंबून व्यवहारासाठी देहाचा (थोडासा) व चिंतनासाठी आत्मतत्त्वाचा निरंतर आधार घ्यावा) ही शिकवण श्रीस्वामींच्या रोमरोमात भिनली होती. त्यांचे यदृच्छाभ्रमण मात्र श्रींच्या आज्ञेप्रमाणे चालले असल्याने एकापरीने अनियत असले तरी नियतच होते. यतिधर्मात तेही धावत्या जीवनात निव्वळ ग्रंथाभ्यासाच्या मागे लागणे बसत नाही. बृहदारण्यकात म्हटले आहे.

**नानुध्यायाद् बहुत् शब्दान् वाचो विग्लापनं हि तत्॥ बृ. ५.४.२१ (पुष्कळ - ग्रंथाच्या मागे लागू नये. कारण ते उगाच वाणीला शीण आणते.)**

वरील श्लोकात पुष्कळ शब्द मुद्दाम योजिला आहे. कारण आत्मचिन्तनासाठी परिमित शब्द आवश्यक असतात असे इथे सुचविले आहे. त्याला धरून श्रींचा हा उद्योग चालला होता. तो स्वतःसाठी होता असे म्हणण्याऐवजी तो दुसऱ्यांसाठी होता हेच म्हणणे अधिक योग्य होय. धावत्या जीवनाचे निमित्त पुढे करून ग्रंथाभ्यासाबद्दल अरुचि असू नये, असे त्यांना सुचवायचे होते. या दृष्टीने परिवारातील काहींची प्रगति पाहून ते कौतुक करीत. कविता पाहून आनंद झाला. ही भगवद्दत्त स्फूर्ति होय. हे श्रीस्वामींचे संमतीचे बोल ऐकून संबंधित व्यक्तीला किती आनंद झाला असेल? दुसऱ्या एका



व्यक्तीची आर्या-रचना सुद्धा श्रींना अशीच आवडली. त्यात काही किरकोळ परिवर्तन करावे हा विचार सुद्धा त्यांनी सोडून दिला. कारण, त्या शोधण्याचा उपक्रम प्रत्येक वेळी अडथळा येऊन तडीला जाईना. श्रींनी त्यावरून काढलेले निष्कर्ष त्यांच्या भगवच्छरणतेची पूर्ण ग्वाही देत आहे. आर्या शोधण्याचा उपक्रम अपुरा राहून जातो याचाच अर्थ भगवन्ताला आहे त्या स्वरूपात ही आर्यारचना आवडत होती, हा निष्कर्ष भगवंताशी पूर्ण ऐक्य असल्यावाचून कोणालाहि काढता येणार नाही. आपल्या संकल्पाप्रमाणे भगवंताचे अनुमोदन आहे; किंबहुना भगवत्संकल्पच आपल्या संकल्पाचा बहाणा करून प्रकट होत असेल हा श्रींचा दृढ प्रत्यय होता.

**तत्र बहुत्वप्रतिषेधात् केवलात्मैकृत्वप्रतिपादकाः स्वल्पा शब्दा अनुज्ञयान्ते। बृ. शां. भा. ५.४१**

पुष्कळ शब्द नको या म्हणण्याचा आत्मतत्वाचे निखळ एकत्व प्रतिपादन करणारे निवडक शब्द संमत आहेत असा अर्थ होतो. त्याला धरूनच त्यांचे हे उद्गार होते. इतर व्यक्तींच्याहि लेखनाच्या संदर्भात जिथे श्रींची ही दृष्टि होती तिथे स्वतःच्या लेखनाविषयी ते किती भगवत्परतंत्र होते हे सहज लक्षात येते. दत्तचंपू व कृष्णालहरी हे दोन ग्रंथ उदित झाले ही भाषा त्यांच्या त्याच अलौकिक भावाची निदर्शक होती. सूर्य - चंद्र - नक्षत्रांचे उदय ज्याप्रमाणे.

साथी करणे म्हणजे फावतेवेळी एकांती बसून पद्मासन घालून स्वस्थपणाने बसून पादुकांचे चिंतन करावे. **नरसी १९०५**

**वेदाध्यायी हयप्रमत्तो जपेत् स्वप्नेऽपि वासितम्।**
**जपिता तु जपत्येव तथा ध्यातापि वासितम्।**

**नरसोबावाडी १९०६**

पहिले स्वप्नाभिप्राय जाऊळ ठेवणे म्हणजे काम - ठेवणे. सर्वथा काम सोडावा हा अभिप्राय. स्वप्नात समंध म्हणजे अहंकार. त्याला भाताचा पिंड देणे म्हणजे अन्नमय देहाभिमान सोडणे.

**तंजावर १९०७**

पहिले स्वप्नाचा अभिप्राय न कळल्यामुळे पुढे पूजा करण्याचे उघड सांगितले.

**मुकयाला १९०८**

जे स्वप्न झाले ते श्रीगुरूने दाखविले. मंत्रशास्त्रात मनुष्यांनी केलेले अनार्ष ग्रंथ याचे अनुष्ठान करू नये असे आहे, मग त्याचा स्वाहाकार करण्याचा कोणी सांगावा?

**पवनी १९०६**

स्वप्नात तीर्थ न दिले इत्यादिक जे दिसले तिकडे तात्पर्य ठेवू नये. कारण **''स्वप्नास्य राज्यभिक्षादि न बुद्धाः स्पृशते खलु''** इत्यादि वचनाने दृश्याला मिथ्यात्त्व ठरते.

**जैनापूर १९११**

स्वप्न-दृष्टांत ही घटना कधी-कधी एखाद्याच्या जीवनात 'मैलाचा दगड' ठरून जाते. भाग्यवश अशाच प्रसंगी सत्पुरुष धावून येतात आणि निभावते. त्या दृष्टीने ब्रह्मावर्तावरून श्रीस्वामींनी वे.शा.सं. नारायणशास्त्री दीक्षित, वाडी यांना पाठविलेले पत्र वाचण्याजोगे आहे.

ना. दीक्षित नरसोबावाडी यास नारायण

पहिल्या स्वप्नाचा अभिप्राय दंड घेऊन चालणे कठीण.

२ चा अभिप्राय भजन चालवावे. ३ चा अभिप्राय दंड घेऊन चांगला धर्म पाळावा.

४ चे नाव प्रणव. पाठीचा वारा गुरुभक्ति. वाट मिळणे म्हणजे अभ्यासानुकूलता. गावास पोचणे क्रममुक्ति. हा अभिप्राय आहे. आतुर संन्याशी यांनी प्रणवाने शंखमुद्रेने प्रोक्षण शिर(१२) - दक्षिण: बाहु (१२) - वामबाहु (१२) हृदय (१२) प्रोक्षणपूर्वक स्नान करावे. प्रणवाने तीन अर्घ्ये देऊन प्रणव-जप करावा. लवकरच दंड घ्यावा. - दंड घेतल्यावाचून महावाक्योपदेश होणार नाही (वगैरे) श्री दत्तस्वरूपी यति मानून त्यापासून दंड घ्यावा. (दंडग्रहण करावा.) इकडे येणे करु नये.

ब्रह्मावर्त २६ मार्च १९०४

या सर्व पत्रांचा नीट उलगडा न झाला. (कारण त्यात संक्षेपाने संन्यास विधि दिला आहे.) तरी एवढे लक्षात येते की, श्री दीक्षित यांना सारखी स्वप्ने पडून राहिली आहेत. श्री नारायण शास्त्री दीक्षित यांची पत्नी नुकतीच निवर्तली. स्वप्नामुळे श्री नारायणशास्त्री दीक्षित यांची मनःस्थिती किती व्याकुळली असेल! अशा वेळी विश्वासाचा पाठीराखा असला म्हणजे किती हायसे वाटत असेल!! श्रीस्वामींचा करारीपणा सुद्धा या पत्रावरून दिसून येतो. श्रीनारायणशास्त्री दीक्षित यांनी दंड घ्यावा पण ते आपणापासून मात्र घेण्याचे मनात आणू नये. अशी स्पष्ट सूचना या पत्रात ते देत आहेत. स्वप्नदृष्टांतावरूनच असेहि दिसते की, श्री दीक्षित शास्त्रींनी श्रीस्वामींपासून दंड घ्यावा अशी सूचना त्यांना मिळाली आहे. पण या विषयात श्री स्वामी मात्र अतिशय खंबीर आहेत. पुढे श्रीस्वामींपासूनच नरसोबावाडीस श्री नारायण शास्त्रींना दंड मिळाला व ते श्रीनृसिंहसरस्वती स्वामी म्हणून प्रसिद्धीस आले. श्री टेंब्ये स्वामींनी असा दंड इतःपर कोणालाहि दिला नाही. यावरून श्रीदीक्षित स्वामींची योग्यता दिसून येते. "**परमहंसछात्रान्तर्गत**" हे दीक्षित स्वामींना श्री टेंब्येस्वामी महाराजांकडून मिळालेले बिरुद (पत्रात उल्लेख) व पुढे गरुडेश्वरी श्रीस्वामींनी नेमलेल्या विश्वस्त मंडळात अध्यक्ष म्हणून केलेली निवड व ती देखील (माझा शिष्य) अशी कंस करून तयार करविलेले कागदपत्र पाहिले की वरील पत्रातील खंबीरपणाचे आणखीच कौतुक वाटते.

**साधकांना श्रीस्वामींनी केलेल्या मार्गदर्शनाचे आणखी एक महत्त्वाचे क्षेत्र म्हणजे योगमार्गाचे अनुष्ठान.** असे साधक कोणत्याहि काळी तुरळकच राहणार. मात्र पदोपदी मार्गदर्शनाची निकड असलेलं ते क्षेत्र होय. यात झालेली जराही चूक विकृतीच्या रूपाने जन्मभर आपली सोबत करू शकते. योगाभ्यासातील ही विघ्ने पातंजल योगसूत्रात नोंदली आहेत. या विषयातील श्रीमहाराजांचा अधिकार पत्रातील भाषेवरून लक्षात येतो.

१) विपरीत करणी २) पश्चिमतान ३) शक्तिचालन.

सूर्यनाडीने श्वास घेऊन वज्रासनावर बसून परिधान युक्तीने रोज पाच याप्रमाणे १०० पर्यंत (मागे ठाण देऊन मस्तक टेकून सोडून पुनः पुनः.... याला परिधान युक्ति अथवा सूर्याकुंचन म्हणतात). तदनंतर डाव्या पायावर उजवा पाय ठेवून पायाचे पृष्ठभाग दोन हातांनी धरून नाभीचे खाली व हड्डीचे वर ५ याप्रमाणे १०० पर्यंत ठेवावे. याला कंदताडन म्हणतात. नंतर पद्मासनावर बसून यथाशक्ति क्रमाने आठप्रमाणे भस्त्रा कराव्या. म्हणजे ४० दिवसांनी कुंडलिनी व्युत्थान होते.

रोज भस्त्रिका केल्यावर समासनावर बसून तो सो शब्दाने दीर्घ उच्चार करून तोंडाने श्वास आत घ्यावा आणि हं शब्दाने तोंड मिटून नासिकेने श्वास सोडावा. याप्रमाणे तीन महिन्यानंतर सर्व अंग शून्य होत जाते. नंतर हं शब्द मस्तकात घुमतो. त्याजकडे चित्तवृत्ति ठेवावी. म्हणजे चित्तलय होत जातो. षणमुखी मुद्रा करून वायु सोडावा व परत करावी.

**शक्तिचालन झाले म्हणजे मुंग्या अंगावर चढल्यासारख्या होतात. हे ३० दिवसांनी सुमारे होते. ते आठपंधरा दिवस होते. मग बंद होते. मग गळ्यात मुरली वाजविल्यासारखा शब्द होतो. मग ब्रह्मरंध्रात जातो. त्यावेळी भोवयात दुखू लागते. कपाळ भोवू लागते. असे आठ दिवस होते. मग बंद होते. अंधकार दिसतो. मग चंद्रोदयाप्रमाणे ज्योतिर्मय दिसते.**

मंडलेश्वर १९००

**अभ्यास करणार तर सर्व नियम ठेवलेच पाहिजेत. नियम घडत नसता अभ्यास करणे बरोबर नाही. ईश्वरी इच्छेने स्वातंत्र्य मिळाल्यावाचून विशेष अभ्यास न करावा. दीड-दोन महिन्यानंतर शब्द स्पष्ट कळून येतात. ते अनुक्रमे वाढून मेघनादापर्यंत पोचल्यानंतर पुनः शून्य होतो.**

महत्पूर १९०१

मार्गदर्शन म्हणजे काय या गोष्टीची उत्तम उकल या पत्रातून होते. केवळ ग्रंथातील माहिती देणे एवढेच मार्गदर्शनाचे स्वरुप असत नाही. जिज्ञासु व्यक्तीच्या अधिकारात कोणत्या गोष्टी येऊ शकत नाहीत याचे स्वच्छ ज्ञान मार्गदर्शकाला हवे. याला **प्रक्रिया-पांडित्य** म्हणतात. म्हणूनच "ईश्वरी इच्छेने स्वातंत्र्य मिळाल्यावाचून विशेष अभ्यास न करावा अशा तऱ्हेची सावधानतेची सूचना श्रीस्वामी करू शकले हे लक्षात ठेवण्याजोगे आहे. वरील वाक्यात असा एक ध्वनि असू शकतो की श्री स्वामींचे जीवन तर धावपळीचे. ते जर योगाचा अभ्यास करतात तर आम्हीच तसा कां न

करावा ? त्यासाठी नियमांची कशाला धास्ती ?

त्यावर श्रीस्वामींचे उत्तर असे आहे, तुम्ही माझ्याकडे पाहून आपला कार्यक्रम आखू नये. ईश्वराने स्वातंत्र्य दिल्यावाचून आपण आपल्याच मताने नियमात शिथिलता ठेवणे हिताचे नाही. या उत्तरात ''ईश्वराने आपल्याला स्वातंत्र्य दिले आहे.'' हा अर्थ दडलेला असू शकतो. श्रीस्वामींचा स्वतःचा अवतार - अविग्रह होता हेहि त्यातून ध्वनित होत आहे.

श्रीस्वामी महाराज अखंड प्रवासात असले तरी आपल्या आश्रितांच्या पारमार्थिक प्रवासाची काळजीसुद्धा तेवढ्याच आत्मीयतेने वाहत असत. सत्पुरुषांची कृपामय कूर्मदृष्टि म्हणायची ती ही. त्यांचे उपदेशाचे शब्द दिसायला साधे असले तरी त्यांच्या मुखातून ते बाहेर पडले असल्याने त्यात **वेगळे नियंत्रण सामर्थ्य व अनुग्रह सामर्थ्य** असते. त्यामुळेहि साधकाचा लाभ होत असतो. उपपादनाची सुद्धा प्रत्येक थोर पुरुषांची आपआपली शैली असते. म्हणून पुष्कळदा केलेला उपदेश ग्रंथात पूर्वीच येऊन गेला असला तरी सत्पुरुषांच्या उपदेशाचे आगळेपण नाहीसे होत नाही. ही सारी प्रस्तावना यासाठी करावीशी वाटत आहे की श्रीस्वामींनी सिनोर (गुजराथ) वरून एक विस्तृतपत्र श्री उकिडवे, सावंतवाडी यांना लिहिले असून त्यात **राग-द्वेष, काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर, ईर्ष्या, असूया, दंभ, दर्प, अहंकार, इच्छा, भक्ति आणि श्रद्धा ह्या सोळा चित्ताच्या वृत्ति सांगितल्या आहेत.** मनाच्या वृत्तीचे हे वेगळेच परिगणन आहे. काम-संकल्प-विचिकित्सा इत्यादि रुपाने किंवा संतान - विज्ञान इत्यादि रुपाने उपनिषद ग्रंथातून मनाच्या वृत्तीचे वर्णन येते. त्यापेक्षा हे वेगळे आहे. या प्रत्येक वृत्तीचे स्वरुप काय आहे व एक वृत्ती दुसऱ्या वृत्तिहून वेगळी कशी आहे एवढेच सांगून श्रीस्वामी थांबत नाही तर त्या वृत्तीचा उपशम कसा करावा हेसुद्धा दर्शवीत आहेत. शेवट ते या विवेचनाचा निष्कर्ष असा सांगतात.

पहिल्या तेरा वृत्ती आपोआप पुनः पुनः उठतात व नरकात घालतात. म्हणजेच त्या अशुद्ध म्हणून त्या वृत्ति उठताच आठवून त्या वर सांगितल्याप्रमाणे रोधून वारंवार भक्ति श्रद्धा ह्या शुद्ध वृत्ति आहेत. म्हणून त्या प्रयत्नाने उठवाव्या.

**सिनोर १८९९**

योगविषयक मार्गदर्शनात ज्याप्रमाणे श्रीस्वामींचे प्रक्रिया पांडित्य दिसते, त्याचप्रमाणे वरील पत्रांत परिभाषापांडित्य दिसते. वस्तुतः भक्ति-श्रद्धा हे शब्द किंवा राग - द्वेष / काम क्रोध हे शब्द समानार्थक वाटतात. परंतु श्रीस्वामींनी त्यातील वेगवेगळ्या आशयछटा स्पष्ट तर केल्या आहेतच, शिवाय याच्या जोडीला ज्याला पातंजल योगसूत्रात प्रतिपक्ष भावन (विरोधी वृत्तीचे उद्भावन) म्हणतात त्याची दिशा सुद्धा इथे सुचविली आहे. हा शब्दांचा अर्थ कीस काढणे नव्हे. तसे उद्योग करण्यात श्रींना स्वारस्य नाही. आपल्या पुढे असलेला साधक कोणता अभ्यास करून परमार्थाच्या



प्रवासात यशस्वी होऊ शकतो, यासाठी केलेले हे दिग्दर्शन आहे. म्हणूनच त्याचे मूल्य चिरंतन आहे. उपनिषदात केलेल्या मनोवृत्तीच्या वर्णनापेक्षा वेगळी दिशा सुचवून श्रीस्वामींनी आपले परिभाषा - स्वातंत्र्य सुद्धा दाखवून दिले आहे. मध्यवर्ती सिद्धांत अबाधित ठेवून अवांतर तपशीलाच्या बाबतीत प्रत्येक अधिकारी पुरुषाला प्रतिपादनाची नवी नवी दिशा ठरविता येते, हाच त्याचा अर्थ होय. सरते शेवटी साधकाचे कल्याण साधणे हे महत्त्वाचे. या दृष्टीने श्रीस्वामींचे हे मार्गदर्शन समाजापुढे येणे अत्यंत आवश्यक होय.

या सर्व पत्रांतून आपल्यास **कळवळ्याची जाति** दिसून येते. आतापर्यंत आर्त व जिज्ञासु-साधकाशी संबंधित असलेल्या पत्रांचा उल्लेख आपण केला. पण तेवढ्याच मर्यादेतील ही पत्रे आहेत असेही नाही. जो कोणी जवळ येईल त्याच्याशी संवाद साधण्यासाठीच हे पत्राचे माध्यम असल्याने यांत अनेक रंग विखुरले आहेत. गांजा पिण्याचे व्यसन असणाऱ्या बंडू शागीर्दासाठी **''निर्व्यसनिप्रियो विजयते''** अशा आद्याक्षराने गुंफलेले श्रीदत्तस्तोत्र इथे मिळेल. भक्तांच्या इच्छेवरून रचलेली **''भोजन पात्राची आरती''** इथे मिळेल. परीक्षेस बसताना उत्तीर्ण होण्यासाठी लिहून दिलेला श्लोक (मंत्र) इथे मिळेल. मधूनच नवा दंड - कमंडलू. उपलब्ध करून देण्यासाठी पाठविलेल्या पत्रात दंड - कमंडलूचे शास्त्रीय वर्णन बघायला मिळेल, काहीच पूर्व अनुमति न घेता श्रीस्वामींचे ग्रंथ आपल्या व्यक्तिगत स्वार्थासाठी मुद्रित करणाऱ्या हळबे नावाच्या व्यक्तीला शासकीय दंड व्हावा यासाठी वाडीच्या पुजाऱ्यांना केलेले आवाहन मिळेल. वाडीच्या पुजाऱ्यांची वर्तणूक बिघडल्याबद्दल त्यांची केलेली कानउघडणी वाचायला मिळेल. वारंवार होणारे श्रीदत्तगरूचे संदेश व त्याला अनुसरून चाललेला प्रवासक्रम याची माहिती इथे मिळेल. असे नानारंगाचे हे धनुष्य आहे. **ही पत्रे म्हणजे श्रीस्वामींच्या पतिजीवनाचा स्वच्छ आरसा. '' निःश्वासान्ध इवादर्शः ''** अशी श्रीवाल्मिकींनी एक उपमा दिली आहे. आरसा धुळीनेच मळतो असे नाही तो पाहणाऱ्यांच्या निःश्वासाने सुद्धा मळू शकतो, असा या बचनाचा अर्थ होय. या आरशाचे मात्र तसे होऊ नये. या आरशाचा उपयोग नीट होण्यासाठी आपल्यावर सुद्धा काही दायित्व आहे हे विसरता येणार नाही. **कोण ही पत्रे लिहीत आहे ही जाण जर जागती व श्रद्धा कोमल असेल तर ही पत्रे अर्थाचा वर्षाव करतील.** ती कोमलता सुद्धा ही पत्रेच पुरवतील, पण त्या दृष्टीने पाहावे मात्र लागेल. एका बाजूने प्लेग व दुष्काळ या 'सप्तग्रहीच्या पीडेने' सारे लोकजीवन वाळून गेले आहे. दुसऱ्या बाजूने अपरिग्रह, संन्यास धर्माचे भ्रमंतीचे जीवन, व संन्यास-धर्माचे इतरहि अत्यंत कठोर - विधी - नियम यांनी स्वतःचे व्यक्तिगत जीवन संकट-मय झाले आहे. **अशाहि वैराण वाळवंटात फुललेले हे श्रीस्वामींचे जीवन आहे एवढी एक जाण ठेवली तरी ही पत्रे अर्थदृष्ट्या कदापि शिळी होणार नाहीत.** नव्हे, त्यांचा निर्मल आमोद निरंतर दरवळतच राहील. बृहदारण्यक उपनिषदातील एक सुवचन श्रीस्वामींच्या

या पत्रराशीत एका ठिकाणी आढळते. प्रतिकूल परिस्थितीतहि अभंग असलेल्या श्रीस्वामींच्या आध्यात्मिक श्रीमंतीचे विवरण त्यात मिळेल.

येथील हाल पाहवत नाहीत... लोक पोरासाठी नवस करीत व ढोरांची चोरीहि करीत. तेच लोक पोरेढोरे शहरात सोडून निष्ठुरपणे जातात. असो. **हा एक तमाशा निर्विकारत्वे साक्षीपणे पाहत पर्यटन करावे.**

**धान्यादिकांची महर्गता झाली तरी सच्चिदानंदरूपामध्ये कधीहि तूट नाही. ( एष नित्यो महिमा ब्राह्मणस्य न वर्धते कर्मणा नो कनीयान् )**

**द्वारका १८९९**

बृहदारण्यक उपनिषदात येणारे हे वचन फार तोलामोलाचे आहे. ज्या संदर्भात श्रीस्वामी हे वचन सहज उद्‌धृत करून जातात तो, या वाक्याची सखोलता तेवढीशी न्याहाळू देत नाही. महागाईसारख्या आपत्तींचा श्रीस्वामींच्या मनावर परिणाम होऊ शकत नव्हता एवढाच ढोबळ अर्थ या वाक्यावरून आपल्या लक्षात येतो. पण तेवढीच या वाक्याची व्याप्ति नाही. तसे अलौकिक धैर्य काही निवडक व्यक्तिंमध्ये असते. व त्याबद्दल त्यांचे गुणगान सुद्धा आपण करीत असतो. पण लौकिक व्यवहारातील त्या अलौकिक धैर्याचा या उपनिषद वचनात उल्लेख अभिप्रेत नाही. एवढे मात्र आपण इथे लक्षात ठेवायचे आहे. या वचनाचा उत्तरार्ध पाहिला म्हणजे त्याची खोली लक्षात येते.

**तस्माद् एवंविच्छान्तो दान्त उपरतस्तितिक्षुः समहितो भूत्वाह्यान्येवात्मानं पश्यति सर्वमात्मानं पश्यति नैनं पाप्मा तरति सर्व पाप्मानं तरति नैनं पाप्मानं तपति सर्व पाप्मानं तपति विपापोऽविरजो ऽविचिकित्सो ब्राह्मणो भवति एष ब्रह्मलोकः।**

**बृहदारण्यक ४.४.२३**

**( ब्रह्मवेत्त्या पुरुषाचे स्वरूप व सामर्थ्य, याप्रमाणे कोणत्याहि आगन्तुक कर्म - प्रक्रियेवर अवलंबून नसल्याने तो इंद्रिये व मन यांच्या वासनात्मक ओढीपासून मुक्त होऊन सर्व एषणांचा त्याग करून अत्यंत एकाग्रतेने अंतर्यामी आत्म्याला बघत असतो. आपणाव्यतिरिक्त या जगात अणुमात्र दुसरे काही नाही हे तो अनुभवत असतो. अशा व्यक्तीला पुण्य-पापाचा लेश स्पर्श करीत नाही. त्यांनाहि तो आत्मभावानेच पाहतो. कोणतेहि पाप त्याला बाधू शकत नाही. उलट, हाच त्यांना आपल्या सर्वात्मभाव दृष्टीने भस्मसात् करतो. असा हा पुरुष धर्माधर्माच्या अतीत, कामाच्या अतीत, संशयाच्या अतीत होऊन मी सर्वात्मा परब्रह्म आहे या धारणेवर स्थिर असतो. ब्रह्म-लोक म्हणतात, तो हा, सर्वात्मभावाचा साक्षात्कार होय. (भावार्थ)**

बृहदारण्यक उपनिषदातील या वचनाची ही व्याप्ति पाहिली म्हणजे श्रीस्वामींनी सहज ओघात उच्चारलेल्या या वाक्याचे खरे मर्म थोडे तरी लक्षात येईल. प. प. श्रीनरसिंहसरस्वती दीक्षित स्वामी यांनी रचलेल्या श्रीटेंब्येस्वामींच्या आरतीत **"सोऽहं हंसः पक्षाभ्यां संचरसि ह्याकाशे"** तू हंस आहेस, तू आपल्या दोन पंखांनी सुदूर आकाशात




उडत असतोस, असे जे काव्यात्मक व आध्यात्मिक वर्णन केले आहे ते या बृहदारण्यकातील आशयाची एक झलक आहे. अशा या दिव्यतेचे अखंड वैभव लेवून संचार करीत राहणाऱ्या महापुरुषाने ही पत्रे लिहिली आहेत एवढे जरी आपल्या लक्षात आले तरी हा "आरसा" निश्वासान्ध होण्याचे कारण नाही. **उलट, ही पत्रे म्हणजे श्रीस्वामींनी लिहून ठेवलेली दैनंदिनी आहे, हे श्रींचे अधिकृत आत्मचरित्र आहे; ही एक संग्रह गाथा आहे. हा एक श्रींनी आपल्याशी केलेला विश्रम्भालाप आहे असा नवा नवा आशय जाणवून आपली श्रद्धा दुणावेल व आपल्या जीवनातील क्षण सोन्याचे होऊन जातील.**

श्री. वासुदेवराव चोरघडे यांनी पत्रांची वेगळी वर्गवारी करून वाचकांना सादर करण्याची जी सेवा श्रीचरणी रुजू केली त्याबद्दल त्यांचाहि आपल्यास हेवा वाटेल. सर्व वाचकांच्या व माझ्या वतीने त्यांचे पुनः एकवार आभार. प्रस्तावना एवढी लांब असत नाही. परंतु श्री. वासुदेवराव यांच्या कृपालोभामुळे हा वाचेचा पघळ होऊन गेला. त्याबद्दल सर्वांप्रति क्षमा मागतो.

श्रीरामनवमी, शके १९१९ — श्रीस्वामीचरणानुरागी

**गुणाकर बामन पिंपळापुरे**



# * पत्रान्तरंग *

| पत्र क्र. | आशयशीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|

## १ - प्रासंगिक सूचना इत्यादि


| | | |
|---|---|---|
| १) | आता भेट प्रारब्धाधीन | ३८ |
| २) | उत्तर यात्रेचा विचार | ३८ |
| ३) | पुढचा मुक्काम अनिश्चित | ३८ |
| ४) | होळकरशाहीत चातुर्मास | ३९ |
| ५) | येऊन काय करायचे | ३९ |
| ६) | मुक्काम तिलकवाडा मारुती मंदिर | ३९ |
| ७) | भगवद्‌भजनाने कालक्षेप करावा | ४० |
| ८) | भगवद्‌भजनी प्रमाद नसावा | ४० |
| ९) | द्वारकेला शारदामठात | ४० |
| १०) | हेही दिवस निघोन जातील | ४१ |
| ११) | ग्रंथरचना हे रामो हरि करणाऱ्या मुखाचे माहात्म्य नव्हे | ४१ |
| १२) | बाकी दुष्काळ कठीण असे. तूर्त गीता चालू आहे. | ४२ |
| १३) | 'गणेशहृदय' पाठवावे | ४३ |
| १४) | परमहंस परिव्राजकाचार्य हे मठाधिपतीचे महत्त्व | ४३ |
| १५) | आईचा जीवमान असेपावत सेवा करावी | ४४ |
| १६) | यानंतर मुक्काम काशी | ४४ |
| १७) | प्रयागास जाण्याचा विचार | ४४ |
| १८) | तूर्त मुक्काम बिठूर इथेच | ४५ |
| १९) | 'अंतकाले च मामेव' कसे घडावे. | ४५ |
| २०) | हे मरण योग्याला सुद्धा दुर्मिळ | ४५ |
| २१) | दंड कमंडलू पाहिजेत - कसे असावे | ४६ |
| २२) | इकडे कानपुरात प्लेग | ४७ |
| २३) | जयंतीमुळे लिहिणे झाले नाही. | ४७ |
| २४) | संस्कृत गुरुचरित्र पाठविले | ४८ |





| | | |
|---|---|---|
| २५) | पत्राद्वारे दर्शन होत आहे | ४८ |
| २६) | 'मी सांभाळून घेईन' असे सांगणे झाले | ४८ |
| २७) | मुक्काम नरसी | ४८ |
| २८) | आपण पादुकाशीच आहो | ४९ |
| २९) | सवड सापडत नाही. | ४९ |
| ३०) | प्रभु इच्छेने घडेल ते घडो | ४९ |
| ३१) | इथून काशीकडे | ५० |
| ३२) | सर्वांचे मन पुनरागमनाकडे | ५० |
| ३३) | पाऊस नसल्याने दुष्काळ मोठा | ५० |
| ३४) | या देशी अतिशय उन्हाळा | ५१ |
| ३५) | वाडीकडे येणार. भेटीस यावे | ५१ |
| ३६) | रामेश्वरास जाण्याचा विचार | ५१ |
| ३७) | सध्या मुक्काम वाडी - पुढचा भरवसा नाही | ५२ |
| ३८) | उद्या रामेश्वराकडे जाणार | ५२ |
| ३९) | तंजावर - चातुर्मास इकडेच होईल | ५२ |
| ४०) | चातुर्मास्याचा अद्याप निश्चय नाही | ५२ |
| ४१) | कविता स्फुरण - हे ध्यानविघ्न | ५३ |
| ४२) | वेणू तीरावरील निवास | ५३ |
| ४३) | 'संदीप्ते भवनेपि कूपखननं' - उपयोगी नाही | ५३ |
| ४४) | भगवंताने हातात धरले तेच गती देतील | ५४ |
| ४५) | आता शांतता दिसते | ५४ |
| ४६) | उदुंबराची खांदी तोडू नये | ५४ |
| ४७) | दुसरी तार पोचली नाही. | ५५ |
| ४८) | श्री गुरुप्रसादासाठी नित्य प्रार्थना सुरू. | ५५ |
| ४९) | प्रसाद होईल | ५५ |
| ५०) | सर्वांनी भगवत्स्मरण करावे - भगवत्प्रसाद होईल | ५५ |
| ५१) | गंगातीरी जाणे झाल्यावाचून पुनः फिरणे नाही | ५६ |
| ५२) | मालामंत्र पाठ करावे | ५६ |
| ५३) | संध्येवाचून रात्री गायत्री जप करू नये | ५६ |
| ५४) | तूर्त शारीरभाष्य पाठ चालू | ५७ |

५५) सध्या मुक्काम नरसी ........................................ ५७
५६) ईश्वरभजनी सादर राहावे........................................ ५७
५७) पुढे माळव्यात ........................................ ५८
५८) एकादशीचा वैश्वदेव........................................ ५८
५९) संतान प्राप्तीसाठी मंत्रजप........................................ ५९
६०) दत्तस्तोत्र ........................................ ५९
६१) नाव कळल्याशिवाय मंत्र देता येत नाही........................................ ६०
६२) गुजराथी पुस्तके आपल्या उपयोगी नाही........................................ ६०
६३) सदाशिवमंत्राचे पुरश्चरण ........................................ ६०
६४) विशेष लिहिणेस वेळ नाही........................................ ६१
६५) जगदगुरूचा ठराव पाहून करावे ........................................ ६१
६६) रोगशांतीसाठी प्रार्थना सुरू आहे ........................................ ६१
६७) उद्या इथून उत्तरेकडे ........................................ ६१
६८) भिक्षेतील द्रव्य दक्षिणादिकी योजावे........................................ ६२
६९) या देशी संन्याशाविषयी अतिशय भक्ती ........................................ ६२
७०) जगद्‌गुरु शृंगेरी स्वामींची भेट........................................ ६२
७१) आता कुंभकोणास जाऊन आलेल्या वाटेशिवाय गती नाही........ ६३
७२) वाकेरीचे भाते पाठवावे ........................................ ६३
७३) नरसोबावाडीतील तीर्थे ........................................ ६३
७४) मंडनमिश्रांची आश्रमांतरातील नावे........................................ ६४
७५) श्रीगुरूचे भजन यात आमचे समाधान ........................................ ६४
७६) स्तोत्र अवकाशाने पाठवू ........................................ ६४
७७) पुढे सप्तगोदावरीकडे जाणे........................................ ६५
७८) किनाऱ्याने कृष्णातीरी येणे झाले........................................ ६५
७९) प्रवासासंबंधी सांगणे ........................................ ६५
८०) अजून प्रयाणाचा निश्चय नाही........................................ ६६
८१) 'ब्रह्मानंद स्वामींनी दोन मंदिरे श्रीगुरूची बांधली'................ ६६
८२) इकडे येऊ नये – सोईअभावी संकट पडायचे ........................ ६६
८३) थोडे श्रवण होत आहे ........................................ ६७
८४) श्री दत्तगुरूचे गुणानुवाद वर्णावे ........................................ ६७





८५) तिथ्यन्ती पारणा करणेचा शास्त्रार्थ........................................ ६७
८६) गुरुचरित्र स्वाहाकारासंबंधी निर्णय सांगता येत नाही............. ६७
८७) श्रीगुरु सर्वांतरी सर्वसाक्षी आहेत........................................ ६८
८८) देवालयासंबंधी सूचना ........................................ ६८
८९) दुर्लक्ष्याने घडले तो अपराध नव्हे ........................................ ६९
९०) उद्या प्रातःकाळी पुढे प्रयाण........................................ ६९
९१) प्रकृतीमान कसा आहे ? ........................................ ६९
९२) पाय लचकल्यामुळे राहणे झाले ........................................ ७०
९३) शेत सोडवून देवांकडे योजना करावी ........................................ ७०
९४) येथे दत्तजयंतीउत्सव झाला........................................ ७०
९५) उद्या गोकर्णास प्रयाण - आज तैत्तिरिय संपले. ........................ ७१
९६) पुढे कृष्णातीरी जागे होईल........................................ ७१
९७) साक्षीपणाचे निरंतर अनुसंधान ठेवावे........................................ ७१
९८) फलादिक असतील ती पूजेकडे ठेवावी........................................ ७२
९९) चहूकडे कृष्णा भरली आहे........................................ ७२
१००) गोदातीरी पर्यटन ........................................ ७२
१०१) इथे येणे कठीण - लोकास श्रुत व्हावे........................................ ७३
१०२) अडचणीत पत्राद्वारे दर्शन मानावे........................................ ७३
१०३) चातुर्मास समाप्ती ........................................ ७३
१०४) तूर्त मुक्काम गरुडेश्वर........................................ ७४
१०५) या रानात मंडळीने येऊ नये........................................ ७४
१०६) इथे छाट्याही वाळणें कठीण........................................ ७४
१०७) जप ठेवावा - संकट जाईल ........................................ ७५
१०८) ईश्वरास रात्रंदिवस अभेदाने चिंतीत जावे........................................ ७५
१०९) अजपाजप - पुरुषसूक्ताने पूजा नियम ........................................ ७५
११०) साक्षीभूत मी आहे असे अनुसंधान ही आमची सेवा ............. ७५
१११) करवेल तावत नोकरी - रात्रौ अध्यात्मग्रंथ वाचावे............. ७६
११२) यज्जाग्रतो दूरमुदैति या ऋचांचा पाठ अन्नपूर्णे सदापूर्णे भिक्षारंभ. ७६
११३) स्वानुसंधानाचा प्रमाद न व्हावा........................................ ७६

| | | |
|---|---|---|
| ११४) | दयाळू गुरुमाउली कृपा करीलच | ७७ |
| ११५) | कल्पवृक्षाखाली बसून चौपदरीस गाठ कां? | ७७ |
| ११६) | आपआपला उपासना मंत्र नित्यक्रमाहून वेगळा जपावा. | ७८ |
| ११७) | निर्व्यसनि प्रियो विजयते | ७८ |
| ११८) | प्रत्यगभिन्न परमात्मा मी आहे | ७९ |
| ११९) | पत्राद्वारे दर्शन मानून स्वस्थ राहावे | ७९ |
| १२०) | नागपुरात प्लेग जोरात | ८० |
| १२१) | पौर्णिमेस उत्तरेकडे जाणार | ८० |
| १२२) | कंठ हा यजुर्वेद आहे | ८० |
| १२३) | अप्रार्थित दुःख येते तसे सुखही येते | ८० |
| १२४) | निष्ठेने ईश्वरभजन करावे | ८१ |
| १२५) | स्वानुसंधान सदोदित असावे | ८१ |
| १२६) | साक्षीपणाचे अनुसंधान ठेवावे | ८१ |
| १२७) | उगीच धाक धरला तो सोडावा | ८१ |
| १२८) | प्रणवोपासना चालवावी | ८२ |
| १२९) | उत्तरी हाल कळवावा | ८२ |
| १३०) | सत्कालक्षेप करावा | ८२ |
| १३१) | हरे राम हरे कृष्ण - औपनिषद मंत्र | ८२ |
| १३२) | बेदरचा संतप्रवृत्ती राजा | ८३ |
| १३३) | अनन्य शरणाला परमेश्वर जवळ | ८३ |
| १३४) | विजय वाड्याकडे प्रयाण | ८३ |
| १३५) | कृष्णातटाने निघणे | ८३ |
| १३६) | पुढील समाचार पंधरा दिवसांनी | ८४ |
| १३७) | अंगारा व शिंग भस्म घ्यावे | ८४ |
| १३८) | फळ आले नाही हे प्रारब्ध समजावे | ८४ |
| १३९) | काकनाडात जाऊन दर्शस्नान | ८५ |
| १४०) | आलेल्या मंडळींनी गावभोजन केले | ८५ |
| १४१) | नागपूर बाजूने जाणे केले. | ८५ |
| १४२) | कृष्णातीराहून विजयवाड्याकडे प्रयाण | ८६ |
| १४३) | खुशालीचे पत्र पाठवावे | ८६ |
| १४४) | सुषुप्ति लक्षण | ८६ |
| १४५) | वाडीवर आल्यास त्रिवेणी स्नान घडेल. | ८७ |
| १४६) | सत्पुरुष सान्निध्य तारक | ८७ |
| १४७) | तूर्त सत्संगति वेदांतशास्त्रच मानावे | ८८ |


## २ - दत्तसंप्रदाय - व्यापक


| | | |
|---|---|---|
| १४८) | श्री दत्तसंप्रदाय हा भागवत संप्रदाय आहे. | ८८ |


## ३ - व्यवहार दक्षता


| | | |
|---|---|---|
| १४९) | लुच्चेगिरीला क्षमा नाही | ८९ |


## ४ - ग्रंथरचना तत् संबंधी सूचना


| | | |
|---|---|---|
| १५०) | दत्तलीलामृतसिंधु - ग्रंथ भगवद् इच्छेने झाला | ८९ |
| १५१) | गुरुचरित्र छपाईला नकार | ८९ |
| १५२) | टीका व टीपांसाठी गुरुचरित्र पाठवावे | ९० |
| १५३) | पंचीकरण भाष्य पाठवावे | ९० |
| १५४) | स्मरणाने टीका लिहिली | ९० |
| १५५) | सटीक पांचपाक्षिक | ९१ |
| १५६) | ईश्वर इच्छेने झालेली टीका बरोबर आहे | ९१ |
| १५७) | ग्रंथछपाई सुरू झाली काय? | ९२ |
| १५८) | लोकांना उपयोग होतो तर बरेच आहे. | ९२ |
| १५९) | कूर्मपुराण पाठवावे | ९३ |
| १६०) | सवडीप्रमाणे आख्याने होतील | ९४ |
| १६१) | माहात्म्याचे पुस्तक लिहून झाले | ९४ |
| १६२) | गुरुचरित्रचूर्णिका घडली | ९४ |
| १६३) | वे. गणेश सातवळेकरांसाठी दोन पदे | ९५ |
| १६४) | सटीक दत्तमाहात्म्य पाठविले | ९६ |
| १६५) | क्षिप्राकाठी मुक्काम | ९६ |

१६६) सध्या पाठ चालू ........................................ ९७
१६७) दत्तमाहात्म्य – साडे पाचहजार ओव्यांचा ग्रंथ ........................ ९७
१६८) गच्छतः स्खलनं क्वापि ........................................ ९७
१६९) खर्चाच्या तारतम्याने मूल्य ठरावे ........................................ ९८
१७०) पुस्तक साक्षात दर्शन समजावे........................................ ९८
१७१) नश्वर देहापेक्षा यशःकीर्ति कायम........................................ ९८
१७२) कानडी कवितेचा अर्थ पाठवावा ........................................ ९९
१७३) कष्टोपशमनार्थ गुरुचरित्र समश्लोकी करण्याचे सांगणे झाले ......... ९९
१७४) नोऽप्रभो असेच पाहिजे ........................................ १००
१७५) अवकृपा नाही - गुरुचरित्र पाठवावे ........................................ १००
१७६) स्वाराज्य सिद्धी पुस्तक आले काय ? ........................................ १०१
१७७) गुरुचरित्र पहिली प्रत ........................................ १०१
१७८) अनुरागपूर्वक परमेश्वर सेवन करणे........................................ १०१
गुरुचरित्रात नवीन श्लोक भरू नये........................................ १०१
१७९) दत्तमाहात्म्याची घाई करू नये ........................................ १०२
१८०) 'गुरुचरित्र सार' पोचले ........................................ १०२
१८१) छपाईस मनाई नाही - कवितेत क्षेपक पडू नये ........................ १०२
१८२) पुस्तके भाविकांना द्यावी........................................ १०३
१८३) श्री दत्तचंपू व कृष्णालहरी उदित........................................ १०३
१८४) श्री दत्तचंपूवर दोन स्तबकांची टीका........................................ १०३
१८५) गुदस्ताची स्तोत्रे व पदे पाठवावी........................................ १०४
१८६) सूत्रवृत्ति भाष्य ........................................ १०४
१८७) अध्ययन चांगले चालवावे........................................ १०४
१८८) ४४ अध्यायांची चूर्णिका झाली ........................................ १०५
१८९) श्री जगद्गुरूंनी उत्तम प्रेम ठेवले ........................................ १०५
१९०) सदाशिवब्रह्मेंद्र कृतब्रह्मसूत्रवृत्ति ........................................ १०६
१९१) वृद्ध शिक्षा - उपनिषत् सूत्रस्मरणार्थ स्मरणी ........................ १०७
१९२) झालेले भाष्य - कुठे पाठवायचे ? ........................................ १०७
१९३) श्री दत्ताची राजधानी सुखाची (पद) ........................................ १०८



१९४) सूत्रवृत्ति पाठवावी ........................................ १०८
१९५) सत्यदत्त व्रत कथा ........................................ १०८
१९६) दत्तसहस्रनाम पाठवावे........................................ १०९
१९७) दत्तपुराण शेवटचा ६४ वा सटीक पाठवावा ........................ १०९
१९८) विष्णुयाग विधान पाठवावे........................................ १०९
१९९) देवी स्तोत्र पाठविले आहे ........................................ ११०
२००) लिहून पाठविण्याचे श्रम करू नये........................................ ११०

## ५ - औषध योजना - व्याधिमुक्तीसाठी उपाय

२०१) अंतरातील देवाची बदली न होऊ देणे........................................ ११०
२०२) कडकी व श्वेत कुष्ठासाठी औषध........................................ १११
२०३) सदैव भजनी सादर असावे ........................................ १११
२०४) स्वपदापासून च्युत होऊ नये........................................ १११
२०५) श्रीगुरूचे तीर्थ दोन वेळ घ्यावे........................................ ११२
२०६) औषधाबरोबर 'मुंचयित्वा हवि' चा जप ........................................ ११२
२०७) गोकर्णीची जडी घ्यावी ........................................ ११२
२०८) थंड पाण्याने स्नान करू नये.पोटातील उपशांति आहे काय? . ११३
२०९) संग्रहणी - उपशमाची इच्छा नाही........................................ ११३
२१०) बेताने राहून औषध सेवत करावे ........................................ ११३
२११) गोकर्णीच्या जटा पाठवाव्या........................................ ११४
२१२) कोहळे पाक रीति कळवू ........................................ ११४
२१३) मौक्तिक घ्यावे - गुरुभजनच तारक होय ........................ ११४
२१४) श्री दत्तमालामंत्राचा १००० जप करावा ........................ ११५
२१५) जसजशी सत्त्वशुद्धी तसतसे देवाचे सान्निध्य........................ ११५
२१६) औपनिषद मंत्राचा जप घडेल तसा करावा........................ ११५
२१७) श्वास कमी करण्यास धौती ........................................ ११६
२१८) दुःख सहन करावे........................................ ११६
२१९) ज्वरास डिकेमाली व वेखंड ........................................ ११६
२२०) रास्नादि काढ्यातून गुग्गुळ घ्यावा........................................ ११७

२२१) शुचिर्भूतपणे वागावे ........ ११७
२२२) १० तोळे उपळसार पाठवावी ........ ११७
२२३) मुलगा पिडकास म्हणून नेम करावा ........ ११७

## ६ - ज्योतिषविषयक पत्रे

२२४) अरिष्ट योगासाठी मृत्युंजय जप ........ ११८
२२५) ज्योतिषशास्त्री प्रारब्धापेक्षा प्रयत्न विशेष ........ ११८
२२६) पक्षी व अवस्थाबल पाहून शुभाशुभ ........ ११९
२२७) सप्तग्रहीचे फल ........ ११९
२२८) आता इथे पत्र पाठवू नये ........ १२०
२२९) ग्रहण स्पर्श काळ ........ १२०

## ७ - योग - अभ्यास साधन

२३०) माला मंत्रासाठी आसन कोणते? ........ १२०
२३१) चित्ताग्रतेला उपाय ........ १२१
२३२) अलातृचक्रवत् संसारभ्रम ........ १२१
२३३) एका स्वतंत्र उपनिषदाचा विषय ........ १२२
२३४) चित्ताच्या वृत्ती व त्याचे नियमन ........ १२३
२३५) दृष्टी स्थिर झाली की चित्त स्थिर होईल ........ १२५
२३६) समाधि - साधन ........ १२५
२३७) नियम घडत नसता अभ्यास करणे बरोबर नाही ........ १२६
२३८) अनन्य शरणता ठेवावी ........ १२६
२३९) अजपाजप घडेल तितका करावा ........ १२७
२४०) पादुकांचे चिंतन करावे ........ १२७
२४१) कर्तव्याचे अनुसंधान सोडू नये. ........ १२७
२४२) चातुर्मासमाप्ती विधी ........ १२८
२४३) 'साक्षी चिद्रत्यगात्मा' भावना ठेवावी ........ १२८
२४४) मुलाबद्दल शिवास अभिषेक करावा ........ १२९



२४५) आपल्या नादी न वागता तिकडेस प्रार्थना करावी ........ १२९
२४६) सर्वांसी मिळून रहावे ........ १३०
२४७) चंडीपाठ व रुद्रानुष्ठान करावे ........ १३०
२४८) देहत्रयी व्यापाराचा साक्षी श्री दत्त ........ १३०
२४९) स्वानुसंधानाचा प्रमाद तेच मरण ........ १३०
२५०) प्रमीत पितरांचे कोणी नाही म्हणून उपोषण ........ १३१
२५१) तूर्त गुरुचरित्र वाचन व सूक्त जप ........ १३१
२५२) जितका जप घडेल तितका घडू द्या ........ १३१
२५३) ठरविल्याप्रमाणे चालू द्या ........ १३२
२५४) श्री चरणाकडे अनन्य शरण व्हावे ........ १३२
२५५) हंसाश्रम परित्याग झाल्याने संध्याधिकार नाही ........ १३२
२५६) उपोषण सोडून माधुकरी वगैरे करावी ........ १३३
२५७) गुरुचरित्र ५ ओव्या नित्य चुकवू नये ........ १३३
२५८) चित्तशांतीसाठी प्रणवाभ्यासाकडे चित्तवृत्ति ठेवावी ........ १३३
२५९) पुढे विशेष सेवा ........ १३३
२६०) माला मंत्राचे पुरश्चरण रोज १२ पाठ ........ १३४
२६१) एक सप्तक संतत धाराभिषेक करावा ........ १३४
२६२) रुद्राभिषेक व गुरुचरित्र पाठ सुरू ठेवावे ........ १३४
२६३) अभिषेक चालवावा. सात ब्राह्मण गुरुचरित्र पाठाला बसवावे .. १३५
२६४) यथाशक्ती श्लोकाचा जप ........ १३५
२६५) विष्णुयागाची त्वरा नाही ........ १३५
२६६) पत्रद्वारा दर्शन मानावे ........ १३६
२६७) नासाग्र दृष्टी - हृदयी अनुसंधान ........ १३६
२६८) यंत्रे धन असतात ........ १३६
२६९) अजून खेचरी वाढली पाहिजे ........ १३६
२७०) परमेश्वरावर निष्ठा ठेवून सत्कर्म करणे ........ १३७

२७१) संसाराचे ओझे मला नाही अशा बुद्धीने वागावे................ १३७
२७२) प्रति रविवारी श्री चे दर्शन करावे.............................. १३७
२७३) लिहिल्याप्रमाणे जप करावा .......................................... १३८
२७४) नारायण बली करावा......................................................... १३८
२७५) उदकशांति करून दिलेला जप करावा .............................. १३९
२७६) स्वप्नात निष्ठेप्रमाणे श्रीगुरूने देखावा दाखविला ................ १३९
२७७) श्रद्धा भक्ति, ध्यान या उपायाने देव पाहावा ........................ १३९
२७८) स्वैप्नार्थ - दंड घ्यावा........................................................ १४०
२७९) चिंतित ते स्वप्नात दिसते ............................................... १४०
२८०) सर्वथा काम सोडावा हा स्वप्नाचा अभिप्राय........................ १४०
२८१) तूर्त सेवा चालवावी .......................................................... १४१
२८२) अनार्ष ग्रंथाचा स्वाहाकार कोणी सांगावा............................ १४१
२८३) अनुमोदन द्यावे असे वाटत नाही........................................ १४१
२८४) स्वप्नाभिप्राय - भजन प्रभावाने सिद्धि .................................. १४२
२८५) दैन्य न आणता उमेदीने विचार करावा.................................. १४२
२८६) स्वप्न हेतू अनाकलनीय ..................................................... १४२
२८७) श्री दत्तात्रेय पाहि मां याचा जप करावा................................. १४२
२८८) स्वप्न वाईट नाही............................................................... १४३
२८९) आत्म व अन्न संस्कारार्थ वैश्वदेव ........................................ १४३
२९०) गोविंद भय्याजी चोरघडे यांनी आपल्या ................................ १४३
ज्येष्ठ चिरंजीवाला लिहिलेल्या पत्रातील अंश
२९१) स्वामींचे निर्वाण................................................................. १४४




# श्री प. प. वासुदेवानंद सरस्वती स्वामींचा पत्रसंग्रह

## १ - प्रासंगिक सूचना इत्यादि

पत्र क्रमांक १

|| श्रीदत्त ||

### आता भेट प्रारब्धाधीन

गंगाखेड — वै. व. ३०-१८१३, ६ जून १८९१

श्रींचे आज्ञेने उत्तरखंडी जाणे होत असता गोदातीरी वै. कृ. १४ शुक्रवारी दुपारी सौभाग्यवतीस देवाज्ञा झाली. क्रिया करून नंतर उत्तरपंथी जाणे होईल. आपण सदैव दत्तनामानुसंधान ठेवावे. लक्ष्मीनारायण यक्षिणी, चि. दत्तू व भालू यांस वरील मजकूर प्रविष्ट व्हावा, इहपर भयाने सत्कालक्षेप करावा. मातोश्री आईस मानसिक वंदन असावे. यावर आता भेट होणे प्रारब्धाधीन आहे. परंतु सदैव चरणकमल हृदयी ठेविले आहे. तेथील सर्व दृष्ट स्पृष्ट कृतोपकार मंडळीचे स्मरण आहे. हा मजकूर ती. बाबाजीपंत गोडे[१] यांस प्रविष्ट व्हावा.

१ : महाराजांचे श्वशुर

---

|| श्रीदत्त || पत्र क्रमांक २

### उत्तरयात्रेचा विचार

हरिद्वार — वै. कृ. १८१४, सन मे १८९२

नारायण, नर्मदातीराहून फा. कृ. २ रोज निघून वै. शु. १३ रोजी हरिद्वारी येणे झाले. पुढे नारायणाकडे जाणेचा विचार आहे. मननाविषयी लिहिण्यास सवड झाली नाही. कारण रस्त्यात थरणे[१] झाले नाही. पुढे चातुर्मास्यांत कुठेहि थरणे[१] होईल. तेथोन व्यवस्था घडेल. सर्व मंडळीस नारायण.

पत्ता : हरिद्वार येथे अहिल्याबाईचे धर्मशाळेत.

१ थांबणे

---

|| श्रीदत्त || पत्र क्रमांक ३

### पुढचा मुक्काम अनिश्चित

ब्रह्मावर्त — मार्गशीर्ष १८१८, डिसेंबर १८९६

आपण पाठविलेले पत्र हरिद्वार मुक्कामी पावलें. हल्ली हरिद्वारातून निघून ब्रह्मावर्ती

राहणे जाहले. परंतु थोडक्याच दिवसांत येथून स्थानांतर होणार आहे या वर्षी जयंती अमक्या ठिकाणी होईल म्हणून सांगता येत नाही. पुढे कायम राहणे ज्या ठिकाणी होईल तेथून पत्र पाठविता येईल. कळावे. नारायण.

(सन १८९७ जानेवारी महिना, प्रांत बुंदेलखंड, जिल्हा जालवण येथे श्रीस्वामींचा मुक्काम होता.

---

॥ श्रीदत्त ॥ **पत्र क्रमांक ४**

## होळकरशाहीत चातुर्मास

पेटलाद भाद्रपद कृ. १२-१८१९
२३ सप्टेंबर १८९७

श्रीदत्त होळकरशाही परगणा पेटलाद येथे चातुर्मास झाले. येथोन पत्र पाठविल्यांचे उत्तर नाही. तरी लवकर उत्तर आलेवर सर्व कळविण्यात येईल. लवकरच पुढे जाण्याचा विचार आहे.

---

॥ श्रीदत्त ॥ **पत्र क्रमांक ५**

## येऊन काय करायचे

नर्मदातीर मार्गशीर्ष व. ३,
शके १८१९ स. १८९७

नारायण, मिति माघ व. ३ रविवारपर्यंत क्षेम असो. वि. आपले आलेले पत्र आतांच पोचले. मजकूर समजला. आपण इकडे येण्याबद्दल पत्र पाठविले होते असे नाही. इकडून सहज मंडळी, तिकडे जाऊन येणार, आणि आपल्यास इकडे न मिळणारे जिन्नस मिळतील म्हणोन पत्र पाठविले होते. आता इकडे येण्याविषयी लिहिले तरी येऊन काय करावयाचे आहे ? असो. आपले मर्जीप्रमाणे करावे. विशेष लिहीत नाही. शंकर सप्रे यास नारायण प्रविष्ट व्हावें.

---

॥ श्रीदत्त ॥ **पत्र क्रमांक ६**

## मुक्काम - तिलकवाडा मारुती मंदीर

तिलकवाडा आषाढ कृ. ९-१८२०
ता. १३ जुलै १८९७

नारायण - गायकवाड राजधानीपैकी तिलकवाडा नर्मदानजिक मारुतीचे मंदिरात तूर्त आसन आहे. प्लेगचे संबंधाने जागोजाग जाण्याचा प्रतिबंध असल्यामुळें येथेच तूर्त राहणे घडले. तिकडील मजकूर बरेच महिने न कळल्यामुळे हे पत्र पाठविले आहे कळावे. श्रीदत्त, नारायण.



॥ श्रीदत्त ॥ **पत्र क्रमांक ७**

## भगवद्‌भजनाने कालक्षेप करावा

तिलकवाडा भाद्रपद शु. ४ श. १८२०
२१ ऑगस्ट १८९७

वे. शा. नारायण दीक्षित नरसोबावाडी यांस नारायण. विशेष गायकवाड सरकार बडोदे नजीक नर्मदातीरी तिलकवाडा येथे हनुमंताचे मंदिरात आसन आहे. प्लेग संबंधे जाणे होत नाही. यास्तव येथे तूर्त राहणे आहे. येथे ब्राह्मणाची घरे आठ आहेत. मात्र खेडेगाव असल्यामुळे भाष्य वगैरे पुस्तक मिळत नाही. **कूर्म पुराणाची प्रत काढली.** तपासून लौकरच मूळ प्रत पाठविण्यांत येईल. तेथील वर्तमान सविस्तर पत्रद्वारा कळवावे. भगवद्‌भजनाने कालक्षेप करावा. तेथील सर्व मंडळींस नारायण.

---

॥ श्रीदत्त ॥ **पत्र क्रमांक ८**

## भगवद्‌भजनी प्रमाद नसावा

तिलकवाडा अधिक आश्विन
व. १-१८२०
ता. ३० सप्टेंबर १८९८

वे. शा. नारायण दीक्षित नरसोबावाडी यांस नारायण. पाठविलेले पत्र पोहोचले. मात्र जाहलेली कविता किंवा ग्रंथ पाठवावा असे लिहिले. परंतु जी कविता झाली ती जेथेच्या तेथेच राहिली. आंता तूर्त येथे झालेल्या कविता संग्रह करून पाठविता येईल. स्वामींनी मागितलेले आन्हिक देण्याचा योग येत नाही. कारण हल्ली दोन वर्षे प्लेगामुळे खेडेगावातच राहणे झाले. **अच्युताश्रमी, यतिधर्म समुच्चय, विश्वेश्वरी** वगैरे ग्रंथ उपलब्ध न झाल्यामुळे तो योग येत नाही. पुढे पाहता येईल. रुद्राविषयी सदर ग्रंथ पाहणेस अजून मिळाले नाही. क्षेपक अध्यायाची वगैरे टीका करण्याचा बराच वेळ उद्योग शिथिल पडला. भगवद् इच्छा. कळावे. तूर्त आहिताग्नि कानभटजी कुठे असतात व कृष्णशास्त्री यांनी काय उद्योग सुरू ठेवला आहे ते कळावे. पुजारी वगैरे सर्वांस नारायण. हल्ली त्या ठिकाणी कोण नवीन स्वामी आहे कळावे. **वक्रतुंडबुवास नारायण, भगवद्‌भजनी प्रमाद नसावा.**

---

॥ श्री दत्त ॥ **पत्र क्रमांक ९**

## द्वारकेला शारदामठात

द्वारका ज्येष्ठ शु. ५-१८२१
ता. १३ जून १८९९

रा. रा. नारोपंत उकिडवे सावंतवाडी, नारायण. तूर्त श्रीक्षेत्र द्वारका येथे

शारदामठात आसन आहे. चातुर्मास्य येथेच करण्याचा विचार आहे. येथे गायकवाडी असल्यामुळे दक्षिणी वस्ती असून सर्व सोईस्कर आहे. येथे तूर्त रोगराई नाही. गेल्या वर्षी पर्जन्य न पडल्यामुळे लोक पीडित आहेत. अजूनहि येथे पर्जन्य पडला नाही. तिकडील प्लेग वगैरे कसा आहे. कळवावा. नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक १०

## हेहि दिवस निघोन जातील

द्वारका

आश्विन व ७-१८२१
२१ ऑक्टोबर १८९९

ना. उकिडवे सावंतवाडी यांस नारायण. पाठविलेले पत्र पोहोचले. इकडे मुळीच पर्जन्य नव्हता. श्रावण व. ५ रोजी १ इंच पाऊस पडला. पुन्हा मुळीच नाही. आता थंडी पडते. पेरे मुळीच नाहीत. येथेच चार हजार गुरे मेली. काही आहेत त्यांचा काय भरोसा. नागरमोथा कुटून ह्या दिवसांपर्यंत लोकांनी घातला. झाडावर पान नाही. दिवसानुदिवस फार महागाई होत आहे. गोरगरिबाला गायकवाड सरकारपासून खाण्याला मिळाल्यामुळे ह्या दिवसापर्यंत वाचले. १ महिन्यास १ लक्ष रुपये किंवा जास्त लागतात. अजून बारा महिने काढणे व एका परगण्यात ही तऱ्हा, आणखी असे परगणे बरेच आहेत. काय होईल ते ईश्वर जाणे. येथून ८-१५ दिवसांत सिद्धपुराकडे जाणेचा विचार आहे. ह्या क्षेत्रापैकी सर्व मंडळींचा येथे राहण्याचा अत्याग्रह आहे पण हे येथील हाल पाहावत नाहीत व हा प्रतिकार कोण करील ! ईश्वर इच्छा ! लोक पोरासाठी नवस करीत व ढोराची चोरीहि करीत तर लोक पोरेढोरे शहरात सोडून निष्ठुरपणे जातात. असो. **हा एक तमाशा निर्विकारत्वे साक्षीपणे पाहात पर्यटन करावे. १०० रु.ची म्हैस दुधाळ ५ रु. सुद्धा घेत नाहीत व सुंदर स्त्री सुद्धा पुरुषाला नको ह्यापरता तमाशा काय सांगावा ? हेहि दोन दिवस आहेत. 'दिनरात्री' न्यायाने निघोन जातील (माया मेघो जगन्नीरं वर्षत्येव यथातथा । चिदाकाशस्य नो हानिर्न वा लाभ इतीर्यते।)** सौराष्ट्र देश, श्रीक्षेत्र प्रभास येथे ९ अध्यायांची टीका झाली व बाकीची अनंत देश श्रीक्षेत्र द्वारका येथे पूर्ण झाली. येथील पुराणिकांनी प्रती काढण्याकरिता व समजून घेण्याकरिता आग्रह केल्यामुळे पाठविण्यास इतके दिवस लागले. आता सरस्वती विसर्जन होताच पाठविता येईल. काल वाडीहून नारायण दीक्षित व कृष्णशास्त्री वगैरेंचे पत्र आले.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक ११

## ग्रंथरचना : हे रामो हरि करणाऱ्या मुखाचे माहात्म्य नव्हे

शंकर सप्रे यांनी टीका होत आहे असे सांगितले तरी ती प्रसाद करून इकडेस मिळावी. त्याला उत्तर लिहिले. सावंतवाडीस पाठविण्याचे वचन गेले तेव्हा त्याकडे



पाठविली जाईल. तेथून तुम्हाला मिळण्याचे लिहिण्यात येईल. तरी जर छापणार तर मनाई नाही पण भलतेसकडेस सांदीस जाऊन पडू नये. न छापता दिल्या ठिकाणीच पडून राहू नये. जर छापण्याची सोय न घडली तर पाहिजे असल्यास १ प्रत उतरून घेऊन ही प्रत वाडीवर पाठवावी (पत्ता : नारायण लक्ष्मण दीक्षित किंवा बाळकृष्णशास्त्री) ही प्रत स्वच्छ लिहून काढण्यास मुळीच अवकाश मिळत नाही. कारण येथे भाष्यांचे पाठ वगैरे देण्याचे शिवाय इतरहि पाठ चालू आहे. त्याच व्यवधानात ही लिहिली. अक्षर चांगले नसून शोधहि घालावे लागले. प्रत पाठ नसून तोंडानेच जसे स्फुरले तसे लिहून टीका झाली व हे पुस्तक झाले. त्यांतहि चुका आहेत. सारंगपुरी तपासलेल्या पुस्तकावरून समप्रत करण्याचा विचार होता. पण मिळाली नाही. श्रीगुरुंची इच्छा. त्यांनी स्मृती दिल्याप्रमाणे घडले. तरी कुठे कुठे ह्या पाठविल्या पुस्तकाचे पाठ ठेवले. येथे खाली - अशी ओळ देऊन बाहेर दुसरी अक्षरे लिहिलेत. तो त्या ठिकाणी पाठ समजावा व कित्येक ठिकाणी सवड मिळाली तेथे टीकेतच पाठ दाखविला. जेथे + किंवा अंक दिला तेथे टीका झाल्यावर पश्चात् समजून घेणाऱ्यांनी खुलासा करावा अडल्यावरून टीप दिली. ती पाहिजे तर टीकेत लिहावी किंवा खाली टीप घ्यावी. ह्या टीकेचे जागोजाग भाष्यकारांचे संमत व उत्तर मीमांसा, न्याय व क्वचित् मीमांसा न्याय दिला. व्याकरणाचाहि भाग थोडा थोडा दिला आहे. शिवाय कठीण श्रुति व सूत्रे याचाहि अर्थ दाखविला. परंतु बरीच सूत्रे व श्रुति प्रमाणभूत असून त्यांचा अर्थ दाखवावा. परंतु तशी सवड न झाली. हा ग्रंथ मुमुक्षूला उपयुक्त आहे. मात्र संस्कृत भाषेत झाला. तूर्त लोक संस्कृताचे भाषांतर करतात हे कळते. तथापि अंतर्यामी श्रीगुरु यांची अशीच इच्छा. अस्तु. एक भाषा एकादसिद्धदेशी चालेल. पण संस्कृत सर्वत्र चालते. पुढे भाषांतर करणार तर खुशाल करो. ही टीका होणे एवढा ह्या व्यक्तीचा अधिकार नाही. (रामो हरि: ) करणाऱ्या मुखाचे हे माहात्म्य नव्हे, **तर हा श्रीस्वामींचा अनुग्रह व स्वहृदयस्थ स्वमहिमख्यापक श्रीदत्तगुरुप्रसाद जाणावा.** नारायण.

बुक पोस्ट पावताच जरुर उत्तर पाठवावे. सर्वांचा अग्रह आहे, की कार्तिक शु. २ रोजी अन्नकोट पाहून जावे. पाहावे. आपण चिंता करू नये. धान्यादिकाची महर्घता झाली तरी सच्चिदानंदरूपामध्ये कधीहि तूट नाही. (एष नित्य महिमा ब्राह्मणस्य व वर्धते कर्मणा नो कनीयान्)

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक १२

## दुष्काळ कठीण असे. तूर्त गीता चालू आहे

सिद्धपूर

मार्ग शु. ११-१८२१
१० डिसेंबर १८९९

रा. रा. नारायण उकिडवे सावंतवाडी यांस नारायण. श्रीक्षेत्र सिद्धपूर येथे

जयंतीचा उत्सव सुरू आहे. **तूर्त गीता चालू आहे.** संपताच डाकोरांस जाणार. तथापि येथे २०-२५ दिवस राहणें होईल व थंडी नव्हती हल्ली पडते. बाकी दुष्काळ कठीण असे. आपण नावे सांगितली ती खाली लिहिल्याप्रमाणे नावे.....

यांप्रमाणे ह्यांच्या नावाने कार्ड घालावे. शिवाय ह्यासंबंधी पत्रे आपल्याला येतात. त्यांनाहि गुरुचरित्र छापल्याचे कळविता येईल. कळावे. नारायण

---

॥ श्री दत्त ॥ **पत्र क्रमांक १३**

## " गणेशहृदय " पाठवावे

सिद्धपूर हाटकेश्वर मंदिर

मार्ग. व. २-१८२१
१८ डिसेंबर १८९९

वे. शां. सं. नारायण दीक्षित नरसोबावाडी यास नारायण. आपण पाठविलेले पत्र एक महिन्याने काल मिळाले. श्रीपंत कृष्ण यांस **गणेशहृदयाची** आवश्यकता आहे. तरी आपण घेऊन अगर तेथे नसेल तर कुरुंदवाडाहून आणून पाठवून द्यावे. दुसरे, मागील वर्षात कवितासंग्रह सावंतवाडी येथे उकीडवे यांच्या नावाने पाठविला. आता त्यांना आपणाकडेच पाठविण्याबद्दल पत्र पाठविता येईल. गुरुचरित्राचीहि टीका त्यांच्याकडेसच पाठविली आहे.

पत्ता : प्रांत गुजरात, तालुके सिद्धपूर येथे सरस्वतीचे तीरी हाटकेश्वर महादेवाचे मंदिरात धर्मशाळेत देणे, असा लिहिणे. नारायण

---

॥ श्री दत्त ॥ **पत्र क्रमांक १४**

## परमहंस परिव्राजकाचार्य हे मठाधिपतीचे महत्त्व

चिखलदरा

ज्येष्ठ्य शु. ३-१८२२
३१ मे १९००

रा. रा. नारायण उकिडवे सावंतवाडी यांस नारायण. आजपर्यंत एका जागी कायम राहणे नव्हते म्हणोन पत्र पाठविले नाही. येथे वैशाख ३० रोज येणे झाले.येथे चातुर्मास करणार. या देशी दुष्काळामुळे मनुष्ये मेली ती गणतीच नको. तूर्त महामारीनेहि मरतात. हे ईश्वराची इच्छा. असो येथे गुरुचरित्राच्या जाहिराती आल्याचे गंगाधराने सांगितले (परमहंस परिव्राजकाचार्य हे महत्त्व जाहिरातीत देणे नको होते कारण ते महत्त्व मठाधिपतीचे आहे. सर्व मंडळीला नारायण.

पत्ता : जिल्हा नेमाड, पोस्ट बडवाणी नजीक, चिखलदरा

तेथे **ब्रह्मविदाशीर्वाद विद्यारणकृत** शंकर वगैरे आसामीकडे मिळतील तर इकडे पाठवावे. एका द्वारकेच्या सद्गृहस्थाला पाहिजेत.



॥ श्री दत्त ॥ **पत्र क्रमांक १५**

## आईचा जीवमान असे पावत सेवा करावी

बिठोर

ज्येष्ठ शु.१८२४
७ जून १९०२

रा. रा. नारायण उकिडवे सावंतवाडी यांस नारायण. आपले पत्र पावले. आता तूर्त ब्रह्मावर्त विठोरांतच चातुर्मास होईल. स्वप्नाबद्दलचे तुम्हाला ज्ञापन केले तोच हेतु असावा. शिवदत्ताचे नावे पाठविलेल्या पाच प्रती येथे आल्या. ते गावी गेल्यामुळे त्यांचे उत्तर न गेले. त्या मंडळीचा अभिप्राय पाच प्रति फुकट न घ्याव्या. दाम पाठवावे असाच आहे. आईचा जीवमान असे पावत सेवा करावी. प्रारब्ध ती भोगते. कळावे. नारायण

---

॥ श्री दत्त ॥ **पत्र क्रमांक १६**

## यानंतर मुक्काम काशी

बिठूर

जि. कानपूर
आश्विन शु. २-१८२४
३ ऑक्टोबर १९०२

रा. रा. नारायण उकिडवे सावंतवाडी यांस नारायण. आपलेकडून बहुत दिवस पत्र आले नाही म्हणून हे कार्ड लिहिले. शिवदत्त पंडित यांच्या नावे पाठविलेले दत्तमाहात्म्य यांना पावले. ते शिकत असल्याने त्यांनी उत्तर लिहिण्यास सांगितले. आताच पुस्तक लिहिण्यास सुरू केले आहे. लिहून होताच पाठवू. इकडे कानपुरास प्लेग बहुत आहे. पाऊस वगैरे बरा आहे. येथे काही दिवस वास होईल. पुढे काशीस जाणे होईल. कळावे. नारायण.

नारायण. तूर्त ब्रह्मावर्त बिठूर, जि. कानपूर अंताजीपंताचे घाटावर राहणे आहे. चातुर्मास्य येथे होईल. गुरुचरित्राच्या पाच प्रती बुकपोस्टाने पाठवून द्याव्या. खर्चासहित पैसा पाठविला जाईल. कळावे. (दुसऱ्याचे हस्ताक्षर)

---

॥ श्री दत्त ॥ **पत्र क्रमांक १७**

## प्रयागास जाण्याचा विचार

बिठूर

का. शु. ६-१८२४
६-११-१९०२

रा. रा. नारायण उकीडवे सावंतवाडी यांस नारायण. अजून बिठूर येथेच मुक्काम आहे. प्रयागास जाण्याचा विचार आहे. आर्यांची वही व गुरुचरित्रसार नाना वृत्तांचे बुक पोस्टाने पाठविले ते पोचले असेल तर उत्तर पाठवावे. कळावे. नारायण.

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक १८

## तूर्त मुक्काम बिठूर इथेच

बिठूर

पौ. शु. १-१८२४
३० डिसेंबर १९०२

रा. रा. नारायण उकीडवे सावंतवाडी यांस नारायण. बरेच दिवस आपलेकडील वर्तमान कळले नाही. पुढे जाण्याचा विचार होता. पण तूर्त संग्रहणीमुळे येथेच राहणे केले. शिवदत्ताला पुस्तके पोहाचली. दत्तमाहात्म्य अजून चार अष्टक लिहिण्याचे आहे. आईची तब्येत कशी ती कळवावी. नारायण

---

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक १९

## ‘अन्तकाले च मामेव’ कसे घडावे!

बिठूर

पौ. व २-१८२४
१५ जानेवारी १९०२

नारायण. पाठविलेले पत्र मिळाले. द्वारकेस जातेवेळी रस्त्यात ३३ दिवस भिक्षा न झाली व कोठे कोणी खजूर व खोबरे दिले. त्या सेवनाने काही दिवस रक्त पडून संग्रहणीवर आज तीन वर्षे पल्ला पोहोचला, व पाणी प्यालेवर जास्त उपद्रव होतो हे जाणून ताकावरच तीन वर्षे घालविली. गेल्या ज्येष्ठ१२ रोजी पाणी पिण्यात आल्याने उपद्रव जास्ती जाहला व त्याचा प्रतिकार करण्याची मुळीच इच्छा नाही. कारण **“भोगादेव क्षयः कार्यो नान्यथारब्धकर्मणः।”** मग का उगीच तन्निमित्त विचार करावा? देहबुद्धीनेही कदाचित् पाहिले तरी भिक्षूला **“क्षुदेव व्याधिश्चिकित्स्यतां भिक्षौषधं भ्युजतां”** या परतां दुसरा विचार करण्यासच नको. कदाचित कोणी म्हणेल शरीर कष्टाने ईश्वराचे भजन तरी कसे होईल? अल्पोपद्रवाने भजनाला अडथळा येईल तर अंती **“शतवृश्चिकदष्टस्य या पीडा सानुभूयते”**. अशा कष्टांतरी, **‘अंतकाले च मामेव’** इत्यादि कसे घडावे? तर हा दृढ होण्याचा कित्ताच वळविला जातो. कळावे. नारायण.

---

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक २०

## हे मरण योग्याला सुद्धा दुर्मिळ

बिठूर

(ब्रह्मावर्त)
पौष व. ७-१८२४
२ जानेवारी १९०३

रा. रा. नारायण उकीडवे सावंतवाडी यांस नारायण. औषध पाठविण्याची गरज नाही. याविषयी आपणास पत्रात कळविले आहे. येथे तूर्त प्लेग बहुत आहे. प्रायः गाव उठून गेला. चार वर्षे बरोबर आपा या नावाने कर्नाटक ब्राह्मण होते. **त्यांनी साबेसुबेपणी संन्यास घेऊन तात्काळ तीन वेळ प्रणव म्हणून देहोत्सर्ग केला.** हे मरण योग्याला सुद्धा दुर्मिळ. कळावे. बहुत काय लिहिणे. नारायण

---

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक २१

## दंड कमण्डलू पाहिजेत. कसे असावे

बिठूर

मा. शु. गुरुवार १८२४
५-२-१९०३

श्रीमत् परमहंस परिव्राजक वासुदेव आनंद सरस्वती यांचे रा. श्री. नारोपंत उकीडवे व वे. शंकर सप्रे यांस अनेक नारायण. मि. मा. शु. ८ गुरुवार पर्यंत क्षेम असो. विशेष. आपल्यास बरेच दिवसांत पत्र पाठविले नाही व इकडील पत्ता आपल्यास न समजल्यामुळे तिकडून पत्र येण्याचा संबंध नाही. परंतु तिकडील काही गृहस्थलोक इकडे नोकरी संबंधाने भेटतात त्याजवळून काही हकीकत कळून येते. असो.

आम्हास तूर्त दंड कमण्डलूबद्दल फार हरकत होत आहे. तरी खाली लिहिल्याप्रमाणे कमण्डलू २ व दंड चार पाहिजेत. ते आपलेकडून मिळतील तर इकडून कोणी जाणारा पाहून अगर तिकडून येण्यासारखे असतील तर खाली लिहिलेल्या पत्त्यावर पत्र पोचताच उत्तर द्यावे. दंडाचे लांबीबद्दल सुताचा दोरा पाठविला आहे. एक दंड हाताचे मध्यांगुळाप्रमाणे जाड असावा व मुळापेक्षा अग्रभाग जाड नसावा व विशेष बारिकही असू नये. मुळाकडे पर्वाचे आरती आठ अंगुळे असोन मध्ये १४-१२-१० अशी सम पर्वे असावी. दंड तोडण्याचे वेळी अग्र व मूळ किंवा पर्वाचे फाटे इतकेच कापावे. मध्ये कोणतेहि प्रकाराने त्यास शस्त्र लागू नये व सर्व फाटे पर्वाचे फुटलेले असावे. कोणत्याहि ठिकाणी किड्याने टोचलेले अगर योनी चिन्ह नसावे. योनी म्हणजे फुटलेले पर्वाचे वरचे बाजूस खड्डा असतो. त्याचा नकाशा अलाहिदा पाठविला आहे. पर्वाचे फाटे तोडताना दोन दोन अंगुळे राखोन तोडावे. दंड सबंध पोकळ मुळीच असू नये व इतका जाड जमिनीतूनच निघालेला असला पाहिजे. मोठे माणक्याचा अग्र कामाचा नाही. याबद्दलची माहिती कृष्णोबावा सांगेलीकर यांस आहे. परंतु ते समयी न भेटतील तर ही माहिती उपयोगी पडेल म्हणून लिहिले आहे.

जवपर्यंत १४ व १२ वर्षे मिळतील तवपर्यंत १० वर्षाचा काढू नये व सदरी लिहिल्याप्रमाणे इतका बारीक न मिळेल तर शिकस्त हाताचे आंगठ्याइतका जाड असला तरी चालेल. परंतु याहून जाड नसावा. हे दंड सांगेलीसच आहेत. दंडाचे लांबीचे नमुने दोन आहेत. प्रत्येक लांबीचे सदरी लिहिलेले व नकाशाप्रमाणे २/२ पाठवावे.

कमण्डलू कोणत्याहि लाकडाचा असला तरी हरकत नाही. परंतु मजबूत तगणारा असावा. त्याचे प्रमाण गर्भाच्या पोकळीचा व्यास मूळ सहा अंगुळे. मध्य आठ अंगुळे.

मुख म्हणजे कंठ चार अंगुळे असून उंची बारा अंगुळे असावी व त्यास सांगलीचे झारीप्रमाणे तोटी लावून वरती धरण्याकरिता लाकडी किंवा लोखंडाची कमान असावी. त्यात राहण्यासारखी फुलपात्रे मिळाल्यास ठीक आहे. येणेप्रमाणे नग दोन पाहिजेत. कमण्डलूचा बाह्य परीघ मध्याचा सुमारे २५-२६ अंगुळाचा म्हणजे सुमारे एक हाथ वेठ मध्ये होणार व पाणी आत पक्के शेर अडीच तीन पर्यंत राहील असा असावा. हे लिहिण्याचे कारण येथे आरंभास व्यास असा शब्द आहे. याजवर शंका निघाली म्हणोन आहे. कळावे.

इकडून बाबू भिसे वेंगुर्लेकर यांचे घरी कोणी जाणार आहेत. त्यांस आणावयास सांगू. तरी पत्राचे उत्तर जरूर यावे. आमचे येथे राहणे फाल्गुन शु. ५ पर्यंत आहे. जिन्नस मिळताच आणि इतके दिवसांत येत नाहीत असे असेल तर पौर्णिमेपर्यंत राहू. करिता पत्राचे उत्तर जरूर यावे. बहुत काय लिहिणे. नारायण.

पत्ता : जिल्हे हुसंगाबाद, तालुके हर्दा, पोस्ट हांड्या येथे वे. रा. रा. सदाशिव लक्ष्मण ऊर्फ बाबासाहेब सुभेदार यांनी घेऊन सिद्धनाथी स्वामीस द्यावे. (दुसऱ्याचे हस्ताक्षर)

---

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २२

## इकडे कानपुरात प्लेग...

बिठूर मार्ग शु. १-१८२५

२० नोव्हेंबर १९०३

रा. रा. नारायण उकीडवे सावंतवाडी यांस नारायण. पाठविलेले पुस्तक पावले. तूर्त संग्रहणीचा उपद्रव किंचित् कमी आहे. इकडे कानपुरात प्लेग बराच आहे. तेथचे लोक येथे बरेच आले आहेत. पुढे ईश्वरी इच्छा. परमेश्वर भजनी सादर रहावे. कळावे. नारायण.

---

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २३

## जयंतीमुळे लिहिणे झाले नाही

बिठूर मार्ग २-१८२४

१९ डिसेंबर १९०३

वे. शा. नारायण दीक्षित नरसोबावाडी यांस नारायण. जयंतीमुळे हल्ली लिहिणे झाले नाही. ८-१५ दिवसांत येईल. मारी विधान पाहिले जाईल. नारायण. ब्रह्मावर्त ऊर्फ बिठूर असा पत्ता लिहावा.



॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २४

## संस्कृत गुरुचरित्र पाठविले

ब्रह्मावर्त

वे. शा. नारायण दीक्षित नरसोबावाडी यांस नारायण. पत्रातील मजकूर कळला. इकडे स्वातीचा पाऊस पडला. बाकी बरे आहे. संस्कृत गुरुचरित्र अध्याय ३२ श्लोक १५४ पर्यंत तुम्हाकडे पाठविले. पावल्याचे उत्तर लौकर यावे. भगवद्भजनी सादर असावे. नारायण.

---

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २५

## पत्रद्वारे दर्शन होत आहे.

बिठूर माघ. शु. १४-१८२५

३१ जानेवारी १९०४

रा. रा. नारोपंत उकीडवे सावंतवाडी यांस नारायण. पाठविलेले पत्र पावले असेलच. **पत्रद्वारा दर्शन होत आहे.** आणखी विशेष श्रम का करावा? या उपर तुमची इच्छा. कळावे, नारायण.

---

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २६

## 'मी सांभाळून घेईन' - असे सांगणे झाले

गंगाखेड वैशाख १८२७

मे १९०५

श्री नृसिंहसरस्वतीस्वामी नरसोबाची वाडी यांस नारायण. वाडीवरून निघाल्यानंतर सांगोल्यास आल्यावर संग्रहणीचा उपद्रव सुरू झाला. गाणगापुरात जाऊन (पादुकांचे दर्शन मात्र करू) इतके सांगणे झाले. तेव्हा प्रकृती बिघडली कसे जाणे होईल? अशी प्रार्थना केली. नंतर **"मी सांभाळून घेईन"** असे सांगणे झाल्यावरून अक्कलकोटवरून गाणगापुरास जाणे झाले. वरच्या सांगण्याचे अनेक अर्थ कळून आले. नंतर हुमणाबादवरून गोदापार येणे झाले. नारायण.

---

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २७

## मुक्काम नरसी

नरसी ज्येष्ठ वद्य ६-१८२७

२३ जून १९०५

श्री प. नृसिंह सरस्वती स्वामी, नरसोबावाडी यांस नारायण. या गांवी आल्यावर

येथे सतत मोठा पाऊस लागून नदीला पूर आला. तेव्हा येथेच राहणे केले. येथून वऱ्हाड जवळच आहे. हा गाव लहानच आहे. कयाधू नावाची एक लहान नदी आहे. येथे लहानसे राममंदिर आहे. येथेच आसन ठेविले. अन्यत्र जाण्याचा काळ नाही. येथें म्हणण्याजोगी सोय नाही तथापि कसे तरी दोन महिने लोटावयाचे. या गावी आसमंतांत रेल नाही; व पोस्टहि नाही. आठ दिवसांनी एकदां सिपाही येतो. अस्तु. कळावे. **हा पहिलाच आपला चातुर्मास आहे तरी चार महिन्यांचे करावे.** त्याचे आठ पक्ष पण करावे. तेथील सर्व संन्यासी, पुजारी, सेवक, क्षेत्रवासी या सर्वांस नारायण प्रविष्ट करावा.

---

॥ श्री दत्त ॥ **पत्र क्रमांक २८**

## आपण पादुकापाशीच आहो

नरसी

भाद्रपद शु. १-१८२७
३१ ऑगस्ट १९०५

रा. रा. नारायण नरसोबावाडी यांस नारायण. कार्ड पावले. मजकूर कळला. चालू आहे तसाच क्रम चालवावा. आपण पादुकापासीच आहो. काही अनुमान करू नये. सर्व मंडळीस नारायण. पूर्णिमा होताच इथून जाणार.

---

॥ श्री दत्त ॥ **पत्र क्रमांक २९**

## सवड सापडत नाही

नरसी

भाद्रपद शु. ४-१८४७
२८ ऑगस्ट १९०५

रा. रा. बाबूराव शिरोळकर यांसी नारायण. पत्र पावले. आरती व श्लोक (स्तोत्र) देण्यास अवकाश नाही. गर्दी असोन सवड सापडत नाही. पुढे पाहता येईल कळावे. नारायण.

---

॥ श्री दत्त ॥ **पत्र क्रमांक ३०**

## प्रभु इच्छेने घडेल ते घडो!

भेलसा

मार्ग शु. २-१८२७
५ डिसेंबर १९०५

श्रीमत् परमहंस नृसिंह सरस्वती नरसोबावाडी यांस नारायण. तुम्ही पाठविलेली पत्रे २ व पुस्तक पावले. सर्व मंडळी संबंधाने पत्र आले. त्यात वाडीविषयी उदासीन होऊ नये असे लिहिले. तर पत्र पाठविले त्याचा अभिप्राय हाच की, सार्वजनिक पत्र तापीला आले त्याबद्दल उत्तर देण्याकरिता काही आज्ञा व्हावी म्हणून रोज प्रार्थना बरेच दिवस केली पण काहीच उत्तर मिळाले नाही. असे जर आहे तर लोकांनी का नादी



लागावे? अभिप्रायाने पत्र पाठविले. त्यापासून भीतीचे कारण काहीच नाही. वाडीविषयी औदासिन्य ठेविले असे नाही. अस्तु. जे प्रभूच्या इच्छेने घडेल ते खरे. वाडीवर पुन्हा न यावे असेहि स्वतःचे म्हणणे मुळीच नाही. काशी वगैरे तीर्थयात्रा करावी हाहि विचार नाही. **जे प्रभूच्या इच्छेने घडेल ते घडो.** येथे भेलसे मुक्कामी पूर्णिमा (जयंती) करून पुढे जाणार. कळावे. सर्वांस नारायण.

---

॥ श्री दत्त ॥ **पत्र क्रमांक ३१**

## इथून काशीकडे

ब्रह्मावर्त

फा. शु. २७-१८२७
२५ फेब्रुवारी १९०५

श्रीनृसिंह सरस्वती यांस नारायण. फाल्गुन शु. २ रोजी ब्रह्मावर्त येथे येणे झाले व वाडीकडील पत्रेहि आज मिळाली. उद्या उत्तर सविस्तर पाठविता येईल. येथोन लौकरच काशीकडे जाण्याचा विचार आहे. कळावे. सर्वांस नारायण.

---

॥ श्री दत्त ॥ **पत्र क्रमांक ३२**

## सर्वांचे मन पुनरागमनाकडे

ब्रह्मावर्त

फा. १५-१८२७
१० मार्च १९०६

श्रीमत् भगवद्भक्ति परायण श्रीनृसिंहवाडी क्षेत्रस्थ मंडळी यांस नारायण. आपुलें सविनय पत्र आज पावले. सर्व मजकूर कळला व **सर्व आबालवृद्धांचे मन पुनरागमनाकडेस लागले हेहि कळले.** परंतु श्रीक्षेत्र काशीपर्यंत जाणे होणार. येथून लौकरच काशीस जाऊन पुन्हा लवकरच मागे फिरण्याचा विचार आहे. याउपर सद्गुरु इच्छा. कळावे.

वे. शा. स. नरु अण्णा पुजारी यांसी नारायण. आपण इकडेस येणेचे करू नये. बहुधा या वर्षात तिकडे येणे पडेल असे वाटत नाही. जेथे चातुर्मास्य होईल तेथोन पूर्वी पत्र पाठविण्यात येईल. कळावे. सर्व लहान थोर मंडळीस नारायण.

---

॥ श्री दत्त ॥ **पत्र क्रमांक ३३**

## पाऊस नसल्याने दुष्काळ मोठा

काल्पी

वै. व. ३-१८२८
११ मे १९०६

श्री प. नृसिंहसरस्वती नरसोबाची वाडी यांस नारायण. आपण पाठविलेले गुरुचरित्र पावले. आज येथोन झांशी येथे जाणार. सकाळी थोडी चाल होते. येथे उन्हाळा

अतिशय आहे. सूर्यास्तानंतरहि लपेट चालते. ह्या देशी पाऊस नसल्यामुळे दुष्काळ मोठा आहे. कळावे. नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक ३४

## या देशी अतिशय उन्हाळा

बढवाई आ. व. १-१८२८

७ जुलै १९०६

श्री प. नृसिंह सरस्वती नरसोबाची वाडी यांस नारायण. काल रोजी बढवाई येथे नर्मदातीरी व्यासपूजा झाली. ब्रह्मावर्त सोडल्यानंतर १० दिवस क्षिप्रीस राहणे झाले. बाकी चाल होत होती. ह्या देशी अतिशय उन्हाळा असल्यामुळे सकाळी २-३ तास चाल होत होती. त्यामुळे जास्ती चाल झेपली नाही. गेले वर्षी उत्तर देशी पर्जन्य नसल्यामुळे मोठा कहर होऊन गेला. येथे ७ इंच पाऊस पडला. नर्मदेस दोन बरे पूर आले. तूर्त कमी आहे. स्वामी व पुजारी आदिकरून सर्वांस कळवावे. प्रौष्ठपदी होताच दक्षिणेस मार्ग धरावयाचा. थोड्याच दिवसांसाठी येथे येण्याचे करू नये याप्रमाणे गं. भा. दुर्गाबाईस सांगावे. वाडीवरच राहणे करावे. सर्व मंडळीस नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक ३५

## वाडीकडे येणार - भेटीस यावे

बढवाई श्रा. शु. ७-१८२८

२८ जुलै १९०६

रा. रा. बाबू यांस नारायण (नृसिंहवाडी) कार्ड पावले. भाद्रपद पूर्णिमा होताच येथोन वाडीकडे येणार. तेथे तुम्ही भेटीस यावे. भजन चालवावे. नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक ३६

## रामेश्वरास जाण्याचा विचार

नरसोबाची वाडी का. ८-१८२८

२५ आक्टोबर १९०६

रा. रा. नारायण उकीडवे सावंतवाडी यांस नारायण. पत्र पावले. **पुरश्चरण सुरू असता इकडे येणे करू नये.** येथोन रामेश्वरास जाणेचा विचार आहे. चालू आहे तो क्रम तसाच चालू द्या. कळावे. नारायण.



॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक ३७

## सध्या मुक्काम वाडी - पुढचा भरवसा नाही

नरसोबाची वाडी

रा. रा. नारायण उकीडवे सावंतवाडी नारायण. पत्र पावले हा वेळ पावत येथे राहणे झाले. पुढचा भरवसा नाही. पैशांची व्यवस्था श्रीगुरुचे खर्चाकडेसच अभिषेक नैवेद्यादिक करावे. कळावे. नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक ३८

## उद्या रामेश्वराकडे जाणार

तंजावर जे. शु. ११-१८२९

२० जून १९०७

श्री प. नृसिंहसरस्वती स्वामी नरसोबाची वाडी यांस नारायण. तंजावरांतून उद्या रामेश्वरास जाणार. फिरून आल्यावर दर्शन होईल. नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक ३९

## चातुर्मास इकडेच होईल, तंजावर

तंजावर जे. शु. १२-१८२९

२३ जून १९०७

रा. रा. नारायण उकीडवे सावंतवाडी यास नारायण. काल तंजावर येथे येणे झाले. उद्या रामेश्वराकडेस जाणार. चातुर्मास इकडेसच होईल. नंतर गोकर्णाकडून असे प्रस्थान होईल. चालू असलेला क्रम तसाच चालू द्यावा. सर्वांस नारायण प्रविष्ट व्हावे. कळावे. नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक ४०

## चातुर्मास्याचा अद्याप निश्चय नाही

रामेश्वर आषाढ शु. २-१८२९

१२ जुलै १९०७

श्री प. नरसिंह सरस्वती, वाडी, यांसी नारायण. आषाढ शु. २ रोज गुरुवार दिवशी सायंकाळी रामेश्वर सोडला. तंजावरची मंडळी चालू चातुर्मास तंजावरी करणेकरिता नेण्यासाठी आलेली. पण तंजावर २३५ मैल आहे. दिवस थोडे राहिले. चातुर्मास्य ठिकाणी होईल असा निश्चय अद्याप नाही. निश्चय ठरल्यावर पत्र पाठविता येईल. तिकडून कोणीहि भेटीकरितां येईल तर त्यांनी येऊ नये. कारण लोक जमावाने

उपद्रव होतो. असे कळवितांहि कोणी येतील तर आमची नाराजी होईल. कळावे, स्वात्मानुसंधान असावे. सर्वांस नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक ४१

## कविताविषयस्फुरण - हे ध्यानविघ्न

तंजावर

आषाढ कृ. ७ - १८२९

श्री प. नरसिंह सरस्वती स्वामी नरसोबाची वाडी यास नारायण. आपण पाठविलेले पत्र पोहोचले. आपले पत्र येण्यापूर्वीच प्रतिपदेचे दिवशी येथून पत्र पाठविलेले पोहोचलेच असेल. आपा बडू हे येथे काल पोहोचले. येथोन प्रौष्ठपदी होताच पुढे येणे होईल. **जर कवितेविषयी स्फुरण होत असेल तर त्यावेळी तो विषय टाळून ध्यान किंवा भजन करावे. अशा तऱ्हेने कविता विषयीची विस्मृति पाडावी. कारण हे ध्यानविघ्न आहे.** सर्व मंडळींस नारायण.

॥ श्रीदत्त ॥ पत्र क्रमांक ४२

## वेणू तीरावरील निवास

संध्यामंडप (तंजावर)

आषाढ कृ. १ - १८२९

९ ऑगस्ट

श्री प. प. नरसिंह सरस्वती स्वामी नरसोबाची वाडी, यांस नारायण. तंजावरपासून एका कोसावर एक कावेरीचा प्रवाह बरा आहे. तिला वेणू नदी म्हणतात. येथे राहणेची उत्तम सोय व भिक्षेस जवळच ब्राह्मणाची घरे, हवा उत्तम, असे सर्व सौकर्य आहे. रसीद आताच पावली. सूत्रवृत्ति उद्या गांडा पाठवील. प्लेगविषयीचा मजकूर समस्त ग्रामस्थांचे नावे पाठविल्या पत्रावरून कळेल. कळावे. नारायण. गांडाचे सांगण्यावरून कृष्णालहरी टीका आरंभली. १९ श्लोकांची झाली. कळावे. नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक ४३

## संदीप्ते भवनेपि कूप खननं .... उपयोगी नाही

संध्यामंडप (तंजावर)

श्रा. शु. १-१८२९

१० ऑगस्ट १९०७

श्रीमत् प. स्वीयवर्ग पुजारी आश्रित नरसोबावाडी यास नारायण. आपणाकडून तार येताच श्रीगुरूंची प्रार्थना केली. दुसरे दिवशी उत्तर मिळाले " नेमाप्रमाणे वागणूक होत नाही व प्लेग येणार" असे सुचविले. हयगय केली. आता "संदीप्ते भवनेपि कूपखननं" काय कामाचे, "एकदा दंड फिरवायचा." असे सांगणे झाले. पुनः प्रसाद होण्याकरिता प्रार्थना सुरू आहे. भजन करा असे सांगणे होते. भजन प्लेगला घालविणार



असे नाही. तर सर्वांनी आपली आज्ञा पाळून पूर्वजांनी जसा प्रसाद केला असा करावा असा हा अभिप्राय. पहा, पूर्वी कोणीहि पुजाऱ्याचा तिरस्कार केला तर अभिमान धरून तात्काळ त्याला शिक्षा होत होती. आता पुजाऱ्याला ठार मारण्याचा प्रसंग आला तरी राजदरबारातसुद्धा पुजारी व तस्थ इतर यांवर किती श्रींची दया आहे. तरी न व्हावे व श्रीगुरूला कळवळा यावा अशा तऱ्हेने सर्वांनी सर्वकाळ झटावे. कळावे. भगवंताने प्रसाद करावा. ह्याविषयी भगवंताची येथे प्रार्थना सुरू आहे. उत्तर मिळताच पत्र पाठविता येईल. कळावे. निष्ठेने भजनादिक करावे. सर्वांस नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक ४४

## भगवंताने हातात धरले, तेच गती देतील

तंजावर

श्रावण शु. ५-१८२९

१५ ऑगस्ट १९०७

श्रीनरसिंह सरस्वती नरसोबाची वाडी यांस नारायण. पत्र पावलें. लवकरच पुस्तक पाठवता येईल. **आपण दर्शन न झाले असे मानून खिन्न होऊ नये. ज्या भगवंतानी हातात धरले तेच आता अंतःप्रकाश करून गती देतील. (कर्षयंतः शरीरस्थं) असला प्रकार न करावा.** कळावे. नारायण

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक ४५

## आता शांतता दिसते

संध्यामंडप (तंजावर)

श्रा. शु. ५ - १८२९

१५ ऑगस्ट १९०७

श्री प. नरसिंह सरस्वती नरसोबाची वाडी यांस नारायण. आज सकाळी तार पोहोचली. उत्तर दिले. मागे पत्र पाठविले त्यात आता एकदा दंड फिरवावयाचा असे उत्तर कळविले. त्यापेक्षा आता शांतता दिसते. तरी लवकरच प्लेग कमी होईल. थोडे दिवस मुले उंदीर न पडल्याजागी बदलावी व उंदीर पडल्याजागी राहू नये. भजन तुम्ही चालवावे. सविस्तर वर्तमानाचे उत्तर पत्रद्वारा द्यावे. सर्व मंडळीस नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक ४६

## उदुंबराची खांदी तोडू नये

तंजावर

श्रा. व. ५ - १८२९

२८ ऑगस्ट १९०७

नारायण. कमंडलु पावला. गरज नव्हती. त्याने परभारे बोलविला. असो. आणखी पात्रादिकांची गरज नाही. देऊळ आहे त्यापेक्षा वाढवावे अस वाटत नाही व

उंचही करण्यास नको. प्रदक्षिणेस चिखल होत असेल तर दगडी अथवा चुनेगच्ची सफेद फरशी करावी. उन्हाळ्यात तापेल तेव्हा मंडप करावा. उदुंबराची खांदी तोडू नये. ती बचावाची युक्ति करावी. कळावे. नारायण.

॥ श्री दत्त ॥ **पत्र क्रमांक ४७**

## दुसरी तार पोचली नाही

सभामंडप (तंजावर) भा. शु. ४ - १८२९

१ सप्टेंबर १९०७

श्री प. नृसिंह सरस्वती नृसिंहवाडी यांस नारायण. गुंडुंची नावची तार मात्र पावली. दुसरी पावली नाही. येथोन तार केलेली पोचलीच असेल. आज प्रार्थना करू. उत्तर कळवू. कळावे. नारायण

॥ श्री दत्त ॥ **पत्र क्रमांक ४८**

## श्रीगुरुप्रसादासाठी नित्य प्रार्थना सुरू

तंजावर भा. शु. ५ - १८२९

१२ सप्टेंबर १९०७

श्री प. नृसिंह सरस्वती नृसिंहवाडी यांस नारायण. कार्ड पावले. श्रीगुरूचा प्रसाद होण्याविषयी प्रार्थना नित्य सुरू आहे. प्रसाद होईल. कळावे. नारायण.

॥ श्री दत्त ॥ **पत्र क्रमांक ४९**

## प्रसाद होईल

संध्यामंडप (तंजावर) भा. शु. ५ - १८२९

१२ सप्टेंबर १९०७

रा. रा. बावुराव शिरोळकर यांस नारायण. कार्ड पावले. श्रीगुरूचा प्रसाद होण्याविषयी प्रार्थना नित्य सुरू आहे. प्रसाद होईल. कळावे. नारायण.

॥ श्री दत्त ॥ **पत्र क्रमांक ५०**

## सर्वांनी भगवत्स्मरण करावे - भगवत्प्रसाद होईल

मूळतापी आ. व. ६ - १८२७

वे. शा. समस्त ब्रह्मवृंद श्रीक्षेत्र नरसोबाची वाडी यांना नारायण. पत्र पावले. सवडीप्रमाणे अभिषेक व्हावा. सर्वांनी भगवत्प्रवण होऊन भगवत् स्मरण केले असता संकट आले तरी दूर होऊन भगवत्प्रसाद होईल. कळावे. पुजारी आदी करून सर्व ब्रह्मवृंदास नारायण.





## गंगातीरी जाणे झाल्यावाचून पुनः फिरणे नाही

मूळतापी आश्विन कृ. ८ - १८२७

२१ आक्टोबर १९०५

वे. शा. सं. गुडंभटजी पुजारी यांस (नृसिंहवाडी) नारायण. आपणांस भेटणे होते. बरेच श्रम झाले हे कळले. असो, भगवदिच्छा. वाडीहून निघाल्यापासून आजपर्यंत २०० कोसच चालणे झाले. अजून गंगातीरी जाणे झाल्यावाचून पुनः फिरणे नाही. मानसिक दर्शन करावे. श्रीगुरुसेवेविषयी तयार व्हावे. तुमचे मातोश्री आदी करून सर्व मंडळीस नारायण.

॥ श्री दत्त ॥ **पत्र क्रमांक ५२**

## मालामंत्र पाठ करावे

पोस्टल स्टॅम्प वरून

२० ऑगस्ट १९००

समस्त भगवद्भक्त मंडळीस नारायण.

आपणाहून आलेले पत्र पावले. कोणत्याही निमित्ताने भगवद्भजन घडावे तरच मनुष्य जन्माचे साफल्य. कलियुगात भगवद्भजनच तारक आहे. कळावे, लहान थोर मंडळीस नारायण. दामोदर भगवानजी यांसी नारायण.

गेल्या वर्षी ग्रहपीडा निवारणार्थ १२ माला पाठ सांगितले. आता घडतील तर निष्कामपणे करावे. त्रिकमलालचें नावे २ पत्रे पाठविले.

पत्ता दामोदर भगवानजी. तिलकवाडा

॥ श्री दत्त ॥ **पत्र क्रमांक ५३**

## संध्येवाचून गायत्री जप रात्री करू नये.

२५ सप्टेंबर १८९९

पोस्टल स्टॅम्प

दामोदर भगवानजी पाठक. नारायण. पाठविलेले पत्र पोचले. येथेही श्रा. व. ९ रोजी एक इंच पाऊस पडला. पुनः मुळीच पडला नाही. मोठा भयंकर प्रसंग आहे. हा सप्तग्रहीचा परिणाम. सर्वांनी ईश्वर भजनी लक्ष्य लावावे. तो तारील. गायत्री जप घडेल तितुका सवडीने दिवसासच करावा. संध्येवाचून रात्री गायत्री जप करू नये. मेधावृद्धी करिता जो ब्राह्मीचा उपयोग सांगितला तोच करावा. स्तोत्र पश्चात पाठविता येईल. येथे बरेच पाठ होत असतात. त्यामुळे अवकाश नाही. कळावे भगवानजीला व तुमचा मंडळीस नारायण. सर्वांला नारायण. प्र. मास्तर नर्मदाशंकर यास नारायण.

॥श्री दत्त॥ **पत्र क्रमांक ५४**

## तूर्त शारीर भाष्य पाठ चालू

भा. कृ. १२

२८ ऑक्टोंबर १९००

दामोदर भगवानजी पाठक यास नारायण. पाठविलेले पत्र पावले. येथे चातुर्मास पुढे झाले. पण तूर्त शारीर भाष्य पाठ चालू असल्यामुळे काही दिवस राहणे होईल. अजून थोडा अर्शाचा उपद्रव आहेच. त्याहीमुळे पुढे जाण्याचा अनुमान केला. कळावे.

श्री दत्ताचे ध्यान

**बालार्कप्रभमिन्द्र नीलजटिलं भस्माङ्गरागोज्ज्वलं।**
**शान्तं नादविलीन चित्तपवनं शार्दूलचर्मावृतं॥**
**ब्रह्माद्यैः सनकादिभिः परिवृत्तं सिद्धं महायोगिनं।**
**दत्तात्रेय मुपास्महे हृदि सदा ध्येयं सदायोगिनिः॥**

(वरील पत्र तिलक वाडा येथे दामोदर पाठक यास पाठविले.

---

॥श्री दत्त॥ **पत्र क्रमांक ५५**

## सध्या मुक्काम नरशी

नरसी (हिंगोली)

२२ ऑगस्ट १९५

(पोस्टाच्या स्टॅम्प वरून)

भगवद्भक्ति परायण दामोदर भगवानजी पाठक यास नारायण. आपले पत्र पावले. तूर्त हैद्राबाद पोस्ट हिंगुली जवळ नरशी येथे १ महिनापर्यंत राहणे होईल. मग इथून पुढे जाणार. तेथील सर्व मंडळीस नारायण.

---

॥श्री दत्त॥ **पत्र क्रमांक ५६**

## ईश्वर भजनी सादर राहावे

फा. शु. १२ सोम.

श्री मणिशंकर यासी नारायण

विशेष. पाठविलेले दंड पोचले. त्यात ५-६ उपयोगी आहेत. आता आणखी गरज नाही. येथे थोडे दिवस राहून तिकडे येईन. चातुर्मास राहण्याचा निश्चय करता येत नाही. तेथे आल्यावर ठरेल. कळावे, सर्व मंडळीस नारायण. ईश्वर भजनी सादर असावे. ददामोदर भगवानजी यास वगैरेस कळवावे की, इकडे भेटीस येणेची गरज नाही. तिकडे येणे होईल. कळावे.



॥श्री दत्त॥ **पत्र क्रमांक ५७**

## पुढे माळव्यात

पोस्टल स्टॅम्प

ऑक्टोबर १९०० चे पत्र

दामोदर भगवान यास

आ. (आश्विन) शु. ७ पर्यंत क्षेम असे. विशेष येथोन पुढे माळव्यात जाण्याचा विचार आहे.

तेथोन पत्त्यावर पत्र पाठविता येईल. तेव्हा पत्र पाठवावे. इकडे पाऊस बरा आहे. पीकही बरे आहे. कळावे. नारायण. सर्व मंडळीस नारायण.

कार्डावरील पत्ता: (बडोदे पैकी तिलकवाडा येथे कचेरी नजीक भगवानजी पाठक यास प्र. क्षेम Tilakwada)

---

॥श्री दत्त॥ **पत्र क्रमांक ५८**

## एकादशीचा वैश्वदेव

२०.२२ ऑगस्ट

पत्रावरील स्टॅम्प

२६.७.१९००

दामोदर यास नारायण.

पाठविलेले पत्र पोचले. इकडे आषाढ १५ रोजी २ इंच पाऊस पडला. ----- (हा वेळ पावत ना) सर्वेत्र सारखा नाही. कुठे कुठे पेरे झाले. या वर्षी खंडवृष्टीचे लक्षण आहे. पण ईश्वर कृपेने बरे होईल. **एकादशीचे दिवशी वैश्वदेव अन्न सत्कारार्थ पंचसूनादोष परिहारार्थ तांदुळाने किंवा कंदमूळ फळाने करावा. अन्नसंस्कारार्थ वैश्वदेव नाही. जीवात्पितृकाने वर्षादि तर्पण करावे.** (विशेष शोध करून कळविता येईल). श्री दत्तमाला मंत्र व कवच अष्टोत्तर नाम जप हेच. बाकी सर्व सवडीप्रमाणे पाठविता येईल - सर्वांस नारायण प्रविष्ट. पाठविली पुस्तके पोचली.

(या पत्रातील सदरावरून हे पत्र दुसऱ्याने लिहिले आहे असे वाटते. काही शब्द लागत नाहीत -)

श्रीरामचंद्र उपासनेचा मंत्र

**आचम्य ममाभीष्टार्थसिद्धिद्वारा श्री सीतारामचंद्र देवताप्रीत्यर्थ तन्मत्र जपमहं करिष्ये।**
**ध्यानं। दक्षिणे लक्ष्मणो यस्य वामे च जनकात्मजा**
**पुरतो मारुतिर्यस्य तं वन्दे रघुनन्दनम्**
**मंत्र : नमो भगवते रामचन्द्राय।**

## संतान प्राप्तीसाठी मंत्रजप

आचम्य

मृतापत्यातपत्व दोषनिरसन पूर्वकं दीर्घायुष्मत्सुपुत्र प्राप्तिद्वारा
श्रीसंतानप्रदगोपालप्रीत्यर्थ तन्मत्रजपमहं करिष्ये
आसने उपविश्य अस्य मंत्रस्य नारद् ऋषिः। शिरसि।
अनुष्टुप छंदः मुखे। संतानप्रद गोपाल देवता हृदये॥ क्लीं बीजं नाभौ।
नमः शक्तिः पादयो। देवकीसुते कीलकं सर्वांगे।
देवकीसुत अंगुष्ठाभ्यां नमः। गोविंद तर्जनीभ्यां नमः।
वासुदेव मध्यमाभ्यां नमः। जगत्पते अनामिकाभ्यां नमः।
देहि मे तनयं कृष्ण कनिष्ठिकाभ्यो नमः।
त्वामहं शरणं गता करतलकरपृष्टांभ्यां नमः।
यंमलोकात्समानीय जीवयित्वा गुरोः सुतं। पुत्रर्यो गुरवे दत्तं ध्याये संतान
प्रदं हरिं -
मंत्र — देवकी सुत गोविंद वासुदेव जगत्पते। देहिमे तनयं कृष्ण त्वामहं
शरणं - गता - १००० ००.
अनेन जपेन श्री संतानप्रद गोपालकृष्ण देवता प्रीयताम् आचमेत्

---

||श्री दत्त|| पत्र क्रमांक ६०

## दत्तस्तोत्र

भा. कृ. ८

१७ सप्टेंबर १९००

वे. दामोदर यासी

पत्र पावले. येथे पाऊस चांगला पडून गेला. शेती बरी आहे. दर तूर्त रुपये चारशे दहा इत्यादि आहे. अंदाज महिन्यानंतर बदलेल. सर्वांना नारायण. सवडीप्रमाणे श्री दत्तस्तोत्रे पाठविता येतील. स्मरण.

दत्तात्रेयो हरिः कृष्ण उन्मत्तानंद दायकः।
मुनिर्दिगंबरो बालः पिशाचो ज्ञानसागरः॥१॥
एतानि दशनामानि सर्वकाले पठेन्नरः।
क्षयापस्मारकुष्ठादि तापज्वरनिवारणः॥२॥



कदायोगी कदाभोगी कदानग्न पिशाचनम्।
अनसूयात्रिसंभूता दत्तात्रेयो दिगंबर।
स्मर्तृगामी स्वभक्तामुद्धरर्ता भवसंकटात्॥३॥

या श्लोकांचे मनात नित्य स्मरण ठेवावे. नारायण. (अक्षर दुसऱ्यांचे)

---

||श्री दत्त|| पत्र क्रमांक ६१

## नाव कळल्याशिवाय मंत्र देता येत नाही.

श्रा. शु. ७

नारायण. पत्र पावले. पत्रद्वारा दर्शन मानून स्वस्थ रहावे.

नाव कळल्याशिवाय मंत्र देता येत नाही. म्हणून अंगारा दिला आहे. हा तायितीत घालून तिच्या गळू (पतिवर) द्यावा. सर्वांस नारायण.

---

||श्री दत्त|| पत्र क्रमांक ६२

## गुजराथी पुस्तके आपल्या उपयोगी नाही.

१७ फेब्रुवारी १९१४

(पोस्ट स्टॅम्प)

नारायण. पत्र पावले. हल्ली गुजराथी पुस्तके छापिली. ती आपुल्या उपयोगी पडणार नाहीत. सर्वांस नारायण. सदाशिव गोपाळ भागवत, सारंगपूर मालवा.

---

||श्री दत्त|| पत्र क्रमांक ६३

## सदाशिवमंत्राचे पुरश्चरण

आ. व. ६

नारायण. पत्र पावले. तिकडून मंडळीने इकडे येणेचे सध्या करू नये. रेलपासून ८ मैल चिखलदरा आहे व गाडी रस्तेवाचून दुसरी सोय नाही. गाडी रस्त्याने २ वेळ नर्मदा उतरण्याचे संकट बरेच पडेल. येथे कुग्रामात धड खाण्यास सुद्धा मिळण्याची अडचण आहे. तेव्हा आबाल वृद्धानी पत्ररूपी दर्शन मानून स्वस्थ रहावे. ६ लक्ष सदाशिव मंत्राचे पुरश्चरण आहे. भोजनापूर्वीच जप व्हावा. रोज समसंख्या जप करावा. प्रथम देह शुद्ध्यर्थ तीन कृच्छ प्रायश्चित करावे. रोज नित्य जप झाल्यावर पुरश्चरणाचा जप करावा. हविष्यान्न भक्षण करावे. नारायण.

॥श्री दत्त॥ **पत्र क्रमांक ६४**

## विशेष लिहिणेस वेळ नाही

संध्या मंडप (तंजावर) भा. शु. १३-१८२९
१९ सप्टें. १९०७

श्री प. नरसिंह सरस्वती नृसिंहवाडी यांस, नारायण. पत्र पावले. येथे गर्दीमुळे विशेष लिहिणेस वेळ नाही. वद्य १ रोजी इथून निघणार. आता येथे पत्र पाठवू नये. पुढे रस्त्यात सवड मिळेल तर पत्र पाठवू. सर्व मंडळीस नारायण.

---

॥श्री दत्त॥ **पत्र क्रमांक ६५**

## जगद्गुरूचा ठराव पाहून करावे

श्री नृसिंहवाडी क्षेत्रस्थ ब्रह्मवृंद यांसी नारायण. या मैत्रायणी शाखेच्या ब्राह्मणांविषयी आपण काही सांगत नाही. शास्त्री यांचे पत्र व जगद्गुरूंचा ठराव पाहून तुम्हाला वाटेल तसे करा. नारायण.

---

॥श्री दत्त॥ **पत्र क्रमांक ६६**

## रोग शांतीसाठी प्रार्थना सुरू आहे

संध्यामंडप (तंजावर) भा. १५-१८२९
२१ सप्टेंबर १९०७

श्री नृसिंह सरस्वती यांस नारायण. पुस्तक पत्रे पावली. कानाचे औषध सुरू करावे. श्री प. परमानंदस्वामी, शंकरस्वामी, गोपाळस्वामी यांस नारायण. लहान थोर मंडळीस नारायण. गुरु प्रसन्न होऊन रोगाची शांती व्हावी अशी प्रार्थना सुरू आहे. अभय मिळोन शांती होईल. अंतोबास नारायण. उद्या येथोन निघणार. आता येथे पत्र न द्यावे. नारायण.

---

॥श्री दत्त॥ **पत्र क्रमांक ६७**

## उद्या इथून उत्तरेकडे

तंजावर भा. १५-१८२९
२१ सप्टेंबर १९०७

श्री प. नृसिंह सरस्वती नरसोबा वाडी यांस नारायण. कार्ड पावले. उद्या येथोन निघोन उत्तरेकडचा मार्ग धरावयाचा. पुढे तिकडे किती दिवसात येणे होईल आजच सांगता येत नाही. कळावे. नारायण.



॥श्री दत्त॥ **पत्र क्रमांक ६८**

## भिक्षेतील द्रव्य दक्षिणादिकी योजावे

तंजावर भा. १५-१८२९
२१ सप्टेंबर १९०७

रा. रा. नारायण उकीडवे सावंतवाडी यांस, नारायण. उद्या येथोन निघणार. पुढे कोणत्या मार्गाने जायचे हा निश्चय अजून नाही. धान्य, भिक्षा मागतां कोणी त्यांत द्रव्य घातले तर ते काढून टाकावयाचे नाही. ते भिक्षारूप असल्याने हव्यकव्यादिकांत दक्षिणादिकी योजावे. कळावे. नारायण.

---

॥श्री दत्त॥ **पत्र क्रमांक ६९**

## या देशी संन्याशाविषयी अतिशय भक्ती

सत्यमंगल आ. व. ६-१८२९
२७ ऑक्टोबर १९०७

श्री नृसिंह सरस्वती नरसोबावाडी यांस नारायण. पत्र वाचले. **प्रकृति बिघडते त्याला पूर्वकर्मच कारण. देवसंबंध नाही.** येथोन ५० मैल गोदावरी आहे. कार्तिकीचे क्षौर तेथेच करावे असेच मत आहे पण येथील मंडळी येथेच कृष्णातीरी करावे म्हणून आड येतात. ह्या देशांत संन्याशाविषयी अतिशय भक्ती असल्यामुळे जागोजाग बरीच बरकत येते. तरी गोदावरी तीरी लौकरच जाणे करणार. तेथील सर्व मंडळीस नारायण.

---

॥श्री दत्त॥ **पत्र क्रमांक ७०**

## जगद्गुरु शृंगेरी स्वामींची भेट

सत्यमंगल आश्विन व. १३-१८२९
३ नोव्हेंबर १९०७

श्री प. प. नरसिंह सरस्वती नरसोबावाडी यांस नारायण. तंजावर सोडून कावेरी तीरी श्रीजगद्गुरु शृंगेरी स्वामींची भेट झाली. नंतर त्यांनी शृंगेरीस जाऊन पुढे जाण्यास आज्ञा दिली. सत्यमंगल येथे येणे झाले. पुढे निघण्याचे, परंतु पुढे दोन्ही वाटेला जागोजागी प्लेग सुरु आहे व जाण्यास प्रतिबंधहि बराच करतात. तरी तुम्ही सर्वथा जाऊ नका. असे या ठिकाणच्या सर्व ब्राह्मणांनी आडवले व काल तंजावराहूनहि येथे मंडळी आली तीहि त्याप्रमाणे जाहिरातीतून प्रतिबंध प्रसिद्ध केल्याचे सांगतात व त्याप्रमाणे श्रीगुरूंचे सांगणे झाले तरी पुढे येणेचा तूर्त निरुपाय. तेव्हा काही दिवस कावेरीतीरी राहावे असा विचार केला. तिकडील सर्व वर्तमानपत्र तंजावरास यावे. नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक ७१

## आता कुंभकोणास जाऊन आलेल्या वाटेशिवाय गती नाही

भवानी, कावेरी संगम का. शु. ११-१८२९

१५ नवंबर १९०७

श्रीमत् परमहंस नरसिंह सरस्वती स्वामी नृसिहवाडी, यांस नारायण पत्र पावले. कर्नाटकाचे सरहद्दीपर्यंत जाणे झाले. चामराजपुरापासून पुढे प्लेगसंबंधी प्रतिबंधामुळे लोक पडून. ह्या मार्गाने जाऊ नका असे आड आले. म्हणून भवानी कावेरी संगमावर फिरून येणे केले. पण बेंगळूराकडच्या मार्गाने प्रतिबंध रेलने जाण्यास व पादचारी यांससुद्धा आहे. तरी पुनः आता कुंभकोणास जाऊन आलेल्या वाटेशिवाय गती नाही. येथे क्षौर करून पुढे निघून एक झैलाकडील मार्ग आहे, तेथवर जाऊन प्रथम पाहावे, असा विचार आहे. तेथील स्वामी व लहान थोर मंडळीस नारायण. अग्निहोत्रीबुवास तूर्त विहार बदलू नका. स्नानसंध्यानुष्ठान देवाकडेच करा असे सांगावे. दुर्गाबाईस नारायण. पुनः पुनः सूत्रवृत्ति वाचावी. श्रीदत्त

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक ७२

## वाकेरीचे भाते पाठवावे

अमरावती (जि. गुंटूर) मार्गशीर्ष कृ. १४-१८२९

२ जानेवारी १९०८

श्री प. प. नृसिंहसरस्वती नृसिंहवाडी यांस नारायण. आज अमरावती येथे येणे झाले. येथे गैरसोय असलेमुळे येथून प्रातःकाळी पुढे जाणार. पुस्तक १७ श्लोकांपर्यंत पाठविले आहे. येथें लक्ष्मणशास्त्री यांच्या मुलीचे नाकात व्रण होऊन त्यातून अर्ध्या अंगुळाएवढे किडे पडतात. मुलाच्याहि नाकात तशीच तऱ्हा आहे. तरी तेथे कोणाला तरी सांगून वाकेरीचे भाते कृष्णाशास्त्री बिवलकर किंवा दुसऱ्या कोणत्याहि जागी मिळेल तेथून पाठवून देण्यास सांगावे. अंतोबा नरहरी यांचे नावे १ रुपया मनीऑर्डर करून पाठविला तो घेऊन कोणीतरी माहितगाराने चांगले वाकेरीचे भाते पाठवून द्यावे.

पत्ता : जिल्हा गुंटूर, पोष्ट अमरावती, रंगा वझल्ला लक्ष्मीनारायण शास्त्री यास नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक ७३

## नरसोबावाडीतील तीर्थे

चिखलदरा पौष शु. ५-१८२९

८ जानेवारी १९०८

रा. रा. बंडू काकतकर, नरसोबावाडी यांस नारायण. आता जाण्यास निघाले असता अंतोबाचे व तुमचे पत्र आले. विचार करण्यास वेळ नाही. तथापि तूर्त घडेल तसे - सेवा व माधुकरी, भजन सुरू असू द्या. सर्व मंडळीस नारायण. दुर्गाबाईस नारायण. नित्य सांगितल्याप्रमाणे करावे. श्री प. नृसिंह सरस्वती स्वामी नरसोबावाडी यांस नारायण. आतंच पुस्तक पावले. यानंतर पुस्तक पाठवू नये. तिकडेच आलेवर मागवून पाठवू. जगद्गुरुहि कालडीस पूर्व शंकराचार्यांच्या उत्पत्तिस्थानी त्यांचे मूर्तीचे प्रतिष्ठा करण्यास चालले. सर्व मंडळीस नारायण. **नरसोबाचे वाडीतील तीर्थे उदुंबर** समीप – पापविनाश – काम्यतीर्थ – सिद्धवरदषट्कुल – प्रयाग – शक्तितीर्थ – अमरतीर्थ –कोटीतीर्थ. नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक ७४

## मंडनमिश्राची आश्रमांतरातील नावे

मुक्त्याला श्रावण शु. ५-१८३०

श्री नरसिंह सरस्वती यांस नारायण. परमानंद स्वामींस कळविणे. **विश्वरुपधराचार्य वार्तिकाचार्य व सुरेश्वराचार्य ही तीन नावे मंडन मिश्रांची आश्रमांतरांत नामे झाली. पद्मपादाचार्य, पृथ्वीधराचार्य – ही पद्मपादाचार्याची नावें आहेत** असे ऐकिले आहे. कळावे. नारायण.

बळवंतराव हे वाकेरी पाठवून देतील. ते सकाळी एकदा निरसे दूध १० तोळे व त्यात एक तोळा होईल इतके गंध खलून घ्यावे. तिकडून स्त्रिया – पुरुष वगैरे कोणी येणेची इच्छा करील तर येथे सर्व तऱ्हेची अडचण असून जागासुद्धा मिळणेची मुसकील पडेल. तरी इकडेस कोणीच येऊ नये. हे आमचे सांगणे श्रेयस्कर होईल असे तेथील लोकांस कळवावे. सर्वांस नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक ७५

## श्री गुरूचे भजन यात आमचे समाधान

मुक्त्याला भाद्रपद व. २-१८३०

१२ सप्टेंबर १९०८

श्री प. नृसिंह सरस्वती यांसी नारायण. आपलेकडील सर्व वर्तमान कळले. श्रीगुरूस भजन ऐकविले म्हणजे आमचे समाधान जाहले. आता इकडे आल्यावर भेट पडेल. कळावे. नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक ७६

## स्तोत्र अवकाशाने पाठवूं

पेडकल्लपल्ली आश्विन व. १०-१८३०

१९ ऑक्टोबर १९०८

श्री प. नृसिंह सरस्वती स्वामी यांस नारायण. आजच गोदावरीकडेस जाण्यास निघालो. बंडु शागिर्द यांना नारायण प्रविष्ट. स्तोत्र त्याने मागितले ते अवकाशाने पाठवू. कळावे. नारायण.

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक ७७

## पुढे सप्तगोदावरीकडे जाणे

नागेश क्षेत्र अवनीगुडा आश्विन व. १२-१८३०

२१ आक्टोबर १९०८

वे. शा. शंकरभट सप्रे सावंतवाडी, यांस नारायण. कृष्णासागर स्नान विषुव पर्वणीस करून निघणे झाले. सप्त गोदावरीकडेस जाणेची योजना झाली. नागेश क्षेत्रात यमद्वितीयेपावत राहून पुढे जाणे होईल. पुस्तके पावलीच असतील. प्रकृतीचा मान सविस्तर लिहावा. नारोपंत वगैरे सर्वांस नारायण. कळावे.

पत्ता : कृष्णा जिल्हा मचली बंदर समीप. देवी तालुका, पोस्ट पेदाकल्लेपल्ली नागेश क्षेत्र संन्याशी मठांत, असा इंग्रजी लिहावा.. नारायण.

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक ७८

## किनाऱ्याने कृष्णातीरी येणे झाले

पेडकल्लापल्ली कार्तिक शु. ८-१८३०

१ नोव्हेंबर १९०८

रा. रा. नारायण उकीडवे सावंतवाडी यांस नारायण. पत्र पावले. वाडीवर धोंडूला सांगितले की येथे सावंतवाडीवरून येणे करू. परंतु रामेश्वरावरून परत करनाटक सरहद्दीपर्यंत येणे केले. तेथे प्लेगाचे प्रतिबंध आले व बेंगरूळच्या रस्त्यावरही तसाच. मग समुद्र किनाऱ्याने कृष्णातीरी येणे झाले. पुढे आता सप्त गोदावरीकडेस जाणेची योजना झाली. उपाय नाही. **प्रायः कोणाला पत्र पाठविणेचे नसते.** तयार झाल्या ग्रंथाचे बुकपोस्ट तद्वारा पत्ता कळविला. **जर पत्र आले तरच उत्तर दिले जाते. म्हणून कृपा नाही असे समजू नये.** तसाच जपादि प्रकार चालू द्यावा. कळावे. नारायण

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक ७९

## प्रवाससंबंधी ‘ सांगणे ’

राजमहेंद्रीनजीक मार्गशीर्ष व. ६-१८३०

१४ डिसेंबर १९०८

श्री प. नृसिंह सरस्वती नृसिंहवाडी यांसी नारायण. राजमहेंद्रीजवळ जयंती



करून काल गोदावरीचे तीर सोडून हैद्राबाद मार्गाने निघणे केले. का. व. ६ रोज सांगणे झाले की **काश्मीरचा रस्ता धरून तिकडे जा. नंतर उठून प्रार्थना केली. कोण नेणार कोण जाणार. जिकडे हा देह ठेवण्याची इच्छा तिकडे ( तंतुक गंगानुज यांना नेले तसा ) नेऊन ठेवावा.** नंतर ४ घटकेने पुनः सांगणे झाले की गौड देश म्हणून मनात अनुमान होते काय ? आता जातिवर्णाश्रमादिक कुठे राहिले ? असे झाले तरी तिकडचा रस्ता न धरता इकडील मार्ग धरिला. मर्जी प्रभूची. तेथील सर्व स्वामी मंडळी, पूजक, सेवक, स्थायिक लहान थोर मंडळीस नारायण.

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक ८०

## अजून प्रयाणाचा निश्चय नाही

काकीनाडा माघ शु. २-१८३०

२३ जानेवारी १९०९

श्री प. नृसिंहसरस्वती नृसिंहवाडी यांसी नारायण. येथे आलेली मंडळी भेटली. अजून प्रयाणाचा कुठे तो निश्चय नाही. पुढे कळवू. मुलाला नारायण. अध्ययन चालवावे. नारायण.

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक ८१

## ब्रह्मानंद स्वामींनी दोन मंदिरे श्रीगुरूंची बांधली

राजमहेंद्री फाल्गुन शु. २-१८३०

२२-२-१९०९

रा. रा. नारायण उकीडवे सावंतवाडी यांस, नारायण, तीन महिनेपर्यंत गोदावरी तीरी राहून आता मागे परतणे झाले. वाडीवरील मंडळी बरीच आलेली. तिला परतविली. येथे ब्रह्मानंद स्वामींनी दोन मंदिरे श्रीगुरुंची बांधिली. येथे ठेवणेकरिता २ गुरुचरित्राची पुस्तके त्यांनी मागितली. व्ही. पी. ने किंवा नाटपेड ह्या पत्त्यावर सर्व तेथे छापलेल्याच्या २-२ प्रती पाठवाव्या. (पेदू प्रोलवेक कटापय्य गव्हर्नर पोस्ट स्पा. बिजवाडा, जिल्हा कृष्णा ) ह्यांस पोचले म्हणजे ब्रह्मानंद स्वामींस मिळेल. शंकर सप्रे वगैरे सर्वांस नारायण.

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक ८२

## इकडे येऊ नये ... सोईअभावी संकट पडायचे

पवनी आषाढ शु. २-१८३

२ जून १९०९

श्री नृसिंह सरस्वती स्वामी यांस नारायण. पत्र पावले. त्याप्रमाणे **अवलोकनादिक चालणे.** तेथील लहान थोर सर्व मंडळीस नारायण प्रविष्ट व्हावा. कळावे. इकडेस कोणी

मंडळीस येईल तर येऊ नये असे कळवावे. इकडे सोई नसल्यामुळे स्वतः संकट पडावयाचे म्हणून. कळावे. नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक ८३

## थोडे श्रवण होत आहे

श्री प. प. नरसिहस्वामी यांस नारायण. पत्र पावले. मास्तर बंडु आपा येथे आहेत. प्रकृति बरी आहे. येथे थोडे थोडे श्रवण होत आहे. मंडळी रात्रीस भजन करतात. असे चालू आहे. सर्व मंडळीस नारायण. कळावे. नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक ८४

## श्री दत्तगुरूचे गुणानुवाद वर्णावे

वे. शा. सं. शंकरभट गुळवणी यांसी नारायण. पूर्वीची पत्रे मिळाली नाहीत. चरित्र मिळाले व ऐकले. सरळ कविता असून रसाळ आहे. जर श्रीगुरूंनी ही एवढी शक्ती दिली तर श्रीगुरु दत्तात्रेयगुरूंचे गुणानुवाद वर्णावे. सर्व मंडळीस नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक ८५

## तिथ्यन्ती पारणा करणेचा शास्त्रार्थ

वे. शा. सं. दादू यांस (नृसिंहवाडी) नारायण. पारणेसंबंधी तिथ्यन्ती पारणा करणेचा शास्त्रार्थ धर्मसिंधूवर करणेचा ठरतो. शिवाय ह्या रानात वा स्थानात पुस्तके पाहण्यास मिळणार नाही. जर वाजसनीक प्रमाण आढळते तर उत्सवान्ती दिवा पारणे करावे. नाहीतरी रात्री करावे. नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक ८६

## गुरुचरित्र स्वाहाकारासंबंधी निराधार सांगता येत नाही

रा. रा. शंकर सप्रे सावंतवाडी यांस नारायण. पुरुषोत्तम भेटला. उद्या तो इथोन इंदूरास जाणार. गृहयाग्नि स्वतःस ठेवणेस घडेल तर ठेवावा. नाही तर चालेल तसेच चालवावे. गुरुचरित्र स्वाहाकारासंबंधी स्वतः निराधार काहीच सांगता येत नाही. अतएव त्यासंबंधाने देवता निर्णय व हवन प्रकार वगैरे कामी काहीच अप्रामाणिक बोलता येत नाही. चंपू संबंधाने पाहण्यास वेळ मुळीच मिळत नाही. पुढे पाहू. कळावे. नारायण

(सदर पत्र शंकरभट सप्रे यांस आले आहे. मजकूर नारोपंत उकीडवे यासंबंधी आहे.)



॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक ८७

## श्रीगुरु सर्वांतरी सर्वसाक्षी आहेत

पवनी

भा. शु. ४-१८३१
१८ सप्टेंबर १९०९

श्री प. नृसिंहसरस्वती स्वामी यांसी नारायण. वाडीवरील मंडळी येथे सुखरूप पोहोचली. तूर्त बरीच गर्दी आहे. वृत्तीचा अभ्यास ठेवावा. एका पुजाऱ्याने काही मजकूर लिहिला. **श्रीगुरु सर्वांतरी सर्वसाक्षी आहे. त्याकडेस अन्यायाचा चांगला परिणाम कधीहि होणार नाही.** नारायण

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक ८८

## देवालयासंबंधी सूचना

नृसिंहवाडी

चै. शु. ३-१८३२
२२-४-१९१०

वे. शा. सं. गणेश व्यंकटेश सातवळेकर कोलगांव कृ. न. वि. वि. आपले पत्र पोहोचले. मजकूर समजला. श्री. प. प. गुरुमहाराजांस पत्र वाचून दाखविले. उत्तरे मिळाली ती :

१) देवालय पूर्वाभिमुख बांधावे. गैरसोय असेल तर उत्तरमुख.
२) तांबेची किंवा पंचरसीमूर्ती करू नये. पाषाणाचीच करावी.
३) चळाची करू नये. स्थिरार्चेस बारा अंगुळापेक्षा मोठी असावी. एकादशादि पर्वाचे दिवशी अभिषेक करावा.
४) देवालय लहान असावे व आकारहि माणगांवचे देवालयाप्रमाणे ठेवण्यास हरकत नाही.
५) मूर्ती दत्ताचीच असावी (म्हणजे सहा भुज, मुख एक, ध्यान जपमंत्रोक्त) माणगावी होती तशी करू नये.
६) दिवसा पूजेनंतर उपदिष्ट मंत्र जप अवश्य आहे. रात्री आवश्यकता नाहीं. तथापि केल्यास प्रत्यवायही नाही.
७) समासन मागाहून कळेल.

श्रीगुरु महाराजांचे जे चरित्र तयार केले आहे **ते यतिवर्य नृसिंह सरस्वति स्वामी (नारायण दीक्षित स्वामी) यांचे नावे पाठवावे.** म्हणजे ते त्यास वाचून दाखवून परत पाठवतील. पुढील व्यवस्था शिष्य मंडळीच्या विचारे करणे. स्वकीय चरित्र प्रसिद्ध करणेस स्पष्ट आज्ञा होणार नाही व नकारहि नाही. कळावे.

मी दोन तीन दिवसांत निघेन. गुरुमहाराजांस येथोन जाण्याची आज्ञा जाहली

असून ती फिरवावी व ते येथेच राहावे. या करिता महारुद्रानुष्ठान ब्राह्मणांनी केले. पुढे काय होईल ते पहावे. क. लो वि.

शंकरभट्ट सप्रे

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक ८९

## दुर्लक्ष्याने घडले तो अपराध नव्हे...

हावनूर

आषाढ शु. ३०-१८३२

५ ऑगस्ट १९१०

श्री प. नृसिंह सरस्वती यांस नारायण. पत्र पावले. दुर्लक्ष्याने तसे घडले तो काही अपराध नव्हे. त्याबद्दल काही मनात आणण्याची गरज नाही. मुद्रा १५ बांधावी. तोपर्यंत सतत फलाहार सोसेल असे वाटत नाही. तरी नियत एका घरचे न करिता हविष्यान्न करावे. पूर्वी ब्रह्मीभूत श्रीमत् परमहंस गोविंदाश्रम यांना असाच एक वर्षी आलेला. त्यावेळी ह्याबद्दल वाटाघाट करून हविष्यान्न भिक्षा त्यांनी चालविलेली. हा सदाचारहि आहे. पाठ तसाच चालवावा. मुलांना सांगोन विद्याभ्यासाला उत्तेजन द्यावे. तेथील लहान थोर मंडळीस नारायण. **यावर्षी मात्र येथे कोणी तिकडून येतील तर बेधडक नियम मोडून पुढे जाण्याचा प्रसंग घडेल.**

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक ९०

## उद्या प्रातःकाळी पुढे प्रयाण

शिमोगा

आश्विन शु. ७-१८३२

२१ ऑक्टोबर १९१०

श्री प. प. नृसिंह सरस्वती यांसी नारायण. राणी बिन्नूरपासून तीन कोसांवर राहून सरस्वती पूजा करून पुढे निघणे केले. परंतु अतिवृष्टी असल्यामुळे म्हणणेसारखी चाल होत नाही. ह्या शिमोग्यावरून सोळा कोसच शृंगेरी राहिली आहे. उद्यां प्रातःकाळी पुढे निघणे होईल. तेथील सर्व स्वामी मंडळीस व सर्व लहान थोर पुजारी मंडळीस व सेवेकरी मंडळीस नारायण. बंडूने अंगारा पाठविला तो मिळाला. कळावे. नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक ९१

## प्रकृतिमान कसा आहे?

बनवासी

कार्तिक शु. ९-१८३२

११ नोव्हेंबर १९१०

रा. रा. धोंडोपंत उकीडवे सावंतवाडी यांस नारायण. मध्यंतरी पत्र पाठवून उत्तर घेण्यासारखे राहणे न झाले. म्हणून पत्र पाठविले नाही. तरी हल्ली प्रकृतिमान कसा आहे तें सविस्तर कळवावे. येथे आठ दिवस राहणे होईल. क. तुमचे सर्व मंडळीस नारायण. नारोपंत आदिकरून सर्वांस नारायण. पत्ता : पोस्ट बनवासी, ता. शिरसी, जि. कारवार, मधुकेश्वराचे देवळात. नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक ९२

## पाय लचकल्यामुळे राहणे झाले

बनवासी

मार्गशीर्ष शु. ५-१८३२

७ दिसंबर १९१०

श्री प. नृसिंह सरस्वती यांस नारायण. आजच पत्र पावले. जरा पाय लचकल्यामुळे येथे राहणे केले. आता पाय बरा आहे. येथे मंडळीने तैत्तिरीय भाष्य आरंभिले आहे. पण येथे राहण्याची इच्छा नाही. लौकरच शिक्षा मात्र संपवून जाणेचे करता येईल. येथून ७० मैल गोकर्ण आहे. वृत्ति चालविली तशीच चालवावी. गोपाळाने पाळणा मागितला हा त्याला द्यावा. दुर्गाबाईची प्रकृति कळवावी. परमानंदस्वामी आदिकरून सर्वास नारायण. बाळशास्त्री अध्यापक, वामनशास्त्री खरशीकर आण्णा, नारायण गणेशशास्त्री, वामन बंडू अंतोबा, श्रीपाद हवळे, अंतू शंकर, बाबूराव हरि राघुसंत, गणपति आदीकरून सर्वांस नारायण. सुंदरा, गंगू, यमुनाबाई इत्यादिकांस व सर्व पुजारी ग्रामस्थ सेवेकरी यांस नारायण. जि. कारवार, पोस्ट बनवासी, ता. शिरसी.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक ९३

## शेत सोडवून देवाकडे योजना करावी

बनवासी

मार्गशीर्ष शु. ६-१८३२

८-१२-१९१०

रा. रा. नारायण उकीडवे सावंतवाडी यांस नारायण. पत्र पावले. स्वप्नात निर्देशित केल्याप्रमाणे पै कडून - रक्कम घेऊन शेत सोडवून देवाकडे तत्संबंधी योजना करावी. विमा उतरलेल्या रकमेचा श्रीकडेस अन्य तऱ्हेने उपयोग करावा. तूर्त देवालय असून आणखी कोणाकडूनहि श्रींची मर्जी फिरून व्यवस्था होईल. शिवराम पै यांस नारायण. भगवत् सेवेत अंतर करू नये. नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक ९४

## येथे दत्तजयंती उत्सव झाला

बनवासी

मार्गशीर्ष १५-१८३२

१६ डिसेंबर १९१०

श्री प. नृसिंह सरस्वती यांसी नारायण. आजच पत्र पावले. येथील मंडळी

उत्सवाविषयी आज्ञा मागत होती. पण नाही म्हणोन सांगितले. तरीहि जयंती दिवशी बरीच यात्रा जमून उत्सव झाला. २-३ दिवसांत शिक्षा संपेल. मग पुढे जाणे होईल. लिहिलेल्या सर्वांस नारायण.

---

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक ९५

## आज तैत्तिरीय संपले

बनवासी — मार्गशीर्ष व. १०-१८३२
२६-१२-१९१०

श्री प. नृसिंह सरस्वतीस्वामी यांस नारायण. आजच तैत्तिरीय संपले. आताच गोकर्णास जाण्यास निघणार. तेथील सर्व मंडळीस नारायण.

---

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक ९६

## पुढे कृष्णातीरी जाणे होईल

गोकर्ण — पौष व. १-१८३२
१५-१-१९११

रा. रा. धोंडो कृष्ण कोपकर बडोदा यांस नारायण. पत्र पावले. तेथे थोडे दिवस राहून पुढे बहुधा कृष्णातीरी जाणे होईल. भगवद्भजनी सादर असावे. कळावे. नारायण.

---

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक ९७

## साक्षीपणाचे निरंतर अनुसंधान ठेवावे

जैनापूर — चै. शु. १-१८३३
१-४-१९११

श्री प. पु. नृसिंह सरस्वती यांस नारायण. गलगल्यांतून निघून जैनपुरांस येणे झाले. येथोन वऱ्हाडाचे मंडळीस उद्यां रवाना करून पुढे कृष्णातटानेच जाण्याचा विचार आहे. अंतोबा-बाबूराव आपल्या निघण्याचे वेळीच निघणार होते. आण्णा बाकीच्या मंडळीस घेऊन दुसरे दिवशी निघणार होते. ते पोचल्याचे कळवावे व चंपावती, गंगा मागे राहिल्या त्यांना सोबत मिळून त्या तिकडेस आल्याचे कळवावे. श्रवणादि कालातिरिक्त काली सर्वदा **जाता येता सुद्धा आपुले निर्विकार साक्षीपणाचे निरंतर अनुसंधान ठेवावे. साक्षीभूत दत्तात्रेय सद्गुरूच सर्वत्र परिपूर्ण आहे. ही भावना उत्तरोत्तर दृढ करीत असावी. उगीच कार्पण्य मनात आणू नये.** कळावे.

सर्व स्वामी व तेथील मंडळीस नारायण. गांडा ब्रह्मचारी याचा साष्टांग नमस्कार प्रविष्ट व्हावा.



॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक ९८

## फलादिक असतील ती पूजेकडे ठेवावी

चैत्र शु. १२-१८३३
१०-४-१९११

रा. रा. नारायण उकीडवे सावंतवाडी यांस नारायण. शनिवारी भिक्षा करून त्यात **फलादिक असतील ती पूजेकडे ठेवावी व अन्नाचा नैवेद्य करून ब्राह्मणास द्यावा आणि आपण एकादशीप्रमाणे वागावे. अशीच सेवा काही दिवस घेणेची इच्छा आहे.** कळावे. नारायण. गांडा ब्रह्मचारी याचा नमस्कार.

---

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक ९९

## चहूकडे कृष्णा भरली आहे

कुरुगड्डी — ज्येष्ठ व. १-१८३३

श्रीमत् परमहंस नृसिंह सरस्वती स्वामी यांस नारायण. पत्र व पुस्तके पावली. येथे काहीच उत्सव नसल्यामुळे उत्सव नवीन करण्याकरिता येथील मंडळीने सांगितल्यावरून श्लोक मागितले. येथे सत्र वगैरे काही नाही व एका पुजाऱ्यावाचून दुसरे घर नाही. चहूंकडून कृष्णा भरली. नौका नाही. तुंबीच्या जोडीवरून लोकाला उतरतात. पौषानंतर पायउतार होतो. अजून चातुर्मास्याचा नियम सांगण्यासारखा नाही. आपण घडेल तसे पाठादिक ठेवावे. पण **निरंतर साक्षीभूत स्वरूपानुसंधान ठेवावे.** कळावे. नारायण.

गांडाचा शिरसाष्टांग नमस्कार. **मनात चिंता करावयास कारण नाही. श्रीसद्गुरु समर्थ आहे.** ह्या जाग्यावर कोल्हापूर सरकार आदिकांचे उपाधि वाढेल तर जागा सोडून दुसरे गावी जावून राहण्याची आज्ञा आहे. तुमच्या सर्व गोष्टी श्रीचरणी निवेदन केल्या. कदाचित् चातुर्मास होईल तर कोणाचीच सोय नाही. कोण आला तर तांदूळ मिळावयाची पंचाईत आहे.

---

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक १००

## गोदातीरी पर्यटन

राजूर — पौष शु. १२-१८३३
१-१-१९१२

रा. रा. धोंडोपंत कोपकर यांस नारायण. गुरुद्वादशीचे दुसरे दिवशी कुरुगड्डी सोडून कांही दिवस कृष्णातीरी राहून तूर्त गोदातीरी पर्यटन होत आहे. गुजराथी येणेंचा विचार नाही. कळावे. नारायण.

|| श्री दत्त ||   पत्र क्रमांक १०१

## इथे येणे कठीण - लोकास श्रुत व्हावे

चिखलदरा   आषाढ शु. ८-१८३४

२१ जुलै १९१२

श्री नरसिंह सरस्वति स्वामी यांस नारायण. केशवशास्त्री आदिकरून मंडळी आज रोजी येथे पोचली. बनेल तोपर्यंत क्षौर करूनच व्यासपूजा करावी. जर ह्या पौर्णिमेचे क्षौर राहिले तर चातुर्मास्य संपेपर्यंत मध्ये होणार नाही. इतर पौर्णिमेचे दिवशी राहिले तर वद्य ५ पर्यंत करावे. तिकडून दर्शनाकरिता कोणी मंडळी येतील तर फारच हाल होतील. ८० मैल रेल्वेपासून दूर हा गाव आहे व नर्मदेतून इतके लांब येणे तर कदाचित् नौकाहि बुडून जाणेचा संभव आहे. शिवाय गाडीरस्ता नाही. शिवराम वगैरे येणार असे केशवशास्त्री म्हणत होते. तरी येथे माधुकरी वगैरे मिळण्याची सोय मुळीच नाही, हे वर्तमान लोकांस श्रुत व्हावे.नारायण.

---

|| श्री दत्त ||   पत्र क्रमांक १०२

## अडचणीत न पडण्याकरिता पत्रद्वारे दर्शन मानावे.

चिखलदरा   आषाढ व. ११-१८३४

९ ऑगस्ट १९१२

नारायण. बढवाई स्टेशनापासून सुमारे ८० मैल चिखलदरा असून मार्गाची सोय नाही व २-३ दिवस नर्मदेतून येण्यास लागतील व जातेवेळी वारा न मिळाल्यास किती दिवस लागतील हे सांगता येणार नाही. अशा अडचणीत न पडण्याकरिता पत्रद्वारा दर्शन मानून स्वस्थ रहावे. कळावे. नारायण.

---

|| श्री दत्त ||   पत्र क्रमांक १०३

## चातुर्मास समाप्ती

चिखलदरा   भाद्रपद व. १-१८३४

२० सप्टेंबर १९१२

श्री प. नृसिंह सरस्वती स्वामी यांस नारायण. चातुर्मास्य समाप्ती झाली. आताच काही दूरची मंडळी आली तेव्हा थोडे दिवस राहून पुढे जाणे होईल. कळावे. **प्रणानुसंधानी सादर असावे.** नारायण. सर्वांस नारायण प्रविष्ट व्हावा.



|| श्री दत्त ||   पत्र क्रमांक १०४

## तूर्त मुक्काम गरुडेश्वर

गरुडेश्वर   वै. शु. ८-१८३५

१३ मे १९१३

वे. शा. रामचंद्र शास्त्री प्रकाशकर बडोदे यांस नारायण. तूर्त गरुडेश्वरास राहणे आहे. चातुर्मास्याला अजून दोन महिने आहेत. तेव्हा आज मुकरर सांगता येत नाही. कळावे. नारायण.

---

|| श्री दत्त ||   पत्र क्रमांक १०५

## या रानांत मंडळीने येऊ नये

गरुडेश्वर   जेष्ठ शु. ५-१८३५

१८ जून १९१३

श्री प. नृसिंह सरस्वती स्वामी यांस नारायण. चांदोदपैकी गरुडेश्वर नर्मदातीरी एका लहान पर्णशाळेत राहणे आहे. तूर्त पाऊस सुरू. प्रायः येथेच चातुर्मास्य होईल. येथे दक्षिणींचे एकच घर आहे. शिवाय देवालय, धर्मशाळा वगैरे मुळीच नाही. व या रानात उगीच मंडळी अविचाराने येतील तर अशा फजीतीत येऊ नये. असे कळावे. हा मजकूर दत्तभट वगैरेस कळवावा. **स्वानुसंधानाविषयी प्रमाद होऊ नये.** कळावे. नारायण.

अलंकार १ श्लोकाहार नव्हे. श्री. प. परमानंद स्वामी शंकरानंद निलजीकर यांस नारायण. शंकर, अंतू, हरि, सखाराम, बाबूराव, श्रीपादभट हवले, आदिकरून सर्वांस नारायण.

---

|| श्री दत्त ||   पत्र क्रमांक १०६

## इथे छात्याही वाळणे कठीण

गरुडेश्वर   ३० जून १९१३

ज्येष्ठ व. ११-१८३५

श्री प. नृसिंह सरस्वती यांसी (सर्व पुजारी मंडळीस पत्र) नारायण. पत्र पाठवले. जो सर्व मंडळीनी विचार केले ते उत्तम आहे. (**भयकृद भयनाशनः**) असा **भगवान आहे. तरी भय आल्यावर शरण जाण्यापेक्षा पूर्वीच तत्प्रवण असावे हेच उचित. काल अष्टमीचे दिवशी १५ इंच एकदम पाऊस पडला व पुढेहि पडत आहे. छात्याहि वाळविण्याचे कठीण पडते. नुसते बसण्यास सुद्धा जागा नाही. याकरिता इकडे या वर्षी कोणी येऊ नये.** कळावे. नारायण.

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक १०७

## जप ठेवावा - संकट जाईल

रा. रा. नारायण उकीडवे सावंतवाडी यांस नारायण. पत्र पावले कमंडलूहि पावला. **अनसूयात्रिसंभूतो दत्तात्रेयो दिगंबरः। स्मर्तृगामी स्वभक्तानां उद्धर्ता भव संकटात्।** याचा जप घडेल तसा ठेवावा. संकट जाईल. नारायण.

---

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक १०८

## ईश्वरास रात्रंदिवस अभेदाने चिन्तीत जावे

बिठूर

श्री नारोपंत उकीडवे यांस नारायण. पत्र पावले. **संकट दूर करणाऱ्या ईश्वरास रात्रंदिवस अभेदाने चिन्तीत जावे.** येथे हवा बरी नाही. याकरिता पत्रद्वारा दर्शन मानून येथे न येतां स्वस्थ भगवत् सेवेत तत्पर रहावे. कळावे. नारायण.

---

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक १०९

## अजपाजप - पुरुषसूक्ताने पूजादि नियम

ज्येष्ठ शु. १२-१८२५
६ जून १९०३

वे. सखाराम भटजी कोलगाव यांस नारायण. **हस्तपाद प्रक्षालन करून प्रातः काळीच अजपाजप करावा. प्रत्युपचाराला मूलमंत्र लावून पुरुषसूक्ताने पूजा करावी. श्रीसूक्त घेतल्यास हरकत नाही, पण गरज नाही. जपांते मृद्धारण करण्यास हरकत नाही. वैदिक मंत्रास आवश्यकता नाही. द्वादशाक्षरींचा द्वादशलक्ष पुरश्चरणाजप आसनावर प्रसादादि भक्षण न करावे. पूजोत्तर किंवा भोजनाचे वेळी तीर्थ घ्यावे. प्रातःपूजेला स्नान पाहिजे. मध्यान्ह सायंकाळी स्नान न घडल्यास दुरून उपचार अर्पावे.** देवालयाचे हातून घडेल. असा निश्चय असेल, तर बांधावे. नारायण.

---

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक ११०

## साक्षीभूत मी आहे असे अनुसंधान ही आमची सेवा

बिठूर आ. शु. ५-१८२५

वे. शा. सं. नारायण दीक्षित नरसोबावाडी यांस नारायण. पाठविलेले पुस्तक पावले. **निरंतर साक्षीभूत मी आहे असे अनुसंधान ठेवणे ही आमुची सेवा होय.** कळावे. तेथील सर्व स्वामीला व पुजारी व परस्थ सेवेकरी आदि करून सर्वांना नारायण. येथे सर्व व्यवस्था बरी आहे. नारायण.



॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक १११

## करवेल तावत् नोकरी ... रात्री अध्यात्म ग्रंथ वाचावे

बिठोर फा. व. २-१८२५
३ मार्च ११९०४

रा. रा. नारायण उकीडवे सावंतवाडी यांस नारायण. आपुले पत्र पावले. आता येथून लौकरच जाणेचा विचार आहे. जर तुम्ही येणे केले तर इतुके दूर येऊन उगीच चुकामूक पडेल. तरी येणे करू नये. **करवेल तावत् नोकरी करावी न घडेल तर सोडून स्वस्थ घरी बसून गायत्री जपादि करून व सायंकाळी रात्रीसमयी अध्यात्म ग्रंथ (एकनाथी भागवत वगैरे) वाचावे.** तूर्त बाहेर फिरण्यायोग्य दिवस नाहीत. कदाचित् योग्य साधुसमागम घडेल तर करावा. उगीच व्यर्थ खर्च करून इकडे भटकण्यांत काय मिळेल? कळावे. नारायण.

---

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक ११२

## 'यज्जाग्रतोदूरमुदेति' या ऋचांचा पाठ - अन्नपूर्णे सदापूर्णे स्मरणाने भिक्षारंभ

रा. रा. नारायण उकीडवे सावंतवाडी यांस नारायण पत्र पावले. ऐकून आनंद झाला. **रोज नित्य जप झालेवर 'यज्जाग्रतोदूरमुदैति' ह्या सहा ऋचा पाठ करीत जावे. अन्नपूर्णे सदापूर्णे शंकर प्राणवल्लभे। ज्ञानवैराग्य सिध्यर्थ भिक्षां देहि च पार्वति॥ अशी भिक्षेस निघते वेळी प्रार्थना करून गुरुवंदन पूर्वक भिक्षेला जाऊन आणि केलेली भिक्षा श्रीगुरुला निवेदन केली अशा भावाने निवेदन तदाज्ञेने पाकार्थ योजितो अशी प्रत्यही भावना असावी.** बाकी विशेष काही करविणेचे वाटत नाही. टेंभे यांस इथून परभारे औषध पाठविता येईल. कळावे. नारायण.

---

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक ११३

## स्वानुसंधानाचा प्रमाद न व्हावा

नरसी भा. व ६-१८२७
२१ ऑगस्ट १९०५

**श्रीमत् परमहंस छात्रान्तरगत नृसिंहसरस्वती नरसोबावाडी यांस नारायण.** पत्रे पावली. तसाच अभ्यास चालू द्यावा. मास्तर यांचे कार्ड पावले. त्यांना नारायण प्रविष्ट व्हावा. **जी वाडीवर श्रीगुरूंची सेवा होत आहे, ती आमची समजावी.** आबा पुजारी यांस नारायण. कार्ड पावले. पुढे काही दिवस एकत्र राहणे झाल्यावर कळेल. **स्वानुसंधानाचा प्रमाद होऊ न द्यावा.** गुरुचरित्र काव्य मिळाले. एका ब्राह्मणाने येथे लिहिण्यास आरंभिले

ते थोडेच दिवसांत आपलेकडे पाठवितील. तेथील सर्व स्वामी मंडळी, सेवेकरी मंडळीस, सर्व पुजारी सपरिवार यांस, क्षेत्रवासी, सर्वांस नारायण.

॥श्री दत्त॥ **पत्र क्रमांक ११४**

## दयालू गुरुमाऊली कृपा करीलच...

नरसी
भाद्रपद शु. १-१८२७
३१ ऑगस्ट १९०५

श्रीमन्नृसिंहवाडी क्षेत्रस्थ यति व पुजारी नरसोबावाडी यांस वासुदेवानंद सरस्वती यांचे नारायण. आपणाकडून पत्रे आली त्यांत मूर्तिसंबंधाने कळविल्याप्रमाणे काय करावे म्हणून श्रींची प्रार्थना केली. त्यावेळी कोपमुद्रा दाखवून आता पंच नेमून परभारे व्यवस्था ठेवली पाहिजे असे सांगणे झाले. तरी पुन्हा पुन्हा प्रार्थना केल्यावर सांगणे झाले की, त्या देशाच्या लोकांची वागणूक बिघडल्यामुळे त्या देशाचाच कंटाळा येतो. व पुन्हा प्रार्थना केली की देशासंबंधी सुधारणा करणे हे काम श्रीचरण प्रसादाने केले तरच होईल. ते असो. श्रीक्षेत्रवासी स्वामी, पुजारी - सेवक यांजकडून जर चूक झाली असेल. तर ती कोणती कळल्यास त्याची क्षमा मागून पुढे तशी चूक न घडण्याबद्दल आपुले आज्ञेप्रमाणे वागतील. आपण सद्‌बुद्धि देऊन वागविले पाहिजे. अशी प्रार्थना केल्यावर पुन्हा सांगणे झाले की अजून नाकातील घाण बंद होत नाही. ती कोणती घाण हे तर स्पष्ट सांगणे होत नाही. पुन्हा प्रार्थना सुरू आहे. मायबाप दयालु गुरुमाउली कृपा करीलच करील. सर्वांनी मात्र (**महद्‌भयं वज्रमुद्यतं**) आपुला शास्ता कोणी एक आपल्यावर स्वतंत्र आहे. तो साक्षी आहे तरी त्याला अनन्य शरण असून **निष्कपट वागू या असा निश्चय करून वागावे.** तो सर्वारिष्टे निरसन करून रक्षण करील. सर्वांस नारायण. ''**योगिनी वरदानादि भवेत्तस्यान्यथा कथम्**'' **तथापि दमहर्त्तुस्तत्पादौ वन्द्यौ पुनः पुनरिति नारायण. दमहर्तुः।**

(या ठिकाणी मद्-हर्तुः कदाचित् असेल.)

॥श्री दत्त॥ **पत्र क्रमांक ११५**

## कल्पवृक्षाखाली बसून चौपदरीस गांठ का?

हुशंगाबाद
मार्गशीर्ष १८२७
नोव्हेंबर १९०५

रा. रा. विष्णुपंत यांस नारायण. आपले पत्र पावले. उद्या येथोन म्हणजे हुशंगाबाद सोडून पुढे जाणार. पुढे रस्त्यांत कुठे राहणे होईल हा निश्चय सांगता येत नाही. सुमारे दोन महिन्यांनी गंगातीरी जाणे होईल. कदाचित ब्रह्मवर्तावर गेल्यावर भेट होईल. आपण कल्पवृक्षाखाली बसून चौपदरीस गांठ मारण्याची इच्छा कां करावी?



जरी आज तसा अनुभव न आला तरी शेवट येणार. (**देहांते देवस्तारकं ब्रह्म व्याचष्टे**) उपासकांना देहांती देवतारक ब्रह्मोपदेश देऊन मोक्ष देतो असे आहे व पूर्वीहि नैष्ठिक भक्ती असता अपरोक्षानुभव होईल. कळावे. सर्वांस नारायण प्रविष्ट करावा. श्रीगुरुसेवेविषयी सादर असावे. नारायण.

॥श्री दत्त॥ **पत्र क्रमांक ११६**

## आपआपला उपासना मंत्र नित्यक्रमाहून वेगळा जपावा

संध्यामठ (तंजावर)
भाद्रपद शु. ३-१८२९
१० सप्टेंबर १९०७

रा. रा. बाबूराव (नरसोबावाडी) यांस नारायण. आपुल्या पत्रांचे कालच उत्तर लिहिले. आमुची कृपा नाही असे म्हणू नये. पदात नाव आले नाही ही त्यावेळेची लहरी आहे. दुसरे एक स्मारक पद पाठविता येईल. प्लेगचा रोग रोग-दोषादि अनेक कारणांनी असतो. त्याचा एकाने परिहार करून सर्वांचे क्षेम कसे साधेल? आपण आपआपला उपासना मंत्र नित्यक्रमाहून निराळा घडेल तितुका जपावा. पौर्णिमा होताच येथोन जाणार. नारायण.

॥श्रीदत्त॥

## पद-चाल-धांव विभो करुणा

श्रीपाद श्रीवल्लभ नरसिंह सरस्वति यतिवर दत्ता॥ धृ०॥
कृष्णावेणीतीरविहारा भवसंहारा शिक्षितमत्ता॥
सत्ता हे तव है भवदव चित्तातीता हो अनियत्ता॥१॥
सत्तारक तू स्थिरचिरहेतु हरि मम मंतु निजपदी चित्ता॥
रमवी रमणा भवभयहरणा निरुपमकरुणा मुनिजन वित्ता॥२॥
वित्ताते श्रुतिमस्तकवित्ता आहे जरी तरी वळखुणि माझ्या॥
चित्ता आता मजवरी दत्ता करि करुणेक्षा मृदुतर चित्ता॥३॥

**ह्याप्रमाणे एक पद पाठविले. हे रोज एकदा म्हणून निजावे.**

॥श्री दत्त॥ **पत्र क्रमांक ११७**

## निर्व्यसनिप्रियो विजयते

बंडू शागीर्द (नरसोबाची वाडी यांस) हावनूर गावी करून पाठविलेले पद ''**निर्व्यसनि प्रियो विजयते**'' ही आद्याक्षरे श्लोकार्थाच्या आरंभीच आहेत. गांजा ओढण्याचे व्यसन होते. त्यास अनुलक्षून ही अक्षरे मुद्दाम घातली होती.

हे स्तोत्र पुढील प्रमाणे आहे –

**नि**र् मलं निश्चलं स्वांतं निशांतं यस्य संततम्
**व्य** तीतरज उत्कृष्टमेकांतंदयितं मतम् ।।१।।
**स** सर्वात्मापि सर्वेशः सर्वभूतगुहाशयः
**नि** यंता सर्व भूतानां सर्वशक्ति समन्वितः ।।२।।
**प्रि**यश्चात्मवतां नित्यं दत्तात्रेयो जगद्गुरुः
**यो**गेश्वरो योगिपूज्यो भक्तानां कल्पपादपः ।।३।।
**वि**श्वरूपधरो विश्वविहारी विजिताहितः
**ज**न्ममृत्युजराव्याधिभयदोषनिवारणः ।।४।।
**य** ति संन्यासि सुगतिः सर्वारिष्टनिवारणः
**ते** जसां तेज आत्मायं सदा ध्येयो मुमुक्षुभिः ।।५।।

आद्याक्षरे **निर्व्यसनि प्रियो विजयते**

---

।। श्री दत्त ।। **पत्र क्रमांक ११८**

## प्रत्यगभिन्न परमात्मा मी आहे

मंथन कालेश्वर वैशाख शु. ४-१८३१
२३-४-१९०९

श्री प. प. नरसिंह सरस्वती यांस नारायण. ज्याप्रमाणे लिहिले तसेच चालू द्यावे. निरंतर ( **देहेंद्रियमनःप्राणाहंकारेभ्यो विलक्षणः** ) **निर्विकार कूटसाक्षी प्रत्यगभिन्न परमात्मा मी आहे अशी भावना असावी.** परमानंद स्वामी यांस नारायण. आहिताग्नि वामन बटु, दत्तू वामन, अंतोबा वामन, गुंडु पंडित, काकतकर, शंकर, अंतु, परशुराम, बाबुराव, राघु, हरि, संत आदि करून सर्वांना – दुर्गाबाईस नारायण. वे. शा. अण्णा दीक्षित यांस नारायण. आपण श्रीक्षेत्री राहूनच चालू क्रम चालवून यथामति यथाशक्ति प्रवचन करावे. **श्री दत्तगुरूप्रमाणे प्रवास होईल.** उत्तर दिशेस जाणेची कार्तिका पासून. हयगयच ठेवली पण काळेश्वरी जोरानेच सांगणे झाले की 'चल'. म्हणून उत्तरदिशा धरावी लागली. सर्वांस नारायण.

---

।। श्री दत्त ।। **पत्र क्रमांक ११९**

## पत्रद्वारे दर्शन मानून स्वस्थ रहावे

नारायण. पत्र पावले. **पत्रद्वारा दर्शन मानून स्वस्थ राहावे.** वामन याचे मुलाकरिता आपासाहेबाकडे यंत्र देता येईल कळावे. नारायण.



।। श्री दत्त ।। **पत्र क्रमांक १२०**

## नागपुरात प्लेग जोरात

पवनी श्रावण व. ११-१८३१
१० सप्टेंबर १९०९

दत्तभक्तिरत कुप्पुस्वामी यांस नारायण. सौ. मीनाक्षीबाईंची प्रकृति कशी आहे व आपल्या तिकडील व्यवस्था कशी चालते सर्व कळवावे. नागपुरात प्लेग जोराने चालतो आहे. म्हणून तिकडून दर्शनास कोणी यावे अशी इच्छा नाही. कळावे. नारायण.

---

।। श्री दत्त ।। **पत्र क्रमांक १२१**

## पौर्णिमेस उत्तरेकडे जाणार

पवनी भाद्रपद शु. ११-१८३१
२५ सप्टेंबर १९०९

दत्तभक्तिरत कुप्पुस्वामी तंजावर यांस नारायण. पत्र पावले. सर्व मजकूर कळला. इकडे दर्शनाकरिता बोलाविणेचे पण इकडे हवा बिघडल्यामुळे बोलाविणे केले नाही. पौर्णिमेस येथोन उत्तरेकडेस जाणार. तिकडेस पत्रद्वाराच दर्शन समजावे. निरंतर श्रीदत्तगुरूंचे चिंतन ठेविल्यास सर्व संकटे दूर होऊन जातील. कळावे. नारायण.

---

।। श्री दत्त ।। **पत्र क्रमांक १२२**

## कंठ हा यजुर्वेद आहे

पवनी भा. व. १-१८३१
३० सप्टेंबर १९०९

श्री प. नृसिंहसरस्वती स्वामी यांस नारायण. **कंठ हा यजुर्वेद आहे.** ह र ष स ही अक्षरे पुढे आली असतां अनुस्वार आलेस ँ उच्चारावे. उदा. 'इमँ परम गुह्यँ, प्राशुँ. शतयो इत्यादि. स्वतः का होईना श्रीगुरूंचे स्मरण करून विचार करीत असावा. नारायण.

---

।। श्री दत्त ।। **पत्र क्रमांक १२३**

## अप्रार्थित दुःख तसे सुखही येते

पवनी भा. शु. ९-१८३१
२४ सप्टेंबर १९०९

वे. रा. रामचंद्र प्रकाशकर बडोदा यांस नारायण. कार्डातील मजकूर समजला. **अवश्य भावी घडते त्याचा खेद करू नये. अप्रार्थित दुःख जसे येते तसे सुखहि येते.** आबा यांस नारायण प्रविष्ट करावा. नारायण.

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक १२४

## निष्ठेने ईश्वरभजन करावे

कुरुमगड्डा श्रावण शु. ५-१८३३
२६-७-१९११

श्री. धोंडो कृष्ण कोपकर, बडोदा यांसी नारायण. पत्र पावले. निष्ठा राखून ईश्वरी भजन करावे. कळावे. नारायण.

---

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक १२५

## स्वानुसंधान सदोदित असावे

कुरुगड्डी श्रावण व. २-१८३३
ऑगस्ट १९११

श्री प. नृसिंह सरस्वती यांस नारायण. श्रीदत्त लहरी पावली. तेथील सर्व मंडळीस नारायण. इकडे मंडळी बहुत जमल्यामुळे फारच अडचण झाली आहे. तेव्हा तिकडून काही मुले व अण्णांचे येथून येणाऱ्या मंडळीस येऊ नये असे कळवावे. स्वानुसंधान सदोदित असावे. नारायण.

---

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक १२६

## साक्षीपणाचे अनुसंधान ठेवावे

कुरुगड्डी भाद्रपद कृ. ३-१८३३
११ सप्टेंबर १९११

श्री. प. नृसिंह सरस्वती स्वामी यांस नारायण. पत्र पावले चुकून प्रारब्धवशांत घडले, हा काही अपराध नव्हे. तथापि चित्ताला समाधान वाटत नसेल तर श्रीगुरुचरित्राची एक आवृत्ति करावी. सर्वदा आपलें साक्षीपणांचे अनुसंधान ठेवावे. नारायण.

---

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक १२७

## उगीच धाक धरिला तो सोडावा

गौंड चैत्र. कृ. १०-१८३४
१२ एप्रिल १९१२

श्री प. श्रीनृसिंह सरस्वती यांस नारायण. पत्र पावले. **अपराध काही घडला नसोन उगीच मनात धाक धरिला तो सोडावा.**

**एक प्रणवानुसंधान चालविले म्हणजे सर्व संध्यावंदनादि झालेच.** श्रीगुरूंची सेवा करून झालेल्या वेदांताचा विचार ठेवावा.



॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक १२८

## प्रणवोपासना चालवावी

श्री प. नृसिंह सरस्वती यांस नारायण. यात्रा निवृत्यर्थ पूजा करण्याचा काळ राहिला नाही. लोपाबद्दल प्रणवजप करावा. पुढे **वेळच्यावेळी क्षौर करावे. आपण सांगितल्याप्रमाणे प्रणवोपासना चालवावी.** तीच तारील. कळावे. नारायण.

---

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक १२९

## उत्तरी हाल कळवावा

वे. शा. नारायण दीक्षित यांस नारायण. हल्ली, आपलेकडील पत्र न आले व वाडीवरील हाल न कळला. तरी उत्तरी कळवावा. श्रीदेवाकडून विशेषकम सूचना झाली. नारायण.

---

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक १३०

## सत्कालक्षेप करावा

नरसोबाची वाडी वैशाख शु. १८१२
२७-४-११८९०

वे. रा. रा. शंकरभट सप्रे - सावंतवाडी यांस विज्ञापना पाठविलेली पंचांगे पोचली. प्रकृतिमान उत्तम आहे. तूर्त येण्याचे लक्षण नाही. कळावे. विशेष सूचना अशी की सदैव सत्कालक्षेप करावा. वे. श. दादा अळवणी रा. आपा आठलेकर यांस नमस्कार. बहुत काय लिहिणे. नमस्कार. वासुदेव

---

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक १३१

## हरे राम हरे कृष्ण ... औपनिषद मंत्र

जालवण मा. शु. १३-१८२७
७-२-११९०६

**वे. शा. शंकर गुळवणी यांस नारायण.** आज पत्र पावले. (**हरे राम हरे राम, राम राम हरे हरे। हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे।) ह्या मंत्राचा घडेल तितुका जप करावा. हा स्त्री शूद्रांनी जपणे योग्य नव्हे. कारण की औपनिषद मंत्र हा आहे.** हे पत्र पावता तूर्त प्लेगाचा उपद्रव कसा आहे. कळवावा. तुमच्या सर्व मंडळीस नारायण.

## बेदरचा संतप्रवृत्ती राजा

पवनी श्रावण शु. १८३१

२५-७-१९०९

**वे. शा. शंकर गुळवणी यांस नारायण.** पत्र पावले. ज्या रजकाला वर दिला तो वैडूर्यनगरी म्हणजे बेदर येथे म्लेंछ राजा झाला. तो धार्मिक होता हे ५० अध्यायावरून कळते व वेद आपुले पुढे म्हणवीत असे. तो संत होता ते विदुरानगर कोणते ते यथार्थ ज्ञान नाही. पण अन्यच आहे. कार्य करिता भगवद्भजन करावे. सर्व मंडळीस नारायण.

---

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक १३३

## अनन्य शरणाला परमेश्वर जवळ

नरसोबाची वाडी अ. भाद्रपद कृ. १४

१३ सप्टेंबर १८९०

वे. रा. शंकरभट सप्रे सावंतवाडी यांस. **अनन्य शरणाला परमेश्वर जवळच आहे. त्याची तो उपेक्षा कधीहि करीत नाही.** ग्रहणाविषयी मागाहून कळेल. हे विज्ञापना.

---

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक १३४

## विजयवाड्याकडे प्रयाण

राजमहेंद्रीनजीक माघ व. ८-१८३०

१३-२-१९०८

रा. रा. कुप्पुस्वामी तंजावर यांस. राजमहेंद्री बिजवाड्याचे रस्त्याने निघणे केले. कालच सर्व मंडळी जाण्यास गेली. त्यासोबत ब्रह्मानंद स्वामी निघाले. रामेश्वरास शिवरात्रीकरिता जाणार. द्वादशी दिवशी तंजावरास येणार. कदाचित् तुमचे घरी न आले तर फिरून येतेवेळी भेटतील. कुप्पुस्वामी आदिकरून सर्वांस नारायण.

---

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक १३५

## कृष्णातटाने निघणे

राजमहेंद्रीनजीक माघ व. ८-१८३०

१३-२-१९०८

रा. रा. कुप्पुस्वामी तंजावर यांस नारायण. आज येथोन निघणेचे; पण आता येथे बेळगावहून आपुली मंडळी घेऊन कालकुंद्रीकर सावकार आले व सिद्धपुरातून कृष्णातटाने मी निघालो अशी तार दिली. तरी आज उद्या येथें राहून नंतर जावू. कळावे. नारायण.

---

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक १३६

## पुढील समाचार पंधरा दिवसांनी

निडदबोल माघ व. २-२८३०

७-२-१९०९

रा. रा. अवधूतराव नागराजपंत तंजावर यांस नारायण. काल गोदावरी सोडून राजमहेंद्रीकडून दक्षिणेकडील मार्ग धरला. अजून वाडीची मंडळी तीर्थविधीकरिता राहिली आहे. दोन दिवसांनी जाईल. ब्रह्मानंद स्वामींनी राजमहेंद्री येथे श्रीगुरुदत्तात्रेय मूर्ति व पादुका प्रतिष्ठा केली. पुढे कुठे जाणे होईल ते १५ दिवसांनी कळवू सर्वांस नारायण.

---

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक १३७

## अंगारा व शिंग-भस्म घ्यावे

पालर त्रिपल्लूरनजीक पौष शु. ११-१८२९

१४-१-१९०८

रा. रा. कुप्पुस्वामी तंजावर यांस नारायण. त्रिपल्लूरास पत्र आले. त्यात तुमचे सौभाग्यवतीची प्रकृति बिघडलेली पण किंचित क्रमास लागते असे लिहिले. त्यानंतर पुढे वकीलाला पत्र पाठवावे असे लिहून कळविले पण पूर्वी अरुणाचलाकडून कांचीस जाणेचा विचार होता. पण पालरच्या मंडळींनी मधून रस्ता दाखविला. तेव्हा तिकडेच्या पत्त्यावर पत्रे गेली तर ती न मिळता परत जातील. आता जेथे चार दिवस राहण्याचा विचार असेल तेथून पत्र पाठवू. त्या पत्त्यावर पत्र आले म्हणजे पोचेल. मागच्या पत्रात अंगारा पाठविलेला व रोज एक एक गुंज सांज-सकाळ शिंगाचे भस्म घेण्यास सांगितले त्या प्रमाणे करावे व पुढच्या पत्त्यावरून पत्र न आल्यास घरची सर्व हकीकत कळवावी.

---

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक १३८

## फळ आले नाही हे प्रारब्ध समजावे

कुरुगड्डी भाद्रपद व. ३-१८३३

११ सप्टेंबर ११९११

रा. रा. कुप्पुस्वामी तंजावर यांसी नारायण. पत्र आज पावले. येथे चहूकडून कृष्णा असल्यामुळे एक मोठी अडचण व दुसरी क्वारेंटेन १० दिवस. शिवाय येथे

ग्याची अडचण यामुळे बोलविणे केले नाही. आता पुढे अमुक ठिकाणी जाणे होते असा अजून निश्चय नाही. **जप करून तुम्हास फळ आले नाही तरी हे प्रारब्ध समजावे. येत्या ग्रहणापर्यंत जप करून पुरा करावा.** सर्व लहान थोर मंडळीस नारायण.

॥ श्री दत्त ॥ **पत्र क्रमांक १३९**

## काकनाडास जाऊन दर्शस्नान

पीठापुरम् पौष व. १४-१८३०

२०-१-१९०९

रा. रा. अवधूतराव नागराजपंत तंजावर यांस नारायण. त्या दिवशी निघालो ते ढवळेश्वरी राहून पीठापुरांस येणे केले. आज येथोन निघोन काकनाडास जाऊन उद्या दर्शस्नान करून मागे फिरणार. वाडीहून गं. दुर्गाबाई व पुजारी वगैरे वाडीची मंडळी बरीच आली आहे. तीन दिवसांनी त्यांना परत रवाना करून देवू. कळावे. सर्वांस नारायण.

॥ श्री दत्त ॥ **पत्र क्रमांक १४०**

## आलेल्या मंडळींनी गावभोजन केले

ताडवापी मुक्त्याला नजीक भाद्रपद व. १०-१८३०

२० सफ्टेंबर १९०८

रा. रा. भगवद्‌भजनरत कुप्पुस्वामी तंजावर यांस नारायण. तिकडून आलेल्या मंडळीने शुक्रवारी गावभोजन केले. शनिवारी त्यांना निरोप दिला आणि पुढे रस्ता धरून आज ताडवापी गावात आलो. उद्या पुढे जाऊ. तुम्हाला पूर्वीच पत्र पाठविणेचे परंतु येथे आसमांत बेमारी होती म्हणोन पाठविले नाही. प्रतिपदेच्या दिवशी निघणेचा निश्चय होता पण अडथळे येत गेले. आता पुढे सोयीवार जागी गेल्यावर पत्र पाठवू. कळावे. नारायण.

॥ श्री दत्त ॥ **पत्र क्रमांक १४१**

## नागपूरबाजूने जाणे केले

मंथनकाळेश्वरानजीक वै. शु. १०-१८३१

३०-४-१९०९

रा. रा. कुप्पुस्वामी यांस नारायण. आपणास बिजवाड्यापासून पत्र पाठविल्यानंतर पत्र पाठविण्याचा योग आला नाही. कारण मधी राहणे घडले नाही. गोदावरीच्या तीरातीरानेच काळेश्वर मंथनापर्यंत येणे झाले. नंतर उत्तर खंडात जाणेची आज्ञा पूर्वीप्रमाणेच झाल्यामुळे गोदावरी सोडून नागपुराकडची बाजू धरून जाणे केले आहे.



आता ह्या वर्षात चातुर्मास्य कोठे होणेचे त्याचा निश्चय अजून करता येत नाही. पुढे कळवू. अवधूतराव वगैरे सर्व लहान थोर मंडळीस नारायण प्रविष्ट व्हावा. भगवद्‌भजनी सादर असावे. तोच सर्व संकटे निवारणार आहे. कळावे. श्रीगुरुदेवदत्त

॥ श्री दत्त ॥ **पत्र क्रमांक १४२**

## कृष्णातीराहून बिजवाड्याकडे प्रयाण

चोराडा (बेझवाड्यानजीक) फा. शु. १५-१८३०

७-३-१९०९

रा. रा. कुप्पुस्वामी तंजावर यांस नारायण. आज कृष्णातीरी चोराडा येथे क्षौर करून निघालो. दोन दिवसांनी बिजवाडा येथे जाऊन पुढे १-२ दिवसांत निघू. बिजवाड्यास उत्तर पत्र आले तर पोस्टमास्तरांना नाव ठाऊक आहे. तो असलेल्या ठिकाणी पत्र पोचवतील. अवधूतराव वगैरे तुमची लहान थोर मंडळी व वेंकास्वामी व तेथले सर्व मंडळी नारायण.

वऱ्हाड प्रांताची जयंतराव वगैरे मंडळी बिजवाड्यास आल्याचे ऐकतो. तरी तेथे एक दोन दिवस राहणे घडेल वाटते. कळावे. नारायण.

॥ श्री दत्त ॥ **पत्र क्रमांक १४३**

## खुशालीचे पत्र पाठवावे

पीठापुर पौष व. १४-१८३०

२०-१-१९०९

रा. रा. दत्तभक्तिरत कुप्पुस्वामी यांस नारायण. आज काकीनाडा येथे जाण्यास निघालो. लोकांचे गर्दीमुळे पत्र लिहिणेस सवड मिळाली नव्हती. म्हणून उत्तरास वेळ लागला. सौ. मीनाक्षीबाई करिता अवधूतरावांपाशी सांगितलेला तो प्रकार करावा. आता मुले माणसे सर्व खुशाल असल्याचे पत्र पाठवावे. वाड्यांचा धंदा तूर्त सोडू नये. चालवावा. कळावे. नारायण.

॥ श्री दत्त ॥ **पत्र क्रमांक १४४**

## सुषुप्ति लक्षण

गरुडेश्वर पौष शु. ९-१८३५

५ जानेवारी १९१४

श्रीमत्परमहंस नृसिंह सरस्वती यांस नारायण. **"सर्व प्रकारक ज्ञानोपसंहारः बुद्धेः कारणात्मनावस्थानं" हे आचार्यांनी सुषुप्ति लक्षण सांगितले व "ज्ञानानामुपसंहारो बुद्धेः**

**कारणतास्थितिः वटबीजे वटस्येव सुषुप्तिरभिधीयते ॥१॥ असे वार्तिककारांनीहि सांगितले. तेव्हा सर्व प्रकारक ज्ञानोपसंहार ह्यांच अविद्यावृत्ति वटबीजात वटशक्तीप्रमाणे आहेत. ह्याच पुढे टवटवतात असा अभिप्राय आहे. समाधीमध्ये ही ( वृत्तीना मनुः ) इत्यादि पंचदशीमध्येहि सांगितले.** कळावे. नारायण.

श्रीपाद हळवे यांस सांगावे, की ती रक्कम चालू अनुष्ठान समाप्तीकडे योजावी.

---

॥ श्री दत्त ॥ **पत्र क्रमांक १४५**

## वाडीवर आल्यास त्रिवेणी स्नान घडेल

वेदवाड पल्ली ( राजमहेंद्री जवळ ) मार्गशीर्ष व. ४-१८३०

११-१२-१९०८

**श्रीमद्दत्तात्रेय चरणलीन भक्तिपर कुप्पुस्वामी व अवधूतराव यांस नारायण.** कृष्णातीरावरून पत्र पाठविले. पुढे २-३ दिवसांपेक्षा पुढे अधिक राहणे झाले नाही. बेदवाडपल्ली येथे मार्गशीर्ष शु. १४ सायंकाळी येणे झाले. येथेच जयंति झाली. आज सायंकाळी येथोन पुढे जावू. गतवर्षी तंजावर येथे उत्सवाचा योग आलेला. त्यावेळी सर्वांस दर्शन तेथे घडले. आता पुढे मार्गास थोडे दिवस राहत जाणे असल्यामुळे भेटीला बोलाविता येत नाही. दैवयोगाने वाडीवर जाणे झाल्यास तेथे दर्शनास बोलाविल्यावर सहज त्रिवेणीस्नान होईल. तुमची घरगुती व्यवस्था कशी झाली व ह्यावर्षीचा उत्सव कसा झाला ह्यावद्दल व सर्व मंडळीचे हाल कळण्याकरिता उत्तर मागे सारखे. काही दिवस कुठेहि राहण्याचा योग आल्यास पत्र पाठवू. सविस्तर उत्तर जरुर यावे. लहान थोर मंडळीस नारायण.

---

॥ श्री दत्त ॥ **पत्र क्रमांक १४६**

## सत्पुरुष सान्निध्य तारक

नरसोबाची वाडी ज्येष्ठ व. २-१८१२

५ जून १८९०

वे. रा. शंकरभट सप्रे सावंतवाडी यांस विशेष. पत्र लिहिण्यास कारण स्मर्तव्य **श्रोतव्य जाप्य भजनीय या युगी श्रीहरीच होय. असे श्रुतिस्मृति पुराणे व सज्जनवाक्ये गर्जतात. मग इतर शंका करणेची काय गरज.**

**सत्पुरुषसान्निध्यच तारक होय.** मग त्यांनी उपदेश निराळा काय करावयाचा ? विशेष काय लिहिणे. **श्रीहरी इच्छेने ज्या ज्या वेळी जे जे होणेचे ते त्या त्या वेळी तसे होईल. ( उदर्कः कालो बलीयान )** श्रीगुरुदेवदत्त.





## तूर्त सत्संगति वेदांत शास्त्रच मानावे

नरसोबाची वाडी अ. भाद्रपद शु. १-१८१२

१६ ऑगस्ट १८९०

वे. रा. शंकरभट सप्रे यांस विज्ञापना. पत्राचा विचार मागाहून कळेल. येथे ज्योतिषांनी आदेश्य ठरविल्यावर कळविता येईल. **तूर्त सत्संगति वेदांत शास्त्रच मानावे. तसे न मानून कल्पित सत्पुरुषाची सेवा करु लागल्यास दोष दर्शनादिकाने श्रद्धा उडते. तेव्हा शास्त्रीय सदसद् विचार करीत असावा. परंतु ( अज्ञश्चाश्रद्धधानश्च ) या गीताश्लोकायीला स्मरावे.** पूर्वी पत्रांत लिहिलेला नमस्कारादि प्रकार अन्वय व्यक्तिरेकाने योग्य वाटतो. कळावे. श्रीदत्त.

---

॥ श्री दत्त ॥ **पत्र क्रमांक १४८**

# २ – दत्तसंप्रदाय व्यापक

## श्रीदत्तसंप्रदाय हा भागवत संप्रदाय आहे

पौषे वद्य ५

१३ जाने ९

श्रीयुक्त दामोदर पाठक यास नारायण.

पुढचे वर्षफल करून पाठवावे. फळ विचार कळेल. **श्रीदत्तात्रेयोपासना हा भागवत सांप्रदाय आहे. हा अवतार विष्णूचे २४ अवतारापैकी सहावा आहे. हे भागवत १ व २ स्कंधा ( त ) असून ४ स्कंधारंभी जन्म आहे ही दीक्षा त्रिगुणात्मक असल्याने कोणाशी विरोध नाही. तिलकांतमुद्रतसी लावण्यास दोष नाही.** स्तोत्राचे श्लोक शुद्ध तरी खाली लिहिलले पाहावे. कळावे. सर्वांस नारायण. (अक्षर दुसऱ्याचे)

(या खाली 'श्रीपाद श्रीवल्लभ त्वं सदैव' हे स्तोत्र दिलेले आहे.)

**साकारता तारका सा। कापि साररसापिका।**
**रसाय मे मेय सार । तारमेय यमेरता।**

**या नंतर महाराजांचे हस्ताक्षरातील पुढील श्लोक**

**तदजरामरकोशविलक्षणं। सदजधीगुणवेत्तृकलक्षणं।**
**भुवनहेत्वघहृत्चिपुराधिकं। विविधभेदपरं सम दृश्यते।**
**त्रिविधभेदपरं कमदृश्य ते । पदमिदं सदु चिद्धनमुद्धियाऽ।**
**सदनिदं प्रजहात्यधनुद्धि या।**

माध्वादिसांप्रदाय पंचत्रागम तंत्रादिक आहेत. श्री **दत्तात्रेयावधूत भागवत सांप्रदाय तर वेदोक्त आहे. पाहिजे तर याचे उपनिषद मिळेल.**

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक १४९

## ३ – व्यवहार दक्षता

### लुच्चेगिरीला क्षमा नाही

कुरुगड्डी — आश्विन व. ७–१८३३

समस्त पुजारी (नृसिंहवाडी) यांस नारायण. गुरुद्वादशी होताच येथोन निघून जाणार. हळवे याने न विचारता दत्तमाहात्म्य छापले. अशी लुच्चेगिरीने केवळ लिहिले व ते पुस्तक येथे एक मिळाले. ते पुराव्याकरिता ठेवून त्याला नोटिस दिली. त्यांचे उत्तर तेणे दिले. ते फाळके यांजकडेस आहे. त्यांना हळवे यांवर फौजदारी खटला घाला असे सांगितले. परंतु ते करतील असे वाटत नाही. तरी तुम्ही सरकारमार्फत सर्व पुस्तके जप्तीत ठेवावीत. १००० प्रती काढल्या. त्यांपैकी जितक्या विकल्या तितका सर्व पैसा जमा करून बाकी राहिलेल्या प्रती जर सर्व देईल तर सर्व प्रती श्रीपादुकांशी अर्पण करून तुम्ही त्याची व्यवस्था करावी. असे जर तो न पत्करील तर त्याजवर खटला घालावा. असल्या लुच्च्याला क्षमा कधीहि मिळणे बरोबर नाही. कळावे. लहान थोर सर्व मंडळीस नारायण.

---

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक १५०

## ४ – ग्रंथरचना – तत्संबंधी सूचना

### "दत्तलीलामृतसिंधु" – ग्रंथ भगवद् इच्छेने झाला

पेटलाद — श्रावण १८१९
ऑगस्ट १८९७

नारायण– हल्ली चातुर्मास पेटलाद, प्रांत माळवा होळकरशाही येथे आहे, येथे १ महिना (आणखी) राहणे होईल. या ठिकाणी दत्तलीलामृतसिंधु नावाचा ओवीबद्ध प्राकृत ग्रंथ भगवद् इच्छेने घडलेला नरसोबाचे वाडीस पाठविणेचा असता सारंगपूरच्या मंडळीने पाहण्यासाठी मागितल्यावरून आजच तिकडे रवाना केला आहे. आपल्याला इच्छा असेल तर कळवावे म्हणजे तिकडूनच नरसोबाचे वाडीस रवाना केला जाईल. कळावे. (दुसऱ्याचे हस्ताक्षर)

---

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक १५१

### गुरुचरित्र छपाईला नकार हा ईशेच्छेने उद्गार

तिलकवाडा — कार्तिक शु. ८ शके. १८२०
२१–११–१८९८

नारायण– पाठविले पत्र पोहोचले. या प्रदेशी शेकडो लोकांनी गुरुचरित्र छापण्याची परवानगी मागितली. पण एक दोन कारणांमुळे न दिल्ही. अस्तु. हा ईश इच्छेने उद्गार आला. तरी याचा कोणाकडे बोल नाही. दरसाल एक दोन प्रती लिहून देण्याचे अवश्य घडत होते. आता हे सहज होते तर काही प्रतिबंध नाही. आपण तपासून घ्यावे. यावर अवघड जागी टीप देण्याचा विचार होता. त्याबद्दल चिखलदे मुक्कामी तशी प्रत लिहवविली पण तडीस गेली नाही. जर काही समास राहून छापले जाईल जर एका प्रतीवर अवघड जागी टीप देता येईल. कळावे. बाकी मजकुराचे पत्र चार रोजांत येईल. येथोन दहा दिवसांनी जाण्याचा विचार आहे. कळावे. नारायण.

---

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक १५२

### टीका व टीपांसाठी गुरुचरित्र पाठवावे

सिनोर (गुजरात) — मार्ग. शु. १-१८२०
१४ डिसेंबर १८९८

ना. उकीडवे सावंतवाडी यांस नारायण. तूर्त तिलकवाडा सोडून गुजरात प्रांत गायकवाड राजधानीपैकी सिनोर नर्मदातीरी मार्कंडेश्वराचे मंदिरात राहणे केले आहे. येथे महिना दीड महिना राहून पुढे जाण्याचा विचार आहे. टीका व टीप देण्याकरिता गुरुचरित्र पाठविणार तर या मुक्कामी पाठवावे. आल्यापासून ८ दिवसांत टीप देऊन पाठविले जाईल. तिलकवाड्यांतून पत्र व बुकपोस्ट पाठविले ते पोहचल्याचे उत्तर पाठवावे.

पत्ता : इलाखा गायकवाड, प्रांत बडोदे महाल, सिनोर, रेवातीर येथे श्रीमार्कंडेश्वर मंदिरात. कळावे.

---

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक १५३

### पंचीकरण भाष्य पाठवावे

प्रभासपट्टण — फा. शु. २-१८२०
१३ मार्च १८९९

वे. शा. सं. नारायण दीक्षित, नरसोबावाडी यांसी नारायण. तूर्त प्रभासक्षेत्री राहणे आहे. येथे दोन मास राहून द्वारकेस चातुर्मास्य करण्याचा विचार आहे. श्रीमत् स्वामींच्या पुस्तकांपैकी 'पंचीकरण भाष्य' मिळेल तर बुकपोस्ट पाठवावे.

पत्ता. प्रांत काठियावाड, प्रभासपट्टण येथे सोमनाथाच्या मंदिरात.

---

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक १५४

### स्मरणाने टीका लिहली

द्वारका — श्रावण ४ शके १८२१

१० ऑगस्ट १८९९

ना. उकीडवे सावंतवाडी यांस नारायण. पाडगावकरांचे पत्र पाठवून बरेच दिवस झाले. टीका संपूर्ण होऊन बरेच दिवस झाले. येथे तिघांनी प्रति काढण्यास आरंभ केला. त्यांचे लिहून झाल्यावर पाठविता येईल. जर पुस्तक छापले नसेल आणि अनुकूल असून छापण्याचे असेल तर सटीकच छापावे. टीका चार हजार, मुळासुद्धा सहा हजार होईल. इच्छा असेल तर छापावे. नसेल तर इथून पाठवून देण्यात येईल. तें पुस्तक नरसोबाचे वाडीवर पाठवून द्यावे.

येथे गेल्या वर्षी दहा इंच पाऊस पडला. यंदा अजून मुळीच नाही. बराच अनर्थ आहे. येणाऱ्या सप्तग्रह योगाचे फळ आज तीन वर्षे चालू आहे. ह्या प्रसंगी ईश्वरालाच शरण जावे. उपास्य देवतेचा मंत्र होईल तितुका जपावा. अवकाश न मिळेल तर रात्री जपावा. ह्याहून आणखी सांगावेसे वाटत नाही. ही टीका करतेवेळी प्रत नव्हती. केवळ स्मरणानेच घडले. तेव्हा फेरफार होईल तरी आपल्याकडे असलेली प्रत मिळाली तर ही शुद्ध करून दोन्ही पाठविता येईल तसे करावे. नारायण.

---

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक १५५

## सटीक पांचपाक्षिक

ना. उकीडवे सावंतवाडी यांस नारायण. धूम्रप्रवेश योगछिद्रामध्ये स्तंभ जात नाही. म्हणजे ज्या छिद्रातून धुकट जात नाही त्या छिद्रातून खांब जात नाही. चंचल दिव्याकडे सूक्ष्म लिपी वाचली जात नाही. कारण तमोगुण स्थूल चंचल जाणावा.

संन्यास घेऊन जन्मभू पाहणे व जन्मभूमीवर मरणे इत्यादिकांचे तत्त्व मूळ प्रपंचाधिष्ठान पाहणे व त्या ठायीं लीन होणे हा मुख्य अर्थ होय. दुसरे कुठेहि यथेच्छ संचार करणे हा परिव्राज्य धर्म. तत्रापि अद्यापि सेव्यसेवक भाव आहे. तदनुरोध जिकडे संचार होणार तिकडे यथेच्छ होवो.

स्वप्नाचा अभिप्राय, देववत् पूज्य (पिता) पाषाण मूर्तिवत् (जडीभूत पिशाच्च दशामान) स्वकर्मानें झाला त्याची ही सूचना. एक दोन पत्रे नरसोबाचे वाडीची झाली. नवीन कविता पाठवाव्या. प्रायः जागोजाग झालेली कविता तेथे राहिली. येथे तूर्त असलेली पाठविलेली आहे. वाचून ही कविता नरसोबाचे वाडीला नारायण लक्ष्मण दीक्षित यांचे नावे पाठवावे. दोन दिवसांनी येथून जाणार. टीका पुस्तक काही दिवस कायम राहणे होईल तेव्हा पत्र पाठविता येईल. एका हरिदासाने व येथे नित्य भजन करणाऱ्या मंडळीने अति विनयपूर्वक प्रार्थना केल्यावरून ही कविता घडली व एक पांचपाक्षिक शास्त्र पढत होता त्याच्या शास्त्रामध्ये प्रथम प्रवेश होण्याकरिता हे लहान पुस्तक सटीक घडले. हे सवडीने वाडीवर पोहोचते करावे. कळावे. नारायण.





## ईश्वर इच्छेने झालेली टीका बरोबर आहे.

सिद्धपूर का. व. २-१८२१

१९ नोव्हेंबर १८९९

रा. रा. नारायण उकीडवे सावंतवाडी यांस नारायण. पाठविलेले पुस्तक काल येथे मिळाले. द्वारकेतून येऊन चार रोज झाले. जर पूर्वी मिळते तर त्याप्रमाणेच टीका होती. पुस्तक नसून केवळ मुखाने जसे आठवले तशी झाली. या प्रदेशी टीकेच्या प्रती सहा झाल्या. जर छापण्यास न दिली असेल आणि समप्रत करणे अशी इच्छा असेल तर टीका पाठविल्यास समप्रत करून दोनहि प्रती पाठविण्यात येतील. नाहीतर ही प्रत परत केली जाईल. इकडे बहू दुर्भिक्ष्य असून पाणी नाही. गुरे बहुतेक मेली. मनुष्यांचा बचाव कठीण आहे. तूर्त सरस्वतीस थोडे पाणी आहे. म्हणून येथे वास घडला. पुढे नर्मदातीरी कविता संग्रह लावून देण्यासाठी तरी तिलकवाड्यातून व मडीहून पाठविलेल्या कविता त्याकडे पाठवाव्या. प्रत करून परत येईल. कळावे. जर टीकेचे पुस्तक पाठविण्याची इच्छा असेल तर पाठवावे. **नाहीतर जी टीका ईश्वरइच्छेने झाली ती बरोबर आहे.** वागळे याने वाडीकडील वर्तमान सांगितले. हल्ली कसे आहे कळवावे.

पत्ता : गुजरात कडीप्रांत सिद्धपूर येथे हाटकेश्वराचे मंदिरात. कळावे. नारायण.

---

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक १५७

## ग्रंथछपाई सुरू झाली काय ?

सिद्धपूर पौ. शु. १५-१८२१

२ जानेवारी १९००

रा. रा. नारायण उकीडवे यांस नारायण. आपणाकडून बहुत दिवस पत्र आले नाही. पुस्तक छापण्याचा उद्योग सुरू झाला की काय ? येथे कित्येकांची इच्छा आहे. त्यांना आपले नावे पत्र पाठविण्यास सांगितले आहे. येथोन ५-६ दिवसात पुढे जाणार. हे पत्र पोहोचताच उत्तर यावे. नारायण.

---

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक १५८

## लोकांना उपयोग होतो – तर बरेच आहे

चिखलदरा ज्ये. व. ६-१८२२

१८ जून १९००

रा. रा. नारायण उकीडवे सावंतवाडी यांस नारायण. पत्र पोहोचले. पूर्वी एकदा गायकवाडीतील वरिष्ठ नोकर व मंडळी भेटीला आले. त्यावेळी आपण पाठविलेले पत्र

मिळाले. त्यात शारदा क्रीडणात गुरुचरित्र छापण्याची जाहिरात होती. त्यावेळी आपण असे म्हटले की, ह्या मनुष्याची ओळख देखसुद्धा नसोन व याणे न विचारता एकदम छापण्याचा उद्योग केला. तर ह्यावर खटला घातला तर ह्याचा परिणाम कसा होईल. तेव्हा ते गृहस्थ बोलले. तुम्ही असे कधीही करणार नाही. ही त्याची पक्की खात्री असल्यामुळेच हा उद्योग केला व परभारे असे झाले म्हणून तुमचे तरी काय जाईल? ज्यापेक्षी लोकैषणा, वित्तेषणा सुटल्या त्यापेक्षी कोणी ग्रंथाला नाव ठेविले व लाभ झाला या दोहोंचा हर्षामर्ष नाही व लोकांना उपयोग होतो तर बरेच आहे. इत्यादि त्याच्याशी भाषण झालेले होते. तोच गृहस्थ असावा, पूर्वी ५-१० लोकांचा अत्याग्रह छापण्याची परवानगी मिळविण्याविषयी होता व एक स्वामी ब्रह्मावर्ती हे पुस्तक मी छापून भाविक लोकांना मुफत पुस्तक देईन असे सांगत होते. त्यांना नाही म्हटलेले; ते स्वामीच त्यावेळी भेटीसाठी येऊन पोहोचले. त्यांना जाहिरात दाखविली. तेही बोलले की देवाची इच्छा अशीच आहे की हे पुस्तक प्रसिद्धीला यावे. तुम्ही कसा प्रतिबंध कराल? ती गोष्ट सोडा. असे त्यावेळी मात्र सहज बोलणे झाले. त्यामुळे कोणी लिहिले असावे. येथे पाऊस नाही. ५ शेर गहू झाले. लोक व गुरे बरीच मेली. ईश्वरी इच्छा.

श्रीगुरुचरित्राच्या ३ ऱ्या अध्यायाच्या ६ व्या श्लोकाची टीका आचार्यांचे प्रमाण देऊन पूर्ण करण्याची राहिली, जर छापली नसेल तर खाली लिहिल्यांप्रमाणे भरती करावी.

"महानविद्याकामकर्मप्रभवदुःखोदकः तीव्ररोगजरामृत्युमहाग्राहोऽ नादिरनंतोऽपारो निरालंबो. विषयेन्द्रियजनितसुखलवलक्षणविश्रामोपि पंचोद्रियार्थ-तृण मारुत्विक्षोभोत्थीतानर्थशतमहो महारौरवाद्यनेकनिरयगत हाहेत्यादि कूजिताक्रोशनोद्भूतमहारवेः सत्यार्जवदानदयाहिंसाशमदम धृत्याद्यात्मगुणपाथेयपूर्णज्ञानोडुपः सत्संगसर्वत्यागं मार्गः मोक्षतीरः ईदृशः भावाब्धिः" मला गावात असताना पाठविलेल्या पत्राचे उत्तर, तो देहाने पाहिजे तसा फिरतो. हा मनानेच (तो येथे शंका असा भास आणि हा येथे तुमचा भास) झाला कळावे. नारायण.

---

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक १५९

## कूर्मपुराण पाठवावे

चिखलदरा आषाढ व.९–१८२२

ता. २० जुलै १९००

वे. शा. नारायण दीक्षित नरसोबाची वाडी यांसी नारायण. आपुलेकडे दत्तलीलामृत पाठविला पोचला असेल. न पोचल्यास कळवावे. जे दत्तमाहात्म्य पाठविले ते आपण पाठविल्याचे सारांशभूत काही नवीन विषय जुळवून असे एक चमत्कारिक पाठविले ते त्या तेथील महात्म्यास मिळायाचे नाही. कथा भावार्थ मात्र मिळेल. व कुठे कुठे श्लोक मिळतील व नवीन विषयहि अधिक त्यांत आहे. कळावे. कूर्मपुराण इथे



पाठवून द्यावे. प्रकृति ठीक नसल्यामुळे येथे काही दिवस वास होईल. कळावे. नारायण.

पत्ता : जिल्हा नेमाड पोस्ट बडवानी नजीक चिखलदरा येथे मारुतीच्या मंदिरात देणे या पत्त्यावर पाठवावे.

---

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक १६०

## सवडीप्रमाणे आख्याने होतील

चिखलदरा भाद्रपद शु. ६–१८२२

३१ ऑगस्ट १९००

रा. रा. नारायण दीक्षित नरसोबाची वाडी यांस नारायण. पत्र पावले. अजून टीका एक अष्टक करणेची आहे. पुढे ती उतरून प्रत करून पाठविता येईल. येथे बरेच पाठ चालू असल्यामुळेच मुळीच अवकाश मिळत नाही सवडीप्रमाणे आख्याने करण्यात येतील. उत्तर मीमांसा भाष्य अध्याय मागे पाठविला. तो बुकपोस्ट करून पाठवून द्यावा. नारायण.

---

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक १६१

## माहात्म्याचे पुस्तक लिहून झाले

चिखलदरा भाद्रपद व. ९–१८२२

६ ऑक्टोबर १९००

रा. रा. नारायण दीक्षित नरसोबावाडी यांस नारायण. तूर्त येथून पुढे जाण्याचा हेतू नाही. **माहात्म्याचे पुस्तक लिहून झाले**. द्वारकेत प्रत उतरून घेण्याकरिता मागविले ते पाठविले आहे. तेथून येणाऱ्याबरोबर पाठविता येईल. नारायण.

---

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक १६२

## गुरुचरित्र चूर्णिका घडली

रा रा. नारायण उकीडवे सावंतवाडी यांस नारायण. चिखलदऱ्यास पाठविलेले अध्याय व वाडीहून पाठविलेले पत्र आज पोहोचले. अध्याय तपासले. कानामात्रा वगैरेंची गडबड बरीच आढळते. तथापि ही आवृत्ति अशी संपू द्या. ह्याच नमुन्याप्रमाणे सूचीपत्र दिले जाईल. तूर्त प्रकृति बेताबाताने ठेविली आहे. तूर्त ह्या प्रदेशांत ज्वराचा उपद्रव अतिशय आहे. मनुष्ये बरेच नष्ट होतात. तूर्त येथे पौषापर्यंत राहण्याचा विचार आहे. पुढे माळव्याकडे जाणे होईल. घडेल ते खरे. आपुल्या मातोश्रीचे हाल लिहिले तरी पूर्वकर्म त्यांनी भोगावयाचे. तुम्हाला पाहण्याचे जितुके आहे तितुके घडणार. सोई करून शक्तीप्रमाणे प्रायश्चित्त द्यावे. हल्ली मंडळीच्या आग्रहामुळे भागवताचे चूर्णिकप्रमाणे गुरुचरित्राची चूर्णिका एक घडली व दत्तपुराणाची टीकाही घडली. दोन प्रति झाल्यावर

एक द्वारकेचे मंडळीने मागितली. त्यांना १-२ दिवसांत पाठविण्याची व एक नरसोबाचे वाडीवर पाठविण्याची असा विचार आहे. सवड झाल्यास एक प्रत तिकडही पाठविण्याचा विचार पाहता येईल. येथे पीक सामान्य झाले असून थंडी नाही. रोग अनेक तऱ्हेचे आहेत. नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक १६३

## वे. सातवळेकरांसाठी दोन पदे

**पद. चाल** : शुक चंचूतुनि वृक्षाखाली. वे. गणेश सातवेळकर कोलगांव, सावंतवाडी (अंजनी गीत)

पद (१)

बाळा सांगू कहाणी तूंते। एक नपुंसक भूत होते।
तत्स्त्री वंध्या व्याली सुताते। संगहि जितें नच घडला ॥१॥
भार्या नसतां तिच्या सुता। त्रिगुणी सुत आला होता।
तया भार्याहि नसतां। सुत हो शून्याकार ॥२॥
शब्द करितो एकचि भारी। पुत्र झाला त्याचे उदरी।
चंचल चपळ स्पर्श करी। सर्वाला जो ॥३॥
त्याला रूपवंत पोर। झाले जाळगे जे दुर्धर।
सख्य ठेवी निरंतर। बापाशी जे ॥४॥
कन्या तया सरस जहाली। बापाशी जी वैरीण झाली।
एक कन्या तिला झाली। गंधवती ॥५॥
तिच्या पोर आजी रक्षी। पणजा तया सर्व भक्षी।
माता जरी हे निरीक्षि। लक्षी न घे ॥६॥
ह्या परिवारा घेऊनि पहिला। खेळे दाऊनि नाना लीला।
अंती खाऊनी सर्वाला। एकला नांदे ॥७॥
ऐसा त्यांचा खेळ अचाट। स्वयें वीतो खातो धीट।
हा विचार न करी नीट। तो खट फसे ॥८॥
खेळ मांडता की मोडतां। त्याच्या मनी न खिन्नता।
येते तेवी तूं वागतां। शांतता ये ॥९॥
कहाणी ही अशी बाळा। ऐकुनि दवडि दूरी काळा।
वासुदेव म्हणे हे वेळां। साधुनि तरी ॥१०॥

पद (२)

सत्य ज्ञान अनंत। तुज वदे वेदांत।
हे शोधितो होऊनि दांत। शांत समाहिता ॥१॥
माळा सर्प भ्रांत। ध्वांती दिपे शांत।
होय तेवी हा वेदांत। शमवी जीव भ्रांत ॥२॥
साप नोहे माळां। स्पष्ट दिसली डोळां।
घातली कंपे मिती गळा। न सुटे काही वेळा ॥३॥
आवरणाची भ्रांति। तत्त्वज्ञाने शांति।
विक्षेपाचे स्वरूप शांति। होई प्रारब्धांती ॥४॥
जीव त्वन्मय होता। आवरणाची न वार्ता।
साधिष्ठनी तत्त्वें मिळतां। विक्षेपांत दत्ता ॥५॥
ऐसा वेदातार्थ। जाणूनि शोधू स्वार्थ।
मग दत्ता भेटसी आम्हा। इतर श्रम हा व्यर्थ ॥६॥

॥ श्री दत्तार्पणमस्तु ॥

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक १६४

## सटीक दत्तमाहात्म्य पाठविले

मंडलेश्वर

चैत्र शु. २-१८२३
२२ मार्च १९०१

वे. शा. नारायण दीक्षित नरसोबावाडी यांसी नारायण. सटीक दत्तमाहात्म्याचे २४ अध्याय पाठविले. येथे एक लिहीत आहे. त्याची प्रत झाल्यावर बाकीचे पाठविता येतील. ती प्रत साधारण लेखाची आहे. आता एक सुज्ञाकडून स्वच्छ मोठ्या अक्षराची प्रत काढावी. येथून दोन दिवसांनी माळव्यात जाणार आहे. कळावे. सर्वांस नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक १६५

## क्षिप्रा काठी मुक्काम

महत्पूर

ज्येष्ठ्य शु. ११-१८२३
२९ मे १९०१

रा. रा. नारायण उकीडवे, सावंतवाडी यांस नारायण. हल्ली माळव्यापैकी महत्पूर येथे क्षिप्राकाठी राहणे आहे व चातुर्मास येथे व्हावे असा विचार आहे. तिकडून पत्र येऊन समाचार कळावा. इंदूर-उज्जैनी येथें अक्कलकोटाचे कित्येक भेटले. त्यांचे म्हणणे साल अखेरपर्यंत गुरुचरित्र तयार होऊन मिळेल. त्याला सहा महिने लोटले तरी अजून पैसा भरून आम्हाला पुस्तक मिळाले नाही. त्याला हा उद्योग सुरू असल्याविषयी तपासण्यास आलेले पुस्तक दाखविले. त्यांचे म्हणणे जरुर मिळावे. कळावे. नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक १६६

## सध्या पाठ चालू

महतपूर २४ जुलै १९०१

नारायण. येथे पाठ चालू तपासणी झाली नाही. सवडीप्रमाणे शुद्धिपत्र पाठविण्यात येईल. कळावे.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक १६७

## दत्तमाहात्म्य – साडे पाच हजार ओव्यांचा ग्रंथ

महतपूर श्रावण शु. ११-१८२३
२५ ऑगस्ट १९०१

रा. रा. नारायण उकीडवे सावंतवाडी यांस नारायण. इकडे पाऊस बराच आहे. पिके बरी आहेत. मात्र ज्वराची साथ अतिशय आहे. घर मोकळे नाही. एक-दोन दिवसात शुद्धिपत्र पाठविता येईल. काही लोकांचा आग्रह असा होता की सविस्तर दत्तमाहात्म्य असावे. त्यावरून ओवीबद्ध, तृतीयाष्टकापासून सहाव्या अष्टकापर्यंत आजपर्यंत ओव्या लिहिल्या. प्रायः प्रत्यही एकशे आठ होत गेल्या. तेवढ्यांचाच अध्याय ठेविला. उद्या पन्नास अध्याय पुरा होईल. सुमारे साडेपाच हजार ग्रंथ झाला. आता पुढे लिहिण्याची इच्छा नाही होत. बरोबर व्यंकटराव नावाचा इसम आहे. त्याने लिहिण्यास प्रारंभ केला. चौदा अध्याय लिहिले. इच्छा असेल तर झालेल्या अध्यायाची टिपणी पाठविता येईल. मात्र प्रथमचीच असल्यामुळे जपून लिहिली पाहिजे. प्राकृत असल्यामुळे तुम्हास कठीण जाणार नाही. इच्छा असल्यास लिहून काढू. ती प्रत इकडे पाठवून द्यावी. सवड मिळून आताचे पाहणे झाले .म्हणून टिपण पाठविले. आता लवकरच रवाना करण्याचा विचार घडावा. कळावे. नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक १६८

## गच्छतः स्खलनं क्वापि ...

महतपूर श्रावण व. ११–१८२३
८ सप्टेंबर १९०१

रा. रा. नारायण उकीडवे सावंतवाडी यांस, नारायण. गुरुचरित्र पावले व पत्र पाठविलें तेहि पोहोचले. शुद्धिपत्राबद्दल पत्र देणार तर आपल्याकडून हरकत नाही. छापलेल्या पुस्तकांत अशुद्धे राहिली आहेत ती राहोत. **'गच्छतः स्खलनं क्वापि'** या न्यायाने सर्व चालवावयाचे शुद्धिपत्र मात्र व्यवस्थित केले म्हणजे झाले. पूर्वी पाठविलेले पुस्तक दुरुस्त केलेले तिकडे पाठविले आहे. एक प्रत येथे ठेविली. कळावे. इकडे तूर्त पिके बरी आहेत पाऊस तूर्त नाही. बिमारी आता कमी आहे. कळावे. नारायण.



॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक १६९

## खर्चाच्या तारतम्याने मूल्य ठरावे...

महतपूर भा. व. १२-१८२३
९ ऑक्टोबर १९०१

रा. रा. उकीडवे सावंतवाडी यांस नारायण. पुस्तकाची किंमत जास्त उणी करण्याविषयीचे स्वतःचे काही म्हणणे नाही. तुमच्या खर्चाच्या तारतम्याने तुम्ही तो विचार ठेवा. कोणाला प्रत देण्याची इच्छा नाही. इकडे येण्याचे करू नये. प्लेग संबंधाने प्रतिबंधात राहावे लागले. काल द्वारकेहून पत्र आले. त्यात त्यांनी लिहिले तूर्त पावसाळ्यामुळे गुरुचरित्र पाठविता येत नाही. असे उत्तर सावंतवाडीहून आले. तरी तयार पुस्तके झाली. आता आगाऊ वर्गणी ज्यांनी दिली त्यांना पुस्तके पाठवून द्यावी. येथून ८-१५ दिवसांत पुढे जाणे होईल. द्वारकेस सटीक दत्तमाहात्म्याची प्रत दिली. त्यात कुठे कुठे श्लोक कमी पडले तरी ती प्रत इकडे पाठवून द्यावी. श्लोक लिहून घेऊन ती परत पाठविता येईल. कळावे. नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक १७०

## पुस्तक साक्षात दर्शन समजावे

महतपूर कार्तिक १८२३
नोव्हेंबर १९०१

रा. रा. नारायण उकीडवे सावंतवाडी यांस नारायण. पाठविले तेच पुस्तक पाहिजे होते. ते पोचले. प्लेगचे संबंधाने प्रतिबंध आहे म्हणून तूर्त इकडे न यावे. ४-८ दिवसांत येथोन निघणे होईल. पुढे पूर्वेकडे जाणे घडावे असे वाटते. प्राकृत पुस्तक श्रावणांतच पुरे झाले. येथे एक गृहस्थ लिहित आहेत. त्यांचे लिहिणे झाल्यावर तो आपल्याकडे पाठवील. पंचवीस अध्याय त्याने लिहिले. बाकी सव्वीस उरले. कळावे. नारायण.

**हे पाठविलेले पुस्तक साक्षात दर्शन समजावे** कारण तिकडून येण्याला बराच प्रतिबंध होईल. कळावे.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक १७१

## नश्वरदेहापेक्षा यशःकीर्ति कायम

सारंगपूर शके १८२३
८ फेब्रुवारी १९०२

रा.रा. नारायण उकीडवे सावंतवाडी यांस नारायण. पौष ३० पर्यंत क्षेम आनंद.

हा देह तिकडे येण्याचा इत्यादि इच्छा करण्याची गरज नाही. क्षणभंगुर नश्वर देहापेक्षा यशःकीर्ति कायम राहणार नाही ? **जयन्ति ते सुकृतिनो रससिद्धाः कवीश्वराः । नास्ति तेषां यशः काये जरामरणजं भयम् ॥**

जरी यशकायाने शंका समाधान भाषणादिक कसे घडेल ? म्हणणे तर **प्राकृत लोकांकरिता रसभरित दत्तमाहात्म्य प्रसिद्ध झाले. शिवाय संस्कृत–प्राकृत अनेक ग्रंथांची प्रसिद्धी झाली तेणे शंका समाधान होईल.** हे पत्र जाता सर्व सविस्तर उत्तर सत्वर यावे. कळावे. नारायण.

---

॥ श्री दत्त ॥ **पत्र क्रमांक १७२**

## कानडी कवितेचा अर्थ पाठवावा

ब्रह्मावर्त चैत्र १८२४

मे १९०२

वे. शा. नारायण दीक्षित नरसोबावाडी यांस नारायण. हल्ली बहुत दिवस पत्र आले नाही तरी सविस्तर उत्तर पाठवावे. येथे तूर्त शांती आहे. प्रकृतीचा प्रकारहि कळवावा. गुरुचरित्रातील कर्नाटकी कवितेचा महाराष्ट्रभाषेत अर्थ करून पाठवावा. कळावे. ही कर्नाटकी पदे ४२ व्या अध्यायांत आहेत. नारायण.

---

॥ श्री दत्त ॥ **पत्र क्रमांक १७३**

## १) कष्टोपशमनार्थ गुरुचरित्र
## २) समश्लोकी करण्याचे सांगणे झाले.

बिठूर चै. व. १३-१८२५

२९ एप्रिल १९०३

रा. रा. नारायण उकीडवे सावंतवाडी यांस नारायण. पाठविलेली पत्रे लिम्बेकरांचे नावे व शामरावचे नावे व शिवाय पाठविलेली पुस्तके पोचली व त्यांची व्यवस्था झाली. लिंगरस याला कष्टोपशमनार्थ यथाशक्ति गुरुचरित्र पठण करण्यास सांगावे.

ब्रह्मावर्तास असताना गावात असल्यामुळे सर्व लोक बाहेर गेले होते. काही वृद्ध राहिले होते. त्यावेळी तेथे समश्लोकी करण्याचे सांगणे झाले व तेथे एक लेखी जुने पुस्तक एक्कावन्न अध्यायाचे होते, त्यावरून करण्याचे सांगणे झाले. हे मोठे काम कधी कसे संपावे असे त्याचवेळी मनात येताच पुन्हा सांगणे झाले की तूर्त पाठ वगैरे नसल्यामुळे **रोज दोनशे-दोनशे पन्नास श्लोक होऊन महिना सव्वा महिन्यात संपेल. असे म्हणून सुमारे ६॥। हजार श्लोक संख्या दाखविली. नंतर त्या गुरुचरित्राची जास्त संख्या पाहून ६-२६-३६-३७-४१-४२ अध्यायांपैकी ओव्या काहीशा अर्थानुसंधानास अडचण न येणाऱ्या कमी करून समश्लोकी केल्यावर ही संख्या भरते तसे करावे काय ? अशी प्रार्थना केल्यावर तसेंच करण्याची आज्ञा झाली. तसा ग्रंथ झाला. आता कमीजास्त करता येत नाही** कळावे. नारायण.

---

॥ श्री दत्त ॥ **पत्र क्रमांक १७४**

## नोऽप्रभो असेच पाहिजे

बिठूर

रा. रा. नारायण उकीडवे सावंतवाडी यांस नारायण. पत्र पाठवले. येथे थोडासुद्धा वेळ मिळत नाही. जास्त शोधणे होत नाही. पत्र ठेवले आहे. कळावे. धोंडोपंत आदिकरून सर्वांस नारायण प. वझे यांनी जाहिरातींत लिहिलेल्या स्तोत्रांत **नः प्रभो ठेवले तर ( भोधिप ) येथें अधिप पद आहे. " प्रभुः परिवृढोऽधिपः " या कोशवचनाने अधिप शब्द पर्याय प्रभु आहे. तेव्हा एकदा होतें म्हणून नोऽप्रभो असेच आहे. याचा अर्थ न विद्यते प्रभुः यस्य सोऽप्रभुः तत्संबुद्धौ हे अप्रभो न चास्य कश्चिज्जनिता न चाधिपः इत्यादि श्रुतेः.** नारायण.

---

॥ श्री दत्त ॥ **पत्र क्रमांक १७५**

## अवकृपा नाही – गुरुचरित्र पाठवावे

बिठूर कार्तिक शु. १२-१८२५

२ नोव्हेंबर १९०३

रा. रा. नारायण उकीडवे, सावंतवाडी यांस नारायण. आपली पत्रे मिळाली नाहीत व इथूनहि पत्रें पाठविण्याची गळती पोस्टांत होत असावी असा अनुभव या पोस्टांत आहे. स्वांगत्वे करून सर्वत्र दृष्टि असता कोणी कोणावर अवकृपा केली असें कसे म्हणता येईल. ती शंका मुळीच न घ्यावी. असे घडणार नाही. शिवदत्ताचे पुस्तक लिहून झालें नाही. प्लेगामुळे त्याची दुर्दशा झाली होती. स्वतःबरोबर आपा होते. त्यांनी अष्टके लिहिली व स्वतः तीन लिहिली. आता चौदा अध्याय लिहिण्याचे आहेत, तरी ते पुस्तक सहा अष्टकांपर्यंत पाठविण्यात येईल. मागे पाठविलेल्या पत्रात संस्कृत गुरुचरित्र येथे होते ते एकाने घेतले, तरी येथे एक पुस्तक पाठवावे. ते पत्र पावले नसेल तरी एक पुस्तक पाठवावे. गुरुचरित्राच्या प्रती किती खपल्या कळवाव्या. हल्ली येथे दोन ग्रंथ तयार झाले आहेत. तुमचे मातोश्रींची स्थिती ऐकून आश्चर्य वाटते. तिचे जवळ घडल्यावेळी अनस्मृति वाचावी. कळावे. नारायण.

## ‘स्वाराज्यसिद्धि’ पुस्तक आले काय ?

बिठूर

श्रावण शु. १०-१८२५
७ आगस्ट १९०३

वे. शा. सं. नारायण दीक्षित नरसोबावाडी यांस नारायण. आपुले पत्र पावले. स्वाराज्यसिद्धि नावाचे पुस्तक वाडीवर आले की नाही ते कळवा. तेथील सर्व मंडळीस नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक १७७

## गुरुचरित्र पहिली प्रत ......

ब्रह्मावर्त

श्रा. शु. १२-१८२५
९ आगस्ट १९०३

वे. शा. नारायण दीक्षित नरसोबाची वाडी यांसी नारायण. आपुले पत्र पावले. येथे तूर्त राहणे आहे. गुरुचरित्राची पहिली प्रत फार घाईने लिहिली ती दुसऱ्यास कळण्यास जड जाईल म्हणून सोईसोईने लिहून पाठविता येईल. तीन वेळेत अठ्ठावीसचे २५ ओव्यांपावत पाठविले. पुढे सोईने पाठविले जातील. गोकर्णीची जडीही पाठविण्यात येईल. कळावे. नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक १७८

## अनुरागपूर्वक परमेश्वर सेवन करणे

## गुरुचरित्रात नवीन श्लोक भरू नये

बिठोर (ब्रह्मावर्त)

शके १९२५ सन १९०३

वे. शा. सं. नारायण दीक्षित नरसोबाची वाडी यांस नारायण. पत्र पावले. **भजन म्हणजे काया वाचा मने करून ज्या ज्या समयी जसे घडले तसे तसे अनुरागपूर्वक परमेश्वराचे सेवन करणे. मनाने स्मरण, वाचेने गुणोनामोच्चारण, कायेने वंदन इत्यादि लक्षणाची अनुवृत्ती भगवंती ठेवावी.** येथून गुरुचरित्राची प्रत मिळत नाही. तुम्हाकडे ज्या लेखी प्रती आहेत त्याबरोबरच श्लोक मिळतील. कदाचित् एखाद्या ओवीला श्लोक भरतीस न मिळाला तर एका श्लोकाखाली १-२ एक दोन ओव्या घालून घ्याव्या. ६-२६-३६-४१-४२ ह्या अध्यायात ज्या कमी आहेत त्यामध्ये ज्या ओव्यांवर श्लोक नाहीत त्या मधीच लिहून पुढे क्रमाने लिहावे. नवीन श्लोक भरू नयेत. नारायण.





## दत्तमाहात्म्याची घाई करू नये

बिठूर (ब्रह्मावत)

माघ व. २-१८२५
४ फेब्रुवारी १९०४

वे. शा. नारायण दीक्षित नरसोबाची वाडी यांसी नारायण. तुम्हाकडून भजनाची वही पाठविली ती आम्हास पोचली. दत्तमाहात्म्याची घाई करू नये. सवडीने लिहून पाठवावी. पाठवल्या ‘ गळाटाळा फुटला बाहतां रे ’ या पदाचे ४ अंतर असून पुढे नाहीत आणि पुढच्या पदाचे ‘‘काम काक हा’’ याचे पूर्वीचे अंतरे नाहीत. सवडीने या पुस्तकाचे समागमे लिहून पाठवावी. तूर्त येथेच राहणे आहे. नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक १७६

## गुरुचरित्रसार पोचले

ब्रह्मावर्त

शके १८२५ सन १९०४

वे. शा.सं. नारायण दीक्षित नरसोबावाडी यांस नारायण. **विश्वेश्वरी पोचली.** पुनः गुरुचरित्रसार पाठविले ते पोचले. जरूर उत्तर पाठवावे. प्रकृतिमान कळवावा. नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक १८१

## छपाईस मनाई नाही -

## कवितेत क्षेपक पडू नये

ब्रह्मावर्त

चैत्र ३०-१८२६
१५ एप्रिल १९०४

वे. शा. नारायण दीक्षित नरसोबावाडी यांस नारायण. पत्र पावले. ते मौक्तिक भस्म संपेपर्यंत तुम्ही घ्यावे. कदाचित कसर राहिले तर कळवावे. प्रवाळ (मौक्तिक) १८ रुपये तोळा आहे. पण जे पाठविलेले चार मासे एका बाईने मोफत देऊन रजिस्टारचे सुद्धा दाम तिनेच दिले. आणखी पाहिजे तर मिळेल. तुमच्या सौभाग्यवतीला पाठविलेले औषध सुरू ठेवावे.

नारोपंताने १००० प्रती गुरुचरित्राच्या छापल्या. त्या अजून ७०० (शिल्लक) आहेत. तरी फडके जो उद्योग करणार तो कोणाचे मदतीने असून ग्राहक असतील तर मनाई नाही. पण झालेले कवितेत क्षेपक पडता नये. येथे जुन्या पोथ्यांवरून रचना झाली. ती छापील ओव्यांस कमजास्तपणा आहे. ६-२६-३६-४१-४२या अध्यायात ओव्या गाळल्या. तेथे कसे करणार ? हे सर्व जाणून उत्तर यावे. नारायण.

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक १८२

## पुस्तके भाविकांना द्यावी

ब्रह्मावर्त

ज्येष्ठ ४-१८२६
१७ जून १९०४

श्री नारायण दीक्षित नरसोबावाडी यांस नारायण. वृद्धि पावल्यावर सांगता करावी. पुस्तके भाविकांस द्यावी. सर्वांस नारायण.

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक १८३

## श्री दत्तचंपू व कृष्णालहरी उदित

मूळतापी

आश्विन १८२७
आक्टोबर १९०५

वे. शा. सं. शंकर भट सप्रे चातुर्मास्य यांसी नारायण. तूर्त मूळतापी येथे राहणे आहे. पहाड चढून येथे आल्यावर शौचास उपद्रव जास्ती झाल्यामुळे येथे राहणे केले. तूर्त काहीसे बरे आहे. दिवाळी करून येथून नर्मदापार जाण्याचा विचार आहे. आपण चूर्णिकिचीं सूचना केली पण मूळ पुस्तक येथे नाही. तूर्त तिकडील सर्व वर्तमान पत्रद्वारा कळविणे. हल्ली श्रीदत्तचंपू हा ग्रंथ व कृष्णालहरी हे दोन ग्रंथ उदित झाले. त्यापैकी एक लौकर आपुलेकडे पाठविण्यात येईल. नारोपंत वकील सातवळेकर वगैरे मंडळीस नारायण. येथे आपाभटजी, चौबे हे दत्तूपासून गुरुचरित्र वाचतात व संस्कृतही जाणतात. त्यांनी सटीक संस्कृत गुरुचरित्र आणावा असे सांगितले. ते गरीब असल्यामुळे किंमत देवविता येणार नाही तरी बुक पोस्टाकरिता ४ आणण्याची तिकिटे पाठविली आहेत. तरी नारोपंताकडून एक प्रत घेऊन पाठवावी. त्यातून येत असेल तर एखादे भजनाचे पुस्तक पाठवावे. मागे पाठविल्यांपैकी एक पदाचे पुस्तक बरोबर असावे म्हणून ठेविले पण ते चिखलदेचे हरिदासानी घेतले.

पत्ता : जिल्हा बैतूल, तालुके तहसील श्री. मूळतापी पोस्ट सदर, येथे बापूशास्त्री डांगे यांस पोहोचावे. कळावे. नारायण.

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक १८४

## श्री दत्तचंपूवर दोन स्तबकांची टीका

ब्रह्मावर्त

मार्गशीर्ष शु. ३-१८२७
२९ नोव्हेंबर १९०५

श्री. प. प. नृसिंह नरसोबाची वाडी यांस नारायण. उद्या दुपारी येथोन म्हणजे हुशंगाबाद सोडून भोपाळवरून पुढे जाणार. अजून जयंती कुठे होणार हा निश्चय नाही.



तेथील सर्वांस नारायण. श्रीदत्तचंपूवर दोन स्तबकांची टीका करून शंकर सप्रे यांनी मागितल्यावरून त्याजकडे पाठविली. त्याकडून एक प्रत लिहून मागून घेणे. कळावे. नारायण.

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक १८५

## गुदस्ताची स्तोत्रे व पदे पाठवावी

ब्रह्मावर्त

फा. शु. १५-१८२७
१० मार्च १९०६

श्री प. प. नृसिंह सरस्वती नरसोबाची वाडी यांस नारायण. फा. व. १२ रोज ब्रह्मावर्तकडून काशीस निघणे केले. आता काशीस पोचल्यावर पत्र पाठविता येईल. तेथील सर्व मंडळीस नारायण प्रविष्ट व्हावा. येथील मंडळीने गुदस्ता रस्त्यात घडलेली तापी, रेवा इत्यादिक स्तोत्रे व पदे मागितली आहेत. तरी गेल्या वर्षी वाडीवर ठेवलेली पदे वगैरे पाठवून द्यावी. येथे एका कान्यकुब्ज ब्राह्मणाने श्रीसूक्त मंत्रांचे विधान व सर्व श्रीसूक्त जप हवनादि विधान मागितले आहे. येथे पुस्तक येता ते एक प्रत उतरून घेऊन ते पुस्तक परत पाठवितील. नाट पेड पाठवावे.

पत्ता : नाजमंडी शिवदत्त पंडित को पोंच जी.

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक १८६

## सूत्रवृत्ति भाष्य

संध्या मंडप (तंजावर)

श्रा. शु. १२-१८२९
२० ऑगष्ट १९०७

श्री प. नरसिंह सरस्वती नृसिंहवाडी यांस नारायण. पत्र पावले. श्रीदेवाकडे वागण्याचे व श्रींनी सद्बुद्धि देण्याची सर्वांनी श्रींची प्रार्थना करावी. सूत्रवृत्ति भाषा सुगम आहे. अण्णा व तुम्ही सर्व शंकरस्वामी यांना सुद्धा सहज अर्थ कळणेसारखा आहे. तरी प्रत्यही होतील तितकी सूत्रे चालवावी. कदाचित् इत्यर्थ सर्व न कळला तर कळला तेव्हढा या विचाराने भाष्यविचार सुगम होईल. कळावे. नारायण.

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक १८७

## अध्ययन चांगले चालवावे

राजमहेंद्री

फा. शु. २-१८३०
२२ फेब्रुवारी १९०९

श्री प. नृसिंहसरस्वती यांस नारायण. अण्णा दीक्षित वगैरे सर्व पोचल्याचे सविस्तर उत्तर यावे. क्षौर कृष्णातीरी होईल. पुढे विचार पाहू. ब्रह्मानंद स्वामींकरिता

कृष्णालहरी प्र. ५ मिळेल तर दत्तमाहात्म्य प्रत १ व्हीपी ने पाठवून देण्यास कोणास तरी सांगावे. अध्ययन चांगले चालवावे. ब्रह्मसूत्र वृत्ति अद्याप पुढे लिहिली नाही. तीच नेलेली स्वच्छ लिहून काढून पाहत जावे. तावत् पुढची इकडून पाठवू. बारीक अक्षरांनी लिहिलेले भाष्याचे पुस्तक येथे पाठवावे. म्हणजे ते शुद्ध करणेस बरे पडेल. वृद्धशिक्षा पाहत जावी. प्रकृतिमान कळवावे. सर्वांस नारायण. दुर्गाबाईस नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक १८८

## ४४ अध्यायांची चूर्णिका झाली

भवानी (भवानी कावेरी संगम) का शु. १४-१८२९

१८ नवंबर १९०७

वे. शा. शंकरभट सप्रे सावंतवाडी यांस नारायण. वेदस्तुति पुस्तके पावली. तूर्त प्रकृति कशी आहे व औषधाने काय उपयोग झाला की काय सर्व कळवावे. उत्तरेकडे येण्याकरिता कर्नाटक सरहद्द चामराजपुराजवळ येणे केले. तेथोन जोराने प्लेग असल्याने मार्ग बंद केला. तुम्ही जाऊ नका असा लोकांनी प्रतिबंध केल्यामुळे पुनः मागे कावेरीतीरीस येणे केले. बंगलोराकडेसही प्रतिबंध आहे. पुढे कोणत्या मार्गाने अजून निश्चय नाही. दोन वेळ गुरुचरित्र स्तोत्र टिपणी पाठविली. पोचल्यास कळवावे. ४४ अध्यायांची चूर्णिका झाली. उत्तर अवधूतरावाच्या नावे तंजावरास पाठवावे. सर्वांस नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक १८९

## श्री जगद्गुरूंनी उत्तम प्रेम ठेवले

नेलोर

मार्गशीर्ष शु. १-१८२९

३ डिसेंबर १९०७

श्री प. नृसिंहसरस्वती – नृसिंहवाडी यांसी नारायण. प्लेगाचे प्रतिबंधामुळे मागे फिरून नेलूरपर्यंत येणे केले. आता कुंभकोणाचे मार्गाने उत्तरेचा मार्ग कांची वगैरे प्रदेशी प्रतिबंध नसल्यामुळे याच मार्गाने येणे ठेवले आहे. वाडीतील सर्व वर्तमान कळवावे. द्वादशी उत्सवास सर्व मंडळी आली की काय व सर्व उत्सवाची व्यवस्था कशी झाली व पुजाऱ्यांमध्ये फौजदारी खटले होते त्यातून ते मुक्त झाले की काय? हे सर्व कळवावे. **ब्रह्मसूत्रवृत्ति एक सदाशिव ब्रह्मेंद्र नामक एका सिद्ध पुरुषाने केलेली आहे.** ही पाहिल्यास बरेच भाष्याचे काम होईल. परंतु ती द्राविडी लिपीत आहे. ती स्वलिपीत मिळणेचा प्रयत्न ठेविला आहे. मिळताच पाठविता येईल. **श्रीजगद्गुरूंनी उत्तम प्रेम ठेविले व तुम्ही केलेले ग्रंथ बरोबर असतील तर द्या असे म्हटल्यावर मंत्रगर्भित स्तोत्र लिहून दिले. आनंदित झाले.**



त्यांचेकडून त्यांचे करिता सावंतवाडीतून गुरुचरित्र, संस्कृत सप्तशती, माघमाहात्म्य पाठविण्यास शंकर सप्रे यांस लिहिले. त्यांनी पाठविलेली असतील. प्राकृत माहात्म्य असू द्या पण संस्कृत पाहिजे असे दोन चार वेळा ते बोलले. तरी दत्तपुराण लिहून देणे. तरी ते मोठे आहे. गतवर्षी केलेली दत्तचंपूची टीका पाठवावी म्हणजे थोडक्यात लवकर लिहून परत पाठविता येईल. त्यांचेकरिता १ किंवा कृष्णालहरी पाठवावी. ही पुस्तके पाठविणे. ते तंजावरास आले म्हणजे अवधूतराव आमचा पत्ता घेऊन पाठवतील. प्रकृतिमान कळवावे. सर्व स्वामी मंडळीस व सर्व तेथील लहानथोरांस नमस्कार. नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक १९०

## सदाशिवब्रह्मेंद्र कृत ब्रह्मसूत्रवृत्ति

नेलोर मार्गशीर्ष शु. १-१८२९

६ डिसेंबर १९०७

श्रीमद्यतिवर्य ब्रह्मानंदसरस्वती यांसी नारायण. स्मरणपूर्वक विज्ञापना. सत्यमंगलात गेल्यावर लोकांनी प्लेगसंबंधाने प्रतिबंध बराच सांगून मागे फिरविले. नंतर भवानीस १८ दिवस राहून सदाशिवब्रह्मेंद्र यांचे स्थानी राहणे केले. उद्या येथोन कुंभकोणाचे मार्गाने उत्तरेकडेस जाणार. पुस्तके तुम्हाकडेच पोचली असतील तर त्याचे उत्तर अवधूतराव (तंजावर) यांचे नावे कार्ड पाठवावे. अवकाश मिळेल तेव्हा हे स्तोत्र जगद्गुरूस ऐकवावे.

**सदाशिव ब्रह्मेंद्रकृत सूत्रवृत्ति तृतीय पादाचे वीस सूत्रापर्यंत लिहिली. पुढे सर्व मिळवावी अशी इच्छा जाहली. जरी भाष्यादिक आहे. तथापि सत्पुरुषाचे हातचा एक चमत्कारिक लेख बरोबर असावा अशी इच्छा आहे.** तरी सद्गुरुंपाशी किंवा मीमांसक शास्त्री यापाशी आमचे लिपीत किंवा आंध्रलिपीत पुस्तक असेल तर तंजावरास पाठवावे. ते मिळाल्यास एक प्रत उतरून पुनः परत पाठविता येईल. या देशी द्राविड लिपीत मिळते ती लिपी कळत नाही व छापलेली आढळत नाही. तरी एवढे काम अगत्य करावे. एकांती अभ्यास करण्यास प्रमाद करू नये. जगद्गुरूचे सेवेत राहून प्रसाद संपादून घ्यावा. सर्व स्वामीस नारायण. सर्व आश्रित मंडळीस नारायण प्रविष्ट व्हावा. पत्ता : तंजावर येथे दक्षिण राज बिदी येथे अवधूतराव यांस – अशा पत्त्यावर आल्यास ते पोचते करतील. **जगद्गुरूचे नित्य स्मरणार्थ त्यांकडे पुरुषार्थ निर्णय पुस्तक मिळावे ही इच्छा आहे.** आंध्रलिपी कळते. नारायण.

## वृद्धशिक्षा - उपनिषत् सूत्र स्मरणार्थ स्मरणी

मुक्त्याला भाद्रपद शु. १३-१८३०
८ सप्टेंबर १९०८

श्री प. नृसिंह सरस्वती स्वामी नृसिंहवाडी यांस नारायण. ४ पत्रे पावली. अंगारा पावला. इकडे पीक पर्जन्य बरे आहे. रोगही कमी कमी होत आहे. येथे त्या देशाच्या रिवाजाप्रमाणे भजन सुरू आहे. श्री. प. परमानंदस्वामी – शंकरानंदस्वामी, शांतानंदस्वामी आदिकरून सर्वांस नारायण. वे. आहिताग्नि अग्निहोत्रीबुवा, वे. रा. दत्तू वामन, अंतोबा वामन, बंडू वामन भट पूजक, आण्णा दीक्षित, ढुंढीराज, गणेशशास्त्री, अंतू शंकर, राघु परशुराम आदि करून सर्वांस नारायण. गं. दुर्गाबाईस नारायण. मुलांनी अभ्यास झटून करावा. नारायण.

**श्रीकृष्णातीरी निजामशायीत कोटीलिंग नावाचे क्षेत्री १० दिवस राहणे झाले तेव्हा तुम्हाला प्रणव व मात्रालक्ष्यार्थ वगैरे बरोबर विवेचन सांगण्यास मिळाले नाही असे मनात येऊन वृद्धशिक्षा नामक प्रकरण व पूर्वी कुमार शिक्षा केली त्याप्रमाणे युवशिक्षाही असावी म्हणून १०० श्लोक व युवशिक्षा श्रीगुरुकृपेने रचली व गहनार्थ जाणून साक्षात व्याख्यान सांगितल्याप्रमाणे वर सविस्तर व्याख्या सुरू आहे. आता ७० श्लोकांपर्यंत व्याख्या पूर्ण झाली. जशी नामस्मरणाकरिता हातात स्मरणी तशी उपनिषत् सूत्र स्मरणार्थ ही स्मरणी जाणावी. एकदा आण्णा दीक्षित वगैरे मंडळीस तिचा अर्थ जाणून नंतर दिवस रात्री घडेल तितुका विचार करीत जावा. बाकीची टीका अवकाशाप्रमाणे पाठविण्यात येईल. सूत्रवृत्ति काही ठिकाणी भाष्यास सोडून आहे. ती तूर्त ती पाहावी. दुसरी एक लिहिण्यास सांगितली. चंपू टीका पावली असेलच. नारायण.**

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक १९२

## झालेले भाष्य कुठे पाठवावे?

पवनी अ. श्रा. व. ११-१८३१
११ ऑगस्ट १९०९

श्री प. नृसिंह यांसी नारायण. भाष्य मिळाले. बंडूने पुस्तक छापताहेत असे सांगितले. तरी एक वेळ पाहून घ्यावे म्हणजे अशुद्धे न पडतील या हेतूने बंडूस सांगितले. दोन अष्टकापासून पाच अष्टकापावेतो झाले. चार - पाच दिवसात तपासून पाठविता येईल. कुठे पाठवावे हे कळवावे. नारायण.





## श्रीदत्ताची राजधानी सुखाची (पद)

पंढरपूर पौष शु. ४-१८३१
१५ जानेवारी १९१०

बंडू शागीर्द यांस नारायण (नरसोबा वाडी) आज रोजी सायंकाळी पंढरपूर सोडून वाडीकडे येणे होईल. कळावे सर्वांस नारायण.

**नरसोबाची वाडी जी लोकमान्या । कृष्णातीरां शोभवी जी सुधन्या ।**
**अन्या तैसी देखिली म्यां न साची । श्रीदत्ताची राजधानी सुखाची ॥१॥**
**कृष्णा आहे पूर्वभागी जियेच्या । प्रत्यक्तीरी वास आहे तियेचा ।**
**श्रीदत्ताचा कल्पवृक्षातळी तो । त्राता ज्याच्या चिंतने मोक्ष होतो ॥२॥**
**जो चिंतिता तत्क्षणी वारी मोहा । त्याच्या पदी संतत ठेवि देहा ।**
**मोहान्तका तारि मला परेशा । नाही तुझ्यावीण शरण्यधीशा ॥ ३ ॥**

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक १९४

## सूत्रवृत्ति पाठवावी

संपगांव जे. कृ. १२-१८३२
४ जुलै १९१०

श्री प. नृसिंह सरस्वती यांस नारायण. अजून इकडे पावसाची संधी नसलेमुळे मलापहांतीरी गावोगाव फिरून दशहार करून नंतर पुढे जाणेचा विचार आहे. गुर्लहोसुर, ता. परसगड, जि. बेळगाव येथे श्री. प. कैवल्याश्रम स्वामी यांचे नावे बुकपोस्ट करून सूत्रवृत्ति पाठवून द्यावी व त्यावरच ही ठेऊन घेऊन स्वामी आलेवर देणेचे, असे लिहून ठेवावे म्हणजे मिळेल. आण्णा, कवीश्वर, नारायण वगैरे मंडळीस मागे श्रवण घडले, **चांगली चिंतनिका व पुढे नवीन पंचदशी पाहण्याचे सुरू ठेवावे. मुलांनी मागे झाले त्याचे चिंतन व पुढे कौमुदीचा वगैरे अभ्यास चांगला ठेवावा. तुम्ही स्वतः वृद्धशिक्षा समयाप्रमाणे पहावी व पहिल्या श्लोकात सांगितल्याप्रमाणे प्रणवोपासना ठेवावी.** तेथील लहान थोर मंडळीस हेच सांगणे. इकडेस कोणी येऊन नये. मंडळीचा जमाव झाल्याने उगीच अनेक प्रकारचा विक्षेप होतो. नारायण

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक १९५

## सत्यदत्त व्रत कथा

चिखलदरा पौष कृ. ६-१८३४
२८-१-१९१३

रा. रा. धोंडोपंत कोपरकर बडोदा यांस नारायण. सत्य नारायणाच्या

व्रताप्रमाणेच श्रीदत्तव्रत व कथा छापली आहे. परंतु ती कोणत्या छापखान्यांत स्मरण नाही. शोध पडल्यास कळविता येईल. नारायण.

---

॥ श्री दत्त ॥ **पत्र क्रमांक १९६**

## दत्तसहस्त्रनाम पाठवावे

गरुडेश्वर शके १८३५

१९१३

श्री. प. नृसिंह सरस्वती यांस नारायण. ब्रह्मानंद स्वामींनी दकारादिदत्तसहस्त्रनाम लवकरच पाठविणेस सांगितले आहे. तरी एक प्रत कोणाकडून तरी लिहून पाठवावी. वासुदेव वगैरे येथून गेले. पोचलेचे पत्र नाही. उत्तर आले नाही. **अनुष्ठान चालू द्या. स्वानुसंधान सदैव चालवावे.** नारायण.

---

॥ श्री दत्त ॥ **पत्र क्रमांक १९७**

## दत्तपुराण शेवटचा ६४ वा सटीक पाठवावा

गरुडेश्वर १८३५

१९१३

श्री प. नृसिंह सरस्वती यांस नारायण. मागे पाठविलेले सहस्त्रनाम नंतर पुनः पाठविलेले पोहोचले. एक त्यापैकी ब्रह्मानंद सरस्वतींना दिले. श्रीदत्तपुराणाचा शेवटचा (६४) वा सटीक अध्याय एका स्वामीला पाहिजे. पाठवून द्यावा. लौकरच परत मिळेल. नारायण.

---

॥ श्री दत्त ॥ **पत्र क्रमांक १९८**

## विष्णुयाग विधान पाठवावे

गरुडेश्वर आषाढ शु. १-१८३५

५ जुलै १९१३

वे. शा. रामचंद्र प्रकाशकर बडोदे यांस नारायण. भस्म पावले. एका गलकुष्ठ्याला देणेचे आहे. जर उपयोग होऊ लागला तर आणखी मागता येईल. मुलांची वगैरे प्रकृति कशी आहे कळवावी. विष्णुयाग (पुरुषसूक्त विधान) पाठवावे.



॥ श्री दत्त ॥ **पत्र क्रमांक १९९**

## देवीस्तोत्र पाठविलले आहे

त्रिपालपूर मार्गशीर्ष व. ३०-१८२९

३ जानेवारी १९०८

रा. रा. कुप्पुस्वामी तंजावर यांसी नारायण. येतेवेळी तिवारी देव याने देवीचे भजन मागितले परंतु त्यावेळी देण्यास घडले नाही. तरी हे एक देवीचे अष्टक पाठविले याची प्रत त्याला द्यावी व हे स्तोत्र तुम्हाकडेस असो द्यावे. सर्व मंडळीस नारायण॥ श्री दत्तप्रसादोस्तु. आज सकाळी चिदंबरातून त्रिपालपुरास आलो. उद्या पुढे जाणार. नारायण.

---

॥ श्री दत्त ॥ **पत्र क्रमांक २००**

## लिहून पाठविण्याचा श्रम करू नये

भाद्रपद कृ. १२-१८२७

सप्टेंबर १९०५

श्रीमत् परमहंस नरसिंह सरस्वती नरसोबाची वाडी यांस नारायण. येथे पुस्तकाचा उपयोग करणार कोणी नाही. तथापि एकेक प्रत ठेविली. चंपू येथे आहे करिता हा परत पाठविला. यानंतर पुस्तक जरूर लागेल तरच मागून घेता येईल. लिहून पाठविण्याचा श्रम लावू नये. नित्य स्वानुसंधान ठेवावे. नारायण.

---

॥ श्री दत्त ॥ **पत्र क्रमांक २०१**

# ५ - औषधी योजना - व्याधी मुक्तीसाठी उपाय

## अंतरातील देवाची बदली न होऊ देणे

भाद्रपद कृ. १२-१८१९

२३ सप्टेंबर १८९७

हे कार्ड रवाना आत्ताच करण्याचे इतुक्यात, पत्र आपण पाठविलेले पोहचले. पुस्तक सारंगपुरास पाठविले व तेथून हल्ली इकडे मंडळी आलेली त्यांना वाडीवर पुस्तक पाठविण्याचे सांगितले. आता जर त्यांनी न ठेविले असेल तर त्यांना आपुल्याकडे पाठविण्याचे लिहिले जाईल. **मुलाला अजीर्णाचा उपद्रव असेल तर दाडीम फळाची व कुड्याची जुडी ताकातून घ्यावी.** बदली झाल्याने गैरसोई झाली असेल परंतु प्रभुसत्ता जशी असेल तसे घडणारच. अस्तु. **अंतरातील देवाची बदली न झाली म्हणजे पुरे.** कळावे, नारायण.

॥श्री दत्त॥ **पत्र क्रमांक २०२**

## कडकी व श्वेतकुष्ठासाठी औषध

पौ. शु. ७-१८२३
१६ जानेवारी १९०१

रा. रा. नारायण उकीडवे सावंतवाडी यांस नारायण. पाठविलेले औषध कडकीवर, गाईच्या छटाक दुधात २ गुंजा व खडीसाखर चार मासे. दालचिनी १ मासा, सुंठ २ मासे याप्रमाणे सांज-सकाळ द्यावे. तेल, आंबट वर्ज्य करावे. एक सप्तक झाल्यावर कळवावे व **जिला श्वेतकुष्ठ आहे तिला पांढरे गोकर्णीची जुडी पाण्यात उगाळून कोडावर लावावी. रोज प्रदक्षिणा घालाव्यात.** कळावे. नारायण.

॥श्री दत्त॥ **पत्र क्रमांक २०३**

## सदैव भजनी सादर असावे

चिखलदरा ज्येष्ठ शु. ८-१८२२
५ जून १९००

रा. रा. नारायण उकीडवे सावंतवाडी यांस नारायण. पूर्वी एकदा आपण काकडे आरती मागितलेली, पण त्याचे पुन्हा स्मरणही नव्हते. पूर्वी रचलेल्याची आठवणही नव्हती. आता एका गृहस्थाकडे एकाएकी मिळाली तेव्हा स्मरण येऊन ही लिहून पाठविली आहे. कळावे, सदैव भगवत् भजनी सादर असावे.

(१) पद भूपाळी
**पहाटेसी उठोनि भक्त हर्षुनिया चित्ति .... श्रीगुरुनाथा दावी मुखदीप्ती (६)**

(२) **उठी उठी बा तु आत्मया चिन्मया दत्तात्रेया .... हरपून होऊ केवळ (५)**

ह्याशिवाय दत्तपुराणातील "**नित्ये हि यस्य महिमा**" हे स्तोत्र वेळ मिळाल्यास काकडे आरतीचे वेळी म्हणावे. नारायण.

॥श्री दत्त॥ **पत्र क्रमांक २०४**

## स्वपदापासून च्युत होऊ नये

बिठोर ब्रह्मावर्त भाद्रपद कृ. २-१८२४
१९ सप्टेंबर १९०२

वे. रा. रामचंद्र प्रकाशकर बडोदे यांस नारायण. कार्ड पाहून मजकूर समजला. **कोणी प्राणी कोणावर अवलंबून नाही. सर्वस्वी स्वारंभकानुसारे सुखदुःख भागी आहे तेव्हा नाऊमेद न होता स्वपदापासून च्युत होऊ नये.** कळावे. आपले सर्व मंडळीस नारायण प्रविष्ट. नारायण.

॥श्री दत्त॥ **पत्र क्रमांक २०५**

## श्रीगुरूचे तीर्थ दोन वेळ घ्यावे

सारंगपूर पौष १८२३-१९०२

रा. रा. नारायण उकीडवे सावंतवाडी यांस नारायण. बाबूचे नावे आलेले पत्र पोचले. मुलीची प्रकृति क्षीण असल्यामुळे येथोन व्हावा तसा उपाय होणे नाही. श्रीगुरूचे तीर्थ दोन वेळ द्यावे. दीक्षित यांनी पाठविलेले सटीक स्तोत्र पावले व अर्थ समंजसपणे बराच श्रम घेऊन केला तो पाहून आनंद झाला. त्यांनी काही शंका विचारल्या पण पुस्तक येथे येताच येथील कमावीसदार यांनी लिहण्यास नेले. त्याचा अभिप्राय ते छापणार आहेत. त्यांना सांगितले आहे की, दीक्षितांना विचारून जर ते कबूल करतील तर त्याप्रमाणे करावे.

रा. बिगुडकर यांनी दिलेली पत्रे घेतली. उपयोगी पडली. कळावे.

॥श्री दत्त॥ **पत्र क्रमांक २०६**

## औषधासोबत 'मुंचयित्वा हवि' चा जप

ब्रह्मावर्त श्रावण शु. १०-१८२४
१३ ऑगस्ट १९०२

वे.शा.सं. नारायण दीक्षित नरसोबावाडी यांस नारायण. पत्र पावले. काळे गोकर्णीची मुळी गोमुत्रातून घ्यावी व कुळथ्याचे काढ्याबरोबर भात जेवावा. दोन वेळ असे १४ दिवस घ्यावे. सात दिवसांनंतर प्रकृतिमान कळवावा. यथाशक्ति "मुंचयित्वा हवि" या पाच ऋचेचा जप करावा. नारायण.

॥श्री दत्त॥ **पत्र क्रमांक २०७**

## गोकर्णीची जडी घ्यावी

बिठूर (ब्रह्मावर्त) शके १८२४ सन १९०३

वे. शा. नारायण दीक्षित नरसोबावाडी यांस नारायण. अजून गोकर्णीची जडी काही दिवस घ्यावी. कदाचित् मूळव्याधि किंवा प्रमेहास नेट करील तर थोड्याच गोमूत्रात थोडीच घ्यावी. नागकेशर, खडीसाखर यामानाने सुरू केले तसेच घ्यावे.

**'स्वस्ति नोमिमिता' व 'यत इंद्रमयामहे' सूक्त जपावे. भय जाईल.** नरसिंहाचा श्लोक सावंतवाडीतून घ्यावा. नवीन करून देता येईल. श्लोकाचे टीकेबद्दल तूर्त अवकाश नाही. कळावे. नारायण.

॥ श्री दत्त ॥

## थंड पाण्याने स्नान करु नये

बिठूर

श्री प. नरसिंह सरस्वती नरसोबाची वाडी यांस नारायण. गाईचे तुपांतून रोज २-२ गुंजा सांज-सकाळ हे भस्म घ्यावे. पथ्य विशेष नाही. स्नान थंड पाण्याने करू नये. नारायण.

---

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २०८

## पोटातील उपशांति आहे काय ?

बिठूर (ब्रह्मावती) ज्येष्ठ शु. ११-१८२५

जून १९०३

वे.शा. सं. नारायण दीक्षित नरसोबावाडी यांस नारायण. जे. शु. ११ पर्यंत येथे क्षेम. तूर्त ब्रह्मावर्त बिठोर येथे राहणे आहे. तूर्त येथे प्लेग शांती आहे. आपणाकडून बरेच दिवसात वर्तमान कळले नाही. आता पोटातील व्यथा, मूळव्याधि वगैरे उपशांति आहे काय? कळावे, निरंतर भगवद्भजनी सादर असावे. नारायण.

---

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २०९

## संग्रहणी उपशमाची इच्छा नाही

ब्रह्मावर्त माघ शु. ५-१८२४

२ फेब्रुवारी १९०३

वे. शा.सं. नारायण दीक्षित नरसोबाची वाडी यांस नारायण. आपली दोन्ही पत्रे आजच पोचली. बाई यांस औषध नुसतेच चालू ठेवावे. **आज तीन वर्षे संग्रहणीचा उपद्रव आहे. तदुपशम करण्याची इच्छा नाही.** तूर्त येथे प्लेग आहे. लोक निघोन गेले. **परमेश्वर इच्छेने शांती होईल तो सुदिन.** नारायण.

---

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २१०

## बेताने राहून औषध सेवन करावे

बिठूर (ब्रह्मावती) चैत्र शु. ७-१८२५

४ एप्रिल १९०३

वे. शा.सं. नारायण दीक्षित नरसोबाची वाडी यांस नारायण. आपले पत्र पावले. आता साफ प्रकृति होईपर्यंत बेताने राहून औषध सेवन ठेवावे. येथे काहीसा प्लेग कमी



वाटतो. पुढे ईश्वरी इच्छा. अस्तु. ब्रह्मपुराणांतर्गत अध्याय १ श्लोक **'करांगन्यास विन्यस्य'** इथून न्यासाचे सोळा श्लोकांपर्यंत पाहिले व त्यापैकी अलर्काख्यानात " कामः सर्वात्मना हेयः " हा एक श्लोक एव्हढे एकाला पाहिजेत. मागे पाठविलेल्या पुस्तकात हे काही चुकले आहेत. कळावे. नारायण.

---

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २११

## गोकर्णीच्या जटा पाठवाव्या

ब्रह्मावर्त ज्येष्ठ ३०-१८२५

२५ जून १९०३

वे. शा.सं. नारायण दीक्षित नरसोबावाडी यांस नारायण. पाठविलेले कानडी भाषेचे उलथ्याची पदे पावली. जर तिकडे गोकर्ण मिळत नसेल तर इथून पाठविता येईल. बहुधा ४-८ दिवसात काळे गोकर्णीची जटा पाठविता येईल. मागे ब्रह्मानंदाच्या माडीवर पिवळ्या जड्या ठेविल्या होत्या त्या कदाचित मिळाल्या असून राखून ठेविल्या असतील तर २-४ पाठवाव्या. मासला पाहण्यासाठी एकाला पाहिजे. कळावे. बाईचे औषध बंद करू नये. चालू ठेवावे. पत्ता – अंताजीपंताचे घाटावर रामाचे मंदिरात, ब्रह्मावर्त. नारायण.

---

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २१२

## कोहळे पाक - रीति कळवू

ब्रह्मावर्त चै. कृ. १०-१८२६

१० एप्रिल १९०४

वे. शा.सं. नारायण दीक्षित नरसोबावाडी यांस नारायण. पत्र पावले. कोहाळे दोन पैदा करून ठेवावे. त्याचा पाक करण्याची रीति व त्यात घालण्यास औषधे पाठविण्यात येतील. कळावे. तावत् तुम्ही पाठविलेले औषध घ्यावे व घरातहि मागे चालू केलेले औषध चालू ठेवावे. नारायण.

---

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २१३

## मौक्तिक घ्यावे - गुरुभजनच तारक होय

ब्रह्मावर्त वैशाख शु. ७-१८२६

२२ एप्रिल १९०४

वे. शा. सं. नारायण दीक्षित नरसोबाची वाडी यांस नारायण. पत्र पावले. जरी मौक्तिक पाकात घातले तरी हरकत नाही. तेच घेत जावे. गुणात कमी करणार नाही.

निःशेष जळजळ झालेवर औषध नको. जर अंगात दाह किंवा पोटात जळजळ असेल तर कळवावे. तूर्त कुटुंबाची प्रकृति कशी हे कळवावे नित्य श्रीगुरुजनी सादर राहावे. हेच तारक होय. कळावे नारायण.

॥श्री दत्त॥ **पत्र क्रमांक २१४**

## श्रीदत्तमालामंत्राचा १००० जप करावा

बिठूर (ब्रह्मावर्त) वै. शु. ९-१८२८

३ मे १९०६

वे. शा.सं. सखाराम भटजी कोलगांव यांसी नारायण. काशीकडून येथे येऊन आठ दिवस झाले. दोन दिवसाने येथून दक्षिणेकडेस निघणे होईल. शंकर याचे प्रकृतीस काय होते? श्रीदत्त माला मंत्राचा १००० जप करावा. **पाच पाक्षिक सटीक लेखी पुस्तक एका गौडाकडे आहे. शिवाय छापलेले पाहिले नाही. ह्या ग्रंथास शिवाचा शाप आहे की हा ग्रंथ पाहणारा वेडा होईल.** असो. यावरून जातकाचाहि उपयोग होतो. ग्राम देवता प्रतिष्ठा वेदोक्त रीतीने होत आहेत, पण शूद्र करविणार तर वेदोक्त प्रशस्त नव्हे. तळावडेकरांचा देवाने गर्वोच्छेद केला. पूजेस इच्छा असेल तर श्रीसूक्त योजावे. **आम्लद्रव्याने मूर्तीचा मळ हळूहळू घालवावा.** स्वप्नावरून वाटते, देवळात पादुकाच ठेवाव्या. शंकर याजबद्दल काही सांगणे झाले. पण आपण हे सांगणे त्यालाच श्रीचरणाकडून व्हावे अशी प्रार्थना केली आहे. ह्यावेळी नवा ग्रंथ करणेस अवकाश नाही व आता इच्छाही नाही. कळावे. नारायण.

॥श्री दत्त॥ **पत्र क्रमांक २१५**

## जसजशी सत्त्वशुद्धी तसतसे देवाचे सान्निध्य

बढवाई श्रावण शु. १४-१८२८

३ ऑगस्ट १९०६

रा. सखाराम सातवळेकर कोलगाव यांस नारायण. कार्ड पावले. आता शंकर याची प्रकृति कशी काय आहे? ते कळवावे. प्रेमपूर्वक भजू लागले म्हणजे जसजशी सत्त्वशुद्धि होईल तसतसे देवाचे सान्निध्य होईल. कळावे. नारायण.

॥श्री दत्त॥ **पत्र क्रमांक २१६**

## औपनिषद मंत्राचा जप घडेल तसा करावा

संध्यामठ भाद्रपद १५-१८२९

२१ सप्टेंबर १९०७

श्री प. नरसिंह सरस्वती स्वामी नृसिंहवाडी यांस नारायण. प्लेगाबद्दल परिहार,



विशेष सांगणे झाले नाही. सार्वजनिक जे भजन चालले ते चालवावे. शिवाय **हरे राम हरे राम राम राम हरे हरे । हरे कृष्ण, हरे कृष्ण, कृष्ण कृष्ण हरे हरे ॥१॥ ह्या औपनिषन्मंत्राचा** जप घडेल तसा करावा. जपांती श्रीदत्तमाला मंत्र जपावा. नारायण.

१ प्रस्तुत मंत्र **कलिसंतरणोपनिषदात्** सांगितला आहे.

'भगवत आदिपुरुषस्य नारायणस्य नामोच्चारणमात्रेण निर्धूतकलिर्भवति नारदः पुनः प्रपच्छ तन्नाम किमिति । स होवाच हिरण्यगर्भः ।

हरे राम, हरे राम, राम राम हरे हरे । हरे कृष्ण, हरे कृष्ण, कृष्ण कृष्ण हरे हरे ।

॥श्री दत्त॥ **पत्र क्रमांक २१७**

## श्वास कमी करण्यास धौती

पंढरपूर नजिक पौष शु. १-१८३१

१२ जानेवारी १९१०

श्री श्री नृसिंह सरस्वती स्वामी यांस नारायण. परवा सकाळी पंढरपूरास जाऊन पर्व काळी दंडस्नान करून पुढे निघणेचे होईल. मंडळीचे पाय फुटल्यामुळे दोन दिवस अधिक लागतील. हरि नाना काळकुंद्रीकर यांस श्वास कमी होण्याकरिता धौती मात्र करणेची सांगितली. तो जर तिथे येऊन राहिला असेल तर कोणाकडूनही त्याला करण्याला पद्धति दाखवावी. तेथील लहान थोर मंडळीस नारायण.

॥श्री दत्त॥ **पत्र क्रमांक २१८**

## दुःख सहन करावे

गरुडेश्वर श्रावण कृ. १३-१८३५

३० ऑगस्ट १९१३

वे. रा. रामचंद्र प्रकाशकार बडोदे यांस नारायण. प्राप्त झालेले दुःख सहन करणेकरिता विचार ठेवावा. दुःखाचा कोणी भागी नसतो. तथापि उपयातिक्रम करू नये. सुरवारी हिरडा मधात उगाळून डोळ्यात घालावा. कळावे नारायण.

॥श्री दत्त॥ **पत्र क्रमांक २१९**

## ज्वरास डिकेमाली व वेखंड

गरुडेश्वर कार्तिक १८३५

नोव्हेंबर १९१३

रा. रा. शंकर नारायण भागवत मुंबई यांस नारायण. डिकेमाली २ रति २ विड्याच्या पानांतून त्याला द्यावे. ज्वर जाईल. वेखंड ४० दिवस द्यावे. येथे राहणेचा

भरवसा नाही. नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २२०

## रास्नादिकाढ्यातून गुग्गुळ घ्यावा

नरसोबाची वाडी मा. शु. ९-१८३१

११-२-१९१०

रा. रा. नारायण उकीडवे सावंतवाडी यांस नारायण. रास्नादि काढ्यातून जो गुग्गुळ चालविला तोच चालवावा. तूर्त त्यांच्या प्रकृतीला आराम वाटल्याशिवाय येऊ नये. पवनीस दर्शन झाले आहे तोच संतोष मानून राहावे. नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २२१

## शुचिभूर्तपणे वागावे

संध्यामठ श्रा. शु. १-१८३२

१९१०

रा. रा. बंडू शागीर्द यांस नारायण. पत्र, अंगारा, प्रसाद पावला. देवाकडे चांगले शुचिभूर्तपणे वागावे. दुर्गाबाई आदिकरून सर्वांस नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २२२

## १० तोळे उपळसार पाठवावी

कार्तिक शु. १३-१८३४

बढवाणी ता. २३-२ वा. २३ मि. सावंतवाडीला दाखल ५ वा. १० मि. रा. रा. नारायण गोविंद उकीडवे यांसी "१० तोळे उपळसार पाळेकर सींग बरवानी यांचे पत्त्यावर पाठवावी." वासुदेवानंद सरस्वती.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २२३

## मुलगा पिडकाचा म्हणून नेम करावा

गरुडेश्वर श्रावण कृ. ६-१८३५

२३ ऑगस्ट १९१३

वे. रा. रामचंद्र प्रकाशकार यांसी नारायण. खोकल्याच्या गोळ्या पाठविता येतील. मुलाला देवापुढे पाटावर ठेवून; पीडकास हा दिल्हा – त्याचा म्हणून आम्ही पाळतो; असा नेम करावा. कळावे. नारायण.





# ६ - ज्योतिषविषयक पत्रे

## अरिष्ट योगासाठी - मृत्युंजय जप

श्रावण कृ. १८१८

सन १८९६ सप्तंबर

नारायण. पत्र पाठविलेले आहे. कोठे राहणेचा निश्चय नाही. मुक्काम होईल तसा पत्राद्वारे कळविता येईल. मुलाचे जन्मलग्न सांगितलेल्या वेळावरून वृश्चिक लग्न सिद्ध होते. जरी मारक ग्रह आहे, तरी उच्च राशीस गुरु असोन तो पूर्ण दृष्टीने पाहतो तेव्हा अरिष्ट दूर करील. तथापि काही दिवसपर्यंत केवळ मृत्युंजय मंत्राचा जप प्रत्यही १०८ सुरू ठेवावा. कळावे. (दुसऱ्याचे हस्ताक्षर)

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २२५

## ज्योतिषशास्त्री प्रारब्धापेक्षा प्रयत्न विशेष

पौष शु. १-१८२०

सिनोर (गुजरात) १२ जानेवारी १८९९

ना. उकीडवे सावंतवाडी यांस नारायण. पाठविलेले पत्र मिळाले. पण भगवद् इच्छेने ह्या वेळेपर्यंत त्याची विस्मृति झाली. आता येथे जास्ती दिवस राहण्याचा विचार नाही. कठभाष्याचा पाठ सुरु केला. तो ४-८ दिवसात संपेल. नंतर पुढे जाण्याचा विचार आहे. इकडे प्लेगचा उपद्रव साधारण आहे. स्वप्नाचा भावार्थ नोकरी मिळेल की काय? अशी इच्छा उत्पन्न झाल्यावर त्याबद्दल हे असे स्वरूप दाखवून बोलणे केले. आपला हक्क असणे किंवा वशिला नसणे इत्यादि सर्व प्राकृत विचार आहेत. **जो देणारा तो निराळाच आहे व जितका जितका लाभ होईल तितुका तितुका थोडाच होईल.** हे द्योतन करण्याकरिता (सर्व जग देऊ काय?) हे बोलणे दर्शित केले. तेव्हा निरिच्छ राहणे हे अनुग्रहाने सुचविले असे समजावे. **भाजी भाकरीचा अर्थ पूर्वप्रारब्ध** (नादत्तमुपतिष्ठति) ही सूचना पत्रांतरात करणे. भेद प्रतीतिज्ञापक विचार करून घे इत्यादि. मुलीच्या टिपणावरून राजयोग दिसत नाही. मात्र दरिद्र स्थळी पडणार नाही. विशेष कोणी सांगावे? **ज्योतिषशास्त्री प्रारब्धापेक्षा प्रयत्न विशेष मानिला आहे.** तेव्हा लग्नपति मंगळ अष्टमस्थानी असोन स्वगृही जरी आहे तथापि असाच मंजळ पाहून वराची योजना करावी हे योग्य. यापुढे विवाहाची हयगय करू नये. या वर्षी योग प्रायः यावा. सर्वांस नारायण.

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक २२६

## पक्षी व अवस्था बल पाहून शुभाशुभ

प्रभासपट्टण चै. शु. ९-१८२१
१९ एप्रिल १८९९

वे.शा.सं. नारायण दीक्षित नरसोबावाडी यांसी नारायण. पत्र पावले. दत्तपुराणातील श्लोकहि पोहोचले. अष्टका श्राद्धरूपी असल्याने प्रणव नको. इतर मंत्रालाही प्रायश्चित्तादि संबंधाने गायत्र्यादिकांला प्रणव नको.

समावर्तनानंतर स्नातकावस्थेत ब्रह्मचर्य धर्माने वेदाध्ययन करावे. पत्नी नष्ट होता किंवा मरता दर्भपत्नी करून अग्निपरिचर्या करावी असे श्रौत प्रमाण व प्रचारही आहे. हा नियम स्नातकाला लागू नाही. यावत् आश्रम न होईल तवपर्यंत गायत्री पवित्रादि जपपूर्वक यथेष्ट अध्ययन करावे.

अन्वष्टकादि श्राद्धातील पुनरग्नि स्थापनाविषयी अग्नि नामाचा विचार आहे. तूर्त येथे खेडागाव असल्यामुळे विचार करण्यास अवघड नाही. पाहाडात फिरल्यामुळे पत्र पाठविण्यास अवकाश घडला. आता तूर्त येथोन पुढे जाणेचा विचार आहे. दुसरे पत्र आल्यावर उत्तर पाठवावे.

वे.शा. सं. आहिताग्नि कानंभट अग्निहोत्रीबुवा, दुर्गाराम भटजी वगैरे सर्वांस नारायण.

एतत् खगेष्ट्या ह प्राण पक्षी वेदान्तपर व लौकिक प्रस्तुत पक्षीपर अर्थ त्यांचे फल (स्वात्मनि) आपले मनी घेऊन फल सांगेल तो सर्व वैसावलोकी पूज्य होईल. **"न प्राणेन नापानेन"** प्राणचेष्टेने शरीर धारणादि नाना फले होत. ती बल म्हणजे आत्मा, त्यावाचून व्यथा गतिथिव्यन्यंतर असा पाठ. तिथि पथि या दोनपैकी एक बलिष्ठ पक्षी घ्यावा. श्वास असून मरणावस्थेत असली तर सुभोज्य असेल तर सत्कारी असणार नाही. ताम्रचूडाचा शुक्रवार हे प्रश्नकाळी निजदिवशी असेल तर स्त्रीमुख होईल. त्यावेळचे पक्षी व त्याच्या अवस्था बल वगैरे पाहून फल सांगावे. ताजिकात सांगितल्याप्रमाणे वर्षप्रवेश, मासप्रवेश, दिनप्रवेश करून त्यावेळचे पक्षी साधून त्यावरून शुभाशुभ फल सांगावे.

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक २२७

## सप्तग्रहीचे फल

द्वारका भा. कृ. १-१८२१
२० सप्टेंबर १८९९

वे. शा. नारायण दीक्षित नरसोबावाडी यांसी नारायण. श्रीक्षेत्र द्वारका येथे शारदा मठात क्षेम असे. पत्र पाठविल्याचे उत्तर आले नाही तरी हे कार्ड पोहोचताच सविस्तर पत्र यावे. गुरे व दूध संपत आली. महर्गता अतिशय झाली. कठीण आहे.



सप्तग्रहीचे पूर्ण फल आहे. ह्या वर्षी ह्या लोकांनी शांति जपादि उत्तम तऱ्हेने ठेवावे. सर्व शांतीपेक्षा या शांतीकडे लक्ष लागेल तर बरे. दसरा झालेवर येथून निघण्याचा बेत आहे.

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक २२८

## आता इथे पत्र पाठवू नये ....

हिंगोली (नरसी) भाद्रपद शु. १५-१८२७
२० सप्टेंबर १८९९

श्रीमत् परमहंस नरसिंह सरस्वती नरसोबाची वाडी यांसी नारायण. आपण हिंगोलीच्या पोस्टमास्तरला सांगितल्याप्रमाणे त्याला कार्ड दाखविले. श्रीगुरूंकडून झालेली आज्ञा पत्रद्वारा पाठविलेली आहे. कळावे. आता ह्या मुक्कामी पत्र पाठवू नये. नारायण.

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक २२९

## ग्रहण-स्पर्श काल

नरसोबाची वाडी आषाढ शु. ७-१८१२
२४ जून १८९०

वे. रा. शंकरभट सप्रे सावंतवाडी, नमस्कार विज्ञापना, कालचे ग्रहण ७ घटिका शेष असता. ग्रहणस्पर्श होऊन दीड घटी शेष असता मोक्ष झाला; हे स्पष्ट दिसले. अंतिम शीघ्र केंद्रावरून वक्र समजावे. असे येथचे ज्योतिषी ठरवितात. कळावे. बहुत काय लिहिणे हे विज्ञापना. श्रीदत्त.

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक २३०

## ७ योग - अभ्यास - साधन

## मालामंत्रासाठी आसन कोणते?

मूळपाती कार्तिक शु. १०-१८२७
६-११-१९०२

वे. शा. शंकर गुळवणी यांस नारायण. **माला मंत्र कोणत्याहि आसनावर करण्यास हरकत नाही. महापल्लवत्वस्वस्तिकासनावर करावा.** तुमच्या मंडळीस नारायण प्रविष्ट करावा. येथे गुरुद्वादशीकरिता राहणे केले. आता लौकरच पुढे जाणार. कळावे. निरंतर भगवद्भजनी सादर असावे. कळावे. नारायण.

॥श्री दत्त॥ **पत्र क्रमांक २३१**

# योग- अभ्यास - साधन

## चित्ताग्रतेला उपाय

प्रभासपट्टण

चै. व. ६-१८२१

१ मे १८९९

वे.शा.सं. नारायण दीक्षित नरसोबावाडी यांस नारायण. पाठविलेले पत्र पोचले. पंचीकरण भाष्य पुस्तक महाराष्ट्र लिपीतच होते. मिळाले तर बरे, नाहीतर विशेष अगत्य आहे असे नाही. **प्रतिबंध पापामुळे निश्चल होत नसते. नित्यकर्म गायत्री जपादिकरून ईश्वराराधनेने शुद्ध होईल. विशेषतः हृदयस्थ परमेश्वराचे चिंतन निरंतर करावे.** अग्निहोत्रीबुवा गोडसे वगैरे यांस नारायण. **मस्तकांी सप्तछिद्रे प्राण शब्दाने सांगितली. कुठे कुठे (जगत् सर्वं प्राण एजति निःसृतं) अत्र प्राणशब्दः आत्मवाची (प्राणेन प्राणमाबध्य) इत्यत्र स्वात्मवाची (प्राणस्तेजसा युक्तः) इत्यत्र दृष्टिविशेषत्त्वाची. प्रकृते तु प्राणशब्दः शीर्षण्यच्छिद्रवाची सप्त वै शीर्ष प्राणान् इति श्रुत्यंतरादवगम्यते तथा चैकविज्ञानेन सर्वविज्ञानमुपगम्य सृष्ट्यादिप्रदर्शनेन पुरुष एवेदं सर्वमित्युसंहाराच्छिद्राण्येव प्रतीयते भाष्यकृभ्दिस्तु सप्तशीर्षण्याः प्राणाः तस्मादेव पुरुषात् प्रभवन्ति तेषां सप्तर्चिषो दीप्तयाः स्वस्वविषयावृद्योजनानि सप्त समिधः विषयैर्हि समिध्यन्ते प्राणाः सप्त होमाः तद्विषयविज्ञानानीत्युक्तमलमिती विस्तरेण ।**

**चित्त एकाग्रतेला सोपा उपाय.**

एकान्ती पद्मासनी बसून फावले वेळी श्वासाबरोबर सूक्ष्म उच्चार करून सोऽहं जप करावा (**हंकारेण बहिर्याति सोकारेणा विशेषत्पुनः सौ इन्या**) उच्चाराने आत श्वास घेऊन हं हा बाहेर सोडावा. असा दीर्घ उच्चाराने व विद्यारण्यांनीहि (**दीर्घ प्रणवमुच्चार्थ मनोराज्यं विलीयते**) असे सांगितले आहे. **सोहमित्यत्र सकारहकारी लोपयित्वा संधौकृते प्रणवो भवति इति ज्ञेयम्** । नारायण.

॥श्री दत्त॥ **पत्र क्रमांक २३२**

## अलात्चक्रवत्संसारभ्रम

द्वारका

आश्विन शु. ५-१८२१

९ ऑक्टोबर १८९९

वे.शा.सं. दीक्षित नरसोबावाडी यांस नारायण. येथून ४ दिवसात सिद्धपूरला जाणार. टीका चार दिवसात सावंतवाडीला पाठविली. तेथून वाडीस येईल. गेल्या वर्षी काही कविता नर्मदातीराहून पाठविली. पोचल्याचे कळत नाही. कूर्म पुराणात एक अनंताचा दोरा व एक किंतानाचा कपडा होता तो स्वामींचा जाणून पोथीला ठेविला



आहे. **अलात्चक्रवत् संसारभ्रम विचाराने दूर करावा. प्रमाण मांडूक्य.** सप्तग्रहीच चालू आहे हे कळेल तर हेच फळ. तदर्थ शांत्यादि करावे. अर्वाचीन निबंधकर्त्यांनी अवघ्राण सांगितले. श्राद्धशेषान्नभक्षण केल्याचा प्रत्यवाय श्रुतीने दाखविला नाही म्हणून श्रुत्यविरुद्धस्मार्तधर्म घ्यावा अतिदेशाने. प्रातःसंध्यावत् माध्यान्ह संध्येला "हंसः शुचिः" ह्यानेच मानसिक अर्घ्य द्यावेत. (विशेषानुपलब्धेः) कृष्णशास्त्री यांसी नारायण. "**नैषा तर्केण मतिरापनेया**" "**श्रुतिमतस्तर्कोनुसंधीयताम्**" ह्या वाक्याकडे लक्ष ठेवावे. दुर्गाराम भटजीला वगैरे सर्वांना नारायण. येथे श्रावण व. ९ रोजी एक इंच पाऊस पडला. दोन वर्षे पेरे नाहीत. प्रायः गुरे मेली. गायकवाड सरकारकडून गरिबाला खायला मिळते म्हणून वाचले. बेटात पाण्याची हाकाटी आहे. १॥ पायली बाजरी रुपयात मिळते. असा कहर आहे. असो. ईश्वरी इच्छा. नारायण.

॥श्री दत्त॥ **पत्र क्रमांक २३३**

## एका स्वतंत्र उपनिषदाचा विषय

द्वारका

आश्विन शु. १५-१८२१

१८ ऑक्टोबर १८९९

रा. रा. नारायण उकीडवे सावंतवाडी यांस नारायण. पाठविलेले पत्र पावले. **तूष्णी शब्दाचा अर्थ मुकाट्याने राहणे. श्रमलेला पुरुष सर्व व्यापार सोडून इंद्रियद्वारा किंवा मनाने व्यापार न करता स्तब्ध बसतो ती तूष्णीभूत अवस्था.** इंद्रिय व्यापार नाही म्हणून जागृती म्हणता येत नाही. मनोव्यापार नसल्याने स्वप्न नव्हे. बुद्धिलय होत नाही. म्हणून ती झोप नव्हे व ब्रह्मरंध्री अवस्थिति नसते म्हणून ती तूर्या न होय. म्हणून वेदान्ती ही तृष्णीभूत अवस्था मानली आहे. ही केवळ आत्मा निर्व्यापार आहे हे दाखविण्याकरिता उदाहरणीय आहे.

**उपक्रमोपसंहार - उपक्रम म्हणजे आरंभ** - आज हे दिसणारे जग पूर्वी सत् (असणारे) च होते. हा वेदान्ती उपक्रम करून त्या जगाचा **उपसंहार म्हणजेच लय** त्याच ब्रह्मस्वरूपी सांगितला. ते उपक्रमोपसंहाररूपी एक लिंग ॥१॥ **दुसरे अभ्यास म्हणजे मी ब्रह्म अशी पर्यायाने पुनः पुनः आवृत्ति करणे. पाय बांधिलेला पक्षी कोणत्याही दिशेला उडला तरी ते पूर्वस्थितीवर येईल असे प्रयत्नाने आणावे. मग वाणी मनात, मन प्राणात, प्राण जीवतत्त्वात लीन होणे इत्यादि प्रथमाभ्यास ॥२॥ मक्षिकेने नाना रस एकत्र केल्यावर हा अमुक वृक्षाचा आहे असे भान राहत नाही, तशा सर्व वृत्ति लीन झाल्यावर एक रस (आनंद) होतो हा दुसरा अभ्यास ॥३॥ नद्या समुद्राला मिळाल्यावर नामरूपे नष्ट होऊन एक समुद्रच होतो हा तृतीय अभ्यास ॥४॥ मूळ तुटले असता वृक्ष वाळतो तसे जीवाने सोडलेले शरीर मरते, जीव मरत नाही तो ब्रह्मांश आहे. तत्त्वज्ञानाने उपाधि नष्ट होता मुळ ब्रह्मात जातो हा चतुर्थाभ्यास ॥५॥ वडाचे सूक्ष्म बीज फोडल्यावर जे दिसत नाही परंतु हवा पाणी मिळता वृक्षरुप**

**होते तद्वत वासना, परिणाम, तो भजावा हा पंचमाभ्यास ॥६॥ चोराने डोळे झाकून देशांतरी नेलेला पुरुष दुसऱ्याने मार्ग दाखविल्यावर स्वस्थानी येतो तसा गुरूपदेशाने मुमुक्षु हा स्वस्थानी जातो हा षष्टमाभ्यास ॥७॥ मरणोन्मुख पुरुष स्वजनांचे रडणे जाणत नाही तसा वृत्तिनिरोध केलेला पुरुष इंद्रियाच्या लालुचीला जाणत नाही हा सप्तमाभ्यास ॥८॥ तापविलेले स्वर्ण जळत नाही तसा अहंकार सोडणारा लिप्त होत नाही हा अष्टमाभ्यास वेदांताने ज्ञान होते हे अपूर्व ज्ञान झाल्यावर विदेह मुक्ति होते हे फळ.** अर्थवाद उपपत्ति लिहिलेली आहेच. हा स्वतंत्र एका उपनिषदाचा विषय पत्रात लिहिता येणार नाही ज्याला पुढे बाधा नाही ती प्रबळ श्रुति, ज्याला अपवाद येतो ती निर्बळ श्रुति. जशी ऋतुकाळी भार्यागमन न केले तर भृणहत्या हिला, श्राद्धदिन पर्वकाळी स्वस्त्रीगमन केले तर नरक होईल हा अपवाद इत्यादि जाणावे. माघ माहात्म्याची प्रत वाडीवर पाठविली आहे. बरोबर संग्रह नाही. येथे दत्तलीलामृतसिंधू मात्र आहे. शिवाय येथील लोकांनी गाणी स्फुट आरत्या करविलेली मात्र आहेत. येथे का. १५ पर्यंत राहणे होईल. प्लेगसंबंधाने प्रतिबंध बराच आहे. कळावे, नारायण.

---

॥ श्री दत्त ॥ **पत्र क्रमांक २३४**

## चित्ताच्या वृत्ती-त्यांचे नियमन

पहिल्या अध्यायामध्ये अध्यारोप सृष्टि सांगितली त्यावेळी पंचीकृत स्थूल भूतापासून स्थूल देह झाला हा अपंचीकृत सूक्ष्मभूत सत्त्वांशे ज्ञानेंद्रिय, अंतःकरण आणि रजोगुणागादि कर्मेंद्रिये व प्राण झाले. या सर्वांच्या ऐक्यापासून लिंग देह झाला असे सांगितले आणि ह्या अध्यायात स्थूल सूक्ष्म शरीराला अज्ञानच कारण म्हटले म्हणून पूर्वापर विरोध मानून शिष्याने प्रश्न केला; त्यावर गुरुंनी अध्यारोप सृष्टि म्हणजे प्रथमाध्यायोक्त एका पुढे एक उत्पत्ति झाली. ह्या प्रकरणी पंचभूतापासून दोन देह होतात हे खरे पण वास्तविक युगपरत्वे सृष्टीचा विचार केला तर अज्ञानच सर्वाला कारण आहे. म्हणणे योग्य आहे. वेदामध्ये केव्हा केव्हा अध्यारोपसृष्टि (एकापुढे एक क्रमाने होणे) व केव्हा केव्हा युगपत सृष्टि (एकदम अज्ञानाने सर्व प्रपंच दिसणे) मानले आहे. पंचदश्याम् (द्विविधस्वप्नदर्शनात्) केव्हा केव्हा स्वप्नामध्ये एका पुढे एक क्रम दिसतो व केव्हा केव्हा एकदम थाट दिसतो तद्वत सृष्टी ही जाणावी. अध्यारोप सृष्टीमध्ये पंचभूत दोष शरीराला कारण व युगपद सृष्टीमध्ये केवळ अज्ञानच कारण असे गुरूंनी समाधान केले. त्याच्या नित्यत्वाचे विवेचन मुमुक्षूने करावे हा अभिप्राय. कळावे, नारायण.

राग, द्वेष, काम, क्रोथ, लोभ, मोह, मद, मत्सर, ईर्ष्या, असूया, दंभ, दर्प, अहंकार, इच्छा, भक्ति आणि श्रद्धा ह्या सोळा चित्ताच्या वृत्ति होत. (१) स्त्रियांचे रूप लावण्य, सौंदर्य, हावभाव पाहणे. थट्टा, रतिसंभोगादि करणे. अशी उठणारी चित्ताची जी वृत्ति तिला राग म्हणतात. सुख, स्नेह, प्रीति, रस, आसक्ति इत्यादि हे हिचे पोटभेद



होत. हा राग वारंवार गुणवृद्धिने स्त्रियांचे विलोकन, त्यांच्याशी भाषण, विलास, थट्टा, क्रीडा, आलिंगन किंबहुना स्मरणही केल्याने वाढतो. तो जो हाडामासाचा मळमूत्ररक्तकफादिकाने भरलेल्या, ह्या देहाच्या चिंतनाने व त्यापासून होणाऱ्या क्षणभंगुर सुखाने काय होणार? बंधन मात्र होईल, त्यापेक्षा स्वये शुद्ध असून शुद्ध करणारे शास्त्राने सांगितलेले देवाचे ध्यान मनात आणावे म्हणजे राग शांत होतो. (२) कोणी आपल्या विरुद्ध केले तर त्याचे वाईट करण्याची इच्छा तो काम द्वेष (दुःख, भय, उद्वेग, शोक हे त्याचे पोटभेद) हा मनाला मागे वळविणाऱ्या शमाने हटतो. (३) गृह, धन, वस्त्रादि संपादन करण्याची इच्छा तो काम (प्रीति, अपेक्षा हे त्याचे भेद आहेत) हा इंद्रि निग्रहरुपी दमाने हटतो. (४) स्वमनोगताहून विरुद्ध करणाऱ्यावर संताप करणे तो क्रोध. (पश्चाताप हा त्याचा भेद) हा क्षमेने हटतो. (५) हाती असलेले खर्च करू नये हा लोभ (कार्पण्य हा त्याचा भेद) लोकामधे रक्षण केलेले कोणाचे राहिले, साठा केल्यास आपुल्यास घात होतो व ज्यांनी सर्वस्व दान स्वदेशसुद्धा दिला ते धन्य झाले. तेव्हा द्यावे अशा औदार्याने तो हटतो. (६) ऐश्वर्य, विद्या किंवा अधिकार यांच्या योगे ताठा करणे व कृत्याकृत्य मनी न आणणे तो मोह. हा कोणाचे ऐश्वर्य राहिले, सर्व नश्वर आहे, उगीच का ताठा करावा अशा मनाच्या उपशमाने नष्ट होतो. (७) मला लोकांची पुष्टि आहे किंवा संपत्ति आहे. त्या जोरावर काय पाहिजे ते करीन हा मद. जर आज हे पाप घडले तर पुढे यातना भोगावी लागेल तेव्हा यापासून मागे फिरावे या उपशमाने तो हटतो. (८) विद्या धनादिकेकरून स्वसमान किंवा अधिक पाहिल्यावर किंवा ऐकल्यावर ते सहन न होणे तो मत्सर हा संतोषाने हटतो. (९) हे दुःख शत्रूला व्हावे ते मला का झाले ही ईर्ष्या, माझ्या प्रारब्धाने आलेले मी सोशीन देवा हे शत्रूला सुद्धा नसावे अशा तितिक्षेने, सहनशीलतेने हटते. (१०) हे सुख किंवा हा लाभ मलाच असावा इतरांना काही असू नये ही असूया. सुख आले किंवा लाभ झाला तसे नश्वरांचा होईल. मी तर अविकारी आहे ह्या समाधानाने नष्ट होतो. (११) ह्या कपटधमनि माझी प्रसिद्धि व्हावी हा दंभ. हा लोकांना तरी ईश्वर खरे जाणणार आहे तो कपटाचे फळ देईल तेव्हा जसे अंतरीच तसेच बाहेर काढावे करावे, या सत्यतेने हटतो. (१२) दुसऱ्याची पाडापाडी करून मी बरा म्हणणे हा दर्प. हा अपैशुन्याने सुजनपणाने दूर होतो. (१३) स्वमताग्रह करणे तो अहंकार. हा मी कःपदार्थ कशाला अभिमान करतो ह्या विवेकाने नष्ट होतो. (१४) खाण्यापिण्याची व मलमूत्रोत्सर्ग करण्याची वांछा ती इच्छा, हटविली तर दुःख मात्र होईल व इने स्वर्ग व नरकही नाही. (१५) साधु, गुरू, देववाक्य विश्वास, ती श्रद्धा, ती असंगपणे निष्काम कर्म केल्याने वाढते. हिचेपासून उपरति तितिक्षादि गुण होतात. **पहिल्या तेरा वृत्ति आपोआप पुनः पुनः उठतात व नरकात घालतात, म्हणोन त्या अशुद्ध म्हणून तया वृत्ति उठताच अडवून त्या वर सांगितल्याप्रमाणे रोधून वारंवार भक्ति, श्रद्धा ह्या शुद्ध आहेत म्हणून प्रयत्नाने उठवाव्या. कळावे, नारायण.**

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक २३५

## दृष्टि स्थिर झाली की चित्त स्थिर होईल

चिखलदरा भाद्रपद शु. ४-१८२२
२९ आगस्ट १९००

रा. रा. बाबू बळवंत कुलकर्णी नरसोबाची वाडी यांस नारायण. पत्र पावले. जर मन आवरत नसेल तर क्रमाक्रमाने पायापासून मस्तकापर्यंत ध्यान करावे. तेथे दृष्टि स्थिर झाली मग चित्र स्थिर होईल. गर्दीमुळे आरती करून देता येत नाही. कळावे, नारायण.

---

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक २३६

## समाधि - साधन

मंडलेश्वर मार्गशीर्ष १८२२
डिसेंबर १९००

वे.शा. गणेश सातवळेकर, कोलगाव – सावंतवाडी यांस नारायण. आवश्यक हठकृत्य – हकार उ. सू. ठकाश्च (१) विपरीत करणी (२) पश्चिमतान (३) शक्तिचालन. सूर्य नाडीने श्वास घेऊन वज्रासनावर बसून परिधान युक्तीने रोज पाच याप्रमाणे १०० पर्यंत (मागे ठाण देऊन मस्तक टेकून बोटे सोडून पुनः पुनः याला परिधान युक्ति अथवा सूर्याकुंचन म्हणतात) तद्नंतर डाव्या पायावर उजवा पाय टेकून पायाचे पृष्ठभाग दोन हातांनी धरुन नाभींचे म्हणतात. नंतर पद्मासनावर बसून यथाशक्ति क्रमाने आठप्रमाणे भस्त्रा कराव्या म्हणजे ४० दिवसांनी कुंडली उत्थान होते.

रोज भस्त्रिका केल्यानंतर समासनावर बसून 'सो' शब्दाने तोंड मिटून नासिकेने श्वास सोडावा. याप्रमाणे तीन महिन्यानंतर सर्वांग शून्य होत जाते नंतर 'हं' हा शब्द मस्तकात घुमतो. त्याजकडे चित्तवृत्ति ठेवावी. म्हणजे चित्तलय होतो. नंतर तेजःपुंज स्वरूपाचे भान मात्र राहते. ह्याप्रमाणे केल्यानंतर समाधि होत जाते. षण्मुखी मुद्रा करून वायू सोडावा व परत करावी.

शक्तिचालन झाले म्हणजे मुंग्या अंगात चढल्यासारख्या होतात. हे सुमारे ३० दिवसांनी होते ८-१५ दिवस होते. मग ब्रह्मरंध्रात जातो त्यावेळी भोवयात दुखू लागते. कपाळ भोवू लागते. असे आठ दिवस होते. मग बंद होते. अंधकार दिसतो. मग चंद्रोदयाप्रमाणे ज्योतिर्मय दिसते.

पद्मासनावर बसून (सारखा) तोंड झाकून उजव्या नासिकेने रेचून अत्यंत पूरक करावा. नंतर रेचक करावा. परत पूरक करावा. याप्रमाणे करावे, वाटल्यास उजव्याने पूरक करून सबंध कुंभक करून डाव्याने सोडावे. नंतर पूर्ववत् करुन श्वास उजव्याने सोडावा. यांस भस्त्रिका म्हणतात. नारायण.



॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक २३७

## नियम घडत नसता अभ्यास करणे बरोबर नाही

महतपूर अधिक श्रावण व. ११-१८२३
११ ऑगस्ट १९०१

नारायण. पत्राचे उत्तर तेव्हाच पाठविले. ते का न मिळाले कळत नाही. आर्या वगैरे पाठवून द्याव्या. कौमुदी म्हणावी. तिची आवश्यकता आहे. परंतु वेदाचे अंगहि राखावे. अभ्यास करणार तर सर्व विषय ठेवलेच पाहिजेत. **नियम घडत नसता अभ्यास करणे बरोबर नाही.** ईश्वर इच्छेने स्वातंत्र्य मिळाल्यावाचून विशेष अभ्यास न करावा. दीड दोन महिन्यांनंतर शब्द स्पष्ट कळून येतात. ते अनुक्रमे वाढून मेघनादापर्यंत पोचल्यावर पुनः सूक्ष्म होतात. पूजा पाहिली तो एक चित्ताचा अध्याय हे सांगणे नव्हे. तीन वेळ गायत्री, अग्निमीळे ऋचा, नमो ब्रह्मणे म्हणतच अडचणीचे वेळी ब्रह्मयज्ञ होतो. आ ब्रह्म हा मंत्र जीवत् पितृकांनी म्हणू नये. स्वाधिकारे तर्पणच करावे. केलेले सर्व समर्पण करून रिकाम्या वेळी ईश्वर स्मरण करावे. हे भजन ईवशराचे चिंतन असल्यावर अनुक्रमे भक्ति जडून चित्त स्थिर होईल. पुरश्चरण इतर मंत्राचे करणार तर आपल्या स्नानाकरिता जो ब्राह्मण नेमावयाचा त्याला १००८ किंवा १०८ गायत्रीचा जप करावयास लावावा व स्वये पुरश्चरण करावे. येत्या चंद्रग्रहणात द्वादशाक्षरीचे पुरश्चरण करावे. फावलेल्या वेळी भागवताचे अवलोकन ठेवावे. **कृष्णाजिन ऊर्ध्वलोम पूर्वमुख पश्चिमपुच्छ असावे. त्यावर पूर्वमुख किंवा उत्तरमुख बसावे.** उपासना ठेवणार तर इष्ट देवाच्या पादुकांची वैदिक मार्गाने पूजा करावी. मांत्रिक प्रकार दुर्घट आहे. तिथिपालन करणे अवश्य आहे, ते चातुर्मास्यात असेच नाही; नित्य घडेल तर बरेच आहे. नाहीतर मुख्य एकादशी ठेवावी. जाग्यांविषयी येथून काय सांगणार? कोणाकडून तरी खात्री करून घ्यावी. कळावे नारायण. (वे.शां.सं. गणेश व्यंकटेश सातवळेकर, राहणार कोलगाव यांना पाठविलेली पत्र)

---

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक २३९

## अनन्य शरणता ठेवावी

बिठोर आश्विन व. ४-१८२४
२० ऑक्टोबर १९०२

नारायण. पत्र पावले. आजपावेतो श्रीगुरूंनी सेवा जशी घेतली तशीच पुढेही घेतील. आपण अनन्यशरणता ठेवावी – काय चिंता करून होणार? मातोश्रींची प्रकृति बिघडून बरेच दिवस होऊन भोग सरत नाही हा एक दुर्घट दैवयोगच असला पाहिजे. असो. यावत् जीवित काळ असेल तावत् घडेल. तशी सेवा ठेवावी. बुक पोस्ट करून पाठविलेले पुस्तक विष्णू दीक्षित यांस द्यावे. त्यांनी टीका पाठविली ती उत्तम आहे. त्यांनी

काही शोध विचारले होते. परंतु माळव्यात जी टीका हाती मिळाली त्या वेळेपासून आजपावेतो बाहेरच फिरत होती. आता हाती मिळाली. ती सर्व वाचून पाहून उत्तर पाठविता येईल. आर्याची वही गणेश उर्फ सखाराम सातवळेकर याची आहे. ती कोलगावी असलेले सातवळेकर यांस द्यावी.

येथे भला येऊन पाच महिने राहिला आहे. पूर्वीचा दैवयोग काय होता तो असो पण तूर्त येथे वेदांताचे पाठ चालतात; त्याबरोबर श्रवणाचा व पठणाचा उद्योग बराच चालविला आहे. त्याला जा अथवा राहा असे काहीच सांगितले नाही. चार पढतात त्यात का पढेना? सन्मार्ग आहे व गंगास्नान होत आहे. कळावे. नारायण.

---

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २३९

## अजपाजप घडेल तितका करावा

विठूर

का. शु. १-१८२४

१ नोव्हेंबर १९०२

रा. रा. सखाराम बापू सातवळेकर कोलगाव यांस नारायण. पाठविलेल्या आर्या ज्या ज्या वेळी शोधण्याचा उपक्रम काढावा त्या त्या वेळी अडथळा यावा. एवं सर्व तपासून झाल्या नाहीत. **तेव्हा ज्या करणाऱ्याच्या प्रेमाने घडल्या त्या प्रभूला मान्यच आहे असे मानून तशाच पाठविल्या.** योग व जपादि न घडेल तर आहे त्यात ज्यावेळी जितका अवकाश मिळेल तितका अजपाजप (**ह कारेण बहिर्याति सोकारेणाविशेत्पुनः**) इत्यादि **लक्षण घडेल तितका करावा व वृत्ति दृश्य त्याचा द्रष्टा मी साक्षी असे अनुसंधान वारंवार राखावे.** कळावे, नारायण.

---

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २४०

## पादुकांचे चिंतन करावे

नरसी

भाद्रपद शु. १२-१८२७

१० सप्टेंबर १९०५

वे. शा. शंकर (पुजारी) नरसोबाची वाडी यांस नारायण. पत्र पावले. ज्याप्रमाणे स्वप्न झाले तसे भजन करावे. **साधी करणे म्हणजे फावले वेळी एकांती बसून पद्मासन घालून स्वस्थपणाने बसून पादुकांचे चिंतन करावे.** नारायण.

---

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २४१

## कर्तव्याचे अनुसंधान सोडू नये

नरसी

भाद्रपद शु. ५-१८२७

५ सप्टेंबर १९०५



श्रीमत् परमहंस नरसिंहसरस्वती स्वामी यांस नारायण. आज दोन पत्रे पावली. कविता पाहून आनंद झाला. ही भगवत् स्फूर्तीच होय. **"येथे काही पाठवू नये" असे जे सांगणे झाले त्याचा अभिप्राय प्रणवोपासना सिद्धीने बोललेले सत्य होईल व काही अतर्क्य समजुतीस येईल. तरी तसे न करता आपल्या कर्तव्याचे आपण अनुसंधान सोडू नये.**

श्री. प. प. शंकरानंद स्वामी, परमानंद स्वामी, गोपाळस्वामी यांस प्रणवपूर्ण नारायण. **अनुसंधान एव स्थातव्यं.**

आत्मारामबुवा आदिकरून सर्व मंडळीस नारायण. शुद्धिपत्राचे उत्तर दोन दिवसांनी मिळेल.

---

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २४२

## चातुर्मास समाप्ति विधी

नरसी

शके १८२७

श्री प. प. नरसिंह सरस्वती स्वामी नरसोबाची वाडी यांस नारायण. **कृष्णालहरीपैकी श्लोक २१ दत्ताये दत्तः शुभावहविधिर्यया सा/अंकमुपरि शुद्धं (अंबमितित उपर्यध्वधसः सामीप्य इति द्वितीया अंकस्योपरीत्यर्थः। आभूः आसमंतात भवति आस्ते इति आभूः। ४६ कद शनं दुष्टान्न भोजनं। ४९ हे स्वये शोभनः आयः शुभावह विधिः यस्यास्त्सबुद्धौ** यजमान पत्नी गरोदर असता मातेकडून भिक्षा घेता येणार नाही. पिता असता तर तोच यजमान होईन. मग दोष नाही.

**उ.शु. अधिज्योतिषं चतुर्थी पितृणां मुं माया नारुपकृतेन तस्मा, के शिष्यात् हा पाठ आहे.** विमोक्षायैव हाहि पाठ आहे. चातुर्मास्य संपला म्हणजे पौर्णिमेचे दिवशी नित्याप्रमाणे क्षौर करावे आणि माध्यान्हांनंतर सीमांतर करून गुरुवंदन गीतेचा ११ वा अध्याय म्हणून पुनः गुरुदेवता वंदन करून मठात यावे. नारायण.

---

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २४३

## साक्षी चित्प्रत्यगात्मा - भावना ठेवावी

मूळतापी

आश्विन कृ. १-१८२७

१४ ऑक्टोबर १९०५

श्रीमत् परमहंस नरसिंह सरस्वती व सर्व स्वामी मंडळीस नरसोबाची वाडी - नारायण. पत्र पावले. जसा क्रम चालू आहे तसा असू द्या.

**नो देहो नेंद्रियाणि क्षरमपि चपलं नो मनो नैव बुद्धिः। प्राणो नैवाहमस्मीत्यखिलजडमिदं वस्तुजातं कथं स्यात् ॥ नाहंकारो न दारग्रहसुत सुजन क्षेत्रवित्तादि दूरः। साक्षीचित्प्रत्यगात्मा सकलजगदधिष्टानभूतः शिवोहं ॥** अशी भावना सदा ठेवावी. पुजारी मंडळीस नारायण. सीताराम टेंबे यांस नारायण. दिवाळी होताच येथून गंगातीरी जाणे

होईल. गं.भा. दुर्गाबाईस नारायण. नरु गोविंद यांस नारायण. गंगातीरी जाताच पत्र पाठविता येईल. आत्माराम बुवा यांस नारायण. तुमचा प्रकार ऐकून बरे वाटले. अनाश्रम्यांनी करण्याचे जपादि उत्तरमीमांसा तृतीयाध्याय पादात आहे. येथे ते पुस्तक नाही. आपल्यास पाठविता येईल. **भागवत स्त्रीणां निरीक्षणं स्पर्श संल्लाप क्ष्वेलनादिकम् प्राणिनो मिथुनीभूतान ग्रहस्योग्रतः त्येजत्। शौचमाचनं स्नानं संध्योपासन मार्जवं। तीर्थसेवा जपोस्पृश्याभक्ष्या संभाष्य वर्जनं ॥ हे नित्य अवश्य राखावे स्कं. ११ अं. ७.**

कालकुंद्रीकराकडून नवीन दत्तात्रेय चंपूच्या प्रती मिळाल्यास एक वाडीवर ठेवावी. शंकर सप्रे यांस एक द्यावी. रा. रा. बाबूराव यांस नारायण. मागितल्याप्रमाणे **भोजनपात्राची सुपवित्रा। नीरांजन उररी करी करि शुचि मम गात्रा ॥ध्रु.॥** माध्यान्ही इत्यादि कडवी पाच आहेत.

खोकल्यावर आत्मारामबुवांकडून केल्या असतील त्या सोमलाच्या गोळ्या घेऊन द्याव्या. नसल्यास कोणाकरवी करून घ्याव्या. कळावे. हेच पत्री वे.शा. दत्तभट दीक्षित यांस नारायण. **आपण तूर्त इकडे तिकडे न जाता वाडीवरच राहून गायत्री पुरश्चरण करावे नंतर जी इच्छा आहे ती पुरी होईल.** कळावे. नारायण.

---

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २४४

## मुलाबद्दल शिवास अभिषेक करावा

रा. रा. नारायण उकीडवे यांसनारायण. कवच शुद्ध केले आहे. श्रीगुरूंची पूजा करून पुढे पुस्तक ठेऊन वाचावे. श्रावणापासून सुरू करावे. मुलाबद्दल शंकराभिषेक करावा. कुडेपाक द्यावा. कळावे, नारायण.

---

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २४५

## आपल्या नादी न वागता तिकडेसच प्रार्थना करावी

नरसी

कार्तिक कृ. ४-१८२७
१६ नोव्हेंबर १९०५

वे.शा.सं. नरसिंहवाडी क्षेत्रस्थ पुजारी प्रभृति यांस नारायण. वासुदेवानंद सरस्वती यांचे नारायण. सर्व मंडळींनी पाठविलेले पत्र पोहोचले व त्या दिवसापासून पुन्हा पुन्हा प्रार्थना केली. परंतु काहीच निरोप झाला नाही. पुन्हा तिकडे येण्याचे, पण वाडीवरून जिकडे जाण्याचे सांगणे तिकडे तर जाणे झालेच नाही. यावेळी चालीचा घोटाळा होत आहे. कधी जाऊन पुन्हा येणे होणार ते होवो. **तुम्ही पुन्हा येईपावेतो भजन ठेविता असे लिहिले आहे. तरी एव्हढा निग्रह कशाला?** आता जितके दिवस चालेल तितके दिवस चालवावे. निदान प्रत्यही सायंकाळी तरी नियमाने करावे. घाणीबद्दल खुलासा झाला नाही. पण क्रूरता दिसत नाही. पण प्रार्थना करूनसुद्धा सांगणे होत नाही. तरी



तुम्ही आपल्या नादी न वागता तिकडेस प्रार्थना करावी. कळावे. सर्व स्वामी मंडळी, पुजारी, सकुटुंब सपरिवार सेवेकरी व क्षेत्रस्थ यास नारायण.

---

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २४६

## सर्वांसी मिळून रहावे

कानपूर

वैशाख शु. ४

नारायण. प्रसाद पावला. आपण सर्वांसी मिळून रहावे. पुन्हा सेवेवर घेतील. थोडा थोडा वाचण्याचा अभ्यास ठेवावा.

**स्तोत्र – नमस्तेऽनसूयासुतायर्ति हंत्रे।**
**नमस्तेऽत्रिपुत्राय सर्वाधिहंत्रे। ....**
**शिवं कर्मणीऽयाधि हत्रींच कीर्तिः ॥४॥**

---

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २४७

## चंडीपाठ व रुद्रानुष्ठान करावे

वढवाई (खेडेघाट)

श्रावण व. ९-१८२८
१३ ऑगस्ट १९०६

रा. रा. उकीडवे सावंतवाडी यांस नारायण. चंडीपाठ व रुद्रानुष्ठान शिवाय सर्वांनी भजन करावे हाच उपाय. कळावे. नारायण.

---

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २४८

## देहत्रयी व्यापाराचा साक्षी - श्रीदत्त

बढवाई

श्रा. व. ११-१८२८
१५ ऑगस्ट १९०६

श्री प. नृसिंह सरस्वती यांस नारायण. पत्र पावले. सदा येता जाता सर्व काळ जे देहत्रयी व्यापार होतात, त्या सर्वांचा साक्षी जो भगवान् दत्त, तदरिक्त मी नाही; असे साक्ष्यनुसंधान ठेवावे. नारायण.

---

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २४९

## स्वानुसंधानाचा प्रमाद – तेच मरण

तंजावर

ज्ये. शु. १२–१८२९
२३ जून १९०७

श्री परमहंस नृसिंह सरस्वती नरसोबावाडी यांस नारायण. ज्ये. शु. एकादशी रोजी येथे येणे झाले. उद्या पुढे जाऊ. का. शु. त्रयोदशी व तृतीयेची पत्रे पावली. जी

गुरूंची सेवा होत आहे ती आमची होय. (यस्य देवे परा) असे आहे. तेव्हा अशीच सेवा चालली म्हणजे भगवत् कृपेने हार्द तमो नाश होऊन स्वात्मज्योतिः प्रकाश होईल. अधिक महिना असल्यास दोन महिन्याने दुसरे असे क्षौर आहे. श्री. प. परमानंद स्वामी यांना नारायण. **स्वानुसंधानाचा प्रमाद न व्हावा, झाला तर तोच मरण समजावे.** चातुर्मास्य याजी वामन – दत्तू – वामन – अंतोबा – वामन बड्डू पंडित काकतकर, हळवे, अण्णा दीक्षित, अंतूबा आदि करून भजन मंडळी कवीश्वरादि करून सर्वांस नारायण – स्वप्ने भयसूचक होत आहेत हे जाणून सर्वांनी प्रेमाने भजन सुरू ठेवावे. केशव काळकुंद्रीकरांनी मंत्राचा न्यास मागितला पण कार्डामध्ये म्हणून दिला नाही. तरी तेथे त्याला द्यावा.

**दत्तात्रेय अंगुष्ठः हरिः कृष्ण तर्जनी उन्मत्तानंददायक मध्यमा मुनिर्दिगंबरः अनामिका। बालःपिशाचः कनिष्ठिका ज्ञानसागरः। करतल एवं हृदयादि ध्यानं – माला कमंडलु ॥ संतानगोपालाचाहि मंत्र द्यावा.** नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २५०

## प्रमीत पितरांचे कोणी नाही म्हणून उपोषण

नारायण. पत्र पावले. काढा संपणेबरोबर सुरू करावा. स्वामीला जर प्रमीत पितरांचे कोणी नसल्यामुळे अनहित होते असे वाटल, तर उपोषण करण्यास सांगावे. **निःशेष ममताशून्य झाल्यावर काही गरज नाही.** नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २५१

## तूर्त गुरुचरित्र वाचन व सूक्त जप

श्री प. नृसिंह सरस्वती यांस नारायण. वाडीवरून आलेले पत्र ठेऊन श्रीचरणी प्रार्थना केली परंतु उत्तर न मिळाले. **तूर्त अप्रसिद्धपणे गुरुचरित्र वाचण्यात सात ब्राह्मण व ''यत इंद्रमयामहे'' या सूक्ताचा रोज जप बारा हजार सुरू ठेवावा.** नारायण

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २५२

## जितका जप घडेल तितका घडूं द्या

संध्या मंडप १८२९ – १९०७

श्रीमत् परमहंस प. छात्रीभूत नारायणयति नृसिंहवाडी यांस नारायण. श्रम होणजोगी विश्वेश्वरी पाहू नये. नित्यकर्मे ज्याप्रमाणे लिहून दिली असतील तशी करावी. विशेष कमी दर ठेवून भ्रमणींचे प्रयोजन नाही. जितका जप घडेल तितका घडू द्या. अमुकच झाला पाहिजे असा आग्रह नाही. भिक्षा एकदाच आणावी असा शास्त्रार्थ आहे.



परंतु तसा प्रसंग येऊन पुन्हा मागितली तरी हरकत नाही. ''नान्नदोषेण मस्करी इतिस्मृतेः'' अलं इति. श्री प. प. गोपाळस्वामी यांस – चालू क्रम तसाच चालू द्यावा. भगवत् प्रसादाने सिद्धि होईल. मुंबईचे बाईस पथ्य तेल, वातूळ,आंबट वर्ज्य. गजाननास नारायण. अजून सेवा चालू द्या. दोन ब्राह्मण सांगणे ते संबंधी प्रेतरूपी परमेश्वरप्रीत्यर्थ असाच संकल्प करून ब्राह्मणभोजन करवावे. शिव कवचाचा पाठ करावा. नरुअण्णा यांस नारायण. तूर्त येणेचे करू नये. पुढे थोडे काळात उत्तरेकडे जाणे झाल्यावर काही दिवस सहवास होणजोगे राहणे करावे. तसेच गं. भा. दुर्गाबाईस सांगावे. आत्मारामबुवा, सखारामबुवा आदिकरून सर्वांस नारायण. सर्व पुजारी मंडळी, सपरिवार क्षेत्रवासी, सेवेकरी या सर्वांस नारायण. अण्णाकडून पत्र आले. त्यावरून श्रीगुरूंची बरीच प्रार्थना केली पण अद्याप उत्तर नाही. होताच कळविता येईल, कळावे. काही गडबडू नये. एकास गुरुचरित्र सप्तशती पाठविणे करिता तिकीट दिले आहे. नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २५३

## ठरविल्याप्रमाणे चालू द्या

श्री प. नृसिंहसरस्वती नृसिंहवाडी यांस नारायण. बारा मंडळींनी रोज शंभरप्रमाणे दहा दिवस करणेचा विचार केला, त्याप्रमाणे तूर्त चालू द्या. नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २५४

## श्रीचरणाकडे अनन्य शरण व्हावे

संध्यामंडप (तंजावर) भाद्रपद १८२९
सप्टेंबर १९०७

नारायण. **जसे तुम्ही भक्त तसाच हाहि एक साधारण जीव आहे.** श्रीगुरूंच्या प्रेरणेवाचून ते कसे यावे व असे न होऊनही काहीच प्रतिबंध न झाला हे प्रभुसत्तेवाचून होईल काय? नंतर हे सर्व मनात आणून सर्व क्षेत्रवासी व विशेषतः पुजारी मंडळी यांनी प्रथमतः श्रीचरणप्रसाद व्हावा असे श्रीचरणाकडे अनन्य शरण व्हावे. मागच्या पत्रात स्वामीकडे उपाय कळविलाच आहे. इकडे त्या संबंधाने काही सांगणे झाले नाही. नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २५५

## हंसाश्रमपरित्याग झाल्याने संध्याधिकार नाही

श्री प. प. नृसिंह सरस्वती नरसोबावाडी यांस नारायण. हंसाश्रमपरित्याग झाल्याने सध्याधिकार नाही. प्रणवानुष्ठान श्रवणादिक करावे. सर्वांस नारायण.

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक २५६

## उपोषण सोडून माधुकरी वगैरे करावी

तंजावर

मार्ग शु. ८–१८२९

२८ डिसेंबर १९०७

रा. रा. कृष्णा गोविंद नाईक नरसोबावाडी यांस नारायण. तंजावरास पत्र येऊन राहिले. आता त्यांनी दिले. देवाच्या निरोपाप्रमाणे कार्य होईल. पण अजून थोडे दिवस राहणे. उपोषण सोडून माधुकरी वगैरे करावी. कळावे, आता उत्तरेकडचा रस्ता धरला. नारायण

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक २५७

## गुरुचरित्र ५ ओव्या नित्य चुकवू नये

मुक्त्याला

भाद्रपद व. ९–१८३०

१९–९–१९०८

नारायण. येथोन आताच निघणार. मंडळी सर्व सांगतील. गुरुचरित्राच्या ५ ओव्या नित्य चुकवू नये

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक २५८

## चित्त शांततेसाठी प्रणवाभ्यासाकडे चित्तवृत्ती ठेवावी

हावनूर

भा. १२–१८३२

१९१०

**श्री प. नरसिंह सरस्वती यांसी नारायण.**

**सत्त्वप्रधानं मायावच्छिन्नं सर्व गुणाश्रयं ।**

**ओंकारोपाधिकं ब्रह्माहमस्मीति विभावयेत् ॥१॥**

प्रणवाभ्यासाकडे चित्तवृत्ती ठेवल्याने चित्त शांत होईल.

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक २५९

## पुढे विशेष सेवा

कुरगड्डी

भाद्रपद कृ.९–१८३३

१७ सफ्टेंबर १९११

वे.शां.सं. तुळपुळे(नृसिंहवाडी) यांस नारायण. पुर्वी ४६ सप्ताह व गायत्री जप करणेस सांगणे झाले. त्याप्रमाणे घडला असताहि अजून पूर्वीप्रमाणेच पीडा आहे तर विशेष सेवा चालवा. गती मिळेल. नारायण बंडू शागीर्द यांस नारायण.

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक २६०

## माला मंत्राचे पुरश्चरण – रोज १२ पाठ

शके १८३४–१९१२

रा. रा. बाबुराव शिरोळकर यांस नारायण. **उलट बाधा न येण्याकरिता मालामंत्र १२००० पुरश्चरण प्रथम करून नंतर रोज १२ पाठ करावे, म्हणजे बाधा उलट होणार नाही.** जी मिळकत गेली ती मिळणे कठीण; तथापि इच्छा असल्यास कार्तवीर्याचा जप करावा. **नारायण.**

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक २६१

## एक सप्तक संतत धाराभिषेक करावा

गरुडेश्वर

आषाढ शु. १२–१८३५

१५ जुलै १९१३

श्रीनृसिंह सरस्वती यांसी नारायण. पत्र पावले. एक सप्तक संतत धाराभिषेक करावा. श्रींच्या प्रसादाने दुर्भिक्ष्य शांती होईल. कळावे. सर्व लहान थोरांस नारायण.

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक २६२

## रुद्राभिषेक व गुरुचरित्र पाठ सुरू ठेवावे

गरुडेश्वर

कार्तिक व. ९–१८३५

२२ नोव्हेंबर १९१३

श्री प. नरसिंह सरस्वती यांस नारायण. काल तार दिली त्याप्रमाणे रुद्राभिषेक व गुरुचरित्रपाठ सुरू ठेवावे. शुक्लतीर्थोदकाने स्नपन केले ते बरे झाले. सर्वांनी एक निष्ठेने सेवा करावी. नारायण.

॥श्री दत्त॥ पत्र क्रमांक २६३

## अभिषेक चालवावा – सात ब्राह्मण गुरुचरित्र पाठाला बसवावे

गरुडेश्वर

मार्गशीर्ष १८३५

डिसेंबर १९१३

श्रीनृसिंह सरस्वती यांस नारायण. चालू ठवल्याप्रमाणे अभिषेक चालवावा. शिवाय ७ ब्राह्मण गुरुचरित्राचे पाठाला बसवावे. हे पत्र पोचताच हवामानाचे उत्तर यावे. सर्वांस नारायण.

---

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २६४

## यथाशक्ति श्लोकाचा जप

मुक्त्याला भाद्रपद शु. १३–१८३०

८ सप्तंबर १९०८

रा. रा. कुप्पुस्वामी तंजावर यांस नारायण. पत्र पावले. सर्व मजकूर समजला. मुलाचा तितुकाच योग होता. ईश्वरी इच्छा. सौ. मिनाक्षीबाईला कोणी काही केलेले नाही. शंकादोष झाला. तूर्त शांत असावा. पण तीकरवी – **शिवेति चंद्रचूडेति शंकरेति हरेति च । पार्वतीप्राणनाथेति वद जिव्हे निरंतरम् ॥ हा श्लोक यथाशक्ति जपवावा.** तिणेच यथाशक्ति करावा. दोन्ही राणी साहेबांना व त्यांचे मंडळीला नारायण प्र॥ भावूस्वामी – राजास्वामी, आत्याची तिरुवाडीची व इतर मंडळीस नारायण. राजवाड्यापैकी कामात यश येणेच वाटत नाही. कळावे. येथोन शुक्रवारी निघोन जाणार. नारायण.

---

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २६५

## विष्णुयाग त्वरा नाही

गरुडेश्वर आषाढ कृ. ४–१८३५

२२ जुलै १९१३

वे.शा.सं रामशास्त्री प्रकाशकार बडोदे यांस नारायण. पत्र पावले. सोमवारी २४ घटिका मघा संपतात, तरी तो दिवस बरा आहे. काही हरकत नाही. गोळ्या करून पाठविता येतील. विष्णुयागाची इतकी त्वरा नाही, कळावे. नारायण.

---

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २६६

## पत्रद्वारा दर्शन मानावे

गरुडेश्वर भाद्रपद शु. १५–१८३५

१४ सप्टेंबर १९१३

रा. रा. धोंडोपंत कोपकर बडोदे यांस नारायण. येथे बहुत गर्दी झाली. आता राहण्याचा भरवसा नाही. पत्राद्वारा दर्शन मानून स्वस्थ रहावे. कळावे. नारायण.



॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २६७

## नासाग्र दृष्टी – हृदयी अनुसंधान

## श्री गोविंदराव क्षिप्रीकर यांस पाठविलेली पत्रे

(१) नारायण. वितल ४ प्रसूत १० दिवस लिंगार्चन नाही व राहिल्याचा दोष नाही. भ्रूमध्यलय अभ्यासास ठीक आहे. पण त्यापेक्षा **नासाग्र दृष्टि ठेवून हृदयी अनुसंधान ठेवणे हाच अभ्यास चालवावा.** कदाचित दृष्टि किंचित चळली तरी लक्ष न सोडावे. भोजनानंतर एक तास तरी अभ्यास न करावा.

अभ्यास दृढ झाल्यास अमुक असा नियम नको. **चालन दोहन नित्य चालवावे.** कळावे. नारायण.

---

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २६८

## यंत्रे धन ऋण असतात.

(२) नारायण. पत्र पावले. येथोन मा. व. १ करून निघणार. यंत्रे धन ऋण असतात. ऋण यंत्र आले तर फलद्रूप निघणार व मोठ्या प्रसंगोपात्तच यंत्राचा उपयोग करावा. आपण स्वतः पाऱ्याचा उपयोग केलेला नाही. विनायकराव यांस नारायण. नारायण.

---

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २६९

## अजून खेचरी वाढली पाहिजे

(३) नारायण. विशेष यात्रा फिरायची मनात आणली हे बरे नाही. आजकाल फिरण्यात हासील नाही. इकडेस येण्याचे करू नये. **जे भासते ते स्वप्नवत् समजून तिकडे सरसू नये. अजून खेचरी वाढली पाहिजे. ऊन पाणी व लोणी घेऊन चालन दोहन करावे.** कळावे. नारायण

---

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २७०

## श्रीस्वामी महाराजांचे हस्ताक्षरातील

**कै. गोविंदराव चोरघडे व कै. प्रल्हाद चोरघडे यांना आलेले पत्र**

**( सन १९१० चे सुमारास)**

## परमेश्वरावर निष्ठा ठेवून सत्कर्मे करणे

रा. गोविंद व प्रल्हाद यांसी नारायण. पत्र पावले. परमेश्वरावर निष्ठा ठेवून सत्कर्मे करणे. सत्प्रवृत्त व्हावे. परमेश्वर घडवील. कळावे. परमेश्वर भजनीस सादर रहावे. नारायण.

---

॥ श्री दत्त ॥ **पत्र क्रमांक २७१**

## ८ - स्वप्नार्थ बोध

## संसाराचे ओझे मला नाही अशा बुद्धीने वागावे

नरसोबाची वाडी मा. शु. ६ –१८११

२६-१-१८९०

रा. रा. नारायण गोविंद उकिडवे सावंतवाडी यांस कृतानेकाशीर्विशेष. पाठविलेले पत्र पोहोचले. आणाव गावातून विष्णु आणावकरांचे मागे नड आहे, तिचा विचार करावा. तूर्त त्याची प्रकृति कशी आहे ती कळवावी. स्वतःचा येण्याबद्दलचा स्वप्नाचा अभिप्राय हा की, तूर्त येणे होत नाही. सत्पुरुषाने गळ्यात माळ घातली म्हणजे आपुल्या गळयात लोकरमणीय संसारमाला ईश्वराने घातली ही आपल्याला पसंत वाटत नाही तर जडभार घेण्यासाठी उपास्य देवता अक्कलकोटबाबांचे रूपाने आपले कंठी घेण्यास तयार आहेत. म्हणजे हे संसाराचे ओझे मला नाही अशा बुद्धीने वागावे हेच सुचविले. कळावे. एका स्वामीला वाकेरीचे भाते पाहिजे. मिळाल्यास पाठवावे. श्रीदत्त.

---

॥ श्री दत्त ॥ **पत्र क्रमांक २७२**

## प्रति रविवारी श्रीचे दर्शन करावे

नरसोबाची वाडी श. १८१२ सन १८९०

साष्टांग नमस्कार विज्ञापना पाठविलेले औषध पोहोचले. सांगितल्याप्रमाणे प्रति रविवारी श्रींचे दर्शन करावे. स्वप्न पत्री लिहिलेले ते देवसंबंधी नव्हे, भास आहे. प्रकृतीसंबंधी लिहिले तो प्रकार एरवीच. प्रकृति वैगुण्यामुळे अन्य कारण नाही. कळावे. बहुत काय लिहिणे हे विज्ञापना. श्रीदत्त.



॥ श्री दत्त ॥ **पत्र क्रमांक २७३**

## लिहिल्याप्रमाणे जप करावा

प्रभास फा. व. ३०–१८२०

१० एप्रिल १८९९

ना. उकिडवे, सावंतवाडी यांस नारायण. तूर्त या प्रदेशात प्लेगचा उपद्रव नाही तथापि तिकडून येणाराला प्रतिबंधात राहावे लागते. (स्वप्न) **घरची गाय म्हणजे स्वसंबंधी गरीब स्वभावाचे मनुष्य. जम म्हणजे स्वप्न आरिष्ट येणे. कमडा मलम म्हणजे त्याचे परिहारोपाय अशी सूचना आहे. याचे आपण भय मानू नये. यो मे राजन्युज्यो वा सखा वा स्वप्ने भयं भीरवे मह्यं माहे । स्तेनो वायोदित्संति नो वृकोवा त्वं तस्मांद्वरुण पाह्यस्मान ॥ ह्या मंत्राचा दिवसा न घडल्यास रात्री १०८ किंवा २८ जप तीन महिनेपर्यंत करावा.** ईश्वराचे इच्छेने प्लेग (सांक्रमिक रोग) फैलावतो. यावर कोणाचा उपाय नाही. ज्यांना वाटेल त्या आस्तिक लोकांनी भगवद् भजन करीत असावे. ग्रहमान विपरीत आहे. तूर्त येथे विशेष पाठ वगैरे देण्याचे नसल्यामुळे रोज दोन घटिका गुरुचरित्रावर टीका लिहिण्याची होत असते. पहिले चार अध्याय आताच पुरे झाले. संस्कृतात टीका करण्याची लहर लागली आहे. तूर्त चारशे झाली. पुढे कशी लहर लागेल कोण जाणे. तेव्हा ही टिपण देण्याच्या उपयोगाची नाही. येथे प्रत मुळीच नाही. बरोबरची प्रत सारंगपुरास पूर्वीच पाठविली. तोंडानेच चालते. कदाचित पाठाक्षर भेद होईल तर तो पुढे सुधारला जाईल. टीप देणे तर समास सोडून लिहिलेल्या पोथीवर कठीण जागी दुसरी दिली जाईल. तूर्त येथे पत्र पाठवू नये. लवकरच प्राची सरस्वतीकडे जाण्याचा विचार आहे. लिहिल्याप्रमाणे जप करावा. चिंता करू नये. कळावे. नारायण

---

॥ श्री दत्त ॥ **पत्र क्रमांक २७४**

## नारायणबली करावा

चिखलदरा आ. कृ. ७–१८२२

१८ जून १९००

रा. रा, नारायण उकिडवे सावंतवाडी यांस नारायण. पाठविलेले पुस्तक पावले. पूर्वी आपल्या पत्री गेल्या वर्षी स्वप्न लिहून कळविले. तेव्हा सूचना दिली. अस्तु. **आता जन्मजन्मांतर वैरामुळे ती वासना राहून अशी योनी मिळाली. आईच्या जन्मावर हे वैर चालावयाचेच. याबद्दल घडेल त्यावेळी एक नारायणबली करावा.** हा छापावयाचा उद्योग झाला म्हणजे गंगेस घोडे गेले समजावे. आता पुनः छापण्याची परवानगी देण्याची मुळीच इच्छा नाही. जे भगवद् इच्छेने घडेल ते घडो. तूर्त येथे दत्तमाहात्म्याची टीका ५ अष्टकांची झाली. हा उद्योग कित्येक लोकांच्या प्रार्थनेमुळे घडत आहे. ज्याला पाहिजे त्यानी प्रत

उतरून घ्यावी. इकडे एक पाऊस पडला. पुन्हा पडला नाही. धान्य रुपयास चार शेर झाले. भगवद् इच्छा. नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २७५

## उदकशांती करुन दिलेला जप करावा

मंडलेश्वर फाल्गुन व. १-१८२२

६ मार्च १९०१

रा. रा. नारायण उकीडवे सावंतवाडी यांस नारायण. स्वप्न अरिष्टसूचक व भगवत्कृपाल्पताद्योतक आहे. श्रींचे मंदिरांत उदकशांती करून पूर्वी लिहून पाठविलेला मंत्र (**यो मे राजन्युज्यो**) या मंत्राचा यथाशक्ति प्रत्यही जप तीन मासपर्यंत ठेवावा. १४-१५ दिवस राहणे होईल. हे पत्र पोहोचताच पोथी पाठविल्यास पोचेल. नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २७६

## स्वप्नात निष्ठेप्रमाणे श्रीगुरूने देखावा दाखविला

शके १८२५

६ डिसेंबर १९०३

रा. रा. नारायण उकीडवे सावंतवाडी यांस नारायण. रजिस्टर पत्र ९ रोजी पावले. उत्सवामुळे उत्तरास अवकाश झाला नाही. काठेवाड, गुजराथ, माळवा वगैरे ठिकाणाहून ४-५ तिकिटे दर पत्रात पाठवितात. कारण त्यात लोकांची इच्छा वरचेवर पत्रे यावी व भजने नवी मिळावी. ही तिकिटे असल्याच्या अंदाजाने वाटते की, कार्डावाचून पत्र आले की येथे गळम होण्याच. बरेच लोकांनी बरीच पत्रे पाठविल्याचे आता कळल्यावरून येथील गृहस्थांनी पुढे कागाळी नेली. आतां प्रायः पोस्टात गळती होणार नाही. याउपर रजिस्टर पाठवू नये. जे स्वप्न पाहिले ते निष्ठेप्रमाणे श्रीगुरूने तो देखावा दाखविला. **तर ह्या नर देहाविषयी जिकीर करण्यापेक्षा जो सबाह्यांतर असून सगुणतत्वे मी आहे अशी सूचना देणारे भगवान श्रीगुरु चालकत्वे व भासकत्वे सर्वत्र सदा का न चिंतावे ? आलिया भोगासी असावे सादर. दोष कोणावर ठेवू नये.** कळावे. नारायण

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २७७

## श्रद्धा, भक्ति, ध्यान या उपायाने देव पाहावा

ब्रह्मावर्त कार्तिक शु. ९-१८२५

२९ आक्टोंबर १९०३

वे. रा. शंकरभटजी नरसोबावाडी यांस नारायण. आपल्या पत्रांत दोन स्वप्ने विदित केली. यापैकी पहिले स्वप्नाचा अभिप्राय (श्रद्धा, भक्ति, ध्यान योगादवेहि) श्रद्धा, भक्ति, ध्यान ह्या तीन उपायाने देव पाहण्याचा. यापैकी ध्यानोपाय घडत नाही. त्याविषयी प्रयत्न श्रद्धापूर्वक ठेवावा. दुसरे स्वप्नाचा अभिप्राय केवळ एक तऱ्हेचा विनोद बोलण्यात दाखविला. कळावे. नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २७८

## स्वप्नार्थ – दंड घ्यावा

ब्रह्मावर्त चैत्र शु. ९-१८२६

२६ मार्च १९०४

वे. शां. सं. नारायण दीक्षित नरसोबावाडी यांस नारायण. पहिल्या स्वप्नाचा अभिप्राय दंड घेऊन चालणे कठीण. २ चा अभिप्राय भजन चालवावे. ३ चा अभिप्राय दंड घेऊन चांगला धर्म पाळावा. ४ चे नाव प्रणव–पाठीचा वारा गुरुभक्ति– वाट मिळणे म्हणजे अभ्यासानुकूलता, गावास पोचणे – क्रममुक्ति – हा अभिप्राय आहे. आतुर संन्यासी यांनी प्रणवाने शंखमुद्रेने प्रोक्षण शिर १२, दक्षिण बाहू १२, वामबाहू १२, हृदय १२ प्रोक्षणपूर्व स्नान करावे. प्रणवाने तीन अर्घ्य देऊन प्रणवजप करावा. लवकरच दंड घ्यावा. **दंड घेतल्यावाचून महावाक्योपदेश होणार नाही.** (वगैरे) श्रीदत्तस्वरूपी यति मानून त्यापासून दंड घ्यावा ( दंड ग्रहण करावा ) इकडे येणेचे करू नये. कळावे. नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २७९

## चिंतित ते स्वप्नात दिसते

नरसोबाची वाडी मार्ग शु. ५-१८२८

२०नोव्हेंबर १९०६

रा. रा. नारायण उकीडवे सावंतवाडी यांस नारायण. पत्र पावले **वेदाध्यायी ह्यप्रमत्तो जपेस्वप्नेपि वासितम् । जपिता तु जपत्येव तथा ध्यातापि वासितं ॥** ह्या न्यायाने **स्वप्नात चिंतित दिसते. तेहि शुभदर्शन बरे आहे.** निरंतर आपण साक्षीभूत कूटस्थ आहे असे अनुसंधान ठेवावे. कळावे. नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २८०

## सर्वथा काम सोडावा – हा स्वप्नाचा अभिप्राय

तंजावर श्रा. कृ. १०-१८२९

वे. शा. शंकर यांस ( पुजारी नृसिंहवाडी) नारायण. पत्र पावले. एक पहिले

स्वप्नाभिप्राय जाऊळ ठेवले म्हणजे काम ठेवणे. सर्वथा काम सोडावा हा अभिप्राय. स्वप्नात समंध म्हणजे अहंकार. त्याला भाताचा पिंड देणे म्हणजे अन्नमय देहाभिमान सोडणे. कळावे. अंतू यांस नारायण. नारायण

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २८१

## तूर्त सेवा चालवावी

श्रावण शु. ६–१८३०

रा. नाखरे नृसिंहवाडी यांस नारायण. पत्र पावले. पहिले स्वप्नाचा अभिप्राय न कळल्यामुळे पुढे पूजा करण्याचे सांगितले. तूर्त २ महिने निरोप होणे नाही. सेवा चालवावी. कळावे. नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २८२

## अनार्षग्रंथाचा स्वाहाकार कोणी सांगावा ?

अ. श्रावण शु. ७-१८३१
२४ जुलै १९०९

रा. रा. नारायण उकीडवे सावंतवाडी यांस नारायण. हल्ली विजय वाड्यातून आपुले पूर्वी पाठवलेले पत्र पोचले. जे स्वप्न झाले ते श्रीसद्‌गुरूंनी दाखविले. मंत्रशास्त्रात मनुष्यांनी केलेले अनार्ष ग्रंथ यांचे अनुष्ठान करू नये असे आहे मग त्याचा स्वाहाकार करण्याचा कोणी सांगावा व हा ग्रंथ मी केला असाही अभिमान. श्रीगुरूंची इच्छा असेल तसे घडो, पण स्वाहाकार करा असे अनुमोदन द्यावे अशी प्रवृत्ति होत नाही. कळावे. नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २८३

## अनुमोदन द्यावे असे वाटत नाही

पवनी अ. श्रा. व. १२–१८३१
१२-८-१९०९

रा. रा. नारायण उकीडवे सावंतवाडी यांस नारायण. पत्र पावले. आपुल्यास सांगणे व आपण नियम केला इत्यादि गोष्टी बरोबर आहेत, पण त्या कामी अनुमोदन द्यावे असे वाटत नाही. तिकडेस परभारे श्रींचे इच्छेने जे घडेल ते खुशाल घडो. पुरश्चर्याजप संपला तर दशांश हवन किंवा तद्विगुणित जपादि करून संपवावे, कळावे. नारायण.



॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २८४

## स्वप्नाभिप्राय – भजन प्रभावाने सिद्धि

नरसोबाची वाडी मा. शु. २-१८३१
११-२-१९१०

रा. रा. नारायण उकिडवे, सावंतवाडी यांस नारायण. पत्र पावले. स्वप्नाचा अभिप्राय भजनाच्या प्रभावाने सिद्धि तयार आहेत असे सुचविले. धोंडू यांची प्रकृती कशी काय आहे ? ते कळवावे. नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २८५

## दैन्य न आणता उमेदीने विचार करावा

नैनापूर चैत्र शु. १ – १८३३
१ एप्रिल १९११

रा. रा. नारायण उकीडवे सावंतवाडी यांस नारायण. पत्र पावले. उगीच मनांत दैत्य न आणता उमेदीने विचार करावा. विचारांचे फळ लवकरच मिळेल. स्वप्नात तीर्थ न दिले इत्यादि जे दिसले तिकडे तात्पर्य ठेऊं नये. **कारण " स्वप्नस्थ राज्यभिक्षादि न बुद्धः स्पृशते खलु "** इत्यादि वचनाने दृश्याला मिथ्यत्व ठरते. मुले वगैरे मंडळी पोचली. लौकर येथून त्या सर्वास तिकडे रवाना करून देणार. सर्व मंडळींस नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २८६

## स्वप्नहेतू अनाकलनीय

गरुडेश्वर श्रावण व. १४-१८३५
३० ऑगष्ट १९१३

रा. रा. सखाराम सातवळेकर, कोलगाव यांस नारायण. पत्र पावले हे स्वप्न कोणत्या हेतूने कोणी केले असेल समजुतीत नाही. अन्यत्र उलगडा होत असेल तर करून घ्यावा. येथ येणेचे न करिता पत्रद्वारा दर्शन मानून स्वस्थ राहावे. सर्व मंडळीस नारायण.

॥ श्री दत्त ॥ पत्र क्रमांक २८७

## श्रीदत्तात्रेय पाहि मां – याचा जप करावा

गरुडेश्वर आश्विन शु. ४-१८३५
३ आक्टोबर १९१३

रात्री निजतेवेळी **श्रीदत्तात्रेय पाहि मां–** याचा जप करीत निजावे. वाईट स्वप्न पडणार नाहीत. बाकी सांगितलेला जप चालवावा. नारायण

॥श्री दत्त॥ **पत्र क्रमांक २८८**

## स्वप्न वाईट नाही

गरुडेश्वर कार्तिक शु. ११-१८३५

१० नोव्हेंबर १९१३

श्रीमन्नृसिंह सरस्वती यांस नारायण. स्वप्न काही वाईट नाही. ( **शमः समाहितत्वं च साधनेषु श्रुतं यतः** ) असे आहे. हेच मुख्य राहणेचे अशा अभिप्रायावर स्वप्न आहे. श्रीचरणप्रसादाने सर्व काही होईल. श्लोक राहून गेला आहे. दुसऱ्या आवृत्तीस २७ व ३६ हे दोन्ही श्लोक भरले जातील. नारायण.

॥श्री दत्त॥ **पत्र क्रमांक २८९**

## स्वप्नाशय - वैश्वदेव - आत्म व अन्न संस्कारार्थ

विठूर (ब्रह्मावर्त) ज्येष्ठय १५-१८२४

२४ जून १९०२

वे. सखाराम सातवळेकर यांस नारायण. पत्र व गुरुचरितार्या पावल्या. येथे बहुत पाठ चालू असल्यामुळे राहण्यास मुळीच नाही. तत्रापि प्रतिपदेस सवडीप्रमाणे पाहता येतील. **यवगूःषड्गुणजलपाचित तंडुलान्न (पेज)** हाच आहे. मनाने ते स्वरूप मनात आणणे हाच (**तत्र मनोवृत्ति धारयेत**) याचा अर्थ होय. भगवद्ध्यान करून प्राणायाम करावा. म्हणजे पंचप्राणजय होईल हा स्वप्नाशय. येथे आपा व व्यंकटराव यांची खेचरी छेद मात्र गुण्यास केला. ते काम दुःसह आहे. तेव्हा छेद न करिता चालन व दोहनाने करावे. वर्षाचे आत ही खेचरी होत नाही आत्मसंस्कार व अन्नसंस्कारार्थ हे दोन वैश्वदेवानी होतात. परगृही भोजनास जाणार तर अन्नसंस्कारार्थ तंडुलादिकांनी करावा. प्रवासात किंवा मार्गी कर्मलोप होईल असे वाटेल तरच जलाने करावा. आरत्या करण्यात तूर्त सवड नाही. अग्निप्रतिष्ठा करून अग्निकार्य करावे. वैश्वदेववत लौकिकाग्नि प्रतिष्ठा करावी (पावक नाम योजावे) नारायण.

॥श्री दत्त॥ **पत्र क्रमांक २९०**

**(श्री स्वामी महाराजांचे अनुगृहित शिष्य श्री गोविंद भय्याजी चोरघडे यांनी आपल्या ज्येष्ठ चिरंजीवाला लिहिलेल्या २१-१२-१९३८ च्या पत्रातील प्रेरक अंश)**

चि. दिगंबर गोविंद चोरघडे यांस अनेक आशीर्वाद

तुझे मागील पत्रात असे होत की, मी पांढुर्ण्यात रात्रभर राहिलो व माझे मनात ते दिवशी अनेक तरंग आले. पण ते तरंगच होत त्यात काही रंग नाही. एवढे लक्षात ठेव. आपले शिरावर समर्थाचा छाप असल्यामुळे आपल्याला उणीवच नाही. दिसून येते टिकणारे नाही, एवढे समज म्हणजे झाले. कळावे.



॥श्री दत्त॥ **पत्र क्रमांक २९१**

## स्वामींचे निर्वाण

गरुडेश्वर आषाढ शु.१८३६

२५-६-१९१४

नारोपंत उकीडवे यांस

पत्र लिहावयास फारच दुःख होते. श्री सद्गुरुमहाराज काल रात्री म्हणजे अमावस्या रातौ १२ वाजण्याचे आत ११ वाजल्यावर समाधिस्थ झाले .असो. ईश्वरी इच्छेपुढे इलाज नाही.

विश्वनाथ भटजी कशाळीक- मु.-श्रीक्षेत्र - गरुडेश्वर

## श्रीस्वामींच्या पत्रासंबंधी – मनोगत

श्री परमहंस परिव्राजकाचार्य वासुदेवानंद सरस्वती यांची पुण्यतिथी आषाढ शुद्ध प्रतिपदेला अनेक ठिकाणी साजरी होते. नागपूर – विदर्भ परिसरात हा उत्सव काही ठिकाणी मोठ्या प्रमाणावर होत असतो. श्री टेंबे स्वामी यांचा कालखंड १३-८-१८५४ ते २४-६-१९१४. जन्मस्थान माणगाव (सावंतवाडी) आणि समाधी गरुडेश्वरी (बडोदा . त्यांनी साठ वर्षांच्या काळात केलेली पदयात्रा आणि प्रचंड ग्रंथ रचना हाच एक चमत्कार आहे. या काळात नागपूर– विदर्भाशी त्यांचा संबंध आला. इथे त्यांनी काही काळ घालविला. पवनी मुक्कामी इ.स. १९०९ साली त्यांचा चातुर्मास घडला होता. याच काळात त्यांच्या अनुग्रहाचा, सहवासाचा अनेकांना लाभ झाला. त्यांच्या प्रेरणा घेऊन अनेकांनी आपले जीवन सार्थकी लावले.

श्रीवासुदेवानंद सरस्वतींची ग्रंथरचना प्रचंड आहे. संस्कृत व मराठीतील त्यांच्या ग्रंथरचनेचा विस्तार पाहिला. त्यातील वेदोपनिषदातील किंवा अन्य शास्त्रातील संदर्भ पाहिले म्हणजे कोणत्याही अभ्यासकाला आश्चर्य वाटल्यावाचून राहणार नाही. अपरिग्रहाचे व्रत कठोरपणे सांभाळीत असताना हे सगळे संदर्भ देणे कसे शक्य झाले असावे, याचे आश्चर्य वाटल्यावाचून राहत नाही. आपल्या हातून झालेली ग्रंथरचना ही श्री दत्त कृपेने किंवा दत्तप्रभूंच्या आज्ञेने झाली असे ते म्हणतात. अपरिग्रहाच्या काळात स्वतःजवळ दौत व टाक बाळगायचा ते अपवाद करीत असे म्हणतात. कोणत्या वेळी व कोणत्या ठिकाणी ही आज्ञा होईल याचा नेम नसायचा. ही प्रचंड ग्रंथरचना प्रकाशात आणण्याचे कार्य काही वर्षांपूर्वीच पू. श्री गुळवणी महाराज, पुणे यांनी केले. त्यानंतर काही व्यक्तींनी व संस्थांनीही त्यांचे ग्रंथ प्रसिद्ध केले. तरीही त्यांचे काही ग्रंथ उपलब्ध नाहीत. काही अप्रकाशितही असावेत.

त्यांच्या अप्रकाशित वाङ्मयाचा महत्त्वाचा भाग म्हणजे त्यांनी लिहिलेली पत्रे, इतरांना सुचविलेले उपासनेचे मार्ग, मंत्रांचे कागद, काहींना वेळीच करून दिलेली स्तोत्रे.

मंत्रांचे कागद आजही कित्येकांनी पैतृक धनाचा वारसा म्हणून जपलेला आहे.

या पत्रांतून ज्ञान – कर्म - उपासना या संबंधी नेमके विवेचन, विविध विषयांवरील मार्गदर्शन, प्रापंचिक दुःखमुक्तीचे उपाय तर आहेतच पण त्याही पेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे या चार – **चार ओळीच्या पत्रांनी अनेक सामान्य साधकातून 'निश्चयाचे महामेरु' निर्माण केले आहेत.** आयुष्यातील अनेक दुःखाच्या प्रसंगी विपरीत परिस्थितीतही निश्चल आणि शांत असणारे, विपत्तीला धैर्याने तोंड देणारे आणि कटाक्षाने आपला आचार सांभाळणारे धृतिमान साधक निर्माण केले आहेत. या शतकाच्या सुरुवातीचा काळ असुरक्षिततेचा होता. प्लेगसारख्या व्याधींनी लोक मृत्युमुखी पडत होते. रोग, दारिद्र्य, अज्ञान यांनी व्यापलेले होते. या काळात आपल्या वाट्याला आलेले कर्तव्य चोखपणे बजावणारी, समाधानी, साधक मंडळीही निर्माण करण्यात या पत्रांचा महत्त्वाचा वाटा आहे. आज संपन्नता, सुरक्षितता असेल पण समाधान कुठेतरी हरवले आहे. हव्यास वाढलेला आहे. पूर्वी आपण दुबळे असलो, दरिद्री असलो तरी ईश्वराचे आहोत, आणि **'गरुडाचिया पिलयासी। सर्प तो कवणेपरी ग्रासी'** हा गुरुचरित्रातील आत्मविश्वास या साधक मंडळीचा होता – एका साधकाकडे असलेल्या स्वामींच्या पत्रातील मजकूर असा.....

श्रीदत्त

गोविंद व प्रल्हाद यासी,

नारायण, पत्र पावले, परमेश्वरावर निष्ठा ठेवून सत्कर्म करणे, सत्प्रवृत्त व्हावे, परमेश्वर घडवील, कळावे, परमेश्वर भजनी सादर राहावे – नारायण.

आपण ईश्वराचे प्रतिनिधी म्हणून वावरतो आहोत. असा त्यांच्या शिष्यांचा व्यवहार होता. स्वतःच्या जमाखर्चाच्या वहीवर " श्रीकुलदैवताचे वतीने.... अमुक.... अशीही नोंद ठेवणारे स्वामींचे काही अनुग्रहीत शिष्य होते – सत्कर्म करणे आपल्या स्वाधीन आहे. उगवायचे केव्हा हे कर्मबीजांनी ठरवायचे असते अशी श्रद्धा असलेली ही मंडळी नागपूर – विदर्भाच्या परिसरात होती. त्यांना वेळोवेळी प्रेरणा देणारी पत्रे अत्यंत उद्बोधक आणि सूत्ररूप आहे. त्यांत अनेक विषय हाताळले गेले आहेत.

स्वामींनी एका पत्रात दिनचर्या लिहून कळविली आहे. त्यापत्राचे शेवटी ते लिहितात – " मी असंग, कूटस्थ, साक्षी, निर्विकार आहे अशी पुनः पुनः भावना करावी – त्रिविध ताप, दुःख, कोणी छळ केल्यास विषाद मानू नये..जडभार देवावर घालू नये, असे वागावे " – स्वतः सांसारिक असून त्यांचा गृहस्थाश्रम कसा अनासक्त होता याचा प्रत्यय देणारे हे गंगाखेडवरून ६ जून १८६१ ला लिहिलेले पत्र ( वैशाख वद्य ३० शके १९१३ ) 'श्री चे आज्ञेने उत्तरखेडी जाणे होत असता वै.कृ. १४ शुक्रवारी सौभाग्यवतीस देवाज्ञा झाली. यावर आता भेट होणे प्रारब्धाधीन आहे. परंतु सदैव चरण – कमल हृदयी ठेविले आहे.....

श्री उकिडवे यांना लिहलेल्या एका पत्रात तर सूत्ररूपाने तत्त्वबोधच उतरला



आहे. ' चित्तात राग, द्वेष, काम, क्रोध, लोभ, मोह, ईर्षा, असूया, दंभ, अहंकार, इच्छा, भक्ती आणि श्रद्धा इत्यादी ज्यावृत्ती निर्माण होतात त्यातील क्लेशकारक वृत्तीचा उपशम कसा करावा याचे विवेचन पत्रात आहे. थोडक्यात मत्सर–संतोषाने, ईर्ष्या – तितिक्षने, असूया–समाधानाने, दंभ–सत्याने, दर्प– सुजनपणाने, स्वमताग्रह विवेकाने दूर करून संत समागमाने – सत्पुरुष गुरुविषयी श्रद्धा वाढवावी. श्रद्धा – निष्कामसेवेत वाढवावी असा या पत्राचा सारांश आहे

दि. २३ सप्टें. १८९७ च्या पत्रात कष्टदायक अनुभवामुळे ईश्वरश्रद्धा विचलित होऊ देऊ नये हे सांगताना ते लिहितात. बदली झाल्याने गैरसोय झाली असेल. परंतु प्रभुसत्ता जशी असेल तसे घडणारच. अंतरातील देवाची बदली न झाली म्हणजे पुरे...सिनोर (गुजरात) येथून १२ जानेवारी १८९९ रोजी लिहिलेल्या ज्योतिष्य विषयक मार्गदर्शन असलेल्या पत्रात ते लिहितात –

' ज्योतिषशास्त्री प्रारब्धापेक्षा प्रयत्न विशेष मानला आहे, द्वारकेहून २१–१०–१८९९ ला लिहिलेल्या पत्रात गुजरात येथील त्या वेळच्या स्थितीचे वर्णन आहे.. झाडावर पान नाही... दिवसानुदिवस फार महागाई होत आहे. गोरगरिबांना गायकवाड सरकारपासून खायला मिळाल्यामुळे या दिवसापर्यत वाचले.. एका परगणेत ही तऱ्हा असे आणखी परगणे बरेच आहेत. काय होईल ते ईश्वर जाणे.. लोक पोरासाठी नवस करीत व ढोरांची चोरीही करीत. तर तेच लोक पोरे ढोरे शहरात सोडून निष्ठुरपणे पाहात पर्यटन करावे.. हेही दोन दिवस आहेत.. दिनरात्री न्यायाने निघोन जातील.

काही पत्रातून वैद्यक शास्त्रासंबंधी मार्गदर्शन आहे. औषध योजना सुचविली आहे. पवनीहून २४–९–१९०९ रोजी – बडोदे येथील प्रकाशकर यांना लिहितात, अवश्य भावी घडते त्याचा खेद करू नये. अप्रार्थिने दुःख येते तसेच सुखही येते – दुसऱ्या एका पत्रात १९१३ साली ते कळवितात. प्राप्त झालेल्या दुःखात कोणी भागी नसतो. तथापि उपयतिक्रम करू नये.


विविध विषयांच्या अनुभवांचे भांडारच या पत्रात भरलेले आहे. अनेक पत्रे अनेकांच्या संग्रही असतील. काही स्तोत्रे किंवा स्वामींनी करून दिलेली टिपणे असतील. ठिकठिकाणी होणाऱ्या या उत्सवाचे निमित्ताने ती एकत्र करता आली तर उपकारकच ठरेल. **श्री टेंबे स्वामी कृत 'अज्ञानतिमिर दीपक' नावाचा १६१६ साली छापला गेलेला एक संस्कृत ग्रंथ नुकताच पाहण्यात आला.** स्वामींच्या नावाने असलेल्या ग्रंथात त्याचा अन्यत्र उल्लेखही नाही. तेव्हा अशा ग्रंथांचे–त्यांच्या अन्य अप्रकाशित वाङ्मयाचे ह्या उत्सवाचे निमित्ताने परिशीलन होणे सर्वांना लाभदायक होईल. पुण्यस्मरणाच्या पर्वकाळी स्वामींना विनम्र अभिवादन

**वासुदेव चोरघडे**
**अभ्यंकरनगर, नागपूर**

# स्वामी महाराजांचे चतुर्मास
## ' २३ चातुर्मास ' पुढे दर्शविलेल्या ठिकाणी झाले

| नं. | इसवी सन | शक | प्रदेशाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | १८९१ | १८१३ | उज्जयनी |
| २ | १८९२ | १८१४ | ब्रह्मावर्त |
| ३ | १८९३ | १८१५ | हिमालयातील पहाडी |
| ४ | १८९४ | १८१६ | मुलूख म्हणजे बदरीनारायण |
| ५ | १८९५ | १८१७ | बदरीकेदार, गंगोत्री, अशा ठिकाणी असा वा खातरीलायक बातमी मिळत नाही. |
| ६ | १८९६ | १८१८ | हरिद्वार |
| ७ | १८९७ | १८१९ | पेटलाद (मालवा) |
| ८ | १८९८ | १८२० | तिलकवाडा |
| ९ | १८९९ | १८२१ | द्वारका |
| १० | १९०० | १८२२ | चिखलदरा |
| ११ | १९०१ | १८२३ | महतूर (मालवा) |
| १२ | १९०२ | १८२४ | ब्रह्मावर्त |
| १३ | १९०३ | १८२५ | ब्रह्मावर्त |
| १४ | १९०४ | १८२६ | ब्रह्मावर्त |
| १५ | १९०५ | १८२७ | नरसी |
| १६ | १९०६ | १८२८ | बढवाणी |
| १७ | १९०७ | १८२९ | तंजावर (संध्यामठ) |
| १८ | १९०८ | १८३० | मुक्त्याला (कृष्णातीर) |
| १९ | १९१० | १८३१ | पवनी |
| २० | १९११ | १८३२ | हावनूर |
| २१ | १९१२ | १८३३ | कुरुगड्डी |
| २२ | १९१३ | १८३४ | चिखलदरा |
| २३ | १९१४ | १८३५ | गरुडेश्वर |
| | | १८३६ | समाधि |






# ग्रंथ निर्मितीची स्थळे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | दत्त पुराण (संस्कृत ग्रंथ) | ब्रह्मावर्त | उ. प्र. |
| २. | गंगेची स्तुती (५ श्लोक) | हरीद्वार | उ. प्र. |
| ३. | नर्मदा स्तुती, नर्मदा लहरी | नेमावर | म. प्र. |
| ४. | दत्त लिलामृत प्राकृत | पेटलावद | म. प्र. |
| ५. | अभंग - मित्र मित्र भांडती | चिखलदरा | म. प्र. |
| ६. | कुर्म पुराण (देवनागरीत) | तिलकवाडा | गुजरात |
| ७. | अनसूया स्तोत्र व पद | अत्रि आश्रम | गुजरात |
| ८. | द्विसाहस्त्री गुरूचरित्र टिका अध्याय ९ | प्रभासपट्टन | गुजरात |
| ९. | द्विसाहस्त्री गुरूचरित्र टिका अध्याय १० नंतर | द्वारका | गुजरात |
| १०. | गुरुचरित्रावर चूर्णिका | द्वारका | गुजरात |
| ११. | सिद्ध सरस्वती स्तुती | सिद्धपूर | गुजरात |
| १२. | कृष्णावेणी पंचगंगा स्रोत स्तोत्र | मंडलेश्वर | म. प्र. |
| १३. | वेद स्तुती व ब्रह्मस्तुती | मंडलेश्वर | म. प्र. |
| १४. | दत्त महात्म्य व त्रिशती गुरु चरित्र | महतपूर | म. प्र. |
| १५. | समश्लोकी गुरु चरित्र व लघुमननसार ग्रंथ | ब्रह्मावर्त | उ. प्र. |
| १६. | सप्तशती गुरु चरित्र | ब्रह्मावर्त | उ. प्र. |
| १७. | अखंडआत्मा अविनाशी दत्त स्तोत्र | गाणगापूर | कर्नाटक |
| १८. | कृष्णा लहरी | गाणगापूर | कर्नाटक |
| १९. | करुणा त्रिपदी व दत्त चंपू | नरसी | महाराष्ट्र |
| २०. | साकारता तारका स्तोत्र | बडवाह | म. प्र. |
| २१. | कुमार शिक्षा | हंपी | कर्नाटक |



| | | | |
|---|---|---|---|
| २२. | समश्लोकी चरित्रावर चूर्णिका | तंजावर | तामिलनाडू |
| २३. | कृष्णा लहरीवर संस्कृत टिका | तंजावर | तामिलनाडू |
| २४. | युवा शिक्षा, वृद्ध शिक्षा, स्त्री शिक्षा | मुक्त्याला | आंध्रप्रदेश |
| २५. | गोदावरी स्तुती | सप्तगोदावरी | आंध्रप्रदेश |
| २६. | वैतगंगा स्तोत्र | पवनी | महाराष्ट्र |
| २७. | भूतपिशाच्च स्तोत्र | गुर्लहोसूर | कर्नाटक |
| २८. | तुंगभद्रा स्तुती, त्रिपुरान्तकेश्वर स्तोत्र | हावनूर | कर्नाटक |
| २९. | षट्पंचशिका वेदान्तपर स्तोत्र | हरीहर | कर्नाटक |
| ३०. | दत्त महात्मन स्तोत्र | कुरवपूर | कर्नाटक |
| ३१. | श्रीपाद श्री वल्लभ स्तोत्र | कुवरपूर | कर्नाटक |
| | उमरेडकर नाईक यांना यंत्र करून दिले | कुरवपूर | कर्नाटक |
| ३२. | जगदंबा स्तुती | तुळजापूर | महाराष्ट्र |



## सर्व उपदेशाचे सार

१) मुक्तीचा लाभ करून घेणे हे मनुष्य जन्माचे कर्तव्य आहे.

२) त्याकरिता प्रथम मन स्थिर व्हावे या उद्देशाने वर्णाश्रमविहित धर्माचे यथाशास्त्र आचरण झाले पाहिजे.

३) वेदान्ताचे श्रवण, मनन, निदिध्यासन नित्य करावे.

४) मुख्यतः लक्षपूर्वक श्रवणाने मनातील आसक्ती कमी होईल.

५) सात्त्विक प्रवृत्तीनेच मानवाची उन्नती होते.

६) सात्त्विक प्रवृत्ती होण्याकरिता आहार हा हित, मित व मेध्य म्हणजे पवित्र असण्याकडे लक्ष दिले पाहिजे.

७) आपली प्रकृती सात्त्विक झाली आहे हे ओळखण्यासाठी खूण अशी की, स्वधर्मावर दृढ श्रद्धा बसून स्नान–संध्या, देवपूजा, पंचमहायज्ञ हे वेळेवर करणे, अतिथिसत्कार, गोसेवा, मातापितरांची सेवा ही हातून घडणे, कथा – कीर्तन, भजन–पुराण यांचे श्रवण होणे, सर्वांबरोबर गोड बोलणे, दुसऱ्याचे नुकसान होईल असे न वागणे, स्त्रियांनी सासरी राहून सासरा व इतरही वडील माणसे यांच्या आज्ञेत पतीची दृढ निष्ठेने सेवा करणे इ. गुण आपल्यामध्ये येणे. आपली प्रकृति सात्त्विक बनल्याची ही चिन्हे आहेत.

८) उदरनिर्वाह व्यापार, शेती, नोकरी, कोणताही व्यवसाय केला तरी वेदविहित कर्म व गुर्वाज्ञापालन कधीही सोडू नये.

९) स्वकर्म केले तरच अन्तःकरण शुद्ध होते.


१०) अन्तःकरण शुद्ध झाले तर उपासना स्थिर होते.

११) उपासना स्थिर झाली तर मनाला शांती मिळते.

१२) आणि मनाची गडबड थांबली म्हणजे आत्मज्ञान होऊन मोक्षाचा लाभ होतो.

**याप्रमाणे जो वागेल तो शेवटी पूर्ण सुखी होईल.**






श्रीस्वामींचे हस्ताक्षर

## श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज


# माझी मानसपूजा

तेजो **श्री** स्वामिजी । यतिवरा, योगेश्वरा, गुरूवरा । आनं **दि** भावे मी पूजितो ।
काया **वा** चा, मने । प्रथम अर्पितो हे निर्मल जल । जणू **गं** गा जलस्नान तुम्हा ।
घ्यावी **सु** वासिक फुले । गंध न् मंत्रोमय अक्षता । वस्त्र **ब** रवेहे शोभे भारी ।
आतां **दे** वा ल्यावे भस्म । हे पवित्र, विराजित होण्या । स्विका **रा** रा वे हे सुखासन ।
विसां **वा** घ्या थोडासा । अर्पितो श्रद्धा भक्तिचा नैवेद्य । प्रमो **दि** त मने तुम्हा ।
ब्रह्मा **नं** दी पावलो मी । करितो प्रेमभावे पंचारती । हासु **गं** धी धूप ज्वलनी ।
निना **द** हा घंटिचा, । शंख करी 'सोऽहं' ललचारी । सदा **ब** रसे मंम चित्ती ।
सेवा **स** हवास लाभे । आनंद आमुचा वर्धितसे । गुरू **रा** या कृपा करा ।
अवि **र** त वंदितो मी तव ।-चरणी, स्विकारावी प्रदक्षिणा । तसे **श्री** फल, दक्षिणा ।
सर्व **स्व** वाहिले तुमच्या । पायी, अपराधा क्षमा करा । आता **पा** लन करा आम्हा ।
विनं **ती** गुरूराया । समर्पितो माझी कृश काया । असो **द** या कृपा सदा ।
गुरू **स्वा** मी तुम्ही । चुकले, माकले क्षमा करावी । हीत **व** चरणी प्रार्थना ।
दास **मी** पाडस तुमचा । बघता माऊलीकडे सदा । प्रफु **ल्ल** मनी मी होई ।
हाती **म** ला उचलावे । जवळी एकदा घ्यावे । सुल **भ** दिशा दाखवा ।
असो **हा** वरद हस्त । मम मस्तकी, पाठी स्पर्श । सदो **दि** त रहावां ।
आधा **रा** ने तुमच्या । झालो या जीवनी कृतार्थ । सदा **गं** धति राहे मी ।
करी **ज** जय जयकार । तुमचा, महामंत्र अजपी । अज **ब** सामर्थ्य त्यांते ।
ॐ **नमः** स्वामिजी । स्विकारावी माझी मानसपूजा । उद्धा **रा** वे सकळां ।

प्रत्येक ओळीतील पहिल्या चरणातील तिसरे अक्षर एकापाठोपाठ पहातां
**" श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज नमः "**
आणि प्रत्येक ओळीतील तिसऱ्या चरणांतील तिसरे अक्षर एकापाठोपाठ पहाता
**" दिगंबरा दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा "**
हा महामंत्र तयार होतो.

**प्रा. द. श्री. सबनीस**, सांगली






संकल्प सिध्दीचे समर्थ

श्री वासुदेव पत्रबोध संग्रहाची - संकल्प सिध्दी -
प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज यांच्या कृपाबलाने झाली.

REGD. BY: REGISTRAR OF NEWSPAPERS: REGD. NO. R. N. 31921 / 77



प. प. श्री टेम्बे स्वामी महाराज

श्री वासुदेव पत्रबोध संग्रह या ग्रंथातील ही पत्रे म्हणजे
श्रीस्वामींनी लिहून ठेवलेली दैनंदिनी आहे.
हे श्रींचे अधिकृत आत्मचरित्र आहे. ही एक संग्रहगाथा आहे.
नवा नवा आशय जाणवून आपली श्रध्दा दुणावेल व
आपल्या जीवनातील क्षण सोन्याचे होऊन जातील.

श्री वासुदेव निवास प्रकाशन, पुणे ४.